


# महाराष्ट्राचे शिल्पकार

# वसंतदादा

राजा माने

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

महाराष्ट्राचे शिल्पकार

# वसंतदादा

राजा माने

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

अनुक्रमणिका

- प्रथमावृत्ती : नोव्हेंबर २०११
  महाराष्ट्राचे शिल्पकार क्र. ३३
- प्रकाशक :
  सचिव,
  महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
  मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय इमारत,
  १७२, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय मार्ग,
  दादर, मुंबई ४०० ०१४


© प्रकाशकाधीन


- मुद्रक :
  व्यवस्थापक,
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
  ताराबाई पार्क, कोल्हापूर ४१६ ००३

- मुखपृष्ठ : पोरे ब्रदर्स, सोलापूर
- मांडणी : सचिन पाटील (मारुल हवेली)

- किंमत : रु. ६३·००


या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

## अनुक्रमणिका

# अध्यक्षांचे निवेदन

पद्मविभूषण स्व. वसंतदादा पाटील हे आधुनिक महाराष्ट्राचे खऱ्या अर्थाने शिल्पकार म्हणता येतील असे एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व होते. स्व. यशवंतरावजी चव्हाण यांच्या काळात भारतीय स्वातंत्र्यलढ्यामध्ये ज्या सेनानींनी सक्रिय भाग घेतला, देहदंड सोसला आणि परकीय सत्तेचा निकराने मुकाबला केला अशा थोर लढवय्यांपैकी वसंतदादा पाटील हे होते. ब्रिटिशांच्या काळात त्यांनी स्वातंत्र्यासाठी संघर्ष केला आणि स्वातंत्र्योत्तर काळात नवमहाराष्ट्राच्या सुदृढ रचनेसाठी अविश्रांत प्रयत्न केले. सामान्य परिस्थितीमध्ये जन्म घेतलेल्या वसंतदादा पाटील यांना जन्मजात बुद्धिमत्ता आणि दूरदृष्टी यांचे वरदान लाभले होते. कुमारवयातच स्वातंत्र्यसैनिक म्हणून काम करू लागल्यामुळे ग्रामीण भागातील जनमानसाचा अचूक अंदाज त्यांना येत असे. ग्रामीण भागात कार्यकर्ता म्हणून काम करताना त्यांनी अफाट लोकसंग्रह केला, समाजाचा विश्वास संपादन केला आणि अंगभूत समंजसपणाने लोकसंघटन करून एक व्यापक सामाजिक दृष्टी प्राप्त करून घेतली. कृषी व सहकार क्षेत्रांमध्ये त्यांनी अतुलनीय कार्य केले. राजकारणामध्ये स्व. यशवंतरावजी, वि. स. पागे, वसंतरावजी नाईक, आदी धुरिणांबरोबर काम करून नव्या महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये मोठा हातभार लावला. संपन्न व सुदृढ महाराष्ट्र हे या सर्वांचे स्वप्न होते. आजचा महाराष्ट्र हा त्या स्वप्नाची परिपूर्ती आहे असे म्हणावे लागेल. महाराष्ट्राचे शिल्प घडविताना या साध्यासुध्या, मराठमोळ्या सह्याद्रीच्या पुत्राने ‘कार्यकर्ता ते मुख्यमंत्री’ या प्रवासामध्ये जी कामगिरी बजावली, ती इतिहासामध्ये पुसता न येणारी अशी आहे.

अशा या महाराष्ट्राच्या सच्च्या शिल्पकाराचे चरित्र श्री. राजा माने यांच्यासारख्या सव्यसाची लेखक, पत्रकाराकडून लिहवून घेता आले, याचा महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाला आनंद वाटतो. स्व. वसंतदादा पाटील यांच्या या चरित्रामुळे महाराष्ट्राच्या भावी पिढ्यांना चैतन्यशील प्रेरणा मिळत राहील, असा मला विश्वास वाटतो.

स्थळ : मुंबई
दि. १२ ऑक्टोबर २०११

**मधु मंगेश कर्णिक**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

अनुक्रमणिका

# लेखकाचे मनोगत

१९७२ चा भीषण दुष्काळ... मी ११ वर्षांचा असेन... माझी आई जिला आम्ही 'अक्का' म्हणतो, ती बार्शीच्या तळ्यावरील रोजगार हमीवर काम करायची... जवळच असलेल्या बाभळीच्या झाडाला लहान भाऊ झोळीत लटकलेला असायचा... त्याच तळ्याच्या कामावर मोठा भाऊ दही विकायचा, तर मी गोळ्या विकायचो... अक्काला रोजगार आठवड्याला मिळायचा... तोही मामलेदार कचेरीवर रांग लावून... रांगेत अक्काचा नंबर रात्री-अपरात्री लागायचा... मजुरांचा लेकरा-बाळांसह तहसीलदार कचेरी परिसरात अक्षरशः तळ पडायचा. नंबर लागला की, अक्का पगार घेऊन यायची. कधी १२ रु. ३५ पैसे, तर कधी १६ रु. १० पैसे! अक्काच्या हातातील ते पैसे बघून आमच्या हाती खजिना लागल्याचा आनंद व्हायचा. त्याच आनंदात एकदा अक्काला मी विचारले, 'आपल्याला हे पैसे कोण देतं?' अक्का म्हणाली, 'सरकार!' पुन्हा माझा प्रश्न, 'सरकार म्हणजे कोण?' अक्का माझा प्रश्न ऐकून गोंधळात पडली अन् थोडा वेळ गप्पच राहिली; पण माझे विचारणे चालूच राहिले... 'आपल्याला पैसे कोण देतं?' शेवटी अक्का पटकन म्हणाली, 'सांगलीचं दादा!' मी पुन्हा विचारलं, 'हे दादा कोण?' माझ्या त्या प्रश्नाला अक्का फक्त 'दादा... दादा' एवढंच उत्तर देऊ शकली; पण ते उत्तर माझ्या हृदयावर कोरलं गेलं. जसजसा मोठा होत गेलो, तसे माझ्या प्रश्नाचे उत्तर मला आपोआपच मिळू लागले. पुढे शिक्षणाच्या निमित्ताने कोल्हापुरात आल्यानंतर तर दादांची महती अनुभवायलाच मिळाली आणि आपसुकपणे 'वसंतदादा' या व्यक्तिमत्त्वाशी आपुलकीचे आणि जिव्हाळ्याचे अनामिक नाते निर्माण झाले. दादांशी काडीचाही संबंध नसलेले; पण दादांशी असे नाते असलेले माझ्यासारखे किती बरे अनामिक असतील? त्याच नात्यामुळे वसंतदादा पाटील या महाराष्ट्राच्या शिल्पकाराच्या जीवन वाटचालीवर प्रकाश टाकण्याची संधी मला मिळणे हे माझे भाग्यच!

वसंतदादांचा जीवनकार्यकाल हा देशाच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक क्षेत्रांतील परिवर्तनाचा काळ होता. त्या परिवर्तनाला सामोरे जाताना समाजहित आणि बदलत्या काळाची मागणी यांची अचूक सांगड घालून भविष्याचा वेध घेणे, हे खूप मोठे आव्हान होते. हे आव्हान पेलण्यात ते यशस्वी झाले आणि म्हणूनच लोकांच्या हृदयसिंहासनावर 'दादा' ही उपाधी प्राप्त करून ते राज्य करू शकले. स्वातंत्र्यपूर्व काळात देशप्रेमाने झपाटलेला आक्रमक, कठोर, धाडसी आणि छातीवर इंग्रजांच्या गोळ्या झेलणारा क्रांतिकारक, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लोककल्याणाशी स्वतःची नाळ जोडून विकासाची नवनवी दालने शोधण्यासाठी सतत धडपडणारा संयमी समाजसेवक, स्वातंत्र्यानंतरच्या प्रारंभीच्या काळात देशाच्या व महाराष्ट्राच्या राजकारणाला 'नवा चेहरा' प्राप्त होत असताना स्वतः सत्तेत वाटेकरी न राहता विकास आणि पक्षसंघटना सामर्थ्यशाली बनविण्यासाठी जिवाचे रान करणारा सच्चा कार्यकर्ता आणि त्यानंतरच्या काळाने जन्माला घातलेल्या सत्ता आणि राजकारणातील नव्या संस्कृतीत स्वतःची आणि महाराष्ट्राची 'अस्मिता' जतन करणारा कणखर, मुरब्बी आणि दिलदार राजकारणी... सार्वजनिक जीवनातील अशा विविध भूमिकांना दादांनी पुरेपूर न्याय दिला. तो देत असताना दुटप्पीपणा आणि कावेबाजपणाला त्यांनी आपल्या स्वच्छ आणि खुल्या राजकारणाच्या आसपासही फिरकू दिले नाही. त्याच कारणाने आपले बंधुतुल्य मित्र, नेते आणि लाडके 'साहेब' यशवंतराव चव्हाण, इंदिरा गांधी आणि राजीव गांधींसारख्या नेत्यांशी ज्या-ज्या वेळी संघर्षाचे प्रसंग उद्भवले, त्या-त्या वेळी ते त्या प्रसंगांना सहज आणि यशस्वीपणे सामोरे जाऊ शकले. १९७८-७९ हे वर्ष महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात 'पाठीत खंजीर खुपसणे' या वाक्प्रचाराने गाजविले! प्रत्यक्ष दादांनी मात्र स्वतः त्या वाक्प्रचाराचा कधीही आणि कुठेही प्रयोग केला नाही. एकूणच, संघर्ष आणि मतभेद बाजूला ठेवून आणि प्रेम, आपलेपणा व विश्वासाने बेरजेच्या राजकारणाची कास त्यांनी आयुष्यभर धरली.

अनुक्रमणिका

सहकार, कृषी, उद्योग आणि शिक्षण क्षेत्रांत क्रांतिकारी कार्य उभे करीत असताना सामान्य माणसांशी असलेले जिव्हाळ्याचे नाते कधीही ढळणार नाही, याची काळजी त्यांनी जीवनाच्या शेवटच्या क्षणापर्यंत वाहिली. त्यांच्या संपूर्ण कार्यावर प्रकाश टाकणे ही बाब सोपी नाही, याची जाणीव ठेवूनच मी या छोटेखानी चरित्रग्रंथाच्या लेखनास प्रारंभ केला. दादांच्या परिवारातील सर्व सदस्य आणि त्यांच्यावर श्रद्धा असणाऱ्या अनेक चाहत्यांनी मला संदर्भ संकलनात मदत केली. त्या सर्वांचा मी ऋणी आहे. दादांचा सहवास लाभलेले हजारो लोक आहेत. त्या सर्वांच्या भावनांना प्रातिनिधिक स्वरूपात घेतलेल्या मुलाखतींच्या माध्यमातून स्थान देण्याचा मी प्रयत्न केला आहे. अनवधानाने एखाद्या संदर्भातील नामोल्लेख राहिला असेल तर तो माझा दोष पदरात घ्यावा, ही विनंती.

या चरित्रग्रंथासाठी प्रेरणा आणि प्रोत्साहन देणाऱ्या महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष मधु मंगेश कर्णिक, सचिव सुरेश वांदिले, 'लोकमत' माध्यम समूहाचे अध्यक्ष खासदार विजय दर्डा, कार्यकारी संचालक देवेंद्र दर्डा, सहकार्यकारी संचालक ऋषी दर्डा, संचालक करण दर्डा, समूह संपादक दिनकर रायकर आणि 'लोकमत' परिवारातील सर्व सदस्यांचा मी ऋणी आहे.

मला घडविणारे बापू (वडील) ज्ञानोबा माने, अक्का (आई) अनुसयाबाई आणि या लेखनकार्यात मदत करणारी पत्नी सौ. मंदा, कन्या कु. शिल्पा, बंधू भगवान व त्याचीपत्नी मनीषा यांचा नामोल्लेख आवर्जून करणे हे मी माझे कर्तव्य समजतो. ग्रंथनिर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावणारे कोल्हापूर शासकीय मुद्रणालयाचे व्यवस्थापक उल्हास सावंत, सहायक व्यवस्थापक संतोष ढवळे आणि पुणे येथील फोटोझिंको मुद्रणालयाचे व्यवस्थापक रूपेंद्र मोरे यांचे आभार!

**राजा माने**
'शिल्पाक्षर', आनंद स्वरूप पार्क,
यशवंत कॉलनी, कसबा बावडा, कोल्हापूर.

अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका

अध्यक्षांचे निवेदन ........ ४

लेखकाचे मनोगत ........ ५

जीवनाचे तत्त्व ........ १०

लढवय्या बाणा ........ १०

-करेंगे या मरेंगे!◦ ........ ११

... आणि सांगली तुरुंग फोडला ........ १२

करवीरनगरीत जन्म ........ १६

चहा सोडला ........ १७

ग्रामविकासातील पहिले पाऊल ........ २०

झपाटलेला काळ ........ २२

बिसूरचा सत्याग्रह ........ २४

भूमिगतांचा झंझावात ........ २७

भूमिगतांचा अड्डा ........ ३०

सर्वजण सांगलीला परतले ........ ३२

पोलिसांना गुंगारा ........ ३३

दादा तुरुंगात ........ ३५

तुरुंगफोडीचा थरार ........ ३६

येरवड्यातून सुटका ........ ३९

विधायक वळण ........ ४१

स्वातंत्र्यानंतरची प्रतिज्ञा ........ ४३

सांगली जिल्ह्याची निर्मिती ........ ४४

विधायक राजकारणाची मुहूर्तमेढ ........ ४८

शालिनीताईंची पहिली भेट ........ ५२

शेतीचे अर्थकारण ........ ५३

सहकार चळवळ ........ ५६

पाण्याचे नियोजन ........ ६०

कृषि उद्योग........................................................................................ ६२
सहकारी औद्योगिक वसाहत ........................................................................ ६३
कृषिउद्योगांची मालिका.............................................................................. ६५
पहिले भाषण ........................................................................................... ६६
शालिनीताईंशी विवाह................................................................................ ६९
साखर कारखानदारीला दिशा...................................................................... ७१
अनेक संस्थांचे मार्गदर्शक .......................................................................... ७२
शामरावदादांचे निधन ................................................................................ ७४
आंतरराष्ट्रीय पातळीवर गौरव ...................................................................... ७६
काँग्रेसमध्ये अस्वस्थता .............................................................................. ७८
मालतीताईंचे निधन.................................................................................... ७९
प्रदेशाध्यक्षपदाचा प्रभाव............................................................................... ८०
पाटबंधारे मंत्रिपदाची धुरा ........................................................................... ८१
राजारामबापूंशी तात्त्विक मतभेद .................................................................... ८३
स्वामी रामानंद भारतींचे निधन ..................................................................... ८४
पाटबंधारे क्षेत्रास दिशा ................................................................................ ८४
संघटन कौशल्याची छाप ............................................................................. ८५
काँग्रेस ऐक्यासाठी प्रयत्न ............................................................................. ८७
शरद पवारांचे बंड...................................................................................... ८९
काँग्रेस ऐक्यासाठी प्रयत्न ............................................................................. ९१
राजकारण संन्यास...................................................................................... ९२
पहिल्यांदा मुख्यमंत्री.................................................................................... ९४
तंत्रशिक्षणाचे ऐतिहासिक धोरण.................................................................... ९७
कृष्णा खोऱ्याचा विकास.............................................................................१००
इंदिरा गांधी व यशवंतरावांचे निधन..............................................................१०१
शालिनीताई महसूलमंत्री ............................................................................१०२
पुन्हा मुख्यमंत्रिपद ...................................................................................१०५

राजस्थानचे राज्यपाल ....................................................................................११०
माणसांचे मोहोळ आणि हळवा स्वभाव ..............................................................१११
नामदेवराव कराडकर ......................................................................................११२
शैलजा वहिनी ...............................................................................................११३
मदन पाटील ...................................................................................................११४
प्रतीक पाटील..................................................................................................११५
यशवंत हाप्पे...................................................................................................११६
डॉ. डी. वाय. पाटील .......................................................................................११७
प्राचार्य पी. बी. पाटील ..................................................................................... ११८
डॉ. पतंगराव कदम .........................................................................................११९
विलासराव देशमुख..........................................................................................११९
सुशीलकुमार शिंदे ...........................................................................................१२१
विजयसिंह मोहिते-पाटील.................................................................................१२१
आर. आर. पाटील (आबा)..................................................................................१२२
जयंत पाटील ..................................................................................................१२४
बा. द. खराडे ..................................................................................................१२४
खासदार विजय दर्डा.........................................................................................१२६
दिनकर रायकर ............................................................................................... १२८
अखेरचे दिवस ................................................................................................१२९

## जीवनाचे तत्त्व

‘जेल फोडून, हातात बंदूक घेऊन मी पुढे पळत होतो... तो एक साक्षात्कारी क्षण... माझ्यापाठोपाठ पळत असलेले माझे सहकारी... त्या दिवशी सकाळीच मोठा पाऊस पडून थांबला होता. कृष्णा नदी पुराच्या नव्या पाण्याने तुडुंब भरून वाहत होती. मी पुढे पळत असताना माझ्यापाठोपाठ वेड्यासारखे पळणारे अण्णासाहेब पत्रावळे, बाबूराव जाधव आणि इतर सहकाऱ्यांची होणारी ससेहोलपट पाहून माझ्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहत होत्या... संस्थानचे बंदूकधारी पोलीस घोड्यावरून आमचा पाठलाग करीत होते... गोळीबार करीत होते... नदीच्या पात्रातून होड्यांमधूनही पोलिसांचा आमच्यावर गोळीबार सुरूच होता... तरीही आम्ही जीवाची पर्वा न करता, उरात हिंमत बाळगून, छाती फुटेपर्यंत पळतच होतो... त्यात अण्णासाहेब पत्रावळे पोलिसांच्या गोळीला बळी पडले... बाबूराव जाधवनी नदीत उडी घेतली... पण नदी पार करीत असतानाच पोलिसांनी त्यांना बंदुकीच्या गोळीने पाण्यातच माशासारखे वरच्या वर टिपले! माझा बाबू पाण्यातच धडपडला!! त्याचे लालभडक प्रेत कृष्णेच्या पाण्याबरोबर खाली वाहत गेले... माझ्या काळजाची आग झाली... मी हे काय पहतोय? माणसं कशासाठी अशी निकराची झुंज देताहेत... ?

मी कधी एकटा असलो की, मला बाबूराव जाधव आठवतात. मग मी झटकन उठतो आणि स्वतःला कुठल्यातरी कामात गुंतवून ठेवतो. अण्णासाहेब पत्रावळेंचा चेहरा माझ्यासमोर आला की, मी थरथरतो! मला काही सुचतच नाही. मग मी माणसांच्या गर्दीत मिसळतो. कातडीवर झालेली जखम दिसते. ती मलम लावून बरी करता येते; पण मनाच्या काळजालाखोलवरझालेल्या जखमा कोणालाही दिसणार नाहीत. मला मात्र त्या बेचैन करतात; म्हणून मी एकटा राहत नाही. माझ्याभोवती सतत माणसांचा गराडा असतो असे म्हणतात; पण खरे सांगू, याबाबतीत मी स्वार्थी आहे! कामाच्या गर्दीत मी असा काही बुडून जातो की, मनातील जखमा कधी विसरतात हे मलाही कळत नाही. विश्वासू माणसांच्या संगतीत सदैव विधायक कार्य करीत राहणं, हा उरातल्या जीवघेण्याजखमांवरचा रामबाण उपाय आहे. हा उपाय मी केला आणि विधायक कार्यात पडलो... मी खरं बोलणारा माणूस आहे. माणसानं खरं बोलावं... मी वसंतदादा पाटील... ! म्हणजे अण्णासाहेब पत्रावळे, बाबूराव जाधव आणि माझ्याइतर सहकाऱ्यांचे अपुरे राहिलेले काम तडीस नेण्यासाठी काळाने चमत्कार म्हणून त्यांचा एक सवंगडी, एक वेडा क्रांतिकारक म्हणूनच मला मागे ठेवले... १९४६ मध्ये जेलमधून बाहेर पडताना मी विधायक कार्य करायचं ठरवलं. ते माझ्या या सर्व त्यागी सहकाऱ्यांच्या आत्म्याची शपथ घेऊनच! का... ? तर माझ्या विश्वासाखातर ते माझ्या मागोमाग येत होते. माणसं शब्दांवर विश्वास ठेवतात. प्राण गेला तरी विश्वास गमावत नाहीत... ’

... हे होतं यशवंत ऊर्फ वसंत बंडूजी पाटील... अर्थात वसंतदादांच जीवनतत्त्वज्ञान! या तत्त्वाशी इमान राखण्यासाठी ते आयुष्यभर झगडले. पद्माळ्यापासून सुरू झालेल्या त्यांच्या याप्रवासात मुंबई, दिल्ली, जयपूर असे कितीतरी टप्पे आले; पण त्यांनी प्रत्येक टप्प्यावर, प्रत्येक वळणावर हे जीवन तत्त्वज्ञान उराशी घट्ट धरले होते!

## लढवय्या बाणा

स्वातंत्र्यसंग्रामाचा तो काळ. १ सप्टेंबर १९३९ रोजी जर्मनीने पोलंडवर आक्रमण केले. हिंदुस्थानावर राज्य करणाऱ्या इंग्लंडने फ्रान्सला सोबत घेऊन जर्मनीविरूद्ध युद्ध पुकारले आणि दुसऱ्या

अनुक्रमणिका

महायुद्धाला प्रारंभ झाला. ३ सप्टेंबर १९३९ रोजी व्हाईसरॉय लिनलिथगो यांनी हिंदुस्थानही युद्धात सामील झाल्याची एकतर्फी घोषणा केली. इंग्रजांच्या या निर्णयामुळे देशभर संतापाचे वादळ उठले. युद्धविरोधी सत्याग्रहासाठी देश सज्ज झाला.

मार्च १९४० मध्ये युद्धविरोधी भाषणाबद्दल जयप्रकाश नारायण यांना अटक झाली. त्याच महिन्यात नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी बिहारमधील रामगड येथे 'साम्राज्यवाद' विरोधी परिषद घेतली. एप्रिल १९४० मध्ये डॉ. राममनोहर लोहिया यांना, तर जुलैमध्ये सुभाषबाबूंना अटक झाली. ११ ऑक्टोबर १९४० रोजी वैयक्तिक सत्याग्रहाची घोषणा केली. महात्मा गांधींनी पहिले सत्याग्रही म्हणून आचार्य विनोबा भावे यांची निवड केली. सत्याग्रही म्हणून दुसरे नाव होते, पंडित जवाहरलाल नेहरू यांचे! १७ ऑक्टोबर १९४० रोजी विनोबा भावे यांनी पवनारमध्ये सत्याग्रह मोहिमेला प्रारंभ केला. तिसरे सत्याग्रही ब्रह्मदत्त शर्मा यांनी सेवाग्रामला सत्याग्रह केला; पण पंडित नेहरूंना सत्याग्रहापूर्वीच इंग्रजांनी अटक केली आणि चार वर्षांची शिक्षा ठोठावली. गोऱ्यांविरोधात देशभर असंतोष पसरला. महात्मा गांधींनी वैयक्तिक सत्याग्रहाची व्याप्ती देशभर वाढविण्याचा निर्णय घेतला. १९४० व १९४१ मध्ये महात्मा गांधींनी वैयक्तिक सत्याग्रहाचे आंदोलन गतिमान केले. महाराष्ट्रातही महात्मा गांधींनी अनेक सत्याग्रहींची निवड केली होती. त्यात एक होते, सातारा जिल्ह्यातील सांगली संस्थानातील पद्माळे या गावचे वसंतराव बंडूजी पाटील ! वसंतरावांनी तत्कालीन बिसूर या गावी वैयक्तिक सत्याग्रह केला आणि स्वतःला अटक करवून घेतली.

## 'करेंगे या मरेंगे!'

दुसरे महायुद्ध धगधगत असताना १९४२ साल उजाडले. महायुद्धाचा भडका दक्षिणपूर्व आशिया खंड पार करून हिंदुस्थानाच्या उंबरठ्यावर येऊन ठेपला. जपानी आक्रमण हिंदुस्थानी सीमांकडे सरकू लागले. युद्धपरिस्थिती चिंताजनक बनत चालली होती. अशा परिस्थितीत स्वातंत्र्यलढा निर्णायक वळणापर्यंत पोहोचला पाहिजे, असे काँग्रेस नेत्यांना वाटू लागले. नेताजी सुभाषचंद्र बोस देशाबाहेर जाऊन भारतीय स्वातंत्र्यासाठी 'आझाद हिंद सेना' बांधत होते. जयप्रकाश नारायण तुरुंगात होते, तर देशभरातील काँग्रेसवाद्यांनी इंग्रज राजवटीविरोधात उग्र लढ्याचा आग्रह धरला होता. महात्मा गांधी या परिस्थितीवर चिंतन करत होते आणि त्यांना मार्ग सापडला... 'करेंगे या मरेंगे' चा नारा देशभर दुमदुमला!

शुक्रवार, ७ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईत गोवालिया टँक मैदानावर काँग्रेसचे ऐतिहासिक अधिवेशन सुरू झाले. देशभक्ती आणि स्वातंत्र्यप्राप्तीने झपाटलेल्या सुमारे दहा हजार स्वातंत्र्यसेनानींच्या साक्षीने मौलाना आझाद यांचे शंभर मिनिटांचे भाषण झाले. ८ ऑगस्ट १९४२ हा काँग्रेस महासमितीच्या अधिवेशनाचा दुसरा दिवस होता. महात्मा गांधी भाषणास उठले. '... एकतर काँग्रेस स्वातंत्र्य मिळवील, नाहीतर नष्ट होईल... करेंगे या मरेंगे!' असा आपल्या भाषणाचा त्यांनी समारोप केला आणि हात जोडून ते काही मिनिटे स्तब्ध उभे राहिले. सभागृह शांत झाले. अनेकांच्या अंगावर रोमांच उभे राहिले.

त्या भाषणानंतर पंडित नेहरूंनी 'छोडो भारत' चा ठराव मांडला. सरदार वल्लभभाईपटेल यांनी त्याला अनुमोदन दिले. स्वातंत्र्यलढ्याने आक्रमक आणि निर्णायक वळण घेतले. प्रत्येकजण पेटून उठला. 'वंदे मातरम्', 'करेंगे या मरेंगे', 'चले जाव' च्या घोषणांनी आसमंत दुमदुमला. अधिवेशनाच्या ठिकाणीच महात्मा गांधींचे जाहीर भाषण होणार होते; परंतु पोलिसांनी महात्मा गांधी, वल्लभभाई पटेल, पंडित नेहरू, मौलाना आझाद यांना अटक करून वेगवेगळ्या तुरुंगात हलविले. त्यामुळे त्या ठिकाणी भाषणासाठी कोणी

अनुक्रमणिका

नेते उरले नव्हते. महात्मा गांधीजींचे भाषण होणार म्हणून हजारो देशभक्तांनी अधिवेशनस्थळी गर्दी केली होती. अखेर त्या सर्वांसमोर अरुणा असफअली यांनी व्यासपीठावर येऊन तिरंगा झेंडा फडकवला आणि जोशपूर्ण भाषणास प्रारंभ केला, तोच पोलीसांनी लाठीमार सुरू केला. अश्रुधुराची नळकांडी फोडली. त्यामुळे एकच गोंधळ उडाला. लोक धावत सुटले. पोलिसांनी धरपकड सुरू केली. या अधिवेशनात देशभरातील क्रांतिकारक सहभागी झाले होते. त्यामध्ये वसंतराव बंडूजी पाटील आणि त्यांचे सहकारी होते. त्यानंतर त्याच रात्री ते सर्व क्रांतिकारक आपापल्या भागांत पोहोचले. महात्मा गांधी आणि इतर नेत्यांच्या अटकेची वार्ता दुसऱ्या दिवशी सकाळीच देशभरातील घराघरांत पोहोचली होती. इंग्रज साम्राज्याच्या विरोधात संतापाची लाट उसळली. 'चले जाव'... 'भारत छोडो', 'करेंगे या मरेंगे' अशा घोषणा गावोगावी घुमू लागल्या.

## ... आणि सांगली तुरुंग फोडला

महात्मा गांधींचा तोच संदेश घेऊन पेटून उठलेले वसंतराव आपल्या साथीदारांसह सांगलीला परतले. भूमिगत राहून, 'पेटा व पेटवा' हा मंत्र घेऊन त्यांनी आपल्या लढ्यास प्रारंभ केला. पद्माळे गावातील एका मळीतील छप्पर हे आंदोलन लढ्याचे केंद्र बनले. तिथूनच क्रांतीच्या प्रत्येक पावलाची दिशा ठरविली जायची. वसंतरावांनी इंग्रजांच्या विरोधात भूमिगत लढा उभारला. रेल्वे स्टेशन्स जाळणे, टेलिफोनच्या तारा तोडणे, रेल्वेगाडी रुळांवरून घसरविणे, चावड्या, पोलीस चौक्यांवर हल्ले करणे, या सर्व कामांसाठी पैसा व शस्त्रे जमविण्यासाठी इंग्रजांच्या मालमत्तेवर तसेच सावकारांच्या घरांवर दरोडे टाकणे अशा मोहिमा त्यांनी राबविल्या. हे क्रांतियुद्ध सुरू असतानाच पोलीसांनी सांगली शहरातील खणभागातील फौजदार गल्लीत सापळा रचून त्यांच्या खोलीवर छापा टाकला आणि वसंतराव व त्यांच्या सहकाऱ्यांना अटक केली. त्यांना सांगली संस्थानाच्या तुरुंगात ठेवण्यात आले.

सांगली संस्थानच्या तुरुंगात वसंतरावाना स्वतंत्र खोलीत ठेवण्यात आले होते. त्यांच्या हालचालींवर अधिकारी व पोलिसांची बारीक नजर होती. स्वातंत्र्यसंग्रामाच्या अनेक लढाया बाहेर चाललेल्या असताना आपण तुरुंगात सडत राहणे वसंतरावांना त्रासाचे वाटत होते. काहीही करावे आणि तुरुंगाच्या बाहेर जाऊन क्रांतियुद्धाचा लढा लढत राहावा, असेच त्यांना सतत वाटत राहायचे. त्यातूनच तुरुंगातून पळून जायचा विचार आला. तुरुंगाची रचनाही आव्हानात्मक आणि पळून जाण्याचा प्रयत्न केला, तर जिवावर बेतायला लावणारी अशीच होती. तुरुंगाच्या भोवताली वीस फुटांहून अधिक उंचीचा तट होता. तटाच्या बाहेरील बाजूने खंदक होता. तुरुंगाच्या दक्षिणेला घोड्यांचा रिसाला, पश्चिमेला पोलीस ठाणे, पूर्वेला पोलिसांची निवासस्थाने होती. त्यामुळे तुरुंग फोडणे हे मृत्यूला आमंत्रण देण्यासारखे होते. तरीही वसंतरावांनी तुरुंग फोडण्याचा चंग बांधला. तुरुंगातील इतर क्रांतिकारकांशी संवाद साधण्यासाठी त्यांनी सांकेतिक भाषा तयार केली. त्या भाषेद्वारे एकमेकांशी संवाद साधला जाऊ लागला. संवादातून तुरुंग फोडण्याचा आराखडा तयार झाला. तुरुंगाच्या तटावरील शस्त्रधारी पहारेकरी आणि तुरुंगात असणाऱ्या इतर पोलिसांशी लढूनच ही मोहिम यशस्वी करावी लागणार, याची जाणीव दादा व त्यांच्या सर्वसहकाऱ्यांना झाली होती. जे काही करायचे ते अवघ्या दहा मिनिटांतच करायचे आणि पोलिसांशी लढत पळून जायचे असे ठरले. अण्णासाहेब पत्रावळे व बाबूराव जाधव हे स्थानबद्ध कैदी असल्यामुळे ते तुरुंगामध्ये मुक्तपणे वावरू शकत होते. वसंतरावांना मात्र दिवसातून दोनवेळा शौचासाठी पहारेकऱ्यांच्या बंदोबस्तात बाहेर आणले जायचे व पुन्हा खोलीत बंद केले जायचे. पत्रावळे व जाधव तुरुंगात मोकळे असल्याचा नेमका उपयोग करण्याचा निश्चय वसंतरावांनी केला. शौचाच्या निमित्ताने बाहेर पडलेल्या इतर

सहकाऱ्यांनी शौचालयातूनच एकमेकांशी संवाद साधला. सांतेतिक भाषेमुळे तो संवाद सातत्याने सुरूच राहिला.

इकडे बेकायदेशीर शस्त्रसाठा करणे आणि इतर गुन्ह्यांखाली वसंतरावांच्या विरोधात सांगली संस्थानाच्या न्यायाधीशांपुढे खटला चालू होता. वसंतरावांच्या बाजूनेकायदेपंडित ॲडव्होकेट ज. वा. पाटणकर यांनी वकीलपत्र घेतले होते. वसंतराव कसे गुन्हेगार आहेत, हे सिद्ध करण्यासाठी पोलिसांनी अनेक पुरावे सादर केले होते. ॲड. पाटणकरांनीही वसंतरावांची बाजू भक्कमपणे मांडण्याचा प्रयत्न केला होता. खटल्याचे काम तब्बल एक महिना चालले आणि २४ जुलै १९४३ रोजी खटल्याचा निकाल लागणार असल्याचे घोषित झाले. तुरुंगातील एक महिन्याच्या वास्तव्यात वसंतराव आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी तुरुंग फोडण्याच्या अनेक युक्त्या चर्चिल्या होत्या. त्या प्रत्यक्षात उतरायला मात्र संधीची आवश्यकता होती. खटल्याचा निकाल ज्या दिवशी जाहीर होणार होता, तो दिवस शनिवारचा होता. शनिवार हा सांगलीचा आठवडी बाजाराचा दिवस. योगायोगाने वसंतरावांचे वकील पाटणकर यांचे सेशन कोर्टात विशेष काम निघाल्याच्या कारणावरून निकालाची तारीख पुढे ढकलली. त्यामुळे शनिवारऐवजी सोमवारी निकाल लागणार होता. वसंतरावांना मात्र निकाल माहीतच होता! पुन्हा तुरुंगात येऊन खितपत पडण्याऐवजी तुरुंग फोडणे हाच पर्याय त्यांना योग्य वाटत होता.

आठवडी बाजाराचा दिवस असल्याने तुरुंगातील काही कर्मचाऱ्यांना बाजाराची ओढ लागली होती. आदल्या दिवशी रात्री वसंतरावांनी आपल्या सहकाऱ्यांना नियोजन कळविले होते. तुरुंगातील शौचालय आणि तिथून कसे पळायचे, याचा आराखडा सर्वांच्या मनात पक्का झालेला होता. हिंदुराव पाटील या सहकाऱ्याने आपल्या खोलीकडे जाताना ‘आज पत्रावळेच्या लग्नाला जाऊ’ की ‘सिनेमाला जाऊ’ असा सांकेतिक निरोप सर्वांना पाठविला. अण्णासाहेब पत्रावळे, बाबूराव जाधव तयारीला लागले. तुरुंगातील मैदानाच्या मध्यावर अण्णासाहेब पत्रावळे उभे राहिले आणि हातातील रुमाल उंचावून त्यांनी सर्व सहकाऱ्यांना इशारा दिला. वेगवेगळ्या ठिकाणी असलेल्या सर्व क्रांतिवीरांनी त्या-त्या ठिकाणी आपल्याजवळ असलेल्या पोलिसांवर हल्ला चढविला. त्यांची हत्यारे हिसकावून घेतली व सर्वजण हत्यारे व काडतुसे घेण्यासाठी मुख्य ठाण्याकडे धावले. दुपारी २·३० वाजता वसंतराव व हिंदूरावांना शौचासाठी त्यांच्या खोलीतून बाहेर आणले. तुरुंगात केवळ दोनच पहारेकरी होते. शौचाला नेणे आणि त्यानंतर कैद्याला परत त्याच्या खोलीत नेऊन कुलूपबंद करणे, हा पहारेकऱ्यांचा शिरस्ता होता. त्याप्रमाणे वसंतरावांसोबत शौचालयाजवळ पहारेकरीही आला. त्याचवेळी हिंदुराव पाटीलही शौचाचे निमित्त करून तेथे आले. एकूण परिस्थितीचा अंदाज घेऊन जवळ केवळ दोनच पहारेकरी आहेत, याचा फायदा घेऊन हिंदुरावांनी एका पहारेकऱ्यावर हल्ला चढविला. त्याच्या हातातील बंदूक हिसकावून घेतली. लगोलग वसंतरावांनी दुसऱ्या पहारेकऱ्यावर हल्ला करून, त्यालाही जायबंद करून त्याच्याजवळील बंदूक व काडतुसे हिसकावून घेतली व त्याला कोंडले. एकच गोंधळ सुरू झाला. कार्यालय व प्रवेशद्वारावर १५-१६ पोलीस होते. वसंतरावांच्या इतर सहकाऱ्यांना ठरलेल्या योजनेप्रमाणे सगळे घडत असल्याचा अंदाज आला. सर्वजण तुरुंगाच्या मुख्य द्वाराकडेधावू लागले. त्याही परिस्थितीत एक पहारेकरी मुख्य कार्यालयाकडे धावू लागला. ते पाहताच पत्रावळेंनी त्याच्यावर गोळीबार केला. त्यात तो वाचला; परंतु पालथे पडून रांगतच तो तुरुंगाच्या मुख्य कार्यालयाकडे जाण्याचा प्रयत्न करू लागला.

या प्रकारामुळे प्रवेशद्वारावरील पोलीस घाबरले. बंदुका खाली ठेवून त्यांनी आपले हात वर केले. तुरुंगातील घंटीजवळ असलेल्या पहारेकऱ्यावरही हल्ला करून त्यांच्याकडील बंदूक व काडतुसे हिसकावून

घेण्यात आली. तुरुंग कर्मचाऱ्यांना काय चालले आहे, याचा नेमका अंदाज येईना. भांबावलेल्या अवस्थेतच त्यांची धावपळ सुरू झाली. एवढ्यात जिनपाल खोत यांनी बंदुकीचा धाक दाखवून तिथे असलेल्या पोलिसांना दम भरला. 'पुढे याल तर जिवे मारीन', असे त्यांना दरडावत खोत आपल्या इतर सहकाऱ्यांना पुढे निघण्यास सांगत होते. त्यातही गुलाब नावाच्या पोलिसाने बंदूक उचलण्याचा प्रयत्न केला; पण त्याचा प्रयत्न गणपतराव कोळी यांनी हाणून पाडला. गणपतरावांनी गुलाबला बंदुकीच्या ठोशाने आडवे पाडले; पण त्यात बंदुकीचे दोन तुकडे झाले. वसंतराव, गणपतराव कोळी, हिंदुराव पाटील, जिनपाल खोत, बाबूराव जाधव, अण्णासाहेब पत्रावळे, दत्तात्रय पाटील, बाबूराव पाचोरे, सातलिंग शेटे, जयराम कुष्टे, महादेव बुटाले हे सर्वजण तुरुंगाच्या मुख्य दरवाजाजवळ येऊन पोहोचले. गणपतराव व दत्तात्रय पाटील यांनी रायफलींच्या खोलीत जाऊन तिथल्या बंदुका, काडतुसे आणि पोलिसांच्या पिशव्या गोळा करून सर्व क्रांतिकारकांना आणून दिल्या. खांद्याला एक बंदूक आणि हातात एक बंदूक घेऊन सर्वजण १६ बंदुका आणि १८० काडतुसांसह तुरुंगाच्या पश्चिमेच्या तटाकडे धावले.

एव्हाना तुरुंगात चाललेल्या गोंधळाची बातमी रिसाल्यातील पोलिसांना समजल्याने ते सावध झाले होते. त्यामुळे हत्यारी घोडेस्वार खंदकाजवळ जमा झाले. तटावरील क्रांतिकारकांच्या ते लक्षात आले. लगेचच हिंदूराव पाटील यांनी तटावरून गोळीबार केला. हिंदूरावांच्या गोळीबारामुळे घोडेस्वार पांगले व दूर पळाले. तेवढ्यात भारतमातेचा जयजयकार करीत जिनपाल खोत यांनी तटावरून खंदकात उडी घेतली. त्यानंतर वसंतरावांनी उडी मारली. हिंदुराव पाटील यांची उडी खंदकातील पाण्यात पडण्याऐवजी कडेला दगडावर पडल्याने ते जखमी झाले. त्यांचे दोन्ही पाय मोडले. तरीही त्यांचा धावण्याचा प्रयत्न होताच; परंतु त्यातत्यांना यश आले नाही. इकडे तटावर पोलिसांच्या बंदुका गोळा करून आणलेल्या नामदेवराव कराडकर व कृष्णा पेंडसे यांनी त्या बंदुका तटावरून खंदकात फेकून दिल्या आणि ते तुरुंगातील आपल्या खोलीकडे निघून गेले. इतर सर्व क्रांतिकारकांनी खंदकात उड्या टाकल्या. हातात बंदुका घेऊन हवेत गोळीबार करीत आणि 'शिवाजी महाराज की जय' अशा घोषणा देत बाजारातून ते धावत सुटले. त्यांच्या अनपेक्षित हल्ल्याने आक्रमक बनलेले सुमारे १२५ पोलीस व घोडेस्वार त्यांचा पाठलाग करू लागले. लष्कराच्या दोन गाड्याही पाठलाग करू लागल्या. पोलिसांचा गोळीबार चुकवत क्रांतिकारक सांगली शहरातील मारुती मंदिरापासून जुन्या सांगलीतून कृष्णा नदीवरील पुलाकडे धावू लागले. 'तुरुंग फुटला... तुरुंग फुटला...' या चर्चेने सांगलीच्या आठवडी बाजारात खळबळ उडाली. अनेकजण धावू लागले. एव्हाना काही पोलीस धावत, तर काही घोड्यावर बसून कैद्यांचा पाठलाग करू लागले. वसंतराव आणि त्यांचे सर्व सहकारी जीव एकवटून सांगलीवाडीकडील कृष्णा नदीकाठाच्या दिशेने धावत होते. वसंतराव, गणपतराव व जयराम कुष्टेंनी पोलिसांना रोखायचे व इतरांनी वारणा नदीतून पोहून कोल्हापूर संस्थानाच्या हद्दीत प्रवेश करायचा असे ठरले होते. त्याप्रमाणे क्रांतिकारक धावत होते.

पोलिसांनी त्यांचा नदीकडे धावण्याचा रोख पाहून नदीत होड्यांतूनही पाठलाग करणारी सशस्त्र पोलिसांची तुकडी लगेचच तैनात केली. आठवडी बाजार, मारुती मंदिरमार्गे जुन्या सांगलीतून पुलाकडे धावत असलेले कैदी, त्यांच्या मागे गोळीबार करीत पाठलाग करणारे पोलीस हे पाहून त्या भागात लोकांची धावपळ उडाली होती. सांगलीवाडीच्या कृष्णा काठावरून जेव्हा हा पाठलाग चालू होता तेव्हा कृष्णेच्या पुलावर एकच गर्दी जमलेली होती. कृष्णा आणि वारणा नद्यांच्या संगमाजवळ पुढे धावणारे क्रांतिकारक आणि पाठलाग करणारे पोलीस यांच्यात केवळ सुमारे ४०० फुटांचे अंतर होते. हा पाठलाग सुरू असतानाच जयराम बेलवलकर, बाबू शेटे, महादेव बुटाले,विठ्ठल शिंदे, मारुती आगलावे, गणपतराव कोळी यांनी जवळच असलेल्या पेरूच्या बागेत आश्रय घेतला. तेथे लपून पुन्हा पुढे जाण्याचा त्यांचा प्रयत्न होता; परंतु

दुर्दैवाने बागेच्या पलीकडे पाणी असल्यामुळे ते सर्वजण तेथेच अडकून पडले. वसंतराव सर्वांना सांगलीच्या पलीकडे सुरक्षित नेण्याच्या प्रयत्नात होते. त्यांपैकी जिनपाल खोत, वसंत सावंत, दत्तू पाटील, बाबू पाचोरे यांनी कृष्णेत उड्या घेतल्या. ते गतीने पोहू लागले. पाठलाग सुरू असताना पोलिसांचा गोळीबार सुरूच होता. त्यात वसंतरावांसोबत धावत असलेले अण्णासाहेब पत्रावळे पोलिसांच्या गोळीचीशिकार बनले. आता ज्यांनी नदीत उड्या घेतल्या होत्या ते सांगलीबाहेर सुरक्षित स्थळी पोहोचेपर्यंत पोलिसांशी झुंज देत त्यांना अडवून ठेवायचा वसंतरावांनी निर्धार केला. कृष्णा-वारणा नद्यांच्या संगमाजवळील काठावरून धावत असतानाच वसंतरावांसोबत असलेल्या बाबूराव जाधव यांनी नदीत उडी घेतली. त्यांना पोलिसांनी बरोबर हेरले आणि गोळीबार करून पाण्यातच टिपले. त्यांचा रक्तबंबाळ मृतदेह कृष्णा नदीच्या प्रवाहाबरोबर वाहून गेला. ते पाहून बेचैन झालेले वसंतराव एका उंबराच्या झाडामागे लपले व तिथून पाठलाग करणाऱ्या पोलिसांवर गोळीबार करू लागले. पोलिसांना थोपविण्यात त्यांना यश आले. त्यामुळे जिनपाल खोत आणि इतर सहकारी नदीच्या किनाऱ्यावर सुरक्षित पोहोचले.

वसंतरावांची पोलिसांशी झुंज सुरूच होती. दुर्दैवाने त्यांच्या बंदुकीची कळ बिघडली आणि ती निकामी झाली. त्याच वेळेला अनाहूतपणे वसंतरावांचा उजवा खांदा उंबराच्या झाडाआडून उघडा पडला आणि पोलिसांनी ती वेळ साधली! सुसाट वेगाने सुटलेली गोळी वसंतरावांचा तो खांदा आरपार छेदून गेली. ते रक्तबंबाळ झाले. तुरुंग फोडून जिवाच्या आकांताने सहकाऱ्यांना घेऊन धावलेले वसंतराव रक्ताच्या थारोळ्यात पडले. रक्तस्राव होत असताना ते बेशुद्ध पडले. तेवढ्यात पोलिसांनी चोहोबाजूंनी संगिनी रोखत त्यांच्याभोवती कडे केले आणि त्यांना ताब्यात घेतले. त्याच दरम्यान गणपतराव कोळी आणि पेरूच्या बागेत लपलेले अन्य क्रांतिकारकयांना होडीतून घेऊन पोलीस वसंतराव जेथे होते त्या ठिकाणी पोहोचले. एव्हाना, वसंतरावांनाही शुद्ध आली होती. शुद्धीवर आलेल्या वसंतरावांनी गणपतराव कोळींना पाहिले आणि इतर सुखरूप निसटलेल्या क्रांतिकारकांची माहिती घेऊन उद्‌गारले, ‘आता मी सुखाने मरीन!’ आपल्या क्रांतिवीर सहकाऱ्यांना वाचविता वाचविता एक क्रांतिवीर जखमी झाला. पोलिसांनी त्याच अवस्थेत त्यांना व खंदकात उडी टाकताना पाय मोडलेल्या हिंदुराव पाटील यांना सांगलीच्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल केले. या घटनेने सांगली परिसर आणि त्या वेळचा सातारा जिल्हा हादरून गेला. उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल केलेल्या वसंतरावांवर डॉ. आपटे यांनी शस्त्रक्रिया केली आणि एका क्रांतिकारकाचा प्राण वाचला! वसंतराव जखमी झाले असले तरी त्यांना त्यांचे साथीदार कधीही पळवून नेतील, अशी धास्ती पोलिसांना वाटत होती. त्यामुळे वसंतरावांना साताऱ्याच्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी हलविण्याचा निर्णय झाला. त्यांना साताऱ्याला हलवत असताना इतर क्रांतिवीरांनी पळवून नेऊ नये यासाठी पोलिसांनी विशेष काळजी घेतली. इस्लामपूरमार्गे न जाता तासगावमार्गे वसंतरावांना साताऱ्याला पाठविण्यात आले. तेथेपोलीस बंदोबस्तातच त्यांच्यावर उपचार करण्यात आले. पुढे तुरुंग फोडणे,शस्त्रे पळविणे, जीवघेणा हल्ला करणे यांसारखे गुन्हे लावून वसंतरावांच्या विरोधात सांगली कोर्टात खटला दाखल करण्यात आला. वसंतरावांच्या शौर्याची दखल घेत प्रांतिक काँग्रेस समितीने पुण्याचे ख्यातनाम कायदेपंडित बॅ. अग्रवाल यांना त्यांचे वकीलपत्र दिले. सांगलीचे ॲड. गणपतराव गोडबोले आणि ॲड. ज. वा. पाटणकर यांनी बॅ. अग्रवाल यांना मदत केली. वसंतरावांच्या विरोधातील खटल्याचा निकाल काय लागणार हे सर्वांनाच ठाऊक होते. २१ सप्टेंबर १९४४ रोजी खटल्याचा निकाल जाहीर झाला. वसंतरावांना सहा वर्षे सक्तमजुरी आणि ५०० रुपये दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली. जिवाची पर्वा न करता लढणाऱ्या स्वातंत्र्यवीराच्या अंगावर तुरुंगात चौकडा शर्ट आणि पँट चढविण्यात आली. स्वातंत्र्यासाठी मृत्यूशी संघर्ष करण्याची हिंमत राखणारे वसंतराव येरवड्याच्या तुरुंगात दंडाबेडीची शिक्षा भोगू लागले… .

अनुक्रमणिका

## करवीरनगरीत जन्म

स्वातंत्र्यपूर्व काळातील सांगली संस्थानातील पद्याळे हे सात-आठशे लोकवस्तीचे गाव. त्या काळच्या सातारा जिल्ह्यातील दक्षिणेच्या टोकाचे गाव. सांगली शहरापासून ८ कि. मी. अंतरावर कृष्णा नदीच्या काठी बसलेले. पद्यादेवीचे स्थान असल्याने गावाचे नाव पद्याळे! कृष्णा नदी आणि तिचे पाणी हा पद्याळे आणि आसपासच्या नदीकाठावरील गावांच्या जीवनसंस्कृतीचा अविभाज्य भाग. याच गावातील बंडूजी पाटील आणि त्यांच्या पत्नी रुक्मिणीबाई. या दाम्पत्याला पहिले पुत्ररत्न शामरावांच्या रूपाने प्राप्त झाले. दुसरे पुत्ररत्न यशवंत ऊर्फ वसंता! पाटील यांचे मूळ आडनाव कदम. तुळजापूरच्या आई तुळजाभवानीचे मानकारी असलेले हे कदम घराणे. महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानीच्या सान्निध्यातच मानकरी म्हणून या घराण्याचे पूर्वज वाढले. त्या पैकी सहावी पिढी सांगली जिल्ह्यात आली. त्यांनी कृष्णाकाठी पद्याळे येथे जमीन घेतली. ते शेती करू लागले. पुढे गावची पाटिलकी या परिवाराकडे आली आणि तेव्हापासून या घराण्याला कदमऐवजी 'पाटील' हे नामाभिधान मिळाले. कोल्हापूरच्या जुन्या संस्थान असलेल्या कागलच्या जगदाळेपाटील कुटुंबातील रुक्मिणीबाई या बंडूजींच्या पत्नी. वसंताचा जन्म १३ नोव्हेंबर १९१७ रोजी कोल्हापुरात झाला. भविष्यात स्वातंत्र्यलढ्यात आणि महाराष्ट्राच्या राजकारण-समाजकारणात इतिहास घडविणारे हे बाळ दिवाळी अमावास्येच्या रात्री जन्माला आले. करवीरनिवासिनी आई महालक्ष्मीच्या नगरीत ज्या राजर्षि शाहू महाराजांनी समता आणि बंधुत्वाचा संदेश रूजविला, त्याच भूमीत दिवाळीदिवशी जन्मलेले हे बाळ पाटील परिवाराच्या कौतुकाचा विषय ठरले. त्यामुळे हे बाळ मोठेपणी नाव काढील, अशीच चर्चा गणगोतात होत राहायची. पाटील आणि जगदाळे परिवार आनंदात होता. मोठ्या आनंदाने आणि हौसेने बाळाचा नामकरण विधी पार पाडला. वसंताचे पाळण्यातील नाव यशवंत! पाळण्यातील नाव यशवंत ठरले तरी त्यांचे वसंत हेच नाव पुढे रूढ झाले. बाळासह पाटील परिवार काही दिवसांनी पद्याळ्यात आला.

पहिल्या महायुद्धाचा तो काळ होता, १९१४ साली सुरू झालेले जर्मनी विरूद्ध इंग्लंड यांच्यातील महायुद्ध त्या काळात टिपेला पोहोचले होते, त्या युद्धाचा परिणामभारतावर असणाऱ्या इंग्रज राजवटीवरदेखील होत होता. इंग्रजांचे लोकांवरील अत्याचार वाढतच होते. त्यातच प्लेगच्या साथीने भारतावर आक्रमण केले. १९१८ साली प्लेगच्या साथीने थैमान घातले. प्लेगची साथ एखाद्या गावात दाखल झाली की, त्या साथीने कुटुंबेच्या कुटुंबे बळीपडायची. या साथीला पद्याळे गावही अपवाद ठरले नाही. पद्याळ्यावरही प्लेगच्या साथीने आपला विळखा घट्ट केला. अनेक कुटुंबांतील कर्ती माणसे प्लेगने पटापट मरू लागली. बंडूजी पाटलांच्या कुटुंबावरही या साथीने घाला घातला. रुक्मिणीबाई व बंडूजी यांना प्लेगची लागण झाली. उपचाराची संधीही न देता काळाने बंडूजी व रुक्मिणीबाईंना आपल्या कवेत घेतले. अवघ्या एका तासाच्या फरकाने माता-पित्यांचा मृत्यू झाला. शामराव त्या वेळी साडेतीन वर्षांचा होता,तर वसंता केवळ दहा महिन्यांचा होता. बंडूजींची आई 'ताई पाटलीण' या नावाने ओळखली जायची. कर्त्या मुलाच्या निधनाने ताईंवर दुःखाचा व संकटांचा डोंगर कोसळला. लहान-लहान नातवंडे उघड्यावर पडली. आता त्यांना कसे वाढवायचे, हा प्रश्न त्यांच्यापुढे उभा राहिला. कुटुंबाची गावात तीस एकर जमीन व राहते घर होते. जमीन कोण कसणार आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा होणार, या चिंतेने ताई पाटलीण ग्रासल्या होत्या. त्यांनी अखेर जाणत्या लोकांशी, पै-पाहुण्यांशी सल्लामसलत केली. कितीही संकटे आली तरी धिटाईने त्यांना तोंड देणे हा त्यांचा पिंड होता. त्याच कारणाने मार्ग निघाला. शामराव व दहा महिन्यांच्या वसंताला त्यांच्या आजोळी कागलला मामांकडे पाठविण्याचा निर्णय झाला. दत्तात्रय तातोबा जगदाळे-पाटील हे शामराव व वसंताचे मामा. त्यांनीच दोघांचे संगोपन केले, वाढविले आजी ताई

अनुक्रमणिका

पाटलीण यांनी कुटुंबाची तीस एकर जमीन व घर कोर्टस ऑफ वॉर्डस्च्या ताब्यात दिली. त्यापोटी दरमहा कुटुंबाला २५ रुपये पोटगी मिळू लागली. कागलमध्ये शामराव व वसंताचा सांभाळ मामा-मामींनी मोठ्या लाडाने व प्रेमाने केला.

काळ कोणासाठी थांबत नाही. तो पुढे जात होता. १९२८ मध्ये साडेतेरा वर्षांचा शामराव व दहा वर्षांचा वसंत कागलहून आपल्या पद्याळे गावी आजीकडे परतले. दहा वर्षांचे बालपण कागलमध्ये मामाकडे कसे गेले. हे दोन्ही भावांना समजलेही नाही. ताई पाटलीण यांना मात्र वसंताला शिकवून मोठे करायचे होते. त्यासाठी त्यांनी त्याला शाळेत घालण्याचा निर्णय घेतला. पद्याळ्यात शिक्षणाची सोय नव्हती. त्यावर गावातच शाळा सुरू करण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता. शाळा सुरू झाल्यास गावातील सर्वच मुलांची सोय होणार होती. गावचे पाटील लक्ष्मण पाटील व ताई पाटलीण यांनी प्राथमिक शाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्याच काळात ज्ञानू लक्ष्मण संकपाळ हा सातवी पास होणारा गावातील पहिला मुलगा गावात आला होता. ज्ञानू संकपाळ यालाच शाळेचा शिक्षक करायचा निर्णय झाला. शाळेला जागा नव्हती म्हणून आजीने आपल्या स्वतःच्या घरातील पडवीची जागा शाळेला दिली आणि पद्याळ्यात प्राथमिक शाळेचे वर्ग सुरू झाले. शरीरयष्टीने सडपातळ,चुणचुणीत असलेला वसंता अभ्यासात हुशार होता. त्याला अभ्यासात गोडी निर्माण झाली. त्याच्या अभ्यासावर व प्रगतीवर संकपाळ गुरुजी खूश होते. वामन पाटील, श्रीमती कोळी,शंकर मोरे या वर्गमित्रांच्या संगतीत वसंताचे प्राथमिक शिक्षण सुरू होते. चौथीपर्यंतचे शिक्षण तेथेच झाले.

याच काळात शेतातील भाजीपाला, गवत सांगलीला नेणे आणि मिळालेल्या पैशातून सांगलीच्या बाजारात कुटुंबाला लागणाऱ्या वस्तूंची खरेदी करणे हा पद्याळ्यातील गावकऱ्यांचा दिनक्रम असायचा. प्राथमिक शिक्षण घेत असताना वसंताही सांगलीला जात-येत असे. बहुतेक वेळा सांगलीला पायीच जावे लागायचे. त्याच काळात १९२९ मध्ये महात्मा गांधींनी देशात कायदेभंगाचा लढा जोमाने चालविला होता. हा लढा देशात आणि महाराष्ट्रात जोर धरत होता. स्वातंत्र्यवीरांच्या शौर्याच्या बातम्या सांगलीला जाणे-येणे असलेल्या वसंताच्या कानांवर पडत होत्या. त्या बातम्यांनी वसंताच्या कोवळ्या मनावर देशप्रेम आणि स्वातंत्र्यलढ्याचे संस्कार होत होते. देशभरात स्वातंत्र्य चळवळीतील घडणाऱ्या घटना आणि घडामोडी ऐकून व वाचून वसंताचे मन पेटून उठत होते.

## चहा सोडला

सोलापुरात घडलेल्या एका क्रांतिकारी घटनेने वसंताचे जीवनच पालटून टाकले. देशप्रेम, त्याग आणि देशासाठी काहीतरी करण्याची जिद्द त्या घटनेने त्याच्यात उफाळून आली. महात्मा गांधींनी मद्यपानविरोधात सुरू केलेल्या चळवळीला बळ देण्यासाठी ६ ते १९३० रोजी सोलापूर शहरातील काँग्रेसच्या तरुण कार्यकर्त्यांनी 'ताडी सत्याग्रह' करण्याचा निर्णय घेतला. शहरालगतच्या हिप्परगा तलावाच्या शेजारीताडीच्या झाडांचे छोटे जंगलच होते. त्यातून निर्माण होणारे ताडीचे उत्पादन रोखणे व लोकांना व्यसनापासून परावृत्त करण्याच्या उद्देशाने त्या जंगलातील ताडीची झाडे तोडण्याचा निर्धार तरुणांनी केला. शेकडो तरुण जमा झाले. हातात कोयते घेऊन त्यांनी ताडीच्या झाडांची तोड सुरू केली. महात्मा गांधींचा जयजयकार करीत ताडीची झाडे तोडणारे तरुण अधिकच आक्रमक झाले. तरुणांची आक्रमकता आणि त्यांनी ताडीच्या जंगलावर केलेल्या हल्ल्याची माहिती ब्रिटिश डीएसपी फेअर आणि कलेक्टर नाईट यांच्यापर्यंत पोहोचली. ते तातडीने हत्यारी फौजफाट्यासह जंगलाजवळ पोहोचले.

अटकसत्र आणि धरपकड सुरू झाली. जमावाने घोषणाबाजी सुरू केली. जमावाचा संताप लक्षात येताच ब्रिटिश अधिकाऱ्यांना तिथून काढता पाय घ्यावा लागला. ते तिथून मागे फिरत असताना काही तरुणांनी त्यांच्या वाहनांसमोर तोडलेली झाडे आडवी टाकून त्यांचा मार्ग रोखला. घोषणाबाजी आणि दगडफेक सुरू झाली. एकच गोंधळ सुरू झाला. जमावाला रोखणे पोलिसांना शक्य होईना. दगडफेकीच्या माऱ्याने घाबरून गेलेल्या पोलिसांनी गोळीबार करण्यास सुरुवात केली. गोळीबार सुरू होताच जमावाची पांगापांग सुरू झाली. त्यातच पोलिसांच्या गोळीबारात दोघेजण जखमी झाले. त्यामुळे जमाव अधिकच खवळला. गोळीबाराचा आधार घेऊन अधिकारी तिथून निसटले. जमाव मात्र त्वेषाने घोषणा देत, ब्रिटिशांचा धिक्कार करीत शहराच्या दिशेने निघाला. गोळीबारानंतर जमाव पांगण्याऐवजी गर्दी तर वाढलीच; शिवाय संतापही वाढलेला होता. चिडलेला हा जमाव शहरात येत असताना वाटेत असणाऱ्या मंगळवार पोलीस चौकीजवळ घोषणा देत थांबला. गोळीबाराचा निषेध करू लागला. त्यातच पोलीस ठाण्यात असलेल्या पोलिसांपैकी दोघांनी जमावाशी उद्धट वर्तन केले. शिवराळ भाषा वापरली; त्यामुळे जमावाचा संताप अनावर झाला. त्यांनी पोलीस ठाण्यावरच हल्ला केला. पोलीस ठाणे पेटवून दिले. आगीच्या ज्वालांमध्ये पोलीस ठाणे जळत असतानाच जमावाने त्या दोन पोलिसांना ताब्यात घेतले. त्यांना दोन पोत्यांत बांधले आणि जिवंत जाळले! जमावाच्या या उद्रेकाने सोलापुरातील ब्रिटिश यंत्रणा पार हादरून गेली. दोन पोलीस आणि पोलीस ठाणे जाळल्यानंतर जमावाने शहरातील ब्रिटिशांच्या सर्व सत्तास्थानांवर हल्ला करून ती ताब्यात घेण्याचा सपाटा लावला. न्यायालयाच्या इमारतीवर हल्ला केला आणि ती पेटवून दिली. सोलापूर जिल्ह्याच्यासंपूर्ण ब्रिटिश प्रशासनावर ताबा मिळविला. जिल्हा कोषागार कार्यालय ताब्यात घेतले. कोषागारावर पहाऱ्यासाठी काँग्रेसचे कार्यकर्ते थांबले. जिल्ह्याची ब्रिटिश यंत्रणा नेस्तनाबूत झाली आणि सोलापुरात तिरंगा फडकला! शहरावर पूर्णपणे काँग्रेस कार्यकर्त्यांचे नियंत्रण आले. गोरे अधिकारी आपल्या कुटुंबाच्या संरक्षणाच्या चिंतेने घाबरून गेले. आपल्या कुटुंबातील महिला व मुलींना त्यांनी रातोरात पुण्याला पाठवून दिले. स्वतःचा जीव वाचविण्यासाठी ते रेल्वे स्टेशनमध्ये असणाऱ्या रेल्वे डब्यात जाऊन दडले.

सोलापुरातील या घटनेने ब्रिटिश राजवटीला हादरा बसला. ब्रिटिशांनी भारतीय पोलीस अधिकारी एम. एम. कामटे यांच्यावर सोलापुरातील परिस्थिती हाताळण्याची जबाबदारी सोपविली. सोलापुरात तिरंगा फडकल्याने बिथरलेल्या दिल्ली सरकारने ब्रिटिश रॉयल अल्टर रायफल्सचे एक विशेष सैन्यपथक सोलापूरला पाठविले. सोलापूर लषकराच्या ताब्यात देण्यात आले. एव्हाना पोलीस अधिकारी कामटे यांनी लोकांना विश्वासात घेऊन वातावरण शांत केले होते. सोलापुरात लष्करी राजवटीने लोकांचा छळ सुरू केला. दोन पोलिसांना जाळल्याचा आणि सोलापुरावर ताबा मिळविल्याचा बदला लष्कर लोकांचा छळ करून घेऊ लागले. मारहाण आणि अटकसत्र चालूच राहिले. त्यातच मल्लाप्पा धनशेट्टी, किसन सारडा, कुर्बान हुसेन आणि जगन्नाथ शिंदे या क्रांतिवीरांना अटक करण्यात आली. त्यांच्या विरोधात खटले दाखल करण्यात आले. पुढे लष्करी न्यायालयाने त्या क्रांतिवीरांना फाशीची शिक्षा सुनावली. ज्या दिवशी त्यांना फाशी दिल्याची बातमी देशभर पोहोचली, तो संक्रांतीचा दिवस होता.

सोलापुरातील चार हुतात्म्यांच्या फाशीची बातमी वसंतापर्यंतही पोहोचली होतीच. तो दिवस शाळकरी वसंतासाठी जीवन बदलून टाकणारा ठरला. सोलापुरातील स्वातंत्र्यवीरांनी कोणासाठी लढा दिला? त्यांनी आपल्या जिवाची बाजी कोणासाठी लावली? देशासाठी त्यांनी बलिदान केले. आता मी देशांसाठी काय करावे? दिवसभर या प्रश्नांनी बेचैन झालेल्या वसंताने संक्रांतीचा सण स्वतःही साजरा केला नाही आणि आपल्या सवंगड्यांनाही करू दिला नाही. तो त्या दिवशी सायंकाळी आपल्या मित्रांसह सांगलीला आला. त्याच दिवशी सांगलीत चांगलाच पाऊस सुरू झाला. सांगलीहूनपद्माळ्याला जाण्याच्या

मार्गावरून ओढ्याला पाणी आल्याने मार्ग बंद झाला. शेवटी सांगलीत भांड्यांचा व्यापार करणारे पद्याळ्याचे महादेव कोळी यांच्या घरी वसंता व त्याचे मित्र थांबले. मनाची बेचैनी मात्र संपलेली नव्हती. रात्री सर्व मित्र स्वातंत्र्यसंग्रामावरच चर्चा करीत बसले होते. सोलापूरच्या हुतात्म्यांच्या शौर्यावर चर्चा करू लागले होते. आपणही काहीतरी केले पाहिजे, असे सर्वांचे मत बनले. सर्व मित्रांच्या साक्षाने वसंताने सोलापूरच्या हुतात्म्यांना अभिवादन करण्यासाठी चहा सोडण्याचा निर्णय घेतला. त्याने चहा सोडण्याची प्रतिक्षा करताच भारतमातेचा जयजयकार करीत मित्रांनी वसंताच्या डोक्यावर गांधी टोपी चढवून टाळ्या वाजविल्या. वसंताच्या जीवन वाटचालीतील स्वातंत्र्य आणि क्रांतिलढ्यातील हे पहिले वळण!

मधल्या काळात शामरावदादांचा विवाह झाला. पद्याळ्याजवळच्या कर्नाळ येथील गणपती पाटील यांची कन्या पार्वती यांच्याशी ते विवाहबद्ध झाले. शामरावदादा आणि पार्वतीवहिनी पुढे वसंताच्या संपूर्ण जीवनात माता-पित्याच्या स्थानीच राहिले. पार्वतीवहिनींनी वसंताला पुत्रवत सांभाळले. स्वातंत्र्याची ओढ लावणारे मन घडत असतानाच वसंता कुस्ती, तालमीत आणि मित्रांत रमू लागला होता. गावातील तालीम हाच मित्रांचा अड्डा बनला होता. दक्षिण महाराष्ट्रात आणि सातारा जिल्ह्यात महात्मा फुले आणि राजर्षी शाहू महाराजांच्या समतावादी व पुरोगामी विचारांचा जोरदार प्रसार सुरू होता. त्यात सत्यशोधक चळवळीचे कामही मोठ्या प्रमाणात रुजू लागले होते. हुंडाबंदी,पुनर्विवाह, स्त्रीशिक्षण, लग्नातील मानपान या संदर्भात सत्यशोधक चळवळीने सुरू केलेले जनजागरण गावागावांपर्यंत पोहोचत होते. पद्याळे गाव हे भक्ति मार्गातील. त्यामुळे वारकरी संप्रदाय आणि पंढरीची वारी हा गावचा विशेष जिव्हाळ्याचा विषय होता. या सर्व गोष्टींचा परिणाम वसंताच्या जडणघडणीवर होत होता. वसंताचे चौथीपर्यंतचे प्राथमिक शिक्षण गावात झाले. पुढच्या शिक्षणासाठी शेजारच्या कर्नाळ गावी जाणे भाग होते. पाचवीचे शिक्षण तेथे झाले. सहावी व सातवीच्या शिक्षणासाठी सांगलीच्या पेठ भागातील शाळा क्र. १ मध्ये प्रवेश घेतला. पद्याळ्यात पहिली प्राथमिक शाळा गावकऱ्यांनी वसंताच्याच घरी सुरू केल्याने चौथीपर्यंतचे शिक्षण पद्याळ्यात झाले. तेथे त्याने संकपाळ गुरुजींचा आवडता. हुशार विद्यार्थी म्हणून शाबासकी मिळवली होती. कर्नाळच्या शाळेत पाचवीच्या वर्गातहीतशीच शाबासकी माने गुरुजी यांच्याकडून वसंताला मिळाली. सांगलीच्या शाळेत कुलकर्णी गुरुजी हे मुख्याध्यापक होते. त्या काळी सातवीच्या परीक्षेसाठी पूर्वपरीक्षा व्हायची. त्या परीक्षेत उत्तीर्ण झाले तरच कराड येथे होणाऱ्या सातवीसाठी त्या विद्यार्थ्याचा परीक्षा अर्ज दाखल व्हायचा. पद्याळ्याचाच वामन पाटीलहा वर्गीमित्र वसंतासोबत सातवीला होता. सातवीची पूर्वपरीक्षा झाली. वामन त्यात पास झाला; पण वसंता मात्र नापास झाला. अखेर वसंताने मुख्याध्यापक कुलकर्णी यांच्याकडे मोर्चा वळविला. परीक्षेची फी भरत असताना पूर्वपरीक्षेत नापास झालो म्हणून आम्हाला सातवीच्या परीक्षेस का बसू देत नाही? असे गाऱ्हाणे त्यांनी मांडले. कुलकर्णी गुरुजींनी त्याचे म्हणणे ऐकून घेतले आणि सातवीच्या परीक्षेस बसण्यास परवानगी दिली.

वसंता व वामनचा अभ्यास सुरू होता. ते दोघेही परीक्षा देण्यासाठी कराडला गेले. परीक्षा चांगल्या तऱ्हेने दिली. पुढे सातवीचा निकाल जाहीर झाला. वसंता परीक्षेत पास झाला. मित्र वामन मात्र नापास झाल्याचे समजले. हे दोघेही परत शाळेत गेले व गुरुजींना भेटून निकालाची पडताळणी केली. तेव्हा वामनदेखील पास असल्याचे समजले. दोघांच्या आनंदाला पारावार उरला नाही. गावात आनंदाचे वातावरण पसरले. सातवीच्या परिक्षेस व्हर्नाक्युलर फायनलची परीक्षा असे त्या वेळी संबोधले जायचे. त्या परीक्षेत पास होणारे पहिले संकपाळ गुरुजी होते आणि १९३४ साली वसंता व वामन ती परीक्षा पास होणारे दुसरे होते. त्यामुळे गावाला त्याचे विशेष भूषण वाटत होते. निकालाच्या आनंदाने घरात व मित्रपरिवारात पेढे वाटले गेले. आता पुढे स्पेशल क्लाससाठी सांगलीला जावे लागणार होते. चालत अथवा सायकलवर

असाच तो प्रवास असे. त्या वेळी स्पेशल क्लास हा इंग्रजी पहिली ते तिसरीचा वर्ग मानला जायचा. त्या तिन्ही वर्गांचा अभ्यास एकाच वर्षात पूर्ण केला जायचा. वसंताने त्या वर्गात प्रवेश घेतला आणि अभ्यासालाही सुरुवात केली. गावातीलच एक वर्गमित्र एकनाथ येडेकर आणि ते दररोज शाळेला जायचे. त्याच काळात दुर्दैवाने एकनाथला प्लेगची लागण झाली आणि त्यातच त्याचे निधन झाले. वर्गमित्राच्या निधनाने वसंता कमालीचा दुःखी बनला. त्याचे अभ्यासात व शाळेत मन लागेना आणि त्याने शाळा सोडण्याचा निर्णय घेतला.

वसंताच्या शाळा सोडण्याच्या निर्णयाला शामरावदादांनीही विरोध केला नाही. शेतीसाठी घरच्या माणसाची त्यांना आवश्यकता होती. अनेक वर्ष जमीन पडून राहिल्याने ती व्यवस्थित करण्यासाठी बरेच कष्ट घ्यावे लागत होते. शामरावदादांच्या त्या कामातील व्याप वाढला होता. अखेर वसंताने शाळा सोडली आणि शामरावदादांना तो शेतीच्या कामात मदत करू लागला. शेतीकामातील प्रत्येक बारकाव्याचा स्वतः अनुभव घेतला. पद्माळ्यातील बरेच शेतकरी शेतातील गवत कापून बैलगाडीने सांगलीला न्यायचे व ते विकून मिळालेल्या पैशांतून घरात लागणाऱ्या वस्तू तिथूनच विकत घेऊन यायचे. त्या काळात गवताच्या एका गाडीला पाच रुपये मिळायचे. वसंताचा गवत कापण्यात विशेष हातखंडा होता. तो स्वतः शेतातील गवत कापून ते बैलगाडीने सांगलीला घेऊन जायचा आणि त्याची विक्री करायचा. शेतातील सर्व कामांत तो तरबेज बनला. नांगरणी, कुळवणी, पेरणी सर्व कामे करू लागला. दहा बैलांच्या नांगराने शेतात नांगरणी करण्याचे कामही त्याने खुबीने केले. दहा बैलांचे नियंत्रण करून आणि त्यांना व्यवस्थित हाकून चांगली नांगरणी तो करीत असे. एकूणच शेतीच्या अर्थकारणाचा आणि कामाचा प्रत्यक्ष अनुभव त्याने १९३५ ते १९३८ या कालावधीत शेतात राबून घेतला. शेतीची कामे वर्षभर नसतात; मग उरलेल्या वेळेत तालमीत जाऊन व्यायाम करणे, मित्रांसोबत कृष्णा नदीत तासन्तास पोहणे हा वसंताच्या आवडीचा छंद होता. शेतीत बारमाही काम नसायचे. त्यामुळे फावल्या वेळेत वसंताने नोकरी केली. शामरावदादांचे सासरे गणपत पाटील कॉन्ट्रॅक्टर होते. रस्ते तयार करण्याची कामे त्यांच्याकडे होती. त्यांनाही काम करणाऱ्या माणसांची गरज होतीच. त्यामुळे गणपत पाटील यांच्याकडे काही दिवस रोड कारकून म्हणून वसंताने नोकरी केली. सांगली-तासगाव रस्त्याच्या कामाची देखभाल करणे,हिशेब ठेवणे आणि मजुरांकडून काम करून घेण्याची जबाबदारी त्याच्याकडे असे. त्यासाठी सायकलवरून प्रवास करीत उन्हातान्हात वसंता कामाच्या ठिकाणी पोहोचायचा. सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा येथेही गणपत पाटील यांनी रस्त्याचे कंत्राट घेतलेले होते. त्या कामाची देखरेख वसंता दररोज पद्माळ्याहून सायकलने जाऊन करायचा. ही नोकरी मात्र फार काळ टिकली नाही. वसंताच्या जीवनातील ती पहिली आणि शेवटचीच नोकरी ठरली. त्यानंतर त्याने फावल्या वेळेतआणखी एक उद्योग केला. कागलच्या जगदाळे-पाटील मामांचा मूक चित्रपट दाखविण्याचा व्यवसाय होता. असे चित्रपट दाखविण्यासाठी अनेक गावांत मामा फिरायचे. वसंताने मामांच्या त्या व्यवसायातही त्यांना मदत केली. चित्रपट दाखविण्याच्या निमित्ताने तो गावोगावी फिरला.

## ग्रामविकासातील पहिले पाऊल

शाळा सोडून शेतीच्या कामात, तालमीत रमलेल्या वसंताने गावातील मित्रमंडळ मोठे होते. सर्व मित्रांचा गावातील तालीम हाच बैठकीचा अड्डा होता. तेथेच सर्वजण जमायचे. गप्पा मारायचे. सातारा जिल्ह्यात सत्यशोधक चळवळीचे लोण पसरत चालले होते. त्याचा परिणाम तालमीत गप्पा मारायला बसणाऱ्या वसंता आणि त्याच्या मित्रमंडळींवर होत होता. तमाशा, पोवाडे आणि मनोरंजनाच्या इतर कार्यक्रमांतून सत्यशोधक चळवळीचे काम सुरू होते. हुंडाबंदी, लग्नातील मानपान, स्त्रीशिक्षण या संदर्भात

सामाजिक सुधारणांचा विचार गावागावांत पोहोचत होता. या विचारांचा प्रभाव वसंतावर पडत होता. देशांत इंग्रजांच्या विरोधात संताप व्यक्त होत असताना आपणही काहीतरी केले पाहिजे, ही भावना सतत रुजत होती. कृष्णाकाठी वसलेल्या पद्याळयाला पिण्याच्या पाण्यासाठी नदीचा आधार होता. नदीच्या काठावर दरवर्षी पुराने गाळ साठायचा. त्यामुळे महिलांना नदीवर पाण्यासाठी जाणे जिकिरीचे ठरायचे. चिखलातूनच वाट काढावी लागायची. गावकरी दरवर्षी झाडेझुडपे टाकून नदीकाठावर जाण्याची तात्पुरती सोय करायचे. त्यातून कायमची आणि सुरक्षित व्यवस्था मात्र होत नसायची. गावाची ही समस्या वसंताच्या नजरेतून सुटली नाही. गावासाठी आपण काहीतरी केले पाहिजे, असे त्याला सतत वाटायचे. त्यासाठी त्याने गावात ग्रामसुधारणा मंडळाची स्थापना केली. काम करणारी तरुण मंडळी एकत्र केली. त्यांच्यात गावासाठी काहीतरी करण्याची जिद्द निर्माण केली. त्यातूनच वसंताच्या जीवनातील ग्रामसुधारणा उपक्रमाची मुहूर्तमेढ रोवली गेली. कृष्णा नदीवर घाट बांधण्याचा उपक्रम पुढे आला. वसंताचे ग्रामविकासातील खऱ्या अर्थाने हे पहिले पाऊल! दरवर्षी पुरामुळे नदीकाठावर साठणारा गाळ आणि त्यातून होणारा त्रास गावकऱ्यांना माहीत होता. कृष्णा नदीवर घाट बांधावा, हा विचार जेव्हा वसंतानेमांडला, तेव्हा गावकऱ्यांनी तो विचार उचलून धरला. वसंताचे संघटन, नियोजन आणि दूरदृष्टी यांची चुणूक या उपक्रमात दिसली. घाट बांधायला साहित्य हवे होते, पैसा हवा होता, कारागीर हवे होते आणि हे सर्व शिस्तबद्ध पद्धतीने करणारी माणसांची फळीही हवी होती. श्रमदानातून कृष्णा नदीवर घाट बांधण्याचे निश्चित झाले. गावात मारुतीचे एक पडलेले मंदिर होते. त्या मंदिराच्या पडलेल्या भिंतीचे दगड घाटासाठी उपयोगी ठरणार होते. वसंताने गावकऱ्यांच्या मदतीने त्या दगडांचा वापर घाटासाठी केला. लोक श्रमदानाला तयार होते. लोकांकडून निधी गोळा केला. लोकांनी निधीरूपात जोंधळे दिले. लोकांकडून अधिक जोंधळे मिळावेत यासाठी वसंताने एक युक्ती काढली. एक पोते जोधळे देणाऱ्याचे नाव एका पायरीला दिले जाईल, असे जाहीर केले. त्याचा परिणाम चांगला झाला. जोंधळ्यांची जास्तीत जास्त पोती निधी म्हणून जमा झाली. तो विकून घाटाच्या कामासाठी पैसा उभा केला. गावात चुना, दगड, वाळू जमा केली गेली. घाट बांधण्याची जबाबदारी राम कुशाबा शिंदे व नारायण लक्ष्मण सुतार या गावातीलच कारागीरांनी घेतली. गावाची जिद्द आणि वसंताचे शिस्तबद्ध संघटन यांमुळे घाटाचे काम दर्जेदार व गतीने झाले. कृष्णा नदीवरील घाट तयार झाला. गावकऱ्यांची सोय झाली. वसंताच्या कामगिरीवर गावकरी खूश झाले. गावकऱ्यांच्या विश्वासामुळे गावाचे पुढारीपण आपोआपच वसंताकडे आले. वसंताच्या हाताला यश आहे,अशी श्रद्धा व विश्वास गावकऱ्यांच्या मनात निर्माण झाला. ग्रामसुधारणा मंडळाच्या माध्यमातून सुरू झालेल्या कामाला गती मिळू लागली.

ग्रामसुधारणा मंडळ स्थापन करण्यापूर्वी वसंताने काही काळ आपल्या गावात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शाखाही स्थापन केली होती. सांगली हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख केंद्र म्हणून ओळखले जायचे. शाखेत कवायती आणि शिस्तीचे धडे दिले जायचे. एके दिवशी वसंताचे कामगार चळवळीतील मित्र दत्तू येडेकर त्यांना शाखेत घेऊन गेले. शिस्त आणि कवायतीमुळे वसंता प्रभावित झाला आणि त्यातूनच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पद्याळे शाखेची स्थापना झाली. पुढे संघाची महात्मा गांधी व काँग्रेसविरोधी विचारधारा लक्षात योताच वसंताने पद्याळ्यातील शाखा बंद केली.

ग्रामसुधारणा मंडळाचे कार्य सुरू असतानाच वसंतापुढे गावातील सावकारी अन्यायाचे एक प्रकरण आले. एका महिलेने सावकाराकडून १५० रुपये कर्ज घेतलेहोते. त्या बदल्यात सावकाराने त्या महिलेची जमीन घेतली होती. ती महिला कर्जावरील व्याज भरून मेटाकुटीला आली होती. तिला कर्जही फिटेना आणि सावकार जमीनही परत देईना. अशा अडचणीतून सोडवणूक करण्याची विनंती त्या महिलेने

अनुक्रमणिका

वसंताकडे केली. या प्रकरणाचा गाजावाजा न होता आणि कुणालाही न दुखावता ही समस्या दूर करणे हे एक खूप मोठे आव्हान वसंतापुढे होते. त्यातून मार्ग काढण्यासाठी वसंताने गावातूनच पैसे जमा करायचे ठरविले. अनेकांकडून दहा-दहा रुपये जमविले. गावकऱ्यांचा त्याच्यावर विश्वास असल्याने पैसे जमा झाले. त्या पैशातून त्या महिलेचे सावकाराचे कर्ज चुकते करण्यात आले. सावकाराच्या घशात गेलेली जमीन पुन्हा त्या महिलेला मिळवून देण्यात वसंताला यश आले.

### झपाटलेला काळ

पद्याळ्यातील संघटन आणि सामाजिक कामामुळे वसंता आता तासगाव तालुक्यात 'वसंतराव पाटील' म्हणून ओळखला जाऊ लागला. गावागावांत त्यांच्या ओळखी वाढत होत्या. कार्यकर्त्यांचा संच तयार होत होता. लोक संघटित होऊन स्वातंत्र्यासाठी लढण्याच्या ध्येयाचा आणि लढणाऱ्यांचा आदर करीत होते. त्या भागात चाललेल्या अनेक चळवळी तसे वातावरण निर्माण करण्यात यशस्वी होत होत्या. राजकीय, सामाजिक चळवळीत सातारा जिल्हानेहमीच अग्रेसर असे. त्याच कारणाने प्रत्येक चळवळीचे पडसाद गावोगावी उमटायचे. लोकमान्य टिळक आणि ॲनी बेझंट यांच्या होमरूल चळवळीमुळे १९१७ पासूनच सातारा जिल्ह्यात स्वातंत्र्याची जाणीव आणि स्वातंत्र्यलढा यांविषयी जनजागृती सुरू झाली होती. १९२७ मध्ये महात्मा गांधींनी स्वदेशीची चळवळ देशात सुरू केली. ही चळवळ देशभर पोहोचली. अनेक गावांमध्ये सत्याग्रही निर्माण झाले. १९२८ मध्ये साताऱ्याचे बुवासाहेब गोसावी व आप्पासाहेब साखळकर यांनी तासगावात सेवादलाची शाखा सुरू केली. या शाखेमुळे कार्यकर्त्यांचे जाळे निर्माण झाले. काँग्रेसच्या प्रचारमोहिमेला गती मिळाली. त्याच काळात ब्रिटिशांनी 'सायमन कमिशन' नेमले होते. त्या कमीशनच्या विरोधात काँग्रसने देशभर निषेध आंदोलन छेडले. सातारा जिल्ह्यातही निषेधाची चळवळ उभी राहिली. सायमन कमिशनच्या निषेधासाठी सांगलीत 'बंद' पाळण्यात आला. त्या चळवळीत विद्यार्थीहीमागे नव्हते. त्यांनीही कॉलेजमध्ये 'बंद' पाळून निषेद नोंदविला.

१९२९ मध्ये लाहोर येथे झालेल्या काँग्रेस अधिवेशनात पंडित जवाहरलाल नेहरू यांनी स्वातंत्र्याची घोषणा केली. संपूर्ण भारतात २६ जानेवारी हा 'स्वातंत्र्यदिन' म्हणून पाळण्याचा निर्णय झाला. स्वातंत्र्यदिन पाळण्याची चळवळ सातारा जिल्ह्यातही गतीने पोहोचली. १९३० मध्ये तासगाव येथे पी. ए. काळे यांनी २६ जानेवारी हा स्वातंत्र्यदिन साजरा केला. सत्याग्रह चळवळ आणि तिरंगा झेंडा आंदोलनाने जिल्हा ढवळून निघत होता. तरुणांनी तासगाव नगरपालिकेवर तिरंगा झेंडा फडकविला. सांगलीच्या विलिंग्डन महाविद्यालयातही तिरंगा फडकविला गेला. तासगावच्या सिद्धेश्वर मंदिरावर सत्याग्रहींनी झेंडा फडकविला; पण ब्रिटिश पोलिसांनी तो नंतर उतरविला. झेंडा आंदोलन जोमात सुरू असताना पोलिसांच्या कारवाईतून झेंड्याचे रक्षण एका महिलेने केले. बिळाशीच्या तानूअक्का कदम या महिलेने ब्रिटिश पोलिसांपासून झेंड्याचे रक्षण केले. अंकलखोप गावात गावकऱ्यांनी चहाबंदीचा निर्णय जाहीर केला. देशात मिठाचा सत्याग्रह सुरू झालेला होता. २८ ऑगस्ट १९३० रोजी सातारा जिल्ह्यात ५० हजार कार्यकर्त्यांनी सत्याग्रहाद्वारे ब्रिटिश राजवटीचा निषेध केला.

१६ डिसेंबर १९३१ रोजी पंडित जवाहरलाल नेहरू यांचा सातारा जिल्ह्यातून रात्री दौरा झाला. २५ डिसेंबर १९३१ रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी सातारा, कराड आणि वाई येथे भेटी दिल्या. या राष्ट्रीय नेत्यांच्या दौऱ्यामुळे जिल्ह्यातील चळवळीला बळ मिळाले.

अनुक्रमणिका

त्याच काळात काँग्रेसचे प्रांतिक अध्यक्ष सेनापती बापट यांनी सातारा जिल्ह्याचा दौरा केला. काँग्रेसचा प्रचार कशा पद्धतीने केला पाहिजे, याची दिशा त्यांनी कार्यकर्त्यांना दिली. १४ मे १९३५ रोजी डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी साताऱ्याला भेट दिली. या भेटीत त्यांना १ हजार ७६७ रुपये १२ आण्यांची थैली अर्पण करण्यात आली. स्वातंत्र्य चळवळीत सातारची टिळक राष्ट्रीय शाळा, तासगावची गजानन व्यायामशाळा ही प्रमुख केंद्रे होती. तासगाव तालुक्यातील कुपवाड व पद्माळे ही काँग्रेसच्या प्रचाराची प्रमुख केंद्रे म्हणून ओळखली जायची. तासगावचे चिंतोपंत काळे गावागावांतून प्रभातफेऱ्या काढून कायदेभंगाच्या चळवळीबद्दल लोकजागरण करायचे.

१९३८ मध्ये कराड येथे आत्माराम पाटील यांच्या अध्यक्षतेखाली शेतकऱ्यांची परिषद झाली. या परिषदेत शेतकरी आणि शेतमजुरांच्या प्रश्नांवर चर्चा झाली. 'कसेल त्याची जमीन' ही मागणी या परिषदेने केली. त्याच वेळेला वसंतरावांनी पद्माळे येथे काँग्रेस कमिटीची स्थापना केली. वसंतराव पाटलांच्या नेतृत्वाखाली पद्माळ्यात लोकजागरणाचे काम अधिक गतीने सुरू झाले. मोहरम, ईद आणि पंढरीच्या वारीच्या भोजनव्यवस्थेचे नेटके नियोजन वसंतरावांच्या नेतृत्वाखाली व्हायचे. पद्माळे आणि परिसरातील गावात वसंतरावांची लोकप्रियता चांगलीच वाढलेली होती.

१९३९ मध्ये तासगाव तालुका काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांची निवड झाली. त्या निवडीची सूचना तासगावचे वि. स. पागे, अंकलखोपचे धुळाप्पा नवले, अमणापूरचे गोविंदराव खोत आणि तासगावचे चिंतोपंत काळे यांनी मांडली. त्या सूचनेनुसार अध्यक्षपदी कुपवाडचे आर. पी. पाटील, तर चिटणीसपदी पद्माळ्याच्या वसंतराव पाटील यांची निवड करण्यात आली. सहचिटणीसपदी तासगावचे काशिनाथ दिगंबर पोंक्षे यांची निवड करण्यात आली. तासगावातील गुरुवार पेठेत काँग्रेस कमिटीचे कार्यालय होते. चिटणीसपदाची जबाबदारी मिळाल्याने वसंतरावांचे कार्यक्षेत्र व्यापक बनले. संपूर्ण तालुक्यात त्यांचा संपर्क वाढला. गावोगावी जाऊन बैठका घेणे, पत्रके वाटणे आणि काँग्रेस पक्षाच्या धोरणांनुसार चळवळी उभ्या करण्याचे काम ते करीत होते. त्यांच्या कामाला लोकांचे मोठ्या प्रमाणात पाठबळही मिळत होते. सायकलवरून अथवा पायी गावोगावी फिरायचे, मिळेल तेथे जेवण करायचे आणि ज्या गावात दौरा असेल तेथेच राहायचे, अशा प्रकारचा वसंतरावांचा दिनक्रम असे. अल्पावधीतच वसंतराव सर्वपरिचित झाले. तालुका चिटणीसपदाच्या कार्यामुळे सातारा जिल्ह्यातील सर्वच नेत्यांशी त्यांचा संपर्क आणि संवाद वाढला.

याच दरम्यान वसंतरावांच्या आजी आणि शामरावदादांनी त्यांच्या मागे लग्नाचा लकडा लावला. कागलच्या जगदाळे-पाटील मामांनी आपली थोरली मुलगी मालतीबाईंचा प्रस्ताव लग्नासाठी शामरावदादा व आजींपुढे ठेवला. वसंतरावांचे बालपण मामांकडे गेले होते. शामरावदादा व त्यांचे पालनपोषण अत्यंत अडचणीच्या काळात मामांनीच केले होते. त्यामुळे मामांनी त्यांच्यासाठी बजावलेल्या कर्तव्याची जाणीव वसंतरावांना होती. मालतीबाईंशी लग्नास होकार देऊन मामांच्याकर्तव्यउपकारातून मुक्त होण्याची संधी वसंतरावांना होती. मामांच्या प्रस्तावाची माहिती शामरावदादांनी वसंतरावांना दिली. वसंतरावांनी त्यास होकार दिला; पण लग्नासाठी अट घातली. कुठल्याही प्रकारचा खर्च न करता, साध्या पद्धतीने 'गांधी लग्न' करण्याची ती अट होती. शामरावदादांनी ती मान्य केली. १९३९ साली खादी पोशाख आणि साधेपणाने वसंतराव आणि मालतीबाईंचा विवाह 'गांधी लग्न' पद्धतीने पार पडला. त्या लग्नासाठी खर्च आला पंधरा रुपये!

एप्रिल १९४० मध्ये रायगड काँग्रेस अधिवेशनात घटना परिषदेने संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी केली. दुसरे महायुद्ध हे केवळ लोकशाही रक्षणासाठीच आहे, असा कांगावा करणे ब्रिटिश सरकारने चालूच ठेवलेले होते. संपूर्ण स्वातंत्र्याच्या मागणीला बगल देत सत्याग्रहींवर अत्याचार करण्याचे सत्र इंग्रजींनी चालूच ठेवले होते. जून १९४० मध्ये सरदार वल्लभभाई पटेल यांनी केलेल्या सातारा जिल्ह्याच्या दौऱ्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला होता. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी कोणताही त्याग करण्याची खूणगाठ कार्यकर्त्यांनी बांधली होती. रावसाहेब पटवर्धन यांना कायदेभंगाबद्दल एक वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा त्याच काळात झाली. परिणामी इंग्रजांविरोधी संताप अधिकच वाढला. साताऱ्यात तरूण सत्याग्राहींचे शिबिर भरविण्यात आले. या शिबिराला वसंतरावही उपस्थित होते. इंदोलीच्या दिनकरराव निकम यांनी या शिबिरात इंग्रजांच्या विरोधात घणाघाती भाषण केले. त्याचा परिणाम म्हणून दिनकररावांना पोलिसांनी अटक केली. स्फोटक भाषण केले म्हणून त्यांना एक वर्षाच्या सक्तमजुरीची शिक्षा झाली. त्या वेळी सातारा जिल्ह्यात अतिवृष्टी झाली होती. जिल्ह्यात ओल्या दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकरी अडचणीत आलेला होता. ब्रिटिश सरकार मात्र महायुद्धाचे समर्थन करीत लोकांना मदतीचे आवाहन करीत होते. त्यासाठी लोकांवर अत्याचारही करीत होते. अशातच महायुद्धसमर्थक रॉयिस्टांनी तासगाव येथे एक सभा बोलाविली होती. ती सभा न होऊ देण्याचा चंग नाना पाटील व वि. स. पागे यांनी बांधला. रॉयिस्टांनी सभा घेण्याचा प्रयत्न केला; परंतु तो नाना पाटील आणि पागे यांनी उधळवून लावला.

## बिसूरचा सत्याग्रह

स्वातंत्र्यासाठी झपाटलेल्या अशा वातावरणात देशात महात्मा गांधींनी वैयक्तिक सत्याग्रहाची घोषणा केली. देशभर वैयक्तिक सत्याग्रह सुरू झाले. सत्याग्रहात सहभागी होण्यासाठी निवडलेल्या कार्यकर्त्यांची यादी महात्मा गांधींना सादर केली जायची. त्यांनी मंजूर केलेल्या नावांनुसार वैयक्तिक सत्याग्रहींची निवड व्हायची. सातारा जिल्ह्यातही वैयक्तिक सत्याग्रहास पात्र असलेल्या कार्यकर्त्यांची यादी तयार करण्यात आली. अशी यादी तयार करताना पात्रतेचे निकष पाळले जायचे. काँग्रेसचा क्रियाशील सदस्य असणारा, खादी वापरणारा, खोटे न बोलणारा, दारू न पिणारा, तुरुंगात नियमाप्रमाणे वागणारा व माफी न मागणारा कार्यकर्ता हे पात्रतेचे निकष होते. या निकषांत बसणाऱ्या कार्यकर्त्यांची सातारा जिल्ह्याची यादी निश्चित झाली. महात्मा गांधींच्या आदेशानुसार साताऱ्यासाठी भाऊसाहेब सोमण व तात्यासाहेब साठे,धामणीसाठी कुपवाडचे आर. पी. पाटील, कुपवाडसाठी दीपचंद व्होरा, येळावीसाठी गंगाराम पवार, तासगावसाठीवि. स. पागे, भिलवडीसाठी धुळाप्पा नवले यांची, तर ब्रिटिश हद्दीतील बिसूर या गावासाठी वसंतराव पाटील यांची सत्याग्रही म्हणून निवड झाली. वैयक्तिक सत्याग्रहींनी ठरलेल्या गावी महायुद्धविरोधी भाषण करायचे. सत्याग्रह करायचा आणि अटक करवून घ्यायची, असे वैयक्तिक सत्याग्रहाचे स्वरूप होते. सातारा जिल्ह्यातील वैयक्तिक सत्याग्रहासाठी निवड झालेल्या सत्याग्रहींनी ठरल्या ठिकाणी व ठरल्या दिवशी आंदोलने केली. वसंतराव पाटील यांनी २४ मार्च १९४१ रोजी बिसूर येथे वैयक्तिक सत्याग्रह केला. हे आंदोलन कसे करायचे, सत्याग्रहींनी भाषणात कोणते मुद्दे मांडायचे आणि एकूण संपूर्ण नियोजनाच्या मार्गदर्शनासाठी प्रांतिक काँग्रसने सीताराम गरुड यांना वसंतरावांकडे पाठविले होते. २४ मार्चच्या सकाळी पद्याळे गावात कार्यकर्ते जमू लागले. 'वंदे मातरम्' आणि महात्मा गांधींच्या जयघोषाने पद्याळे गाव दणाणले होते. शेकडो कार्यकर्त्यांची गर्दी आणि शंभर बैलगाड्यांचा ताफा यांमुळे वातावरणात उत्साह होता. बैलगाडीच्या रथातून शेकडो लोकांच्या साथीने व बैलगाड्यांच्या ताफ्याने वसंतराव पद्याळ्याहून बिसूरकडे वैयक्तिक सत्याग्रहासाठी मिरवणुकीने निघाले. वसंतरावांच्या जयघोषाने परिसर दुमदुमला. सकाळी दहाच्या सुमारास मिरवणूक बिसूर गावात पोहोचली. सत्याग्रहासाठी

अनुक्रमणिका

चावडीसमोरच व्यासपीठउभारण्यात आले होते. मिरवणूक चावडीजवळ पोहोचताच वसंतराव बैलगाडीतून उतरून व्यासपीठावर चढले. ‘वंदे मातरम्’ च्या घोषणा सुरू झाल्या. भारतमातेचा जयघोष सुरू झाला. वसंतरावांना भाषणबाजीत कधीच रस नव्हता. भली मोठी भाषणे करणे त्यांना कधी भावले नाही. ते व्यासपीठावर उभे राहिले, उपस्थित शेकडो बांधवांना हात जोडून नमस्कार केला आणि बोलण्यास सुरुवात केली, “मी बोलणारा माणूस नाही, कृती करणारा माणूस आहे. ब्रिटिश हे आपले शत्रू असल्यामुळे ते खलास झाल्याशिवाय आपला देश स्वतंत्र होणारा नाही. खलास होण्याची ही वेळ आली आहे. अशा वेळी त्यांना कोणतीही मदत अगर सहकार्य देऊ नका. त्यांच्या युद्धप्रयत्नात हरतऱ्हेने अडथळे निर्माण करा. युद्धाला आर्थिक मदत देऊन सहकार्य करू नका. माझा,पार्टीचा, देशाचा या युद्धाला संपूर्ण विरोध आहे. भारतमाता की जय... !”

वसंतरावांनी भारतमातेचा जयघोष केला आणी आपले छोटे भाषण थांबविले. उपस्थितांनी वसंतरावांच्या नावाने घोषणा देण्यास सुरुवात केली. देशप्रेमाने सुरू असलेल्या घोषणांनी वातावरण भारावून गेले. पोलिसांनी लगेचच वसंतरावांना अटक केली. त्यांना कराडला नेले. त्यांच्याविरोधात खटला दाखल झाला. त्या खटल्यात त्यांना सहा महिन्यांच्या सक्तमजुरीची शिक्षा झाली. इथूनच वसंतरावांच्या जीवनातील आणखी एका खडतर आणि संघर्षमय पर्वाची सुरुवात झाली. शिक्षा झाल्यानंतर त्यांना काही दिवस कराडमध्ये बंदिवासात ठेवण्यात आले. त्या ठिकाणी वि. स. पागे, स्वामी रामानंद भारती, धुळाप्पा नवले, गंगाराम पवार हे सत्याग्रहीदेखील होते. सत्याग्रहात अटक केलेल्यांना प्रथम कराडमध्ये बंदिवासात ठेवायचे आणि नंतर टप्प्याटप्प्याने त्या कैद्यांना रेल्वेने येरवड्याच्या तुरुंगात पाठविण्याची पद्धत होती. काही दिवस कराडमध्ये ठेवल्यानंतर वसंतरावांना इतर कैद्यांबरोबर कराडहून रेल्वेने पुण्याला पाठविण्यात आले. सर्व कैदी रेल्वेत दाखल झाले. वंदे मातरम् आणि महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयघोषाने कैद्यांनी रेल्वे दणाणून सोडली. कैद्यांना घेऊन ती पुणे स्टेशनवर पोहोचली. वसंतराव व इतर कैद्यांना हातकड्या घालून पुणे स्टेशनपासून येरवडा तुरुंगापर्यंत पायी नेण्यात आले.

येरवडा तुरुंगात काकासाहेब गाडगीळ, बाळासाहेब खेर, केशवराव जेधे,शंकररावमोरे, मंगलदास पक्वासा, सरदार पटेल, कन्हैयालाल मुन्शी असे देशभक्त होते. सर्व कैद्यांची अ, ब आणि क अशी वर्गवारी करण्यात आली. त्या वर्गवारीनुसार कैद्यांना वेगवेगळ्या चाळीत ठेवण्यात येत होते. कैद्यांची संख्या वाढल्याने तुरुंगातील मैदानावर तंबू उभे करून त्या तंबूंत त्यांना ठेवण्यात आले. वसंतराव सातारा जिल्ह्यातील देशभक्त कैद्यांबरोबर तुरुंगातील एका चाळीत रहात होते. तुरुंगातील देशभक्त सत्याग्रही कैदी एकत्र आल्याने सर्वांचा एकमेकांशी संवाद होत होता. सकाळची प्रार्थना, संध्याकाळची प्रार्थना आणि बौद्धिक भाषणांमुळे तुरुंगातही स्वातंत्र्याविषयी प्रबोधन चळवळ चालूच होती. दररोज सकाळी कैद्यांना चहाऐवजी कांजी दिली जात असे. सूतकताईपासून स्वयंपाकापर्यंतची कामे कैद्यांकडून करून घेतली जात. वसंतराव तुरुंगात शिक्षा भोगत असतानाच गावाकडे एक दुःखद घटना घडली. त्यांच्या मुलीचे निधन झाले. मुलीच्या निधनाची बातमी समजताच वसंतरावांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. दुःखाने त्यांना अस्वस्थ केले. त्यांची अवस्था पाहून तुरुंगातील काही कैद्यांनी वसंतरावांना ‘माफी मागून’ सुटका करून घेऊन आपली पत्नी मालतीबाईंना भेटायला गावाकडे जाण्याचा सल्ला दिला. तो सल्ला वसंतरावांनी क्षणातच धुडकावला. देशप्रेमापुढे कौटुंबिक संकटाला वसंतराव कसे शरण जातील? त्यांनी दुःख गिळले आणि देशप्रेमाला वंदन केले... .

अनुक्रमणिका

येरवड्याच्या तुरुंगात इतर साथीदारांशी चर्चा, विचारविनिमय करून पुढील आंदोलनाची दिशा ठरविण्यावर सर्वांचा भर असे. वसंतराव तुरुंगातून बाहेर पडल्यानंतर काय करायचे याविषयीचे नियोजन मनाशी पक्के करीत असतानाच काळ लोटत गेला. ऑक्टोबर १९४१ मध्ये त्यांची येरवड्याच्या तुरुंगातून सुटका झाली आणि ते आपल्या गावी परतले. तुरुंगातून पद्माळ्याला आल्यानंतर आता वसंतराव शामरावदादांच्या कामात सहभागी होणार, कौटुंबिक जबाबदारी आपल्या अंगावर घेणार, अशी आशा त्यांच्या आजींना, शामरावदादांना व कागलहून पद्माळ्यात येऊन राहिलेल्या मामांना वाटत होती. वसंतरावांच्या डोक्यात मात्र क्रांतियुद्धानेच काहूर माजविले होते. त्यासाठी कोणत्याही संघर्षाला सामोरे जाण्याची त्यांची तयारी होती. देश स्वतंत्र झाल्याशिवाय उसंत घ्यायची नाही, असाच त्यांचा निर्धार होता. तुरुंगातून बाहेर आल्यानंतर याच विचारात ते गढून गेले होते. वैयक्तिक सत्याग्रहामुळे देशातीलवातावरण खूपच बदललेले होते. आता स्वातंत्र्य मिळणारच, अशी लोकांना खात्री वाटत होती. तसेच वातावरण सातारा जिल्ह्यातही होते. वसंतराव गावोगाव फिरायचे. अनेक गावांच्या चावड्यांवर जाऊन बैठका घ्यायचे. तासगावात वि. स. पागे यांच्याकडे त्यांच्या बैठका व्हायच्या, तर सांगलीत समर्थ खादीभांडारचे नाना जोशी, गजानन हुद्दार,मेघजी नरसी शहा, ताराचंद शहा,डॉ. जी. ए. देशपांडे यांच्याकडे वसंतराव जायचे. त्यांच्याशी देशातील परिस्थितीबद्दल चर्चा करायचे. काँग्रेसच्या ध्येयधोरणांबद्दल आणि आपल्या भागातील वाटचालीबद्दल सल्लामसलत करायचे. त्याच काळात सर्वांना उत्सुकता लागली होती ती वर्धा येथे होणाऱ्या काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीची.

६ जुलै १९४२ रोजी वर्धा येथे काँग्रेस कार्यकारिणीची बैठक झाली. ब्रिटिशांची दुटप्पी भूमिका, देशभर चाललेले अत्याचार, महायुद्धामुळे बिघडत चाललेली परिस्थिती आणि स्वातंत्र्यासाठी देशभरात उठलेले वादळ या पार्श्वभूमीवर कार्यकारिणीच्या बैठकीच्या निर्णयांना खूप महत्त्व आले होते. अनेक दिवसांच्या चर्चेनंतर त्या बैठकीतून देशाला कोणती दिशा मिळणार, याकडे वसंतरावांसह त्यांच्या सर्वच सहकारी मित्रांचेलक्ष लागले होते. अखेर त्याच बैठकीत इंग्रजांच्या विरोधात 'चले जाव' आंदोलनाचा निर्णय झाला. त्या निर्णयामुळे अनेक स्वातंत्र्यसेनानी पेटून उठले. इंग्रजांना घालविण्यासाठी काहीही करण्याची ते तयारी करू लागले. या पार्श्वभूमीवर ७ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईत गवालिया टँक मैदानावर काँग्रेसचे अधिवेशन होणार होते. ज्या मैदानावर काँग्रेस पक्षाची स्थापना झाली, त्याच मैदानावर होणाऱ्या आधिवेशनात महात्मा गांधी देशाला कोणती दिशा देणार याकडे साऱ्या देशाचे लक्ष लागले होते. या अधिवेशनाला हजर राहण्यासाठी वसंतरावांनी गावोगावी फिरून जनजागृती केली. अनेक चावड्यांवर तिरंगी झेंडे लावले. अधिवेशनापूर्वीच चळवळीचे वातावरण ढवळून निघाले. सातारा जिल्ह्यातून अनेक कार्यकर्ते रेल्वेने 'भारतमाता की जय', 'वंदे मातरम्' च्या घोषणा देत अधिवेशनाच्या आदल्या रात्री मुंबईकडे रवाना झाले. सांगलीहून मालेगावच्या राम सुतार व मेघजी नरसी शहा यांना सोबत घेऊन वसंतरावही रेल्वेने मुंबईला गेले. सातारा जिल्ह्यातील सर्वच कार्यकर्त्यांचा ठिय्या मुंबईतील पानबाजारात होता. ७ ऑगस्ट रोजी अधिवेशनाला सुरुवात झाली. अपेक्षेप्रमाणे या अधिवेशनात पंडित जवाहरलाल नेहरू यांनी 'चले जाव' चा ठराव मांडला. ८ ऑगस्ट १९४२ रोजी अधिवेशनाचा दुसरा दिवस होता. याच दिवशी महात्मा गांधींनी देशाला 'करेंगे या मरेंगे' चा संदेश दिला. अधिवेशनस्थळी पोलिसांनी अश्रुधुराची नळकांडी फोडली. लाठीमार केला. सातारा जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी आपापल्या भागात परत निघण्याचा निर्णय घेतला. मुंबईतून परत निघण्यापूर्वी वसंतराव आणि इतर कार्यकर्त्यांनी पानबाजारात बैठक घेतली. या बैठकीत आपापल्या भागात भूमिगत राहून लढा देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या निर्णयानंतर कार्यकर्ते परतीच्या प्रवासास निघाले. तोपर्यंत पोलिसांनी कार्यकर्त्यांची धरपकड चालू केली होतीच. त्यामुळे प्रवासातच पोलीस अटक करण्याची शक्यता होती. त्या कारणाने सर्वजण प्रवासाला स्वतंत्रपणे निघाले.

अनुक्रमणिका

## भूमिगतांचा झंझावात

वसंतराव गावी परत आले. भूमिगत राहून लढा आक्रमक करण्याचा निर्णय झाल्याने पुढील नियोजनाच्या कामाला लागले. सातारा जिल्ह्यात भाऊसाहेब सोमण, रघुअण्णा लिमये, शंकरराव साठे, गणपतराव आळते. गणपतराव तपासे यांना पोलिसांनी अटक करून येरवड्याला रवाना केल्याने त्यांना समजले. पोलिसांनी पकड वॉरंट जारी केलेले नव्हते; तरीही कोणत्याही क्षणी वॉरंट निघण्याची शक्यता होती. त्यामुळे कार्यकर्त्यांची बैठक घेऊन भूमिगत लढ्याचे स्वरूप ठरविण्याचा निर्णय झाला. ती बैठक अंकलखोप येथे तात्या सूर्यवंशी यांच्या घरी घेण्याचे ठरले. ठरल्याप्रमाणे त्या बैठकीला वसंतरावांसह त्यांचे सर्व सहकारी उपस्थित राहिले. भूमिगत राहून लढा उभा करण्याची दिशा त्या बैठकीत ठरली.

वसंतराव गावोगावी फिरू लागले. अनेक चावड्यांवर जाऊन त्यांनी मुंबईतील अधिवेशनाचा संदेश लोकांना दिला. सांगलीतही आंदोलनाच्या पुढील कामाबद्दल तरुण कार्यकर्ते सतत विचारीत. एके दिवशी सांगलीतील तानाजी चौकात काही तरुण कार्यकर्त्यांनी वसंतरावांना ‘मुंबई अधिवेशनाचा संदेश काय आहे?’ अशी विचारणा केली. त्यावर वसंतराव म्हणाले, ‘पेटा व पेटवा!’ हाच संदेश घेऊन तरुणांनी कामास प्रारंभ केला. सातारा जिल्ह्यात चाललेल्या स्वातंत्र्यलढयातील घटनांचा परिणामसांगली संस्थानमधील जनतेवरदेखील मोठ्या प्रमाणावर होत होता. प्रजा परिषद व सेवादलामुळे क्रांतियुद्ध आणि स्वातंत्र्यलढ्याची प्रेरणा तरुणांना मिळत होती. त्या प्रेरणेतून भारावलेले कार्यकर्ते लढ्यात सक्रिय होत होते. सांगलीच्या सेवादलाची धुरा पी. बी. पाटील, भाई पेंडसे,जिनपाल खोत, डॉ. देशपांडे, मेघजी नरसी शहा, ताराचंद शहा यांच्याकडे होती. त्या सर्वांचा वसंतरावांशी संपर्क असायाचा. त्यांच्याशी चर्चा करूनच ते हालचाली करायचे. बाबूलाल शहा, बी. व्ही. व्होरा, चारूभाई शहा,बोरगावकर यांच्यासारखी व्यापारी मंडळीही आंदोलनात सक्रिय झाली होती. ११ ऑगस्ट १९४२ रोजी जिनपाल खोत यांनी सांगलीत एक धाडसी पाऊल टाकले. आपले सहकारी शामराव यादव व नारायण शिंदे यांना सोबत घेऊन पटेल चौकातील पाण्याच्या टाकीवर ते चढले. त्या ठिकाणी तिरंगा फडकविला आणि टाकीवर उभाही केला. पोलिसांना ही घटना कळली. पोलिसांनी टाकीवरील तिरंगा उतरविला. तो उतरविताना झेंड्याचा अवमान केला. तिरंगा झेंड्याचा अवमान झाल्याने सांगलीत असंतोषाची लाट उसळली. लोकांनी रस्त्यावर उतरून त्या घटनेचा निषेध करण्याचा निर्णय घेतला. १३ ऑगस्ट १९४२ रोजी ताराचंद शहा यांच्या नेतृत्वाखाली तिरंगा झेंड्याचा अवमान केल्याचा निषेध करण्यासाठी खूप मोठा मोर्चा निघाला. पोलिसांच्या निषेधाच्या घोषणा देत हा मोर्चा रेल्वे स्टेशन चौकात पोहोचला. तेथे मोर्चाचे विसर्जन करून जाहीर सभा घेण्याचा प्रयत्न मोर्चेकऱ्यांनी केला. सभेला परवानगी नसल्याचे कारण दाखवून पोलिसांनी सभा बंद पाडण्याचा प्रयत्न केला. पोलिसांचा विरोध धुडकावून ताराचंद शहा यांनी भाषणाला सुरुवात केली. पोलिसांनी अडथळे आणले तरी त्यांनी भाषण चालूच ठेवण्याचा प्रयत्न केला. अखेर पोलिसांनी लाठीमार सुरू केला. लाठीमारामुळे एकच गोंधळ उडाला. कार्यकर्ते जास्तच चिडले आणि पोलिसांना प्रतिकार करू लागले. पोलिसांच्या हाणामारीत ताराचंद शहा व विलिंग्डन महाविद्यालयाचा पोंक्षे नावाचा विद्यार्थी गंभीर जखमी झाला. कार्यकर्त्यांनी पोलिसांशी झटापट चालूच ठेवली. अखेर पोलिसांनी गोळीबारही केला. जखमी झालेल्या ताराचंद व पोंक्षे यांना उपचारासाठी हलविण्यात आले. या घटनेमुळे स्वातंत्र्यलढा अधिकच आक्रमक बनला.

अनुक्रमणिका

सांगली येथे वसंतरावांच्या उपस्थितीत बैठक झाली. या बैठकीत तासगावतालुक्यातील तासगाव, सोनी, भिलवडी, चिंचणी या गावांच्या चावड्यांवर तिरंगा झेंडा फडकविण्याचे आदेश देण्यात आले. त्या आदेशांनुसार त्या गावांच्या चावड्यांवर तिरंगा झेंडा फडकला.

देशभरात अनेक मोर्चे निघत होते. पोलीस मोर्चेकऱ्यांना अटक करीत होते. पुण्यातही असाच मोर्चा निघाला व पोलिसांनी मोर्चेकऱ्यांना अटक केली. या सर्व घटनांचा परिणाम सातारा जिल्ह्यात लढ्यावर होत होता. तासगाव येथे नाना पाटील व कृष्णराव कुराडे यांचा मोर्चा काढण्याचा विचार होता. तसे ते तयारीला लागलेले होते. त्याच मोर्चाच्या अनुषंगाने एक गुप्त बैठक झाली. या बैठकीत तालुक्यातील सर्व कार्यकर्त्यांना २ सप्टेंबर १९४२ रोजी सकाळी सहा वाजता तासगावात हजर राहण्याचा निरोप देण्यात आला. याच काळात पोलिसांना हूल देण्यासाठी वेगवेगळ्या गावांत मोर्चे होणार असल्याची पत्रके वाटण्यात आली. तशा मजकुराची अनेक पत्रके भिंतीवर चिकटविण्यात आली; त्यामुळे तासगावातील पोलीस गाफील बनले. वेगवेगळ्या गावांमध्ये बंदोबस्त लावण्याचे नियोजन त्यांनी केले. इकडे तासगावात सकाळी सहा पासूनच वेगवेगळ्या गावांतील कार्यकर्त्यांची गर्दी जमू लागली. शस्त्र अथवा हत्यारे आणण्याची कुठलीही सूचना नसताना लोक तलवारी, कुऱ्हाडी, भाले ही शस्त्रे सोबत घेऊन आले होते. समजा, मोर्चा निघाला तर मोर्चावर पोलिसांकडून गोळीबार होण्याची भीती होती. यावर उपाय म्हणून गोळीबार करू शकणाऱ्या पोलिसांवर दहशत बसावी म्हणून गोळीबार करणाऱ्या पोलिसांच्या मुलाबाळांना ठार मारण्यात येणार असल्याची अफवाही पसरविण्यात आली होती. निरोपानुसार वेगवेगळ्या गटांतून कार्यकर्ते तासगावात डेरेदाखल होत होते. फ्लूस, कुंडल, आमणापूर, बांबवडे या भागाचा एक गट; भिलवडी, अंकलखोप, येळावी, निमणी या भागाचा दुसरा गट; सावळज भागाचा तिसरा गट आणि पद्याळ्याहून वसंतरावांसोबत आलेला त्या भागातील चौथा गट अशा चार गटांतून कार्यकर्त्यांची फौज तासगावात दाखल झाली. तासगावमधील भिलवडी नाक्यावर प्रचंड मोठी सभा झाली. कृष्णाराव कुराडे यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा निघाला. स्वातंत्र्याच्या घोषणा,भारतमातेचा जयघोष करीत मोर्चा निघाला होता. तासगावात शिंदे नावाचे फौजदार होते. कार्यकर्त्यांनी दिलेल्या हुलीमुळे बराचसा पोलीस फौजफाटा वेगवेगळ्या गावांत गेला होता. मोर्चाआक्रमक पद्धतीने मामलेदार कचेरीवर गेला. त्या ठिकाणी निकम नावाचे मामलेदार होते. मोर्चेकऱ्यांनी मामलेदार निकम यांना गांधी टोपी घातली. कचेरीवरील ब्रिटिशांचा युनियन जॅक उतरवून त्या ठिकाणी तिरंगा झेंडा फडकविला. दिवाणी कोर्टावरही मोर्चा नेण्यात आला. तेथे एच. एस. पाटील नावाचे न्यायाधीश होते. वातावरणाचा त्यांनी अंदाज घेतला. मोर्चेकऱ्यांनी काही करण्यापूर्वी ते स्वतःच आपल्या डोक्यावर गांधी टोपी घालून बाहेर आले. त्यांनीच कृष्णराव कुराडे यांना पुष्पहार घातला. तासगावच्या तुरुंगात बुर्ली येथील शिवदे नावाचा तरुण कैदेत होता. त्यालाही कैदेतून बाहेर आणून मोर्चेकऱ्यांनी त्याचा सत्कार गेला. मोर्चा यशस्वी झाला होता. त्याची चर्चा जिल्हाभर सुरू झाली होती. मोर्चाची बातमी साताऱ्याचे डी. एस. पी. गिल्बर्ट यांच्यापर्यंत येऊन थडकली. गिल्बर्ट बातमीमुळे संतापले. ते तातडीने तासगावकडे निघाले. तासगावात दाखल होताच त्यांनी संशयितांना मारपीट सुरू केली. अनेक पुढाऱ्यांवर वॉरंट जारी केले. तालुक्यात कार्यकर्त्यांचीधरपकडही चालू केली.

४ सप्टेंबर १९४२ रोजी सकाळी सकाळीच पांडुरंग गोविंद पाटील (येडेनिपाणी) ऊर्फ पांडू मास्तर, निवृत्तीकाका, आदम पैलवान, ईश्वर पुजारी ही मंडळी पद्याळ्यात येऊन दाखल झाली. त्यांनी वसंतरावांचे घर गाठले. वसंतराव त्या वेळी झोपलेले होते. पांडू मास्तरांनी त्यांना झोपेतून उठविले. येडेनिपाणीजवळील मल्लिकार्जुन डोंगरावर सभेचे आयोजन करण्यात आले होते. श्रावण महिन्यातील तो शेवटचा सोमवार असल्याने तेथे जत्रा भरली होती. तिथल्या सभेला वसंतरावांना नेण्यासाठीच ही सारी

मंडळी त्यांच्या घरी आली होती. वसंतरावही झोप पूर्ण होण्याची पर्वा न करता तयार झाले आणि त्यांच्यासोबत त्या सभेसाठी रवाना झाले.

येडेनिपाणीच्या डोंगरावर श्रावण महिन्यातील शेवटच्या सोमवारी मोठी जत्रा भरते. या जत्रेला वाळवा तालुक्यातील आणि परिसरातील अनेक भाविक येतात. या जत्रेतच सभेचे आयोजन करून लोकांमध्ये स्वातंत्र्याविषयी प्रेरणा करण्याचे नियोजन कार्यकर्त्यांनी केले होते. तेथेच कार्यकर्त्यांनी एकत्र जमावे व पुढचे धोरण ठरवावे असे ठरले होते. त्या नियोजनाप्रमाणेच वसंतरावांना त्या सभेस नेण्यासाठीच क्रांतिवीर मंडळी पद्याळ्यात पोहोचली होती. वसंतरावांना घेऊन पांडू मास्तर, हिंदुराव पाटील, रंगराव पाटील आणि इतर कार्यकर्ते तेथे जमले. डोंगर चढतानाच 'भारतमाता की जय', 'महात्मा गांधी की जय' अशा घोषणा दिल्या जात होत्या. डोंगरावरील जत्रेचा सुगावा पोलिसांना लागला होता. क्रांतिकारक त्या जत्रेला आलेच तर त्यांच्यावर झडप घालण्याचा प्रयत्न करण्याचे पोलिसांनी ठरविले. जत्रेच्या बंदोबस्तासाठी म्हणून आठ-दहा पोलिसांना हत्यारासह जत्रेत तैनात करण्यात आले. जत्रेच्या गर्दीने डोंगर फुलला होता. ठरल्याप्रमाणे सर्व कार्यकर्ते डोंगरावर पोहोचले. त्यांच्या घोषणा सुरूच होत्या. डोंगरावरच एक पडके मंदिर होते. पोलिसांना पाहताच कार्यकर्त्यांनी त्यांच्यावरच हल्ला केला. पोलिसांचीच कोंडी केली आणि त्यांना त्या पडक्या मंदिरात कोंडले. मंदिराच्या चारी बाजूंनी कार्यकर्त्यांनी गराडा घातला. शस्त्रे फेकून गप्प राहण्याचा इशारा कार्यकर्त्यांनी पोलिसांना दिला. त्यांना धमकावले. पडक्या मंदिरावर चढून तेथे तिरंगा झेंडा फडकविला. घोषणा जोरजोरात सुरूच होत्या.

तेथे घडत असलेला प्रकार पाहून जत्रेतील लोकांची धावपळ उडाली होती. गोंधळ सुरू झाला होता. जत्रेतील लोकांना शांत राहण्यास सांगण्यात आले. गर्दी शांत झाली. तेथेच सभेला सुरुवात झाली. पांडू मास्तर आणि रंगराव पाटील यांनी ब्रिटिश राजवटीच्या विरोधात जोशपूर्ण भाषणे केली. त्या भाषणांनी उपस्थित लोक उत्साहित झाले. घोषणा देऊ लागले. त्याच सभेत उपस्थितांना वसंतरावांची ओळख करून देण्यात आली. पांडू मास्तरांनी वसंतराव हा एक धाडसी, तरुण कार्यकर्ता असल्याचे सभेस उपस्थित असलेल्या लोकांना सांगितले. त्या रात्री कार्यकर्त्यांनी येडेनिपाणी येथे एका झोपडीत मुक्काम केला. मुक्कामाच्या ठिकाणीही ब्रिटिशांच्या विरोधात काय काय करता येईल याचीच चर्चा त्यांच्यात झाली. दुसऱ्या दिवशी सकाळी वसंतराव पद्याळ्यात पोहोचले. चळवळीतील कार्यकर्त्यांच्या भेटी आणि प्रचार चालूच होता. एके दिवशी रात्री एक गुप्त बैठक झाली. त्या बैठकीत तासगावप्रमाणेच इस्लामपूर येथेही मोर्चा काढण्याचा निर्णय झाला. मोर्चा यशस्वी करण्यासाठी संपूर्ण तयारीनिशी इस्लामपुरात दाखल होण्याचे ठरले. या मोर्चाचे नेतृत्व पांडू मास्तरांकडे देण्यात आले. ८ सप्टेंबर १९४२ हा दिवस मोर्चासाठी निश्चित झाला. वाळवा परिसरातील कार्यकर्त्यांना निरोप पोहोचला. मोर्चाच्या दिवशी पहाटेपासूनच वेगवेगळ्या भागांतून कार्यकर्ते इस्लामपुरात येऊन दाखल झाले. तासगावच्या मोर्चामुळे दुखावलेल्या पोलिसांनी इस्लामपुरचा मोर्चा हाणून पाडण्याचा चंग बांधला होता. तशी मोर्चेबांधणीहीपोलिसांनी केली होती. त्या वेळी साताऱ्याला येटस् नावाचे डी. एस. पी. कार्यरत होते. ते स्वतः फौजफाट्यासह इस्लामपुरात दाखल झाले. अशा वातावरणातच पांडू मास्तरांच्या नेतृत्वाखाली जोरदार घोषणा देत मोर्चा निघाला. मोर्चा मामलेदार कचेरीवर पोहोचल्यानंतर कार्यकर्त्यांची घोषणाबाजी पुन्हा वाढली. कचेरीत उपस्थित असलेले डी. एस. पी. येट्स आणि त्या वेळच्या मामलेदारांनी एक डाव टाकला. मामलेदार कचेरीभोवती हत्यारी पोलिसांचे कडे करण्यात आले होते. मोर्चेकऱ्यांना म्हणणे मांडण्यासाठी कचेरीत येण्याची विनंती केली. त्या विनंतीवरून मोर्चाविषयीची भूमिका सांगण्यासाठी पांडू मास्तर आणि विनायक थोरात कचेरीत दाखल झाले. नेमकी हीच संधी डी. एस. पी. आणि मामलेदारांनी साधली. रचलेल्या

कटाप्रमाणे त्यांनी कचेरीत उपस्थित असलेल्या हत्यारी पोलिसांना पांडू मास्तर व थोरातांना ताब्यात घेण्यास सांगितले. दोघांनाही अटक झाली. या कटकारस्थानाची माहिती काही क्षणांतच कचेरीबाहेर असलेल्या मोर्चेकऱ्यांना समजली. सर्वजण संतापले. तासगावच्या मोर्चाप्रमाणेच अनेक कार्यकर्ते सोबत हत्यारे घेऊन आलेले होते. आपल्याजवळ असलेले भाले,कुऱ्हाडी आणि इतर हत्यारे घेऊन चिडलेल्या कार्यकर्त्यांनी कचेरीवर चाल केली. जमाव संतापाने बेभान झाला होता; परंतु बंदोबस्ताच्या बाबतीत पोलिसांनी आधीच काळजी घेतली असल्याने पोलिसांनी संतापलेल्या जमावावर गोळीबार केला. गोळीबार होताच जमाव पांगू लागला. कार्यकर्ते मिळेल त्या रस्त्याने धावू लागले. जमावाची धावपळ आणि पोलिसांचा गोळीबार यात पंड्या इंजिनिअर व विष्णू बारपटे ठार झाले. पोलिसांनी त्या दोन कार्यकर्त्यांचा बळी घेतला. ते हुतात्मे झाले. वातावरण हाताबाहेर जात असल्याचे पाहून लोकांनी माघार घेण्याची भूमिका घेतली. कार्यकर्ते आपापल्या गावाकडे निघून गेले.

इस्लामपुरातील मोर्चामुळे लोकांमध्ये ब्रिटिशांबद्दल संतापाची लाट पसरली. पोलिसांच्या दडपशाहीमुळे भूमिगत चळवळीची नाकेबंदी होण्याऐवजी अशा घटनांमुळे तिची ताकदच वाढली. इस्लामपूरच्या मोर्चादिवशीच वडूज येथेही कार्यकर्त्यांनी मोर्चा काढला होता. त्या मोर्चावरही पोलिसांनी गोळीबार करून नऊ क्रांतिकारकांना ठार केले होते. पाटण येथे म्हावशीकर यांच्या नेतृत्वाखाली, शिराळा येथे बाबुराव चरणकर यांच्या नेतृत्वाखाली कचेरीवर मोर्चे नेण्यात आले होते. तसेच कराड येथे दादाउंडाळकरांच्या नेतृत्वाखाली कचेरीवर मार्चा नेण्यात आला होता. तेथे मोर्चानंतर उंडाळकरांची मोठी सभाही झाली. पोलिसांनी उंडाळकरांना अटक केली. या अटकेमुळे संतापलेल्या कार्यकर्त्यांनी पोलिसांवर दगडफेक केली होती. हे सर्व मोर्चे आणि घटनांमुळे सातारा जिल्ह्यात भूमिगत चळवळीला लोकांकडूनही छुपे बळ मिळत होते. आंदोलनाची शक्ती दुणावत होती.

### भूमिगतांचा अड्डा

पद्याळ्यातील कर्नाळ ओढ्याजवळील मळीत वसंतरावांनी भूमिगत क्रांतिकारकांचा अड्डा थाटला होता. रात्रभर क्रांतिकारक कारवाया करणे आणि मळीत येऊन दडणे हा दिनक्रमच झाला होता. वसंतरावांना व क्रांतिकारकांना सांगली संस्थानच्या राजांची सहानुभूती होती. त्याच काळात सांगलीत राजाभाऊ काळे नावाचे फौजदार कार्यरत होते. त्यांचाही वसंतरावांबद्दल विशेष जिव्हाळा होता; पण वसंतरावांनी जे काय करायचे ते करावे; पण सांगली हद्दीच्या बाहेर करावे, असे त्यांना वाटायचे. पद्याळ्यातील मळी भूमिगत क्रांतीचे केंद्र बनलेली असतानाच वसंतरावांनी आपल्या कार्यकर्त्यांसाठी सांगली शहरातही वेगवेगळ्या भागांत आठ खोल्या केल्या होत्या. त्या खोल्या बुरुड गल्ली, शिवाजीनगर, फौजदार गल्ली आणि जुन्या सांगलीत होत्या. क्रांतीच्या मोहिमा फत्ते करायच्या आणि कार्यकर्त्यांनी त्या खोल्यांवर मुक्काम करायचा. पोलिसांशी दोन हात करताना आपली शक्ती कमी पडत असल्याची जाणीव वसंतराव आणि त्यांच्या मित्रांना झाली होती. पद्याळ्याच्या मळीत गरज पडेल तेव्हा शामरावदादा कार्यकर्त्यांच्या जेवणाची सोय करीत होते. अनेक वेळा चळवळीला पैसा नाही म्हणून वसंतरावांनी शामरावदादांकडून घरातील दागिने घेऊन पैसे उभे केले होते. पोलिसांकडे मनुष्यबळ होते. शस्त्रसाठा होता. त्यांना समोरासमोर येऊन तोंड देणे शक्य नाही, हे सर्वच क्रांतिकारकांना कळून चुकले होते. लोकांकडून मिळणाऱ्या मदतीला मोठ्या मर्यादा होत्या. हत्यारांसाठी पैसा आणायचा कोठून?या प्रश्नाचे उत्तर म्हणूनच वसंतरावांनी नाइलाज म्हणून लुटीचाही मार्ग अवलंबला.

अनुक्रमणिका

क्रांतीचा लढा व्यवस्थित चालविण्यासाठी सातारा जिल्ह्यात कार्यकर्त्यांचे पाच प्रमुख गट पाडले होते. कुंडल गट, शिराळा आणि वाळवा (पश्चिम भाग) गट, कराडगट, उत्तरेचा गट आणि सांगली गट. कुंडल गटाचे नेतृत्व नाना पाटील यांच्याकडे होते. या गटात जी. डी. बापू लाड, नागनाथअण्णा नायकवडी, आप्पासाहेब लाड, नाथाजी लाड, भगवानराव मोरे, धुळ्याचे डॉ. उत्तमराव पाटील होते. स्वातंत्र्यसैनिकांची सर्वात मोठी संख्या या गटात होती. सांगली गटाचे नेतृत्व वसंतराव पाटील यांच्याकडे होते. या मुख्य गटांमधून अनेक उपगटही अस्तित्वात होते.

वसंतरावांनी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने सांगली भागातील कार्यकर्त्यांचा गट क्रांतीसाठी तयार केला. जी. डी. पाटील, नीळकंठ, दत्तू तात्या, बापू जामदार, वामनकाका पाटील, नारायण जगदाळे, धोंडीराम माळी, रंगराव पाटील, हिंदुराव पाटील हे त्यांच्या गटातील काही खंदे शिलेदार! विध्वंसक कृत्यांनी ब्रिटिशांचे सरकार खिळखिळे करणे या उद्देशाने प्रत्येकजण पेटून उठला होता. विध्वंसाची सुरुवात म्हणून टेलिफोनच्या तारा तोडण्याची मोहीम हाती घेण्यात आली. बुधगाव येथे रात्रीत टेलिफोनच्या सर्व तारा तोडण्यात आल्या. नंतर पोस्टाची बँग लुटण्याचे ठरले. भिलवडी-तासगाव रस्त्यावर पोस्टाची बॅग पळवून नेण्याचा निर्णय झाला. पोस्टाचे टपाल व बॅग भिलवडी स्टेशनवर येत असे. वसंतराव, हिंदुराव पाटील, रंगराव आणि दत्तू तात्या भल्या पहाटे भिलवडी-तासगाव रस्त्यावर निमणी गावाजवळ दडून बसले. भिलवडी स्टेशनवरून शिपाई टपाल बॅग घेऊन निघाला की त्याला त्या रस्त्यातच गाठायचे आणि बॅग लुटायची असे ठरले होते. भिलवडी स्टेशनवरून टपाल घेऊन निघणारा माणूस (त्याला रनर म्हणत) बॅग घेऊन निघाला. निमणीजवळ दबा धरून बसलेल्या वसंतराव आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तो माणूस जवळ येताच त्याच्यावर झडप घातली. त्याच्या हातातील बॅग हिसकावून घेतली आणि पळत सुटले. त्या माणसाने आरडाओरड करायला सुरुवात केली. लोक फक्त पाहत राहिले. पळत सुटलेल्या कार्यकर्त्यांनी बॅगेसह पद्याळ्याच्या मळीतील अड्डा गाठला. लुटून आणलेली बॅग फोडून मोठ्या उत्सुकतेने त्यात किती पैसे असतील याचा अंदाज घेतला; पण सर्वांचाच भ्रमनिरास झाला. त्या बॅगमध्ये पैसे तर नव्हतेच; उलट त्यांना त्यात एक किलो गांजा व अफूची पार्सले मिळाली. निराश होऊन गांजा आणि ती पार्सले सर्वांनी नष्ट केली.

गनिमी कावा हेच मुख्य हत्यार बनवून वसंतराव आणि त्यांच्या सहकाऱ्यांनीब्रिटिशांना जेरीस आणले होते. त्याच काळात सांगली येथे कोटणीस यांच्या वाड्यावर एक गुप्त बैठक झाली. या बैठकीला हिंदुराव पाटील, रंगराव पाटील, जिनपाल खोत, बाबासाहेब पाटील, पी. बी. पाटील,भाई पेंडसे, नामदेव कराडकर, गुंजाळ, विठ्ठल शिंदे, जी. डी. पाटील, धोंडीराम माळी, बाबूलाल, शहा, मेघजी नरसी शहा, लक्ष्मणराव गाडगीळ, डॉ. देशपांडे हजर होते. या बैठकीत गनिमी काव्याची लढाई कशी लढायची याविषयी नियोजन झाले. प्रत्येकाच्या जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या. गजानन हुद्दार यांच्याकडे पत्रके तयार करणे, नामदेव कराडकर यांच्याकडे पत्रके वाटणे, तर गुंजाळ यांच्याकडे स्फोटके तयार करण्याची जबाबदारी देण्यात आली.

शस्त्रे आणि दारूगोळ्यांसाठी पैशाची गरज होती. ती गरज भागविण्यासाठी लुटीशिवाय पर्याय नव्हता. वसंतरावांचे मित्र भूपाल कत्ते यांना गोव्याची चांगली माहिती होती. त्यांनी गोव्याचा खजिना लुटण्याची योजना सर्वांपुढे मांडली. त्या योजनेला सर्वजण तयार झाले. गोव्यात दर महिन्याच्या ७ तारखेला पणजीत खजिन्यात पैसे आणले जायचे, अशी माहिती कत्तेंनी दिली. तो खजिनाच लुटायचा आराखडा तयार करण्यात आला. कार्यकर्त्यांनी वेगवेगळ्या मार्गांनी पणजीत पोहोचायचे. तेथे

अनुक्रमणिका

पोहोचल्यानंतर भटांच्या खानावळीत एकत्र जमून पुढची मोहीम राबवायची असे ठरले. वसंतराव, निवृत्तीकाका, जिनपाल खोत, ईश्वरा गुरव, पी. बी. पाटील, बाबासाहेब पाटील एका मार्गाने पणजीत जाऊन पोहोचले. भूपाल कत्ते व शामराव जाधव दुसऱ्या मार्गाने पणजीत दाखल झाले. सर्वजण भटांच्या खानावळीत पोहोचले. एकमेकांत चर्चा, मसलत सुरू झाली. त्या चर्चेतूनच कुठल्यातरी कारणावरून त्यांच्यात एकमेकांतच भांडणे सुरु झाली. या भांडणांमुळे गोव्याच्या पोलिसांना संशय आला. परिस्थिती अटीतटीची बनण्याची शक्यता निर्माण झाल्याने गोव्याचा खजिना लुटण्याची योजनाच रद्द झाली. योजना जरी रद्द झाली तरी गोव्यात त्या निमित्ताने वसंतरावांच्या नव्या ओळखी मात्र झाल्या.

## सर्वजण सांगलीला परतले

क्रांतियुद्धाची गती वाढत असताना वंसतरावांच्या गटाला पैशाची चणचण भासूलागली होती. पोलिसांच्या धास्तीने कोणीही मदत करायला तयार नसायचे. कोणीच पैसे देईनात तेव्हा दरोडे टाकून क्रांतीसाठी पैसे उभे करण्याचे धोरण आखले गेले. त्यातूनच सांगलीवाडीच्या व्यापाऱ्यावर वसंतराव आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी दरोडा टाकला. त्या दरोड्यात मिळालेल्या पैशातून बॉम्ब, बंदुका, काडतुसे खरेदी करण्याचे ठरले. ते हत्यारे गोव्यातूनच आणत असत. पैशाची व्यवस्था होताच ते गोव्याला गेले. भूपाल कत्ते, राजाराम बुसुर्ग आणि पांडुरंग मिसाळ यांना गोव्याची चांगली माहिती होती. तब्बल १५ दिवस राहून त्या सर्वांच्या मदतीने गोव्यातून हत्यारे मिळविली. बॉम्ब, बंदुका आणि इतर साहित्य घेऊन आपल्या सहकाऱ्यांसह बसने ते कोल्हापूरला निघाले. सावंतवाडीच्या पुढे आल्यानंतर पोलिसांनी बस थांबवून तिची तपासणी केली. वसंतरावांनी हत्यारांची पिशवी ड्रायव्हरच्या बाकड्याखाली दडवून ठेवली होती. त्या पिशवीत बसच्या दुरुस्तीचे साहित्य आहे असे पोलिसांना वाटले आणि वसंतरावांवरचे ते संकट टळले. हत्यारे घेऊन ते सांगलीला सुखरूप परतले.

दारूमुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होतात. दारूचे उत्पादन करणारे गुत्तेच नष्ट केले तर ही समस्या बऱ्याच अंशी कमी होऊ शकते, या हेतूने वसंतरावांच्या गटाने आपल्या परिसरातील दारूगुत्ते जाळण्याची मोहीम हाती घेतली. एके दिवशी रात्री मिरजकवठेमहंकाळ मार्गावरील अलकूड येथील दारूगुत्ता जाळला. त्यानंतर इतर गुत्ते जाळण्यासाठी ते निघाले. पाटगावच्या गुत्त्यावर हल्ला केला. गुत्त्याच्या मालकाने आरडाओरड सुरू केल्याने एकच दंगा सुरू झाला. त्या दंग्यामुळे लोक जागे झाले. लोक जागे होऊन गर्दी झाल्याने त्यांना तिथून पळून जाणे कठीण झाले. शेवटी लोक तेथून निघून जावेत म्हणून हँडग्रेनेडचा स्फोट घडविला. मोठा आवाज झाल्याने लोक घाबरले आणि तिथून पळून गेले. पहाटे सर्वजण कुमठे पाटीजवळ आले. त्यांच्यात चार गट केले. वेगवेगळे गट करून काहीजण सांगलीला, तर काहीजण पद्माळ्याला निघून आले. वसंतराव मुक्कामाला पद्माळ्याच्या मळीत गेले.

वसंतरावांच्या क्रांतिकारककारवाया जोर धरत असतानाच एके दिवशी एक क्रांतिकारी घटना घडल्याचे समजले. पांडू मास्तर, किसन वीर,बलदेव प्रसाद, भाई विभूते, भाई छन्नुसिंग हे क्रांतिवीर येरवड्याचा तुरुंग फोडून पसार झाल्याची ती घटना होती. येरवडा तुरुंग फोडण्याच्या शौर्यामुळे सर्वच क्रांतिकारकांमध्ये आनंदाचेवातावरण पसरले. ब्रिटिश पोलीस मात्र चवताळले. सातारा जिल्ह्यात किसन वीर व पांडू मास्तर या क्रांतिवीरांना शोधण्यासाठी अनेक गावांचा पोलिसांनी छळ मांडला. गावावर छापे टाकणे, लोकांना गोळा करून धमकावणे, बेदम मारहाण करणे, अटक करून कैदेत नेऊन डांबणे असे प्रकार पोलीस करीत होते. पोलिसांनी जंगजंग पछाडले; पण पांडू मास्तर व किसन वीर मात्र त्यांच्या हाती

लागले नाहीत. उलट भूमिगत क्रांतीच्या त्यांच्या कारवाया जिल्हाभर चालूच राहिल्या. पोलीस कोणत्याही मार्गाने त्यांना पकडण्याचा प्रयत्न करीत होते. अनेक गावांचा छळ मांडूनही काहीच हाती लागत नाही असे दिसल्यावर पोलिसांनी क्रांतिवीरांच्या आश्रयदात्यांची मालमत्ता जप्त करणे, गावांवर सामुदायिक दंडाची कारवाई करणे असे प्रकार करण्यास सुरुवात केली. या प्रकारांमुळे लोकांमध्ये संताप वाढू लागला आणि क्रांतियुद्ध अधिकच भडकू लागले.

भूमिगत असलेल्या पांडू मास्तरांनी एके दिवशी वसंतरावांना निरोप देऊन भेटीसाठी बोलावले. भेटीसाठी दुधोंडी गावाची निवड झाली. वसंतरावांनी दुधोंडीला मास्तरांच्या भेटीला जाण्याची तयारी सुरू केली. पद्माळ्याहून हिंदुराव पाटील व राघोबा रायते यांच्यासह सायकलवरून ते दुधोंडीला गेले. मास्तरांची भेट झाली. भेटीतील चर्चेत क्रांतियुद्धाची पुढील आखणी करण्यासाठी कुंडल येथे औंध संस्थानचे युवराज आप्पासाहेब पंत यांच्या बंगल्यात बैठक घेण्याचे ठरले. ठरल्याप्रमाणे जिल्ह्यातील सर्व भागांतील गटांचे क्रांतिवीर बैठकीला हजर झाले. या बैठकीत पुढील धोरण ठरले. त्या धोरणाला सविस्तर स्वरूप देण्यासाठी सर्व नेतेमंडळींना कुरळप येथे मुक्कामाला बोलाविण्यात आले. ठरल्यादिवशी क्रांतिकारक वेगवेगळ्या मार्गांनी कुरळप येथे पोहोचले. दरम्यान, एका हेराने वसंतरावांना क्रांतिकारक कुरळपमध्ये जमणार असल्याची खबर पोलिसांना लागल्याची माहिती दिली. परंतु तिकडे नारायण जगदाळे, बापू जामदार, धोंडीराम माळी, हिंदुराव पाटील हे कुरळपमध्ये जाऊन पोहोचले होते. हेराने दिलेल्या माहितीनुसार पोलिसांनी कुरळप गावावरच छापा टाकला. धरपकड सुरू केली. अनेकांना ताब्यात घेतले. हिंदुरावांनी मात्र पोलिसांना थापा मारून तिथून निसटण्यात यश मिळविले. हिंदुरावांनी आपली फसगत केल्याचे पोलिसांच्या लक्षात आल्याने त्यांनी हिंदुरावांच्या गावावर छापा टाकला. येडेनिपाणी गावातील लोकांचाहिंदुरावांच्या चौकशीसाठी छळ केला. त्यांच्या आई-वडिलांना ताब्यात घेऊन मारहाण केली, त्यांना अटक केली.

## पोलिसांना गुंगारा

पोलिस आणि वसंतराव यांच्यातील लपांडाव चालूच होता. पोलीस हरतऱ्हेचे प्रयत्न करायचे; पण वसंतराव मात्र त्यांच्या हाती कधीच लागायचे नाहीत, एकदा धोंडीराम माळींना हत्यारे आणण्यासाठी गोव्याला पाठविले. वसंतराव स्वतः कोल्हापूरला पांडू मास्तरांना भेटण्यासाठी गेले. हिंदुराव पाटील व रंगराव पाटलांनाही तेथे बोलावले. मंगळवार पेठेत बाबूराव राऊत नावाचे वसंतरावांचे नातेवाईक राहत होते. वसंतराव त्यांच्याकडेच राहिले. पांडू मास्तरांचा मुक्काम गंगावेशमधील अण्णाराव पाडळकर यांच्याकडे होता. रंगराव व हिंदुराव कोल्हापुरात वेगवेगळ्या ठिकाणी राहिले होते. गंगावेश येथे वसंतरावांनी मास्तरांची भेट घेतली. आपल्या भागात चाललेल्या क्रांतिकारी कामाची माहिती त्यांना दिली. त्यांच्यासोबतच्या बैठकीनंतर रात्री आठ वाजता गंगावेशीतील एका खानावळीत पांडू मास्तर, वसंतराव, रंगराव आणि अण्णाराव पाडळकर गेले. एव्हाना फरार पांडू मास्तर गंगावेशीतील खानावळीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. हे तिघे खानावळीत जेवण करीत असतानाच पोलिसांनी खानावळीवर छापा टाकला. पांडू मास्तरांसह वसंतराव, हिंदुराव व रंगरावांना पकडले. पांडू मास्तरांना पोलिसांनी ओळखले होते; परंतु वसंतरावांसह बाकीच्यांना मात्र पोलिसांनी ओळखले नव्हते. डी. वाय. एस. पी. देशमुख यांनी छाप्याची कारवाई करून पांडू मास्तर, वसंतराव आणि रंगराव यांना लक्ष्मीपुरी पोलीस चौकीत नेले. तिघांनाही पोलीस कोठडीत डांबले. पांडू मास्तरांना एका स्वतंत्र खोलीत, तर वसंतरावांसह तिघांना दुसऱ्या खोलीत टाकले. वसंतरावांसह सर्वचजण गयावया करण्याचे नाटक करू लागले. आपण

सामान्य नागरिक असून आपले नाव राऊत असल्याचे सांगून मंगळवार पेठेत राहत असल्याचेही वसंतरावांनी पोलिसांना सांगितले. ती रात्र पोलिस कोठडीत गेली. दुसऱ्या दिवशी वसंतराव पोलिसांकडे घरी जेवायला जाण्याची परवानगी मागू लागले. अखेर पोलीस त्यांच्या विनवणीला बळी पडले. वसंतरावांसोबत एक हवालदार देऊन त्यांना मंगळवारपेठेतील घरी पाठविले. वसंतराव हवालदारासह जेवणाचे निमित्त करून बाहेर पडताच रंगरावही 'मला पाहुण्याकडे जेवायला जाऊ द्या' म्हणून पोलिसांना विनवणी करू लागले. पोलिसांनी त्यांनाही परवानगी दिली. सोबत एक सायकलवाला हवालदार दिला. पुढे काही अंतरावर वसंतराव व हवालदार चालत होते. मागे सायकल घेऊन हवालदार व रंगराव चालत होते. पुढच्या हवालदाराला थांबायला सांगतो असे म्हणून रंगरावसोबतच्या हवालदाराने सायकलवर टांग टाकली. सायकलवरून तो पुढे निघाल्याची संधी साधून रंगराव जवळच्याच एका गल्लीतून पसार झाले. वसंतरावही हवालदाराला लाडीगोडी लावून एका हॉटेलमध्ये घेऊन गेले. तेथे हवालदारास आइस्क्रिम खाऊ घातले. त्यानंतर हवालदारासह मंगलवार पेठेतील आपले नातेवाईक राऊत यांच्या घरी पोहोचले. घरात पोहोचताच स्वतः चेच घर असल्याचा आविर्भाव दाखवीत 'मला जेवायला वाढा', असे म्हणत घरात वावरू लागले. हवालदारालाही चहा दिला. जेवण झाल्यानंतर शौचाचे निमित्त केले आणि तिथून हवालदाराला हुलकावणी देऊन ते निसटले. तिथून निसटल्यानंतर तात्यासाहेब कोरेंच्या वखारीत दोन दिवस लपून राहिले. कोरेंच्या माणसांनी त्यांची चांगलीच बडदास्त राखली. दोन दिवसांनंतर पद्माळ्याला जाण्यासाठी कोल्हापूरहून सायकलवरून निघाले. सांगलीत पोहोचले तेव्हा त्यांना पद्माळ्यात पोलिसांनी सुरू केलेल्या कारवायांची माहिती मिळाली आणि ते सांगलीतच थांबले. पद्माळे येथे सांगली, सातारा, कोल्हापूर येथील दोनशे पोलिसांचा ताफा वसंतरावांना पकडण्यासाठी दाखल झाला होता. गावातील एका-एका माणसाला बोलावून वसंतरावांचा ठावठिकाणा पोलिस विचारीत होते. लोकांना मारहाण करीत होते. गावात आपल्याला पकडण्यासाठी पोलिसांनी चालविलेली धडपड लक्षात आल्याने वसंतरावांना सांगलीतच लपण्याशिवाय गत्यंतर नव्हते. नेमके त्याच दिवशी धोंडीराम माळीही गोव्याहून हत्यारे आणि काडतुसे घेऊन सांगलीत पोहोचले होते. सांगलीत जैन बोर्डिंगमध्ये एका विद्यार्थ्याच्या खोलीत हिंदुराव पाटील, जिनपाल खोत, दत्तूतात्या थांबलेले होते. त्याच खोलीत वसंतरावही थांबले. वसंतराव जैन बोर्डिंगमध्ये आल्याचा सुगावा पोलिसांना लागला आणि पोलिसांनी बोर्डिंगवर छापा टाकला. सुदैवाने वसंतराव थांबलेल्या खोलीऐवजी दुसऱ्याच खोलीमध्ये पोलिसांनी तपासणी केली. त्यामुळे वसंतराव त्यांच्या हाती न लागता तेथूनपसार होण्यात यशस्वी झाले.

वेगवेगळ्या भागांतील कार्यकर्त्यांना हत्यारे पोहोचवून त्यांना सज्ज बनविण्याचे कामही वसंतराव मोठ्या खुबीने करीत होते. त्याच मोहिमेत करोलीचे दत्तू तात्या हँडग्रेनेड्स घेऊन सोनी या गावाला निघाले होते. हँडग्रेनेड्स पिशवीत होते. चालताना पिशवीचा हात बदलताना दत्तूतात्यांच्या हातातून पिशवी निसटली आणि हँडग्रेनेड्सचा स्फोट झाला. दत्तूतात्या गंभीर जखमी झाले. स्फोटाची माहिती पोलिसांना मिळाली आणि पोलीस तेथे पोहोचले. जखमी दत्तूतात्यांना अटक करून पोलिसांनी सांगलीच्या जेलमध्ये टाकले. अशा अनेक घटनांची मालिका वसंतरावांच्या जीवनात सुरूच होती. कितीही संकटे आली तरी क्रांतिकारक कारवाया आणि क्रांतियुद्ध चालविण्याचा त्यांचा निर्धार दिवसागणीक अधिक दृढ बनत होता. त्यातच सांगलीत कॉलऱ्याची साथ सुरू झाली. आपल्या जिवाभावाचे क्रांतिकारी सहकाऱ्यांना साथीची लागण होऊ नये म्हणून वसंतरावांनी कार्यकर्त्यांना लसटोचणीचा कार्यक्रमही घेतला. सांगली शहरातील सर्वच ठिय्यांवर त्यांचे सहकारी क्रांतिकारक मुक्कामाला असायचे. एके दिवशी फौजदार गल्लीतील खोलीत काही क्रांतिकारक बसले असताना कोल्हापूर भागातील क्रांतिकारकांच्या मदतीने बार्शी लाईट रेल्वेची सर्व स्टेशने जाळण्याची योजना आखली गेली. ही मोहीम कशी राबवायची, याविषयी वसंतरावांनी विस्ताराने

अनुक्रमणिका

सूचना दिल्या. रेल्वे स्टेशन जाळण्याअगोदर उदगावजवळील चिंचवड चावडी जाळण्याचे ठरले. त्यानुसार वसंतराव आणि इतर सहकारी ज्या-त्या ठिकाणांवर पोहोचले. क्रांतिकारकांच्या या कारवाईची माहिती कोल्हापूर पोलिसांना मिळाली आणि त्यांनी वसंतरावांसह इतर क्रांतिकारकांना अंकली पुलाजवळ गाठले. पोलीस आणि क्रांतिकारक यांच्यात चकमक सुरू झाली. त्या चकमकीतून मार्ग काढत वसंतराव सांगलीला परतले. पुढे वसंतरावांनी रेल्वे विध्वंसाची मोहीम हाती घेतली. प्रवासी रेल्वे पाडल्यास जीवितहानी होईल, हा धोका लक्षात घेऊन वसंतरावांनी मालगाडी पाडायचा निर्णय घेतला. त्यानुसार नियोजन केले. सोपवून दिलेल्या जबाबदाऱ्या सर्वच क्रांतिकारकांनी यशस्वीरीत्या पार पाडल्या आणि कुपवाडजवळच्या रानात मालगाडी पाडण्यात आली. त्याच मोहिमेत बार्शी लाईट रेल्वेची आरग, बेडग, बेळंकी, सलगरे, धुळगाव ही स्टेशने वसंतरावांनी एकाच रात्रीत पेटविली. अशा अनेक क्रांतिकारीकारवायांमुळे पोलिस हैराण झाले होते. वसंतरावांना पकडण्यासाठी कितीही योजना आखल्या तरी ते हाती लागत नव्हते. अखेर पोलिसांनी वसंतरावांवर एक हजार रुपयांचे बक्षीसही लावले. कधी वसंतराव वेशांतर करून, तर कधी हुलकावणी देऊन पसार व्हायचे. असेच एके दिवशी कुरळपच्या रानात पद्याळ्याचे नारायण जगदाळे यांना वसंतरावांना ‘दादा’ म्हणण्याची कल्पना सुचली. सर्वच क्रांतिकारी मित्रांना ती आवडली आणि या दिवसापासून वसंतराव ‘वसंतदादा’ झाले!

## दादा तुरुंगात

२२ जून १९४३ च्या रात्री वसंतदादा आणि हिंदुराव पाटील सांगली शहरातील जयश्री टॉकीजला सिनेमा पाहायला गेले. सिनेमा पाहून रात्री उशिरा फौजदार गल्लीतील आपल्या ठिय्यावर मुक्कामासाठी आले. पडवीत जयराम कुष्टे, वसंत सावंत, आगलावे हे क्रांतिकारी मित्र अगोदरच झोपलेले होते. हिंदुराव त्यांच्या शेजारी जाऊन झोपले. वसंतदादा मात्र खोलीस जाऊन झोपले. वसंतदादा फौजदार गल्लीत झोपले असल्याची माहिती कुणीतरी पोलिसांना दिली. पोलीस अशा माहितीसाठी आसुसलेले होतेच. साताऱ्याचे पोलीस अधिकारी मोडक व भोपटकर मोठा सशस्त्र फौजफाटा घेऊन फौजदार गल्लीत दाखल झाले. त्या ठिकाणी सांगलीचे फौजदार राजाभाऊ काळे हेदेखील आले. पोलिसांनी दादा आणि त्यांचे सहकारी ज्या खोलीत झोपले होते,त्या खोलीला वेढा घातला. खोलीचा दरवाजा वाजवून दादांना पोलीस आपल्या स्वाधीन होण्याचे आवाहन करू लागले. दादा आणि त्यांचे सहकारी मात्र बाहेर यायला तयार झाले नाहीत. उलट खोलीतूनच बाहेर बॉम्ब फेकण्याची धमकी पोलिसांना देऊ लागले. पोलीस कुठल्याही धमक्यांना बघण्याच्या मनःस्थितीत नव्हते. त्यामुळे त्यांनी दादांनाच दरवाजा तोडून आत प्रवेश करून गोळ्या घालण्याची धमकी दिली. एकंदरच परिस्थिती हाताबाहेर गेल्याचा अंदाज वसंतदादांना आला. त्यांनी पोलिसांच्या स्वाधीन होण्याचा निर्णय घेतला. प्रथम वसंतदादांचे क्रांतिकारी मित्र बाहेर आले आणि त्यानंतर शेवटी वसंतदादा खोलीच्या बाहेर आले. पोलिसांनी दादांसह सर्वांना अटक केली व सांगलीच्या तुरुंगात नेले. फौजदार गल्लीतील खोलीतून बंदूक, दोन बॉम्ब, काडतुसे आणि दारूगोळा पोलिसांनी हस्तगत केला. वसंतदादांना अटक झाल्यानंतर पुढच्याकाही दिवसांतच त्यांच्या सर्वच सहकाऱ्यांना पोलिसांनी शोधून काढले. अटक करून त्यांना सांगलीच्या तुरुंगात पाठविले. सांगलीच्या तुरुंगात वसंतदादा आणि त्यांच्या सोबतचे सर्वच क्रांतिवीर एकत्र आले.

वसंतदादा आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या अटकेची बातमी वाऱ्यासारखी पसरली. दादांबद्दल लोकांना कमालीचे प्रेम होते. त्यामुळे दादांची अटक ही सातारा जिल्ह्यात आणि सांगली परिसरात मोठ्या चर्चेचा विषय बनली. सांगलीच्या तुरुंगात नामदेव कराडकर, कृष्णा पेंडसे, अण्णासाहेब पत्रावळे, बाबूराव

जाधव यांना पूर्वीच अटक करून ठेवले होते. दत्तूतात्याही अगोदरच अटक झाली असल्यामुळे तुरुंगातच होते. वसंतदादा आणि हिंदुरावांना तुरुंगात स्वतंत्र खोल्यांत ठेवण्यात आले. त्या खोल्यांच्या बाहेरच कैद्यांसाठीच्या बराकी होत्या. त्या बराकींत जिनपाल खोत, वसंत सावंत, जयराम कुष्टे, बाबूराव शेटे, महादेव बुटाले, विठ्ठव शिंदे, मारुती आगलावे, गणपत कोळी, बाबू पाचोरे यांना ठेवण्यात आले होते. वसंतदादांच्या गटातील सर्वच क्रांतिकारक आता सांगलीच्या तुरुंगात होते. देशात स्वातंत्र्यासाठी चाललेले क्रांतियुद्ध आणि त्यात स्वतः उतरवून लढण्याची त्यांची तळमळ व जिद्द यामुळे ते तुरुंगात अडकून पडणे शक्य नव्हते. तुरुंगात दाखल होताच त्यांनी तिथूनही सुटण्याची मोर्चेबांधणी सुरूच केली होती. क्रांतियुद्धात आणि त्यासाठी केलेल्या क्रांतिलढ्यातील मिरज संस्थान हद्दीतही पोलिसांनी दादांच्या विरोधात अनेक गुन्हे दाखल केलेले होते. दादांना अटक होताचमिरज संस्थान हद्दीत झालेल्या गुन्ह्यांचा तपास पोलीस गतीने करू लागले. त्यासाठी दादांना काहीकाळ सांगली तुरुंगातून मिरज तुरुंगात हलविण्यात आले. दादा व क्रांतिवीरांच्या विरोधात खटले दाखल करून त्यांना कडक शिक्षा व्हावी या प्रयत्नात पोलीस होते; तर दादा मात्र कोणत्याही परिस्थितीत तुरुंग फोडून बाहेर पडण्याच्या तयारीला लागले होते. दादांचे कुपवाडचे सहकारी मित्र आर. पी. पाटील आणि ज्यांच्याकडे दादांची गप्पाष्टके व्हायची, स्वातंत्र्यलढ्यातील अनेक घटनांवर चौफेर चर्चा व्हायची, ज्यांच्याकडे दादांचा ठिय्या असायचा ते सांगलीतील समर्थ खादी भांडारचे नाना जोशी दादांना भेटायला मिरजच्या तुरुंगात गेले होते. त्या वेळी दादांनी क्रांतियुद्धासाठी लवकरच तुरुंगाच्या बाहेर येण्याचा निर्धार व्यक्त केला होता. पोलिसांनी सांगलीच्या न्यायालयात दादांच्या विरोधात खटला दाखल केला. बेकायदेशीर हत्यारे बाळगणे हा प्रमुख आरोप दादांच्या विरोधात पोलिसांनी लावला होता. तिकडे खटल्याचे कामकाज चालू होते आणि इकडे तुरुंगात दादा आणि त्यांचे क्रांतिकारी मित्र तुरुंग फोडण्याच्या योजना आखत होते. तुरुंगातील कर्मचाऱ्यांची कार्यपद्धती,वेळापत्रक, संख्या आणि इतर बाबींचा अचूक अभ्यास करण्याबरोबरच स्वतंत्र खोल्या व बराकींत विखुरलेल्या आपल्या क्रांतिकारी मित्रांशी संवाद साधण्यासाठी सांकेतिक भाषाही अवगत करण्यात आली होती. तुरुंगातील पोलीस पहारेकऱ्यांवर आक्रमण करून पळून जाण्यासाठी अचूक वेळ साधण्याचा प्रयत्न ते करीत होते.

## तुरुंगफोडीचा थरार

खटल्याचे काम संपले आणि न्यायाधीशांनी २४ जुलै १९४३ रोजी निकाल जाहीर करण्याचे घोषित केले. मागे म्हटल्याप्रमाणे दादांचे वकील पाटणकर यांना सेशन कोर्टात काम निघाल्याने शनिवार, २४ जुलै रोजी ऐवजी सोमवारची तारीख निकालासाठी देण्यात आली. तो शनिवारचा दिवस होता. निकाल लागण्यापूर्वीच तुरुंगातून पळून जाण्याचा निर्धार दादांनी केला होता. दुपारी अडीचच्या सुमारास दादा शौचाचे निमित्त करून खोलीच्या बाहेर पडले. तुरुंगातील इतरही क्रांतिवीर शौचासाठी बाहेर पडले. दादांपाठोपाठ हिंदुराव पाटीलही आपल्या खोलीतून बाहेर आले. शौचालयाजवळ पहाऱ्यासाठी मोहिते नावाचा पहारेकरी होता. नियोजनाप्रमाणे शौचासाठी सर्वच क्रांतिवीर आपल्या बराकीत बाहेर आल्याचा अंदाज दादांनी घेतला. शौचालयासमोरच दादा, बंदूकधारी पहारेकरी मोहिते आणि हिंदुराव पाटील होते. त्याच संधीचा फायदा घेत दादांनी मोहितेला घट्ट पकडले. काही क्षणांतच हिंदुरावांनी त्याच्या हातातील बंदूक हिसकावून घेतली आणि ते तुरुंगाच्या प्रवेशद्वाराकडे धावले. तुरुंगाच्या तटावर एक पोलीस बंदूक घेऊन पहारा देत होता. त्याच्यावरही पत्रावळे व जाधव यांनी झडप घालून त्याची बंदूक हिसकावून घेतली. तुरुंगातील घंटीजवळ एक पहारेकरी होता. त्याचीही बंदूक हिसकावून घेण्यात आली. सर्वजण प्रवेशद्वाराकडे धावले. ते धावत असतानाच शौचालयाजवळील एक पोलीस बंदूक दाखवीत धावत आला.

जिनपाल खोत यांची त्याच्यावर नजर होती. क्रांतिवीरांकडे धावत सुटलेल्या त्यापोलिसावर जिनपालनी झडप घातली आणि त्याची बंदूक अडविली. प्रवेशद्वारावर सोळा पोलीस होते. जिनपालच्या हातात बंदूक होती. आरडाओरड करीत आणि धमकावतच जिनपाल खोत प्रवेशद्वाराकडे निघालेले होते. तुरुंगातील पोलिसांची भीतीने गाळण उडाली होती. जिनपालच्या बंदूक घेऊन चाललेल्या धमकावणीमुळे पोलिस हतबल झाले होते. त्यातही गुलाब नावाच्या पोलिसाने बंदूक उचलण्याचा प्रयत्न केला; पण तो गणपत कोळींनी हाणून पाडला, त्याच्यावर चढाई करून त्याचीच बंदूक काढून घेतली. स्वतःच्या हातातील बंदूक फिरवून मारण्याच्या प्रयत्नात बंदूक पोलिसाला लागण्याऐवजी गटारीवर आदळली आणि तिचे तुकडे झाले.

वसंतदादांसह सर्वजण तटाकडे धावत सुटले, तटावर गेले. तटाभोवतीच्या खंदकात भरपूर पाणी होते; त्यामुळे पोहून जाणे तसे सोपे होते. तटावर पोहोचताच जिनपाल खोत यांनी खंदकात पहिली उडी मारली. त्यानंतर इतरांनी उड्या मारल्या. दादांनीही उडी मारली व त्यांच्यानंतर शेवटी हिंदुराव पाटलांनी खंदकात उडी घेतली. दुर्दैवाने त्यांची उडी खंदकातील पाण्यात पडण्याऐवजी खंदकाच्या कडेला पडली आणि त्यांचे दोन्हीही पाय मोडले. खंदकात उडी टाकलेले सर्व क्रांतिवीर हातात बंदूका घेऊन कडेला पोहोचले; परंतु हिंदुरावांना मात्र पाय मोडल्यामुळे जागचे हलता आले नाही. त्यांनी प्रयत्न करूनही जखमी अवस्थेत धावणे शक्य झाले नाही. बाकी सर्व क्रांतिवीर हवेत गोळीबार करत वसंतदादांसोबत सांगलीच्या बाजारात येऊन कृष्णा नदीकडे धावत सुटले. बाजारासाठी जमलेल्या लोकांमध्ये चलबिचल झाली, गोंधळ उडाला. क्रांतिवीर मात्र हवेत गोळीबार करीत धावतच सुटले. वसंतदादांनी तुरुंग फोडल्याने पोलीस यंत्रणा त्वेषाने क्रांतिकारकांचा पाठलाग करू लागली. काही पोलीस गोळीबार करीत धावत होते, तर कोही पोलीस घोडदौड करीत गोळीबार करीत पाठलाग करीत होते. पुढे हवेत गोळीबार करीत बेफाम धावत सुटलेले क्रांतिवीर आणि त्यांच्या पाठीमागे धावणारे पोलीस व घोडेस्वार. आता पुढे काय होणार, याविषयी हा सर्व प्रकार पाहणाऱ्यांना काहीच कळत नव्हते. हा पाठलाग चालू असताना धावून धावून अण्णासाहेब पत्रावळे थकले आणि एका क्षणी थांबले. तो क्षण पोलिसांनी बरोबर कामी आणला आणि त्यांना आपल्या गोळीची शिकार बनविले. गोळी लागताच पत्रावळे जागीच कोसळले. रक्ताच्या थोराळ्यात त्या क्रांतिवीराची प्राणज्योतमलवली. ते देशासाठी हुतात्मा झाले.

पुढे कृष्णानदीपर्यंत पोहोचलेल्या बाबूराव जाधवांनी नदीत उडी घेतली. आपल्या सर्व क्रांतिकारक मित्रांनी कृष्णेतून पोहत जाऊन दुसऱ्या किनाऱ्यावर सुरक्षित पोहोचावे अशी दादांची धडपड होती. नदीत उडी घेतलेले क्रांतिकारकही त्याच जिद्दीने नदीतून गतीने पोहत निघाले होते; परंतु बाबूराव जाधव मात्र नदीत पोहत असतानाच पोलिसांच्या गोळीला बळी पहले. रक्ताने माखलेला त्यांचा देह कृष्णा नदीत वाहून गेला. एका क्रांतिकारकाला कृष्णा नदीने आपल्या बाहूंत विलीन केले. हे सर्व दादांच्या डोळ्यांदेखत घडत होते. दादा मात्र मोठ्या हिमतीने आलेल्या प्रसंगाला सामोरे जात पोलिसांशी लढत होते. त्यांनी अखेर एका उंबराच्या झाडाच्या आडोशाचा आधार घेतला. तिथूनच त्यांची पोलिसांशी चकमक सुरू झाली. दुर्दैवाने त्यांच्या बंदुकीची कळही नादुरुस्त झाली आणि झाडाच्या बुंध्याआडून उघडा पडलेला त्यांचा खांदा पोलिसांच्या नजरेस पडला. पोलिसांनी बरोबर निशाणा साधला. गोळी दादांच्या खांद्यातून आरपार गेली. दादा रक्तबंबाळ झाले. रक्ताच्या थारोळ्यातच ते बेशुद्ध पडले. त्याच अवस्थेत पोलिसांनी त्यांच्यावर ताबा मिळविला. त्यांना उपचारासाठी सांगलीच्या सिव्हिल रुग्णालयात नेण्यात आले. डॉ. आपटे यांनी केलेल्या शस्त्रक्रियेनंतर दादांच्या जिवाचा धोका टळला. पुढे त्यांना सांगली सिव्हिल हॉस्पिटलमधून हलवून साताऱ्याच्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये ठेवण्यात आले. तेथेही पोलिसांचा कडेकोट पहारा होता. दादांच्या

अनुक्रमणिका

विरोधात न्यायमूर्ती दिवेकर यांच्यापुढे खटला चालला. दादांची बाजू पुण्याचे प्रसिद्ध कायदेतज्ज्ञ बॅ. अग्रवाल यांनी ॲडव्होकेट गणपतराव गोडबोले व ॲडव्हाकेट ज. वा. पाटणकर यांच्या मदतीने मांडली. निकाल सर्वांनाच अपेक्षित होता. २१ सप्टेंबर १९४४ रोजी खटल्याचा निकाल लागला. तुरुंग फोडण्याच्या गुन्ह्याखाली वसंतदादांना सहा वर्षे सक्तमजुरी आणि ५०० रुपये दंड अशी शिक्षा ठोठावण्यात आली. त्यांना पूर्वी सात वर्षांची शिक्षा झालेलीच होती. शिक्षा म्हणून झालेला दंड भरण्यात आला. आताची सहा वर्षांची व पूर्वी झालेली सात वर्षांची अशी १३ वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा भोगण्यासाठी दादांना येरवड्याच्या तुरुंगात धाडण्यात आले.

दादांच्या संघर्षमय आणि खडतर जीवनातील तो एक महत्त्वाचा टप्पा होता. येरवडातुरुंगात त्यांना दंडाबेडीत ठेवण्यात आले. त्यांना अन्नही अत्यंत निकृष्ट दर्जाचे दिले जायचे. निकृष्ट जेवणाच्या विरोधात दादांनी तुरुंगातच उपोषणाला सुरुवात केली. काही केल्या उपोषण सोडत नाहीत याचा राग तुरुंगातील अधिकाऱ्यांना आला. त्यांना किलतानाचे कपडे घालण्यात आले. सर्व प्रकारे त्यांचा छळ करण्यात आला. त्यांनी त्रासास कंटाळून उपोषण सोडावे म्हणून त्यांना दोन दिवस ढेकणांच्या खोलीत ठेवण्यात आले. तरीही दादांनी यातना सहन केल्या; पण तुरुंगातील पोलिसांपुढे झुकले मात्र नाहीत. अखेर पोलिसांना त्यांना चांगले जेवण देणे भाग पडले. सूतकताई, स्वतःच्या हाताने सतरंजी विणणे यांसारखी कामे करीत दादांचे तुरुंगातील दिवस जात होते. येरवडा तुरुंगातच सरदार वल्लभभाई पटेल हेदेखील होते. सरदार पटेल यांची तुरुंगातील कैद्यांशी होणारी चर्चा,तेथेच कैद्यांच्या होणाऱ्या बैठका या सर्व गोष्टी दादा अनुभवत होते. तुरुंगातील अशी वाटचाल सुरू असतानाच १९४६ साल उजाडले. देशात ब्रिटिश राजवटी विरोधातील संताप शिगेला पोहोचला. ब्रिटिश सरकार जर्जर झाले होते. आता भारताला स्वातंत्र्य लवकरच मिळणार असे वातावरण आणि आशावाद देशभरातून जनतेच्या मनात निर्माण झाला होता. देशात लवकरच काँग्रेस अधिकारावर येणार, असा अंदाजही व्यक्त होत होता.

इकडे सांगली परिसरात वसंतदादांना झालेली शिक्षा रद्द व्हावी आणि त्यांना तुरुंगातून मुक्त करावे, ही मागणी जोर धरत होती. लोक त्यासाठी प्रयत्नालाही लागले होते. सांगली संस्थान प्रजा परिषदेने दादांच्या सुटकेसाठी जोरदार प्रयत्न सुरू केले होते. सांगलीच्या राजेसाहेबांना त्या संदर्भात राजी करण्याचे प्रयत्न चालले होते. प्रजा परिषद आणि दादांवर प्रेम करणारी सांगलीची जनता यांमुळे दादांच्या सुटकेच्या प्रयत्नांना दिशा मिळत होती. त्यात डॉ. जी. ए. देशपांडे आणि भाई ताराचंद शहा यांनी पुढाकार घेतला. दादांच्या सुटकेच्या मागणीसाठी सांगली शहरात मार्चा काढण्याचा निर्णय झाला. शहा आणि डॉ. देशपांडे यांनी मोर्चाची जोरदार तयारी केली. दंडाबेडीतील वसंतदादांचे मोठे चित्र रथावर लावण्यात आले. दादांच्या या चित्राचा रथ अग्रभागी ठेवून खूप मोठा मोर्चा काढण्यात आला. दादांचा जयघोष करीत हजारो लोक या मोर्चात सहभागी झाले. शहरातील प्रमुख रस्त्यांवर मोर्चा नेण्यास आला. या मोर्चानंतर स्वामी रामानंद भारती यांच्या अध्यक्षतेखाली खूप मोठी सभा झाली. बॅ. नाथ पै हेहीया सभेला उपस्थित होते. स्वामी आणि पै यांनी प्रभावी भाषणे केली. दादांनी १९४२ पासूनच्या क्रांतियुद्धात केलेले काम आणि त्यांच्या सुटकेविषयी ते आपल्या भाषणात बोलले. या सभेनंतर दादांच्या सुचकेची मागणी घेऊन शिष्टमंडळ सांगलीच्या राजेसाहेबांना भेटले. राजेसाहेबांनाही सुरुवातीपासूनच वसंतदादांविषयी प्रेम होते. त्यांनी शिष्टमंडळाला दादांच्या सुटकेचे आश्वासन दिले. डॉ. जी. ए. देशपांडे, भाई ताराचंद शहा, प्रजा परिषद आणि सांगलीच्या जनतेने केलेल्या पाठपुराव्यामुळे राजेसाहेबांनी वसंतदादांच्या सुटकेचा आदेश काढला.

## येरवड्यातून सुटका

दादांच्या जीवनातील एका नव्या पर्वाची पहाट झाली. २५ एप्रिल १९४६ हा ऐतिहासिक दिवस ठरला. येरवडा तुरुंगातून वसंतदादांची त्या दिवशी सुटका झाली. तुरुंगात अडीच वर्षांची शिक्षा भोगून दादा बाहेर पडले. दादांची सुटका व्हावी यासाठी सांगली संस्थानमधील जनतेने मनापासून प्रयत्न केले होते. त्यांच्या सुटकेची बातमी कळताच लोकांमध्ये स्वागतासाठीही उत्साह संचारला. दादा पुण्याहून रेल्वेने सांगलीकडे येणार होते; त्यामुळे रेल्वेच्या प्रत्येक स्टेशनवर दादांच्या स्वागतासाठी लोक उत्स्फूर्तपणे आले. पुण्याहून हिंदुराव पाटील, दत्ताजीराव शिंदे ही दादांची मित्रमंडळी त्यांच्यासमवेत निघाली. रेल्वेचा डबा सजविलेला होता. त्याच डब्याच्या खिडक्यांवर तिरंगी झेंडे फडकत होते. दादांचा आणि भारतमातेचा जयघोष रेल्वे दणाणून सोडत होता. त्याच वातावरणात रेल्वे कराडमध्ये पोहोचली. हजारो लोकांच्या गर्दीने कराड रेल्वे स्टेशन फुलून गेले होते. लोकांनी जल्लोषी स्वागत केले. तिथूनच काही मित्र दादांसमवेत सांगलीकडे निघाले. माधवनगर येथे आगमन होताच हजारो लोकांच्या उत्साहाने आणि घोषणांनी आसमंत दुमदुमला. क्रांतिलढ्यात जिवाची बाजी लावून लढलेल्या आपल्या भूमिपुत्राच्या स्वागतासाठी तेथे जनसागर लोटला होता. 'क्रांतिवीर वसंतदादांचा विजय असो' या घोषणेने माधवनगर परिसरात उत्साह संचारला. मोटारगाडीतून दादा सांगली शहराकडे निघाले. माधवनगरपासून आमराई परिसरापर्यंतच्या रस्त्यावर शेकडो लोकांनी दुतर्फा गर्दी केली होती. आपल्या घराबाहेर पडून प्रत्येक माणूस रस्त्याच्या कडेला उभे राहून दादांना अभिवादन करीत होता. दादांच्या सुटकेचा आनंदोत्सव प्रत्येकजण आपापल्या पद्धतीने साजरा करीत होता. सांगलीतील तानाजी चौकात पेढे आणि बत्तासे वाटून आनंद साजरा करण्यात आला. सुमारे ४० हजार लोकांच्या गर्दीने आमराई परिसर फुलून गेला होता. सातारा जिल्ह्यातून व सांगली शहरातून दादांवर अलोट प्रेम करणाऱ्या लोकांचा मेळा तेथे भरला होता. तिथूनच एका सजविलेल्या रथातून दादांची मिरवणूक निघाली. चौकाचौकांत जोरदार स्वागत झाले. अनेक महिलांनी औक्षण केले. अशा उत्साहात मिरवणुकीचा समारोप झाला. माई घाटावर पहाटे चार वाजता सत्काराचा ऐतिहासिक सोहळा पार पडला. क्रांतिलढ्यात दादांनी भूमिगत राहून अनेक मोहिमा राबविल्या. सांगली शहरात मोकळेपणाने त्यांना वावरता आले नाही. जनतेच्या प्रेमाचा जाहीर स्वीकारही करता आला नाही. त्या सत्काराच्या निमित्ताने दादांनाही सांगलीकरांच्या आणि सातारा जिल्ह्यातील जनतेच्या प्रेमभावनांचा स्वीकार करण्याची संधी मिळाली. सत्कार सोहळ्यावेळी तात्यासाहेब शिखरे,ताराचंद शहा, जी. डी. पाटील, ॲड. ज. वा. पाटणकर, दत्ताजीराव शिंदे, डॉ. देशपांडे यांची भाषणे झाली. क्रांतिलढ्यात दादांनी वठविलेली भूमिका आणि कार्य यांविषयी सर्वांनी गौरवपूर्ण भाषणे केली. प्रत्येकाच्या भाषणाने वातावरण भारावून जात होते. या सत्कारास दादांनी केवळ उभे राहून नमस्कार करूनच उत्तर दिले. त्यांच्यावरील प्रेमाचा स्वीकार त्यांनी नमस्कारानेच केला. गर्दी, उत्साह आणि दादांवर असलेल्या प्रेम व विश्वासाचे प्रतीक म्हणूनच प्रत्येकजण दादांचा सत्कार करू इच्छित होता. त्याच भावनेने झालेल्या सत्कारातून एक ट्रक पुष्पहार आणि दोन ट्रक नारळ सत्कारस्थळी जमा झाले. दादांच्या जीवनातील ही किती मोठी संपत्ती होती! या संपत्तीचे मोल होऊच शकत नाही. त्याच संपत्तीच्या बळावर दादांनी आपल्या नव्या पर्वाची सुरुवात केली.

सांगलीतील त्या ऐतिहासिक सत्कारानंतर गावोगावी त्यांचे सत्कार झाले. प्रत्येक गावात तेच प्रेम, तोच जोश आणि उत्साह दादांनी अनुभवला. तासगाव, नांद्रे,कुपवाड, बिसूर, कसबे डिग्रज या गावांसह तब्बल ४० गावांमध्ये सत्कार समारंभ झाले. दोन महिने चाललेल्या सत्काराने गावोगावी उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यात दादांच्या आगमनानंतर आठ दिवसांनी झालेल्या त्यांच्या पद्याळे

गावातील सत्कार अविस्मरणीय ठरला. पद्माळे परिसरातील अनेक गावांमधून लोक त्यासोहळ्यात सहभागी झाले होते. जीवनाच्या प्रत्येक वळणावर दादांना खंबीर साथ देणाऱ्या शामरावदादा आणि दादांच्या पत्नी मालतीबाई यांच्यासाठी तर तो दिवस सर्वार्थांनी भाग्याचा होता. ब्रिटिशांनी गावाचा कितीही छळ केला तरी 'वसंतराव कुठे आहेत?' या प्रश्नाचे उत्तर न देणाऱ्या गावकऱ्यांसाठीदेखील आपल्या क्रांतिवीर सुपुत्राचा गौरव करण्याची ही नामी संधीच होती. ती संधी पद्माळ्याचे ग्रामस्थ कशी सोडतील? त्याच कारणामुळे ५१ बैलांच्या गाड्यांतून गावकऱ्यांनी दादांची भव्य मिरवणूक काढली. लेझीम, बँड आणि ढोल-ताशांच्या ताफ्यात दादांच्या जयजयकारात मिरवणूक निघाली. मिरवणुकीनंतर दादांचा सत्कार करण्यात आला. पद्माळ्याचा सत्कार म्हणजे दादांच्या पाठीवर कुटुंबाने दिलेली शाबासकीची आणि प्रेमाची थापच होती.

येरवड्याच्या तुरुंगातून मुक्त होऊन दादा आले तेव्हा देशातील वातावरण बरेचसे बदललेले होते. महात्मा गांधी आणि काँग्रेसने पुकारलेल्या स्वातंत्र्यलढ्याला यश मिळणार, याची खात्री लोकांना झाली होती. क्रांतिलढ्यात दादांनी ब्रिटिशांशी मोठा संघर्ष केला होता. क्रांतिलढ्यात जिवावर बेतलेल्या प्रसंगाला ते धाडसाने सामोरे गेले होते. आता येरवडा तुरुंगातून मुक्त झाल्यानंतर आपल्या जीवनकार्याला दिशा देण्याच्या प्रयत्नात ते होते. तरीही दादांबरोबरच भूमिगत लढ्यात सहभागी क्रांतिकारकांवर ब्रिटिश सरकारने अनेक खटले दाखल केलेले होते. क्रांतिवीरांवरील त्या खटल्यांचे भवितव्य अद्याप ठरलेले नव्हते. त्याच काळात मुंबईत सरकारचे गृहमंत्रिपद मोरारजी देसाई यांच्याकडे होते. मोरारजींनी पहिल्या टप्प्यात क्रांतिसिंह नाना पाटील आणि अरुणा असफअली यांच्यावरील वॉरंट रद्द केले. त्यांच्यावरील सरकारची कारवाई थांबल्याचे चांगले परिणाम होण्याऐवजी भूमिगत क्रांतिवीरांतून वेगळीच प्रतिक्रिया त्या वेळी उमटली. काही क्रांतिवीरांनी सरकारचा पत्रक काढून निषेध केला. अशा परिस्थितीत दादा समन्वयाची भूमिका घेऊन सर्वांशी संवाद साधण्याचा प्रयत्न करत होते. १९४२ च्या क्रांतिलढ्यात भूमिगत राहून कार्य केलेल्या सर्वच क्रांतिवीरांवरील वॉरंट सरकारने रद्द करावे, अशी मागणी होत गेली. सर्वच भूमिगत क्रांतिवीरांवरील वॉरंट रद्द झाल्याखेरीज प्रकट न होण्याचा निर्णय क्रांतिकारकांनी जाहीर केला होता. या परिस्थितीत मार्ग निघावा आणि क्रांतिकारकांनी प्रकट व्हावे, अशी दादांची इच्छाहोती. अखेर मुंबई सरकारचे विधिमंडळ सभापती भाऊसाहेब सोमण यांनी गृहमंत्री मोरारजींची भेट घेतली. क्रांतिकारकांची बाजू त्यांच्यापुढे मांडली. भूमिगत क्रांतिकारकांवरील खटले रद्द करण्याची विनंतीही सोमण यांनी केली. त्यानुसार सरकारने शिक्षा झालेल्या कैदेतील ३७ क्रांतिकारकांना मुक्त करण्याचा आणि ४४ भूमिगत क्रांतिकारकांवरील खटले मागे घेण्याचा निर्णय घेतला. तसा हुकूम २५ एप्रिल १९४६ रोजी काढण्यात आला. भूमिगतांवरील कारवाई रद्द झाल्याने सातारा जिल्ह्यातील जनतेत आनंदाचे वातावरण पसरले. अखेर क्रांतिकारकांचा तो ऐतिहासिक प्रकटदिन उजाडला! १६ मे १९४६ रोजी कराड तालुक्यातील कणेगाव येथे भूमिगत क्रांतिकारक प्रकटीकरणाचा ऐतिहासिक सोहळा पार पडला. या अभूतपूर्व सोहळ्यात आपल्या देशासाठी सर्वस्व पणाला लावणाऱ्या क्रांतिकारकांचा लोकांनी सत्कार केला. अनेक क्रांतिलढ्यातील आठवणी जाग्या करीत सर्व क्रांतिवीर या सोहळ्यात सहभागी झाले होते. सांगली भागातील क्रांतिकारकांसह वसंतदादाही या सोहळ्यास हजर होते. स्वातंत्र्यप्राप्ती हाच एक उद्देश घेऊन १९४२ चा लढा उभे करणारे क्रांतिकारक आपापल्या भागात लढत राहिले. त्यांपैकी काहींचा एकमेकांशीही परिचय नव्हता. प्रकट दिनाच्या निमित्ताने सर्वजण एकमेकांना भेटले आणि ओळखीही झाल्या. विशेष म्हणजे याच दिवशी क्रांतिवीर किसन वीर यांची वसंतदादांशी प्रथमच ओळख झाली.

अनुक्रमणिका

## विधायक वळण

देश स्वातंत्र्याच्या प्रतिक्षेत होता. प्रत्येक स्वातंत्र्यसेनानी आपापल्या भागात लोकांना जागृत करण्यासाठी आपली शक्ती पणाला लावीत होते. स्वामी रामानंद भारती यांनीही तुरुंगातून झालेल्या सुटकेनंतर आपली मोहीम गतिमान केली होती. जिल्ह्यातील काँग्रेसमध्ये चैतन्य निर्माण करण्यात स्वामींनी यश मिळविले होते. दौरे आणि संपर्कमोहिमा राबवून त्यांनी काँग्रेसचे धोरण गावोगावी पोहोचविण्याचा प्रयत्न केला होता. त्याच काळात १४ मे १९४६ रोजी जिल्हा काँग्रेस समितीची बैठक झाली. या बैठकीत स्वामींना अध्यक्षपदी निवडण्यात आले. पक्षाच्या चिटणीसपदी वसंतदादा व किसन वीर यांना संधी देण्यात आली. त्या वेळी पक्षाच्या उपाध्यक्षपदी आय. एन. हकीम यांची, तर खजिनदारपदी गणपत रामचंद्र पाटील यांना संधी देण्यातआली होती. सातारा जिल्ह्याच्या या पदाधिकाऱ्यांनी जिल्हा पिंजून काढला. नेमक्या त्याच काळात मुंबई सरकारच्या विधिमंडळ निवडणुका झाल्या. सातारा जिल्हा दक्षिण मतदारसंघातून यशवंतराव चव्हाण, बाबूराव गोखले, व्यंकटराव पवार, के. डी. पाटील हे काँग्रेसचे उमेदवार भरघोस मतांनी विजयी झाले. सातारा जिल्ह्यावर काँग्रेसचा प्रभाव होताच. या निवडणुकीमध्ये पक्षाचे संघटन अधिक बळकट झाले. मुंबई राज्यात काँग्रेस सत्तेवर आली. बाळासाहेब खेर यांना मुख्यमंत्रिपदी काम करण्याची संधी मिळाली. स्वामी रामानंद भारती, वसंतदादा आणि किसन वीर यांना या मंत्रिमंडळात यशवंतराव चव्हाण यांना संधी मिळेल अशी आशा होती. अभ्यासू, सुशिक्षित आणि धडाडीचा कार्यकर्ता अशी प्रतिमा असलेल्या यशवंतरावांना मंत्रिपदाची संधी मिळेल असे सर्वांनाच वाटत होते; पण सातारा जिल्ह्यातून फलटणचे राजे मालोजीराजे नाईक निंबाळकर आणि सातारचे गणपतराव तपासे यांना मंत्रिमंडळात घेण्यात आले. मंत्रिपदासाठी यशवंतरावांना डावलले तरी मुख्यमंत्री खेर यांनी गृहखात्याचे पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून मात्र त्यांची निवड केली. ते पद घेण्याबाबत यशवंतराव संभ्रमात होते. अखेर वसंतदादा आणि यशवंतरावांच्या मित्रमंडळींनी ते पद स्वीकारण्याचा सल्ला दिला. राज्याच्या राजकारणात यशवंतराव सक्रिय राहावेत यासाठी तो सल्ला मोलाचा होता व तो यशवंतरावांनी मान्य केला. यशवंतरावांच्या भविष्यातील देदीप्यमान कारकिर्दीची तीच पहिली पायरी ठरली.

जिल्हा काँग्रेसचे चिटणीसपद मिळाल्याने वसंतदादांच्या कार्यक्षेत्राची व्याप्ती आपोआपच वाढली. मितभाषी, गोड स्वभाव आणि जोडलेल्या माणसाला भावनिकदृष्टया बांधून ठेवण्याचे कसब यांमुळे दादांचा संपर्क आणि चाहत्यांचा संच झपाट्याने वाढू लागला. साताऱ्यातील सदाशिव पेठेतील जगन्नाथ देवी सराफ यांच्या इमारतीतील काँग्रेस पक्षाचे कार्यालय दादांच्या कार्यशैलीमुळे कार्यकर्त्यांच्या गर्दीने फुलले. त्या कार्यालयाचे सेक्रेटरी म्हणून शिगावचे रंगराव पाटील हे दादांचे मित्रच कार्यरत होते. गावागावांतील लोकांशी जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित होत असतानाच जिल्ह्यातील प्रमुख नेत्यांशीही त्यांचे जवळून संबंध आले. स्वामी रामानंद भारती, सोमण, यशवंतराव, बुवासाहेब गोसावी,व्यंकटराव पवार, वि. स. पागे यांच्याशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित झाले. स्वामींचे ते लाडके बनले! त्याच प्रेमातूनस्वामी त्यांना 'केशव' या नावाने संबोधायचे. दादांनीही आपल्या नम्र स्वभावाने आणि जिज्ञासू कार्यशैलीने नेहमीच स्वामींची शाबासकी मिळवली. वसंतदादा स्वामींना आपल्या गुरूस्थानी मानत होते. त्याच श्रद्धेने स्वामींच्या प्रत्येक शब्दाला मान देऊन कार्य करीत होते. सहकाऱ्यांना हाताळण्याची विश्वासपूर्ण शैली आणि माणसांना प्रेमाने जिंकण्याचे कौशल्य याचमुळे दादा स्वामींच्या कौतुकास पात्र ठरत होते. त्याच विश्वासातून 'या महाराष्ट्रात एकमेव कर्तबगार नेता म्हणून वसंतदादा उदयास येतील' असे भाकीत स्वामी रामानंद भारती यांनी जिल्ह्यातील कार्यक्रमांमधून अनेक वेळा केले होते. त्याच भाकिताशी नाते सांगणारी कृती

अनुक्रमणिका

वसंतदादांच्या कार्यातून सदैव व्हायची. त्याचीच प्रचिती १९ फेब्रवारी १९४६ रोजी साताऱ्यात झालेल्या प्रांतिक काँग्रेस सेवादल कार्यकर्ता शिबिरावेळी आली.

राज्यातील कार्यकर्त्यांचे दोन दिवसांचे ते शिबिर उत्कृष्ट नियोजन आणि संघटनामुळे संस्मरणीय ठरले. नेटके नियोजन, शिस्तबद्ध कार्यकर्त्यांची फळी आणि केलेल्या नियोजनाची अचूक अंमलबजावणी यामुळे दादांचे नेतृत्वगुण राज्यांतील नेत्यांना व कार्यकर्त्यांना अनुभवायला मिळाले. या शिबिराची संपूर्ण जबाबदारी वसंतदादा व किसन वीर (आबा) या दोघांनी आपल्या खांद्यावर घेतली होती. १२ हजार कार्यकर्त्यांची बडदास्त ठेवण्यासाठी लोकांचा सक्रिय सहभाग त्यांनी मिळविला होता. हे शिबिर म्हणजे अनेक गावांचा स्वतःचा उत्सव ठरले होते. दादांनी सांगली भागातून अनेक शेतकरी मित्रांकडून १५० पोती ज्वारी या शिबिरासाठी संकलित केली होती. किसन आबांनीही आदर्कीहून ६० पोती कांदा संकलित केला. आर्थिक नियोजन करून ४० पोती मुगाची खरेदी साताऱ्यातून करण्यात आली. शिबिरासाठीचा स्वयंपाक हा एक आव्हानाचा मुद्दा होता. गावागावांतील महिलांपुढेच ते आव्हान ठेवले गेल्याने महिलांनी ती जबाबदारी सहज पार पाडली. अनेक गावांमध्ये स्वतःच्या घरच्या चुलीवर, चावडीवर, शाळांच्या व्हरांड्यात चुली मांडून भाकरी थापण्यात आल्या. मुगाची उसळ तयार करण्यासाठी गूळ तयार करण्याच्या काहिलीचा वापर करण्यात आला. अनेक गावे अशा स्वयंपाकाची आणि शिबिराची सक्रिय यजमान ठरली. ढोल-ताशे आणि लेझीमच्या ताफ्यासह भाकरी घेऊन बैलगाड्यांसह गावकरी शिबिरस्थळी पोहोचले, शिबिरासाठी गावागावांतून अनेक ट्रकमधून जेवण आणण्यातआले. या सर्व व्यवस्थेमुळे शिबिरासाठी राज्यभरातून आलेले सर्वच सेवादल कार्यकर्ते प्रभावित झाले होते, याच शिबिरास आझाद हिंद सेनेचे सेनापती शहानवाज खान उपस्थित राहिले होते. त्यांनीही वसंतदादांच्या नेतृत्वाचे त्या वेळी कौतुक केले. हे शिबिर जणू राज्याच्या भावी नेत्याच्या गुणांची साक्ष देणारेच ठरले!

सातारा जिल्ह्यातील ‘प्रतिसरकार’ ने आपल्या आक्रमक क्रांतिलढ्याने देशाचे लक्ष वेधले होते. १९४२ च्या क्रांतिलढ्यातून सर्वच क्रांतिकारकांनी भूमिगत राहून ब्रिटिश सरकारला जेरीस आणणाऱ्या मोहिमा आक्रमकपणे राबविल्या होत्या. सातारा जिल्ह्यातील गांधीवादी काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये मात्र भूमिगत क्रांतिकारकांविषयी पूर्वग्रह राहिले होते. त्याचाच परिणाम म्हणून गांधीवादी काँग्रेस कार्यकर्ते भूमिगत क्रांतिकारकांचा दुःस्वास करीत होते. गांधीवाद्यांकडून होणारा हा उपमर्द भूमिगत क्रांतिकारकांना क्लेशदायक ठरत होता. दादांनी गांधीवादी आणि क्रांतिकारक यांच्यात समन्वय राखण्याचा प्रयत्न सदैव केला. तुरूंगातून सुटल्यानंतर आपल्या पद्माळे या गावी राहून दादा कौटुंबिक जबाबदाऱ्या आपल्या खांद्यावर घेतील, अशी आशा त्यांचे बंधू शामरावदादा यांना वाटणे साहजिकच होते; पण तसे घडले नाही. दादांची पक्षकार्यासाठी चाललेली धावपळ वाढतच राहिली. आठवड्यातून एखाद्‌दुसरा दिवसच ते मुक्कामाला पद्माळ्याला यायचे. गावोगाव फिरण्यासाठी त्यांना त्यांच्या मित्रांनी एक जुनी मोटारसायकल दिलेली होती. त्याच मोटारसायकलवरून ते दिवसभर फिरत राहायचे. तुरुंगातील सुटकेनंतर पक्षाच्याच कार्यात व्यस्त झाले तरी शामरावदादांनी मात्र वसंतदादांना त्यात मदतीचीच भूमिका घेतली. त्यांनी शेतीवर लक्ष केंद्रित केले. सर्व कौटुंबिक जबाबदाऱ्या स्वतःच्या खांद्यावर घेतल्या. गावात पंढरपूरची वारी, वारकरी संप्रदाय आणि आध्यात्मिक विचारांचे वातावरण होते. त्यात शामरावदादा सक्रिय सहभागी व्हायचे. पोथी-पुराणाचा व्यासंग असणारी गावकरी मंडळी दररोज रात्री शामरावदादांच्या घरी जमायची. शामरावदादा, त्यांच्या पत्नी पार्वतीबाई, कागलहून पद्माळ्यात येऊन राहिलेले मामा (जगदाळे-पाटील) आणि दादांच्या पत्नी मालतीबाई यांचा दिनक्रम शेती आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळण्यात जात होता.

अनुक्रमणिका

काळ जसा पुढे सरकत होता, तसतसे दादांना मुले-बाळे व्हावीत, हा विषयहीकुटुंबांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा बनला होता. १९४१ साली दादा येरवड्याच्या तुरुंगात असताना त्यांच्या मुलीचे निधन झाले होते. ते दुःख दादांनी तिथेच गिळले होते; पण ते आपली पत्नी मालतीबाई यांच्या सांत्वनालादेखील येऊ शकले नव्हते. कुटुंबाचे दुःख हलके करण्याचा प्रयत्नही ते करू शकले नव्हते. या पार्श्वभूमीवर आता मात्र दादांना मुलगा असावा असे सर्वांनाच वाटत होते. त्यात मुलीच्या निधनानंतर झालेली दोन अपत्येही वारल्यामुळे मालतीबाईंवर दुःखाचा डोंगर कोसळला होता. त्याच कारणाने आता होणाऱ्या अपत्याचे देवाने संरक्षण करावे, अशी प्रार्थना शामरावदादा आणि परिवारातील सर्वच सदस्यकरीत होते. २१ जून १९४७ रोजी मालतीबाईंनी पुत्ररत्नास जन्म दिला. पूर्वी झालेल्या अपत्यांच्या निधनाचा दुःखद अनुभव असल्याने पुत्ररत्नप्राप्तीचा आनंद साधेपणानेच साजरा केला. बारसेही साधेपणानेच झाले. त्याच काळात स्वातंत्र्यसेनानी जयप्रकाश नारायण सांगलीच्या दौऱ्यावर आलेले होते. त्याच कारणाने दादांच्या मुलाचे नामकरण ‘प्रकाश’ असे झाले!

## स्वातंत्र्यानंतरची प्रतिज्ञा

दुसऱ्या महायुद्धामुळे ब्रिटिशांच्या विरोधात संपूर्ण देशात पेटलेले रान आणि जागतिक राजकारणात लोकशाही पद्धतीसाठी ब्रिटिशांवर वाढलेला दबाव यांमुळे ब्रिटिशांनी भारताला स्वातंत्र्य देण्याचा निर्णय घेतला. स्वातंत्र्यासाठी लढलेल्या क्रांतिवीरांसाठी तो सर्वोच्च आनंदाचा क्षण होता. भारतमातेचा जयघोष करीत तिरंगा फडकविण्याचे स्वप्न घेऊन अनेकांनी रक्त सांडले होते. आज तोच तिरंगा देशभर मानाने फडकणार होता. १५ ऑगस्ट १९४७ रोजी देश स्वतंत्र झाला. दिल्लीच्या लाल किल्ल्यावर पंडित जवाहरलाल नेहरू यांनी तिरंगा फडकविला. साताऱ्याच्या ‘अजिंक्यताऱ्या’ वर स्वामी रामानंद भारती यांनी, तर सांगलीच्या स्टेशन चौकात वसंतदादांनी तिरंगा फडकविला. १९३० साली सोलापूरच्या चार हुतात्म्यांच्या बलिदानाने प्रेरणा घेऊन देशसेवेला सुरुवात करताना दादांनी चहा सोडला होता. स्वातंत्र्यदिनी त्यांनी चहा घेऊन आपली प्रतिज्ञा पूर्ण केली. ‘अखेरच्या श्वासापर्यंत मी माझ्या आयुष्यातील प्रत्येक क्षण लोकसेवेसाठी खर्च करीन. माझे सार्वजनिक जीवनहा खुला ग्रंथ राहील,’ अशी प्रतिज्ञाही त्यांनी केली.

ब्रिटिशांविरुद्ध लढताना जी जिद्द होती त्याच जिद्दीने स्वातंत्र्यानंतर देशसेवेला वाहून घेण्याचा संकल्प वसंतदादांनी त्याच दिवशी केला. विकास आणि विधायक कार्याचा मंत्र घेऊन सेवाकार्य सुरू करण्याचा निर्धारही त्यांनी केला. त्याच निर्धाराने शेतकऱ्यांच्या सेवेला दादा त्याच दिवसापासून लागले.

देश स्वातंत्र्यदिन साजरा करीत होता. देशवासीय स्वातंत्र्याच्या आनंदात डुंबून गेले होते; पण तिकडे स्वातंत्र्यादिवशीच पाकिस्तानने काश्मीरमध्ये चढाई करून अत्याचार सुरू केले होते. काश्मिरी जनतेवर अनन्वित अत्याचार केले. त्या अत्याचारांना घाबरून अनेक निर्वासित स्वतंत्र भारतात येऊ लागले. त्यातच मुंबई व कलकत्त्यात (आत्ताचे कोलकात्ता) दंगली उसळल्या. या सर्व घटनांमुळे देशातील वातावरण गढूळ बनले. नेमक्या याच काळात सातारा जिल्ह्यात गुन्हेगारांनी थैमान घातले होते. अनेक फरार गुंड लोकांचा छळ करीत होते. त्याच दरम्यान गुंड सखाराम बारपट्टे याने कामेरीचे कॉंग्रेस आमदार चंद्रोजी पाटील यांचा दिवसाढवळ्या खून केला. या घटनेमुळे जिल्ह्यात फरार गुंडांची दहशत वाढली. वसंतदादा हे प्रकार थांबविण्यासाठी सतत प्रयत्नशील राहिले. पोलिसांना लागेल ती मदत देण्याची भूमिका त्यांनी घेतली. त्याच कारणाने पोलीस गुंडांच्या कारवायांवर पायबंद घालू शकले. चंद्रोजी पाटील

अनुक्रमणिका

यांचा मारेकरी सखाराम बारपट्टे याचा शोध पोलीस घेत होते. तो शोध घेत असताना वशी येथील एका शेतात तो सापडला. पोलिसांनी त्याचा पाठलाग करून त्याला शेतातच ठार केले. बारपट्टेची दहशत संपविली. अशा अनेक कामांत वसंतदादांनी पोलिसांना मदत केली. दादांच्या कार्याचा आणि मदतीचा गौरव म्हणून त्या वेळी मुंबई सरकारने त्यांना स्वसंरक्षणासाठी एक बंदूक भेट दिली.

सातारा जिल्हा आणि सांगली परिसरात दादांनी आपली विधायक कार्याची वाटचाल चालूच ठेवली; पण ३० जानेवारी १९४८ रोजी नथुराम गोडसेने महात्मा गांधींची हत्या केली आणि देशाबरोबरच सांगली जिल्ह्यातही अनेक ठिकाणी जाळपोळ झाली. संतप्त जमावाने अनेक घरांवर हल्ले केले. सांगली शहरात असे प्रकार मोठ्या प्रमाणात घडले. शहरात भीतीचे वातावरण पसरले. संतप्त जमावाला रोखणे पोलिसांनाही कठीण बनले होते. दुर्दैवाने त्याच काळात दादा संधिवाताच्या आजारानेत्रस्त होते. त्यांना चालणेही जमत नव्हते. त्यांच्यावर त्यांचे मित्र डॉ. जी. ए. देशपांडे उपचार करीत होते. तशाही परिस्थितीत दादा रस्त्यावर उतरले. लंगडत लंगडत संतप्त जमावाला सामोरे जाऊन त्यांनी जमावाला शांत करण्याचा प्रयत्न केला. अनेक ठिकाणी जाळपोळ करणाऱ्यांना परावृत्त केले. त्या काळातील दादांनी बजावलेली भूमिका खूप महत्त्वाची ठरली आणि तणावाचे वातावरण निवळले.

स्वातंत्र्य मिळाले तरी दंगली आणि त्यातून निर्माण झालेला तणाव यांमुळे देशाच्या विधायक कार्यात अडथळे येत होते. त्याच कारणाने ते वातावरण बदलणे आणि विश्वासाचे वातावरण निर्माण करणे हे देशापुढे खूप मोठे आव्हान होते. मुंबई सरकारच्या कार्यक्षेत्रात मुंबई व अहमदाबाद येथे उसळलेल्या दंगलींमुळे नवे प्रश्न निर्माण झाले होते. ते प्रश्न मार्गी लावण्यासाठी सामंजस्याचे वातावरण निर्माण करणे ही काळाची गरज होती. तीच गरज लक्षात घेऊन ‘होमगार्ड’ ही नवी संकल्पना १९४८ मध्ये पुढे आली. कॅप्टन एम. जे. बी. माणेकजी यांच्या नेतृत्वाखाली ‘होमगार्ड’ ही शिस्तबद्ध स्वयंसेवी संघटना मुंबई राज्यात उदयास आली. चारित्र्यसंपन्न आणि शिस्तबद्ध स्वयंसेवकांची फळी निर्माण करणे आणि या फळीने पोलिसांच्या हातात हात घालून काम करणे हे या संघटनेचे प्रमुख उद्दिष्ट होते. राज्यात अशी संघटना उदयास आल्याचे पाहून सातारा जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनीही सातारा जिल्ह्यात होमगार्ड संघटना स्थापन करण्याचा निर्णय घेतला. ३ एप्रिल १९४८ रोजी संघटनेच्या कामाचा शुभारंभ झाला. स्वामी रामानंदांनी ‘जिल्हा कमांडर’ या पदासाठी वसंतदादांच्या नावाची शिफारस केली. स्वामींच्या या शिफारशीला बुवासाहेब गोसावी व किसन वीर आबांचा पाठिंबा होताच; परंतु संघटनेच्या कामात आवश्यक असणारा इंग्रजी भाषेतील पत्रव्यवहार दादा कसे हाताळू शकणार,असा मुद्दा पुढे आला. त्यातूनही मार्ग निघाला आणि इंग्रजीची जाण असलेले ॲड. व्ही. ए. पाटील यांना दादांच्या मदतीला देण्यात आले. दादांनी ‘होमगार्ड’ चे संघटन अत्यंत गतीने वाढविले. तालुक्याच्या शाखा स्थापन केल्या. डी. एस. पी. समवेत जिल्हाभर दौरे करून होमगार्डची स्वतंत्र यंत्रणा तयार केली. जी यंत्रणा जिल्ह्यातील अनेक उपक्रमात जिल्ह्याचे बलस्थान ठरली.

## सांगली जिल्ह्याची निर्मिती

देश स्वतंत्र झाला तरी संस्थानांचे अस्तित्व कायम राहिले होते. १९४८ मध्ये देशात संस्थानांच्या विलीनीकरणाचीचळवळ सुरू झाली. अनेक संस्थाने स्वेच्छेने विलीन झाली. काही ठिकाणी संघर्षही झाले. संस्थान विलीनीकरणाच्या प्रक्रियेत वसंतदादा सक्रिय सहभागी झाले होते. सांगलीचे संस्थानिक राजे चिंतामणराव पटवर्धन हे मूलतः पुरोगामी होते आणि त्यांचे दादांशी जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यामुळे

सांगली संस्थान विलीनीकरणाची प्रक्रिया सुकर झाली. राजे चिंतामणरावांनी स्वेच्छेने विलीनीकरणास सहकार्य केले. जत संस्थान विलीनीकरणास सुरुवातीच्या काळात थोडा विरोध झाला; पण दादांनी त्यात शिष्टाई केल्याने तोही विरोध मावळला. स्वातंत्र्याच्या लढ्यात आणि विशेषतः १९४२ च्या क्रांतिलढ्यात औंध संस्थानाने क्रांतिवीरांना सदैव मदत केलेली होती. त्यामुळे औंध संस्थान तत्परतेने विलीन झाले. मिरज, बुधगाव, फलटण आणि कुरुंदवाड ही संस्थानेही विलीन करण्याचा प्रक्रियेत दादा सक्रिय सहभागी होते.

संस्थानांच्या विलीनीकरणानंतर सातारा जिल्ह्याच्या वाटचालीला ऐतिहासिक वळण देणारी घटना ८ फेब्रुवारी १९४९ रोजी घटली. त्या दिवशी किर्लोस्करवाडी येथे जिल्हा काँग्रेसची बैठक आयोजित करण्यात आली होती. याच बैठकीत सातारा जिल्ह्याचे विभाजन करण्याविषयीचा ठराव मांडला गेला. तो सर्वांनुमते मंजूर होऊन मुंबई सरकारकडे पाठविण्यात आला. त्या ठरावानुसार उत्तर सातारा जिल्ह्यात सातारा, महाबळेश्वर, वाई, मेढा, खंडाळा, फलटण, खटाव, कराड, कोरेगाव आणि पाटण असे १० तालुके, तर दक्षिण सातारा जिल्ह्यात मिरज, शिराळा, वाळवा, तासगाव, खानापूर, जत, कवठेमहांकाळ आणि आटपाडी असे ८ तालुके निश्चित करण्यात आले. जिल्हा काँग्रेस समितीच्या शिफारशीनुसार सातारा जिल्ह्याच्या विभाजनाला मुंबई सरकारने मंजुरी दिली. १५ ऑगस्ट १९४९ रोजी उत्तर सातारा व दक्षिण सातारा असे दोन स्वतंत्र जिल्हे अस्तित्वात आले. जिल्ह्याचे भौगोलिक विभाजन झाले तरी विकासासाठी जिल्ह्याचे राजकीय आणि सामाजिक विभाजन होऊ नये, असा प्रयत्न त्यावेळी काँग्रसच्या जिल्ह्यातील नेत्यांनी केला. दोन्ही जिल्ह्यांच्या विकासासाठी एक सल्लागार मंडळ स्थापन केले. स्वामी रामानंद भारती, बुवासाहेब गोसावी, यंशवंतरावचव्हाण, वि. स. पागे आणि वसंतदादा त्या सल्लागार मंडळाचे सदस्य होते. ६ नोव्हेंबर १९५० रोजी कराड येथे झालेल्या काँग्रेस समितीच्या बैठकीतही स्वामी रामानंद भारती यांना दोन्ही जिल्ह्यांचे अध्यक्षपद देण्यात आले. त्याच वेळी वसंतदादांनाही दोन्ही जिल्ह्यांचे सेक्रेटरीपद देण्यात आले. विधायक दृष्टिकोन आणि विकास हेच ध्येय ठेवून दोन्ही जिल्ह्यांची वाटचाल सुरू झाली. जिल्ह्याचे विभाजन झाल्यानंतर आपोआपच वसंतदादांनी दक्षिण सातारा जिल्हा व पर्यायाने सांगली हेच आपले कार्यक्षेत्र निवडले व पर्यायाने यशवंतरावांकडे उत्तर सातारा जिल्ह्याचे सूत्रे आली.

दक्षिण सातारा जिल्ह्यात स्वामी रामानंद भारती, वसंतदादा आणि वि. स. पागे यांच्या सामूहिक नेतृत्वामुळे जिल्ह्याच्या विकासाला नवी दिशा देण्याच्या कामास गती मिळाली. दादांसाठी स्वामी आणि पागे यांना गुरूंचा दर्जा होता. स्वातंत्र्यलढ्यात दक्षिण भागात स्वामींनी काम केलेले होते. शिराळा आणि दुधोंडी येथे स्वामींचे आश्रमही होते. त्यामुळे काँग्रेस पक्षाचे संघटन दक्षिण सातारा जिल्ह्यात वाढविण्यासाठी त्यांना सांगलीत राहून हे काम करणे सोयीचे होते. दादांची क्रांतिलढ्यातील मित्रांची फळी सांगली शहरात कार्यरत होतीच. सांगलीतील गणपती पेठेत लोखंडे यांच्या माडीवर काँग्रेसचे कार्यालय होते. लोकांचा संपर्क आणि कार्यकर्त्यांचे नियोजन त्या कार्यालयातील सेक्रेटरी यशवंत रानडे हे पाहत होते. पुढे १९५५ साली सांगलीचे राजे पटवर्धन यांच्या गणपती संस्थानची जिमखान्यासमोरील मोकळी जागा राजेसाहेबांनी काँग्रेस कमिटीला दिली आणि तेथे पक्षाची सुसज्ज इमारतही उभी राहिली. त्या इमारतीचे बांधकाम सुरू असताना दादा स्वतः त्याची देखरेख करायचे.

स्वामी आणि पागेंच्या सहकार्यामुळे सांगली जिल्हा आणि सांगली शहरातील पक्षाच्या कामाला गती देण्यास दादांनी सुरुवात केली. मेघजी नरसी शहा, चारूभाई पितांबर शहा, डॉ. जी. ए. देशपांडे यांसारखी मंडळी त्यांच्या खांद्याला खांदा लावून काम करीत होतीच. गनिमी कावा, आक्रमक आणि क्रांतिकारी कारवाया हा १९४२ च्या क्रांतिलढ्याचा मूलमंत्र होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भूमिगत राहून लढा दिलेल्या

अनुक्रमणिका

क्रांतिकारकांनी तो मूलमंत्र बाजूला ठेवून विधायक कार्याकडे वळावे अशी दादांची इच्छा होती. त्यासाठी त्यांनी नियोजनबद्ध प्रयत्नही केले; परंतु वाळवा आणि शिराळाभागातील गुंडगिरीचा बीमोड होऊ शकलेला नव्हता. त्या गुंडगिरीचा लोकांना तर त्रास होताच होता; त्याशिवाय शासकीय यंत्रणेलादेखील त्या त्रासाने ग्रासलेले होते. याच पार्श्वभूमीवर पोलिसांनी कासेगावच्या बाबूराव पाटणकर यांना अटक केली होती. पाटणकरांच्या अटकेची पोलिसांची कृती काँग्रेसमधील समाजवादी विचारसरणीच्या कार्यकर्त्यांना भावली नाही. त्यातून त्यांची वाटचाल नव्या मार्गाने सुरू झाली. दादांनी त्यांची समजूत काढण्याचा आणि मतपरिवर्तन करणाचा प्रयत्नही केला; परंतु त्या कार्यकर्त्यांना पाटणकरांच्या अटकेचा निषेध करणारे पत्रक काढले. अखेर त्या सर्वच कार्यकर्त्यांनी समाजवादी पक्षाची स्थापना केली.

दक्षिण सातारा जिल्ह्याच्या प्रत्येक घडामोडीत दादा सकारात्मक दृष्टिकोन ठेवून वाटचाल करीत होते. त्याच काळात त्यांच्यात आणि राजारामबापू पाटील यांच्यात संघर्षाची पहिली ठिणगी पडली. सातारा जिल्हा स्कूल बोर्ड चेअरमनपदाची निवडणूक लागली. या निवडणुकीसाठी दादांनी कराडचे सय्यद दादामियाँ जकाते यांना चेअरमनपदाच्या निवडणुकीत उभे केले. राजारामबापूंना मात्र साताऱ्याचे ॲड. व्ही. एस. बेगमपुरे यांना चेअरमन करायचे होते. या निवडणुकीसाठी किसन वीर आबादेखील इच्छुक होते; परंतु त्यांना त्यांचा अर्ज मागे घेण्यास तयार करण्यात आले. जकाते आणि बेगमपुरे यांच्यात मात्र निवडणूक झाली आणि त्यात जकाते यांचा विजय झाला. पुढे भविष्यात गाजलेल्या वसंतदादा-राजारामबापू यांच्यातील संघर्षाची ती स्कूल बोर्ड चेअरमनपदाची निवडणूक नांदीच ठरली. पुढे हा संघर्ष १९५१ मध्ये पुन्हा दक्षिण सातारा जिल्हा स्कूल बोर्डाच्या चेअरमनपदाच्या निवडीवरून उफाळून आला. त्या वेळी स्कूल बोर्ड चेअरमनपदासाठी सर्वांनी राजारामबापू यांचे नाव निश्चित केले होते. जवळजवळ सर्व मतदार वकिलांनी तशा शपथाही घेतल्या होत्या; पण दादांनी ॲड. केशवराव चौगुले यांना उभे करण्याचा निर्णय घेतलेला होता. अखेर राजारामबापूंची समजूत काढण्यात आली बापूंनीच चेअरमनपदासाठी ॲड. चौगुले यांचे नाव सुचविले. पुढच्या काळात चौगुलेंनी राजीनामा दिला आणि राजारामबापू स्कूल बोर्डाचे चेअरमन झाले.

सातारा जिल्ह्यातील १९४२ चा क्रांतिलढा, प्रतिसरकारच्या माध्यमातून त्या काळात आक्रमक पद्धतीने ब्रिटिशांच्या विरोधात लढलेले काँग्रेसच्या भूमिगतकार्यकर्त्यांचे लढे याविषयी १९४६ मध्ये प्रदेश काँग्रेस कमिटीने नकारात्मक अहवाल केंद्रीय नेतृत्वाला सादर केले होते. त्या अहवालांमुळे पंडित जवाहरलाल नेहरू सातारा जिल्ह्यातील भूमिगत क्रांतिकारकांबद्दल नाराज असल्याचा सूर होता. पंडित नेहरूंचे गैरसमज दूर व्हावेत, अशी इच्छा वसंतदादांसह सर्वच कार्यकर्त्यांची होती. तिला न्याय देण्याचे काम केंद्रीय परराष्ट्र खात्याचे उपमंत्रीडॉ. बाळकृष्ण केसकर यांनी केले. जिल्हाभर फिरून त्यांनी अनेक गावांना भेटी दिल्या. वस्तुस्थितीच अभ्यास केला आणि प्रदेश कॉग्रेस कमिटीने सातारा जिल्ह्यातील भूमिगत क्रांतिकारकांच्या विरोधात दिलेला अहवाल हा गैरसमजांवर आधारित होता हे स्पष्ट केले. त्यांनी तसा अहवाल पंडित नेहरूंना सादर केला आणि त्यांचे गैरसमजही दूर झाले. १९५० साली डॉ. केसकर यांनी सांगली जिल्ह्याला भेट दिली. वसंतदादांनी त्यांचे जिल्ह्यात जोरदार स्वागत केले.

ब्रिटिशांशी लढताना केलेला संघर्ष आणि स्वातंत्र्यानंतर घडणाऱ्या वेगवेगळ्या राजकीय, सामाजिक घडामोडींशी करावा लागणारा संघर्ष यातून वसंतदादांच्या व्यक्तिमत्त्वाला नवे पैलू पडत होते. १९४९ नंतर मुंबई राज्यातील बारा जिल्ह्यांच्या प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून भाऊसाहेब हिरे यांच्याकडे जबाबदारी आलेला होती. काँग्रेस पक्षाच्या दृष्टीने तो काळ तसा संघर्षमय आणि आव्हानात्मक असाच होता.

काँग्रेस पक्षातील केशवराव जेधे, शंकरराव मोरे यांच्यासारखी मंडळी काँग्रेस पक्षातून बाहेर पडली होती. ३ ऑगस्ट १९४८ रोजी आळंदी येथे शेतकरी कामगार पक्षाची स्थापना झाली. क्रांतिसिंह नाना पाटील, शंकरराव मोरे, माधवराव बागल, तुळशीदास जाधव, पंजाबराव देशमुख, दाजीबा देसाई, केशवराव जेधे यांनी त्यात पुढाकार घेतला होता. एस. एम. जोशी, ना. ग. गोरे यांसारख्या मातब्बरांनी समाजवादी पक्षात प्रवेश केलेला होता. या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्ष संघटना गतिमान करणे जिकिरीचे होते. त्या परिस्थितीत यशवंतराव चव्हाण आणि भाऊसाहेब हिरे यांनी वसंतदादांच्या साथीने पक्षाची ताकद वाढविली. त्या निमिताने दादांचा राज्यातील कार्यकर्त्यांशी असलेला संपर्क आणि त्यांच्यातील नेतृत्वगुण सर्वांना दिसले. त्याच काळात १९५० मध्ये नाशिक येथे अखिल भारतीय काँग्रेसचे खुले अधिवेशन आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष भाऊसाहेब हिरे होते, तर अधिवेशनाचे संघटनवसंतदादांनी केले होते. त्या अधिवेशनाच्या शिस्तबद्ध नियोजनामुळे ते यशस्वी झाले. त्याचबरोबर काँग्रेसच्या श्रेष्ठींचे लक्षआपोआपच वसंतदादांकडे वेधले गेले. त्याच वर्षी सांगली हायस्कूलच्या मैदानावर वसंतदादांनी युवक काँग्रेसचे अधिवेशन भरविले. ते अधिवेशनही उत्कृष्ट संयोजनामुळे यशस्वी झाले. त्या अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी भाऊसाहेब हिरे होते, तर यशवंतराव चव्हाण यांनी त्या अधिवेशनात युवक काँग्रेसला दिशा दिली.

अशा सर्व उपक्रमांच्या माध्यमातून वसंतदादा सतत आघाडीवर राहत असत. दक्षिण सातारा जिल्हा विकास मंडळाचे अध्यक्ष म्हणून स्वामी रामानंद भारती कार्यरत होते. त्यांनी जिल्ह्याच्या विकासाची निश्चित दिशा ठरविलेली होती. वसंतदादा आपली कल्पकता, लोकसंपर्क आणि निष्ठेची शक्ती त्याच मार्गाला लावून विकासाला गती देत होते. त्याच कारणाने छोट्या-छोट्या उपक्रमांतून मोठी कामे उभी राहण्याचा इतिहास घडत होता. विकासासाठी निधी लागतो. केवळ सरकारी निधीच्या आधारावर राहिल्यास विकासावर मर्यादा येऊ शकतात,याची जाण दादांना होती. जनतेतूनच विकासासाठी निधी उभा केल्यास सर्व कामे गतीने होऊ शकतात; हे त्यांनी कृतीने सिद्ध केले. अल्पबचत हे त्याचेच उदाहरण म्हणावे लागेल. बचतीचे महत्त्व पटविण्यासाठी लोकजागरण होण्याची गरज असल्याचा विचार त्यातूनच पुढे आला. दादांनी नॅशनल स्मॉल सेव्हिंग्जचे अधिवेशन सांगलीत भरविले. या अधिवेशनाला चांगला प्रतिसाद मिळाला. त्यात लोक सक्रिय सहभागी झाले. लोकांना बचतीचे महत्त्व समजल्याने बचतीकडे लोकांचा ओढा वाढला. त्याचाच चांगला परिणाम म्हणून दक्षिण सातारा जिल्ह्याला अल्पबचतीचे बक्षीस मिळाले. एकीकडे निधीही वाढला आणि दुसरीकडे विकासाच्या कामांना गतीही मिळाली. स्वामी रामानंद भारती, वसंतदादा, वि. स. पागे, बॅ. जी. डी. पाटील या सर्वांनी अल्पबचतीच्या चळवळीतून अनेक विकासकामे होऊ शकतात हे राज्याला दाखवून दिले. पुढे महात्मा गांधी जयंतीच्या निमित्ताने राज्यात ग्रामसुधार सप्ताह सुरू करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला. वसंतदादांच्या नेतृत्वाने या कामातही इतिहास घडविला. जिल्ह्यात हा सप्ताह १५ दिवसांचा करण्यात आला आणि तो दोन महिने चालला. आपल्या भागाच्या विकासासाठी श्रमदान हे आपले कर्तव्य आहे, ही भावना गावागावांतील लोकांमध्ये निर्माण करण्यात दादा यशस्वीझाले. नेतृत्व करणाऱ्यांमध्ये धडाडी असेल, शुद्ध हेतू असेल आणि प्रामाणिक कष्ट असतील तर लोक श्रमदानाच्या कार्यात भक्कमपणे पाठीशी उभे राहतात, याचा अनुभव दादांनी आपल्या सुरुवातीच्या काळातच आपल्या पद्याळे गावातील कृष्णा नदीकाठचा घाट बांधताना घेतला होता. तोच अनुभव ग्रामसुधार सप्ताहाच्या निमित्ताने दादांना पुन्हा आला. त्या काळात स्थानिक मंडळ आणि सार्वजनिक बांधकाम खात्याची अनेक कामे बंद होती. केवळ मजुरांअभावी ती कामे थांबलेली होती. या समस्येवर मात करण्यासाठी दादांनी ग्राम सुधार सप्ताहातील श्रमदानाचा पुरेपूर वापर करून घेतला. सर्व गावे श्रमदानात सामील झाली. परिणामी जिल्हाभर अनेक कामांना गती मिळाली. जिल्ह्यातील

गावागावांनी केलेल्या श्रमदानाचे आर्थिक मूल्य जोखण्याची तत्परताही त्यांनी दाखविली. त्या सप्ताहाच्या निमित्ताने झालेल्या श्रमदानाचे मूल्य त्या वेळी होते १० लाख रूपये!

जी योजना हाती लागेल त्यात जीव ओतून स्वतः काम करणे आणि आपल्यासोबत काम करणाऱ्यांना त्याच पद्धतीने काम करण्याची प्रेरणा देणे ही दादांची कार्यपद्धती होती. त्याच कारणाने शासनाच्या धान्य लेव्ही योजनेतही उत्कृष्टकार्य केल्याबद्दल जिल्ह्याला बक्षीस मिळाले. अशी मिळालेली रोख बक्षिसे आणि लोकांकडून मिळविलेल्या निधीच्या आधारावर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी दादांनी सांगली येथे वसतिगृह उभे केले. दादा स्वतः सातवीपर्यंतच शिकले; पण ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी कराव्या लागणाऱ्या संघर्षचा अनुभव त्यांनी स्वतः घेतला होता. प्राथमिक शिक्षण स्वतः च्याच घराच्या पडवीत शाळा भरवून, चौथीनंतरचे शिक्षणकर्नाळा आणि सांगली येथे पायी जाऊन त्यांनी घेतलेले होते. त्याच कारणाने विद्यार्थी वसतिगृहाची गरज त्यांनी जाणली आणि ते उभेही केले. सांगली परिसरात चाललेल्या या कामांमुळे सांगलीचा राज्यभर दबदबा वाढत होता. राज्यातील अनेक जिल्ह्यांची शिष्टमंडळे सांगलीला भेट देऊन च्या कामांचा अभ्यास करीत होती. आपल्या भागात त्या आधारावर काय करता येईल याचा विचारही करीत होती. दादा मात्र सतत नव्या कल्पनांचा शोध घेत राहायचे. केवळ पारंपरिक पद्धतीनेशेती करून ग्रामीण भागाचा विकास होणार नाही, या वास्तवाची जाणीव त्यांना झाली होती. ग्रामीण भागात कृषिपूरक उद्योग उभारणीच्या कामाला गती दिली पाहिजे असे त्यांनावाटे. ती गती द्यायची तर पुरेशी वीज असणे गरजेचे होते. ती गरज आणि शेतीच्या पाण्याची गरज लक्षात घेऊनच पुढे कोयना धरण आणि विद्युत्‌निर्मिती प्रकल्पाचा विचार कृतीत उतरला. केवळ विकासाची ओढ असून जमणार नाही, तर त्याला पायाभूत सुविधा आणि धरणांसारख्या प्रकल्पांची जोड द्यावी लागेल हेदेखील वसंतदादांना पटले होते. कोयना प्रकल्प परिषदेचे अध्यक्ष भाऊसाहेब हिरे. शंकरराव किर्लोस्कर आणि अभियंता मनोळीकर यांच्या अभ्यासातून आणि प्रयत्नातून कोयना धरण प्रकल्पाला दिशा मिळाली. हेळवाक या गावी भरविण्यात आलेल्या परिषदेत कोयना धरण बांधण्याची शिफारस डेक्कन मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनच्या पाठपुराव्यामुळे नियोजन मंडळाकडे करण्यात आली. भाऊसाहेब हिरे आणि शंकरराव किर्लोस्कर यांच्या पाठपुराव्यामुळे केंद्र सरकारने कोयना धरणास मंजुरी दिली. दक्षिण महाराष्ट्रातील घराघरांत वीज पोहोचविण्याची प्रक्रिया सुरू करणारा हा प्रकल्प साकारला.

### विधायक राजकारणाची मुहूर्तमेढ

स्वातंत्र्यानंतर महात्मा गांधीच्या हत्येनंतर निर्माण झालेल्या वेगवेगळ्या भागांतील तणावाचा परिणाम त्या-त्या भागातील विकासावर आणि नेत्यांवरही झालेला होता. वसंतदादांनी मात्र अशा घटनांना ज्या-त्या वेळी सक्षमपणे हाताळून विधायक आणि दूरगामी विकासाच्या कल्पनांवर भर दिलेला होता. १९५० मध्ये राज्यात इस्लामपूर दूध प्रकरण गाजले. त्या काळात देशात साखरेची कमालीची टंचाई होती. व्यापाऱ्यांनी साखरेचा साठा करून ठेवल्याने सामान्य माणसांना साखर मिळणे कठीण बनले होते. शेतकरीही त्याच समस्येला तोंड देत होते. त्याच काळात इस्लामपुरात दूध व्यवसाय शेतकऱ्यांसाठी नफ्याचा ठरला पाहिजे हा उद्देश घेऊन ॲड. एस. डी. पाटील यांनी दूध उत्पादक शेतकऱ्यांचे आंदोलन उभे केले. दुधाचा व्यवसाय शेतकऱ्याला फायद्याचा ठरावा यासाठी सरकारने आवश्यक ती सर्व मदत करावी, दुधाला योग्य भाव द्यावा, अशा प्रकारच्या मागण्या आंदोलकांनी केल्या,अखेर ते आंदोलन चिघळले आणि ‘दूध बंद’ चा निर्णय झाला. इस्लामपुरात बाहेरून दूध आणणे बंद झाले. तब्बल तीन दिवस इस्लामपुरात दुधाचा थेंबही आंदोलक शेतकऱ्यांनी येऊ दिला नाही. दुधाअभावी लहान मुलांचे हाल झाले.

अनुक्रमणिका

या पार्श्वभूमीवर एस. डी. पाटील यांच्याविरोधात काँग्रस पक्ष कारवाई करण्याच्या तयारीला लागला. त्यासाठी भाऊसाहेब हिरे चौकशीसाठी इस्लामपुरात आले. वसंतदादांनीया प्रकरणात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. दूध उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न आणि त्या अनुषंगाने एस. डी. पाटील यांनी उचललेली पाऊल याचे समर्थन केले. शेतकऱ्यांची बाजू घेत त्यांनी भाऊसाहेब हिरेंपुढे सर्व मुद्दे मांडले. त्या चौकशीनंतर ॲड. एस. डी. पाटील यांची भूमिका योग्य होती हे काँग्रेस पक्षाने कबूल केले. भाऊसाहेब हिरे, स्वामी रामानंद भारती, यंशवंतराव चव्हाण,वसंतदादा, बुवासाहेब गोसावी, व्यंकटराव पवार यांनी एक पत्रक काढून ॲड. एस. डी. पाटील हे निर्दोष असल्याचा व शेतकऱ्यांची चळवळ योग्य असल्याचा निर्वाळा दिला आणि इस्लामपूर दूध प्रकरणावर पडदा पडला. पुढच्या काळात एस. डी. पाटील यांना दक्षिण सातारा जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्षपदही मिळाले.

१९५१ मध्ये सरकारने १९३९ चा मार्केट ॲक्ट मिरज तालुक्यालाही लागू केला. त्यावर व्यापाऱ्यांच्या तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. व्यापारी या कायद्याच्या विरोधात लढायला सज्ज झाले. व्यापाऱ्यांना विश्वासात घेऊन त्यांचे मतपरिवर्तन करण्याची भूमिका वसंतदादांनी घेतली. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळावा आणि व्यापाऱ्यांचीही सोय व्हावी अशी दादांची इच्छा होती. अनेक व्यापाऱ्यांनी सुरुवातीला विरोध केला. काही व्यापारी अलिप्त राहिले, तर काहींनी दादांसोबत राहण्याचा निर्णय घेतला. पुढे सर्वच व्यापारी दादांसोबत यायला तयार झाले. त्याच काळात दादांच्या नेतृत्वाखाली मार्केट कमिटीची स्थापना झाली. ते चेअरमन आणि आर. बी. आरवाडे व्हाईस चेअरमन अशा पद्धतीने मार्केट कमिटीची सुरुवात झाली. सुरुवातीला तीन हजार रुपयांचे कर्ज घेऊन काम सुरू झाले. पुढे मार्केट कमिटीसाठी १०० एकर जागा मिळवून सुसज्ज मार्केट यार्ड उभारण्यात दादांना यश आले. विकासाची अशी कामे चालू असतानाच राष्ट्रपुरूषांना अभिवादन करणाऱ्या आणि त्यातून लोकांना प्रेरणा देणाऱ्या प्रकल्पांकडेही त्यांचे लक्ष होते. त्यातूनच सांगलीच्या स्टेशन चौकात महात्मा गांधीचा पुतळा उभारला गेला आणि त्याचे अनावरण स्वातंत्र्यसेनानी स. का. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

१९५२ साल उजाडले आणि स्वतंत्र भारतातील पहिल्या सार्वत्रिक निवडणुकांची धामधूम सुरू झाली. दक्षिण सातारा जिल्ह्यात लोकसभेची एक तर विधानसभेच्या आठ जागा होत्या. वसंतदादांनी जिल्ह्यातील निवडणुकीची यंत्रणा अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने राबविली. कार्यकर्त्यांचा उत्साह आणि सहभाग राखत असतानाच निवडणुकीविषयी मतदारांचेही प्रबोधन करण्यात आले. वसंतदादा स्वतः सांगली विधानसभा मतदारसंघातून ती निवडणूक लढले. त्यांच्यासाठी डॉ. जी. ए. देशपांडे, रघुनाथसिंह रजपूत, गजानन हुद्दार, चारूभाई शहा, मेघजी नरसी शहा, दीपचंद शहा या त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रचारयंत्रणेची धुरा सांभाळली होती. त्या वेळी काँग्रेसचे ‘बैलजोडी’ हे निवडणूक चिन्ह होते. हे चिन्ह मतदारांपर्यंत पोहोचविणे आणि मतदान कसे करावे याविषयी लोकशिक्षण देणे हीदेखील मोहीम दादांच्या कार्यकर्त्यांनी त्या वेळी राबविली होती. विडी कामगारांमध्ये दादांविषयी विशेष आस्था होती. मतदानाविषयी माहिती व्हावी यासाठी कार्यकर्त्यांनी महिला विडी कामगारांसाठी कागदी मतपेट्या तयार करून मतदान कसे करावे याचेही प्रात्यक्षिक त्या वेळी दाखविले होते. त्या पहिल्याच ऐतिहासिक सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेस पक्षाला लोकसभेच्या एका जागेसह जिल्ह्यातील आठही विधानसभा मतदारसंघांत विजय मिळाला. सांगली मतदारसंघातून दादा स्वतः २७ हजार मतांनी विजयी झाले. मिरज मतदारसंघातून कळंत्रेअक्का,तासगावमधून दत्ताजीराव सूर्यवंशी,कवठेमहांकाळमधून बॅ. जी. डी. पाटील,वाळव्यातून ॲड. एस. डी. पाटील, शिराळ्यातून डॉ. सरोजिनी बाबर तर खानापूर राखीव मतदारसंघातून ॲड. तात्यासाहेब भिंगारदिवे विजयी झाले होते. खासदार म्हणून ॲड. व्यंकटराव पवार

अनुक्रमणिका

निवडून आले होते. विधानसभेत जिल्ह्यातील दोन महिलांना प्रतिनिधित्व देण्यात आले. बॅ. जी. डी. पाटील दादांचे स्वातंत्र्यलढ्यातील जवळचे मित्र. अनेक मोहिमांमध्ये जी. डी. दादांच्या खांद्याला खांदा लावून लढले. पुढे त्यांच्या उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत मिळविण्याचा दादांनी प्रयत्न केला. 'बॅरिस्टर' ही मानाची पदवी संपादन केल्यानंतर त्यांनी दादांसोबत राहून पुढील वाटचाल चालू ठेवली. दादांचे बंधू शामरावदादाही जी. डी. पाटील यांना भाऊच मानत होते. त्याच कारणाने वसंतदादा व जी. डी. राहायलादेखील एकत्र असायचे. पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या माध्यमातून बॅ. पाटील यांना विधानसभेतजाण्याची संधी मिळाली.

पक्षाला मिळालेल्या घवघवीत यशानंतर दक्षिण सातारा जिल्ह्यात मंत्रिमंडळात स्थान मात्र मिळाले नाही. मंत्रिमंडळात स्थान मिळाले नाही तरीही दादांच्या कामाची गती मात्र कमी झाली नाही. उलट विधानसभेतील प्रवेशाचा उपयोग त्यांनी अभ्यासासाठी वेगळ्या पद्धतीने केला. मुंबई राज्याचा अर्थसंकल्प ते बारकाईने तपासत. निधी देण्यात आपल्या जिल्ह्यावर अन्याय तर होत नाही ना, हे तपासून पाहायचे. निवडणुकीनंतर दुर्दैवाने राज्यावर दुष्काळाचे संकट ओढवले. या संकटाला सामोरे जाण्यासाठी सरकारने 'मुंबई राज्य दुष्काळ समिती' ची स्थापना केली. त्या समितीचे डॉ. धनंजयराव गाडगीळ अध्यक्ष होते. दक्षिण सातारा जिल्ह्याचे त्या समितीचे प्रमुख म्हणून वसंतदादा यांनी काम पाहिले. दुष्काळात लोकांना आधार देतानाच दूरदृष्टीने कामांची आखणी करणे आणि त्यानुसार अंमलबजावणी करणे हे दादांच्या कार्यशैलीचे वैशिष्ट्य दुष्काळाच्या निमित्ताने सर्वांनाच अनुभवायला मिळाले. दुष्काळी कामे करताना लोकांना रोजगार उपलब्ध तर व्हावाच; पण त्या कामातून भागासाठी कायमस्वरूपी छोटा-मोठा प्रकल्प उभा राहावा असा त्यांचा प्रयत्न असे. त्याच प्रयत्नातून कवठेमहांकाळ तालुक्यात वज्रचौंडे धरणाचे काम दुष्काळी कामातून उभे राहिले.

दक्षिण महाराष्ट्राचा पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी दादा सदैव प्रयत्नशील असत. पाटबंधारे तज्ज्ञ, अभियंते आणि त्या क्षेत्रातील अभ्यासक यांच्याशी चर्चा करून निर्णय घ्यायचे व पाठपुरावा करायचे. अशाच शिस्तबद्ध पाठपुराव्याचे उदाहरण म्हणून त्यांनी १९५२ मध्ये पेठलोण या गावी भरविलेल्या पाणी परिषदेचा उल्लेख करता येईल. परिषदेसाठी एका आडवळणी आणि दुर्गम भागातील गावाची निवड त्यांनी जाणीवपूर्वक केली. १०० वर्षांत पेठलोण या गावात शासकीय अधिकारी पोहोचलेले नव्हते. त्या गावात पोहोचण्यासाठी परिषदेस उपस्थित राहण्याऱ्या कार्यकर्त्यांना ५० किलोमिटर एवढी पायपीट करावी लागली होती. याच परिषदेत वारणा प्रकल्पाची रुपरेषा निश्चित करण्यात आली. त्यामुळे शासनालाही या योजनेचे महत्त्व समजले.

कोणत्याही विषयाच्या मुळाशी पोहोचणे, त्या विषयातील जाणकारांशी संवादसाधणे व स्वतःचे ठाम मत बिनविणे आणि त्या मतावर ठाम राहणे हा वसंतदादांचास्वभाव होता. प्रत्येक प्रश्नाला त्या स्वभावानुसारच ते हाताळायचे. पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्याला जोडणाऱ्या मिरज-लातूर रेल्वेमार्गाची व रेल्वे प्रवासी समस्यांची सोडवणूक त्यांनी त्याच पद्धतीने केली. 'बार्शी लाईट रेल्वे' म्हणून प्रसिद्ध असलेल्या या नॅरोगेज रेल्वे रुळांचे रुंदीकरण करावे यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. रेल्वे परिषदेचे आयोजन करून केंद्र सरकारचे लक्ष त्या प्रश्नाकडे वेधण्याचा त्यांनी प्रयत्न केला. रेल्वे परिषदेच्या उद्घाटनाला त्यांनी तत्कालीन रेल्वेमंत्री लालबहादूर शास्त्री यांना बोलावले. प्रत्यक्ष अनुभवाने रेल्वे प्रवाशांच्या समस्या शास्त्रींना समजाव्यात म्हणून त्यांचा मिरज ते पंढरपूर असा रेल्वे प्रवासही आयोजित केला.

अनुक्रमणिका

क्रांतिलढ्यात तावून सुलाखून निघालेल्या दादांचे व्यक्तिमत्त्व दिवसेंदिवस खुलत होते आणि त्यांच्या लोकप्रियतेची व्याप्तीही वाढत होती. त्याच काळात भाषिक प्रांतरचनेची चळवळ देशात सुरू झाली. हैदराबाद येथील अखिल भारतीय काँग्रेसच्या अधिवेशनानंतर प्रांत रचनेसंदर्भात फाजल अली आयोगाची नियुक्ती करण्यात आली. भाषिक प्रांतरचनेवरून राज्यात वादळ निर्माण झाले. वसंतदादा व्यक्तिगत पातळीवर भाषिक प्रांतरचनेचे समर्थक होते; परंतु काँग्रेसचे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून त्यांना काँग्रेसच्या धोरणानुसारच कार्यरत राहावे लागत होते. राज्यात संयुक्त महाराष्ट्र चळवळीने रान पेटविण्यास सुरुवात केली. १० फेब्रुवारी १९५६ रोजी अमृतसर येथे अखिल भारतीय काँग्रेसचे अधिवेशन झाले. या अधिवेशनात संयुक्त महाराष्ट्रप्रश्नी अनुकूल निर्णय होईल आणि आपल्याला दिशा मिळेल, असे काँग्रेसच्या सर्वच कार्यकर्त्यांना वाटत होते; पण त्या अधिवेशनात संयुक्त महाराष्ट्राबद्दल चर्चा झाली, मात्र निर्णय झाला नाही. या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांचा संभ्रम दूर करणे हे दादांपुढे आव्हान होते. आपली नक्की भूमिका काय आणि आपण पुढे काय करायचे आहे, याविषयी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणे आवश्यक बनले होते. त्याचसाठी अमृतसर अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर दादांनी यशवंतराव चव्हाणयांचे ‘अमृतसर काँग्रेसचा संदेश’ या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. संयुक्त महाराष्ट्र या मागणीच्या पाठपुराव्यातील एक टप्पा म्हणून द्विभाषिक राज्याचा स्वीकार केल्याने यशवंतरावांनी स्पष्ट केले. त्यातून संयुक्त महाराष्ट्रप्रश्नी काँग्रेस कार्यकर्त्यांची कुचंबणा बऱ्याच अंशीकमी झाली. राज्यातील काँग्रेस विरोधातील वातावरण मात्र निवळू शकले नाही. दरम्यान, २ जून १९५६ रोजी मुंबईत काँग्रेसची बैठक झाली. या बैठकीला दादाही उपस्थित होते. त्याच दिवशी चौपाटीवर पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जाहीर सभेचे आयोजन चौपाटीवर करण्यात आले होते. संयुक्तमहाराष्ट्र समितीने आक्रमक पवित्रा घेतलेला होता. पंडित नेहरूंची ती सभा उधळून लावण्याचा चंग समितीच्या कार्यकर्त्यांनी बांधला होता. अपेक्षेप्रमाणे समितीच्या सुमारे ५० हजार कार्यकर्त्यांनी निदर्शने केली. संभेत गोंधळ घातला.

२ जुलै १९५६ रोजी लोकसभेत संयुक्त महाराष्ट्राबद्दल चर्चा झाली. त्याच दिवशी अर्थमंत्री सी. डी. देशमुख यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. देशमुख यांनी पंडित नेहरूंवर कडवी टीका केली. त्यामुळे वातावरण अधिकच चिघळले. केंद्र सरकारने द्विभाषिक राज्याला मान्यता दिली. द्विभाषिक राज्याच्या नेतेपदी आपली निवड व्हावी अशी मोरारजी देसाई यांची तीव्र इच्छा होती; परंतु त्यांना सर्वांचाच विरोध झाला. नेतेपदाच्या शर्यतीत यशवंतराव चव्हाण आणि भाऊसाहेब हिरे होते. नाराज झालेल्या मोरारजींनी यशवंतरावांना पाठिंबा दिला. नेतेपदासाठी मतदान झाले. त्यात यशवंतरावांना ३३३, तर हिरेंना १११ मते मिळाली. यशवंतराव मुख्यमंत्री झाले. १ नोव्हेंबर १९५६ रोजी द्विभाषिक राज्य अस्तित्वात आले. द्विभाषिक राज्याचा स्वीकार केल्याने यशवंतरावांच्या विरोधात राज्यात संतापाची आणि नाराजीची लाट पसरली. राज्यभरातून त्यांचा धिक्कार आणि निषेद होऊ लागला. अशा कसोटीच्या परिस्थितीतही दादांनी सांगली नगरपालिका व जिल्हा लोकल बोर्डाच्यावतीने यशवंतरावांचा मुख्यमंत्री झाल्याबद्दल मानपत्र बहाल करून सत्कारकरण्याचा निर्णय घेतला. १४ नोव्हेंबर १९५६ रोजी यशवंतरावांना शानदार समारंभात मानपत्र देण्यात आले. लोकांची नाराजी आणि संघर्ष करीत यशवंतरावांची मुख्यमंत्रिपदाची वाटचाल सुरू झाली. त्याच वर्षी वसंतदादा ‘सायटिका’ या विकाराने आजारी पडले. त्यांना बॉम्बे हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. त्यांच्यावर मोठी शस्त्रक्रिया करण्यात आली. केवळ जबरदस्त इच्छाशक्तीच्या बळावर दादा त्याही संकटातून सहीसलामत सुटले.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा वाढलेला प्रभाव आणि त्यामुळे काँग्रेसच्या विरोधातलोकांचा असलेला असंतोष, या पार्श्वभूमीवर मार्च १९५७ साली दुसरी सार्वत्रिक निवडणूक झाली. या निवडणुकीत काँग्रेसला

अनुक्रमणिका

जनतेने जबरदस्त फटका दिला. सांगली जिल्ह्यातील आठ विधानसभा मतदारसंघांपैकी केवळ दोनच ठिकाणी काँग्रेसला विजय संपादन करता आला. सांगलीमधून वसंतदादा २४ हजार मतांनी विजयी झाले. मिरजमधून त्यांचे मित्र बॅ. जी. डी. पाटील विजयी झाले. शिराळा मतदारसंघातून राजारामबापू पाटील यांचा, तर कराड दक्षिण मतदारसंघातून स्वामी रामानंद भारती यांचा पराभव झाला. सांगली लोकसभा मतदारसंघात देखील वि. स. पागे यांना पराभूत व्हावे लागले. काँग्रेसच्या बालेकिल्ल्यात झालेल्या या पडझडीमुळे काँग्रेस पक्षश्रेष्ठी आणि राज्यातील काँग्रेसचे कार्यकर्ते अस्वस्थ बनले.

## शालिनीताईंची पहिली भेट

एप्रिल १९५७ मध्ये शालिनीताई पाटील आणि वसंतदादा यांची पहिली भेट झाली. सांगली जिल्हा लोकल बोर्ड निवडणुकीत वाळवा तालुक्यातील बोरगाव मतदारसंघातून काँग्रेसने शालिनीताईंना उमेदवारी दिली होती. त्या अनुषंगाने इस्लामपूर येथे दादासाहेब मंत्री यांच्या निवासस्थानी आयोजिलेल्या बैठकीवेळी शालिनीताईंनी वसंतदादांना प्रत्यक्ष पहिल्यांदा पाहिले. त्या भेटीविषयी त्यांच्याच शब्दांत सांगायचे तर, 'त्या वेळी ते वयाच्या पन्नाशीच्या आसपास होते. पोटाचा मोठा घेर सोडला तर त्यांची प्रकृती दणकट दिसत होती. रंग सावळा असला तरी चेहरा आकर्षक व देखणा होता. मागे विंचरलेले कुरळे केस, अशा थाटातला तो चेहरा सुप्रसिद्ध अभिनेते अशोककुमार यांच्यासारखा दिसत होता!' या पहिल्या भेटीनंतर कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमधून बी. ए. ची परीक्षा देऊन आलेल्या शालिनीताई त्या निवडणुकीत विजयी झाल्या आणि योगायोगाने बी. ए. परीक्षेचा निकाल आणि निवडणुकीचा निकालही एकाच दिवशी जाहीर झाला. नंतरच्या काळात काँग्रेसच्या क्रियाशील कार्यकर्त्या व पदाधिकारी म्हणून त्यांचा दादांशी संपर्क व संवाद सुरू झाला.

निवडणुकीनंतर संयुक्त महाराष्ट्र चळवळ अधिकच आक्रमक बनली. त्याच काळात ३० नोव्हेंबर १९५७ रोजी प्रतापगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते करण्याचा निर्णयझाला. प्रदेश काँग्रसचे अध्यक्ष मालोजीराजे निंबाळकर यांनी पंडित नेहरूंना निमंत्रित केले. राज्यातील वातावरण बिघडलेले असल्याने पंडीत नेहरूंचा दौरा यशस्वी करणे हे खूप मोठे आव्हन काँग्रेसपुढे उभे राहिले. समितीचे कार्यकर्ते रस्त्यावर उतरून संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी लढत होते. निषेध आणि निदर्शने होणे अपेक्षित होते. अशा गंभीर परिस्थितीत वसंतदादांनी पंडित नेहरूंचा दौरा यशस्वी करण्याचे आव्हान स्वीकारले. कार्यकर्त्यांची प्रचंड मोर्चेबांधणी केली. 'ज्या गावच्या बोरी त्याच गावच्या बाभळी' असे जाहीर करीत जशास तसे उत्तर देण्याचा आक्रमक पवित्रा घेतला. छत्रपती शिवरायांच्या प्रतापगडावरील पुतळ्याचे अनावरण हा राज्याच्या जिव्हाळ्याचा विषय होता. कार्यक्रम कसा होणार आणि तेथे काय घडणार, याकडे राज्याचे लक्ष लागले होते. दादांनी मात्र आपल्या संघटनकौशल्याने आणि कोटेकोर नियोजनाने पंडित नेहरूंच्या विरोधातील निदर्शने शांततेत पार पडतील याची काळजी घेतली. ज्या ठिकाणी गोंधळ होण्याच्या जागा होत्या, त्या ठिकाणी आपल्या कार्यकर्त्यांची मोर्चेबांधणी केली. दादांनी ७०० बैलगाड्या आणि १५० ट्रकमधून कार्यकर्ते प्रतापगडावरील कार्यक्रमासाठी आणले होते. लोकांचा विश्वास आणि पाठिंबा काय असतो हे दादांनी या कार्यक्रमाच्या निमित्ताने श्रेष्ठींना दाखवून दिले, त्यामुळे पक्षातील त्यांचा दबदबा आणखी वाढला.

द्विभाषिक राज्याच्या विरोधातील मराठीजनांची तीव्र भावना कोणापासूनच लपून राहिलेली नव्हती. वसंतदादादेखील त्याच विचाराचे होते. काँग्रसचे धोरण आणि राज्यातील जनतेची इच्छा या

अनुक्रमणिका

संघर्षातून मार्ग काढण्याचा त्यांचा प्रयत्न चाललेला होता. लोकांची इच्छा केंद्रातील श्रेष्ठींपर्यंत पोहोचावी यासाठी ते यशवंतरावांकडेही सातत्याने पाठपुरावा करीत होते. केंद्र सरकार, राज्यातील यशवंतराव चव्हाण सरकार आणि मराठी जनतेची अस्मिता यांची कोंडी फोडण्याची संधी दादांना मिळाली. १३ ऑक्टोबर १९५९ रोजी अखिल भारतीय काँग्रेसच्या अध्यक्षा इंदिरा गांधी यांनी सांगली जिल्ह्याला भेट दिली. त्यांची इस्लामपूर येथे खूप मोठी सभा झाली. दादांनी त्यांचे जिल्ह्यात अभूतपूर्व स्वागत केले. त्यांच्या याच भेटीचा फायदा घेऊन संयुक्त महाराष्ट्र आणि राज्यातील जनतेच्या भावना त्यांच्यापुढे मांडल्या. मराठी लोकभावनेच्या मागण्यांचे निवेदन त्यांना दिले. महाराष्ट्राच्या बाजूने न्याय मिळवूनद्यावा व संयुक्त महाराष्ट्राचे समर्थन करावे, अशी विनंती त्यांनी इंदिरा गांधीकडे केली. दादांच्या या प्रयत्नाला यश आले. इंदिरा गांधींनी अनुकूलता दर्शविली आणि त्यानुसार संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या दिशेने केंद्र सरकारची पावले पडतील अशी व्यवस्था केली.

वसंतदादांचा पाठपुरावा आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा रेटा यांमुळे केंद्राने महाराष्ट्राला अनुकूल असे धोरण स्वीकारण्याची तयारी सुरू केली. संयुक्त महाराष्ट्र स्थापनेपूर्वी अखिल भारतीय काँग्रेसची पुण्यात बैठक झाली होती. त्या बैठकीचे सूत्रधार केवळ आमदार असलेले दादा होते. अखेर १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली. मुख्यमंत्री यशवंतराव आणि प्रदेशाध्यक्ष भाऊसाहेब हिरे यांच्या साथीने वसंतदादांच्या प्रभाव आणि लोकप्रियता वाढीस लागली. पश्चिम महाराष्ट्रातील प्रत्येक निर्णय दादांच्या सल्ल्यानेच होऊ लागला.

## शेतीचे अर्थकारण

वसंतदादांनी स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जे स्वप्न आपल्या उराशी बाळगलेले होते, त्या स्वप्नांचा केंद्रबिंदू हा ग्रामीण भागातील सर्वसामान्य माणूस हाच होता. शेतीत राबणाऱ्या शेतकऱ्याला वेगळ्या मार्गाने नेल्याशिवाय शेती व्यवसायाचा विकास होणार नाही. शेतीच्या विकासासाठी पाण्याचे नियोजन केल्याशिवाय विकास साध्य होणार नाही आणि शेतकऱ्याचे अर्थकारण सुधारल्याशिवाय ग्रामीण विकास होणार नाही, या वास्तवाचे भान वसंतदादांनी सदैव ठेवले. ते भान जतन करताना सोबत काम करणाऱ्या प्रत्येक माणसावर प्रेम करीत त्याला विश्वासात घेत कार्यासाठी प्रेरणा देण्याची हातोटी त्यांनी संपादन केली होती. केवळ कायदा करून शेतकऱ्याच्या पदरात हवे ते पडणार नाही. त्यासाठी शेतकऱ्याचाच सहभाग घेऊन त्यांनी प्रत्येक उपक्रम साकार करण्याची मोहीम हाती घेतली होती. त्याच मोहिमेतील एक यशस्वी मोहीम म्हणून सांगलीच्या मार्केट कमिटीच्या वाटचालीकडे पाहता येईल. १९३९ चा मार्केट ॲक्ट मिरज तालुक्याला लागू झाल्यानंतर दादांनी शेतकरी, व्यापारी,कार्यकर्ते आणि शासकीय यंत्रणा यांचे संघटन आणि नियोजन एवढे जबरदस्त केले की, त्यामुळे केवळ राज्यापुढेच नाही तर देशापुढे मार्केट कमिटीचा आदर्श उभा राहिला. व्यवहारपद्धतीतील कोणताही बदल सहज स्वीकारण्याची व्यापाऱ्यांची मानसिकता नसते. त्याच मानसिकतेचा अनुभव दादांना सांगलीतील मार्केट कमिटीच्या उभारणीवेळी आला.

त्यावेळची बाजारपेठ ही सांगलीतील वखार भागात होती. पारंपरिक पद्धतीने व्यवहार चाललेला होता; त्यामुळे शेतकऱ्यांना अपेक्षित फायदा मिळत नव्हता. उलट हवासूट, मातीसूट, गाडीसूट, वटाव, नमुना,धर्मादाय, पांजरपोळ यांसारख्या प्रथांमुळे शेतकऱ्यांना त्रासच होत होता. या पार्श्वभूमीवर शेतमालाला व्यवस्थित भाव मिळावा, व्यापारी, दलाल आणि शेतकऱ्यांमधील व्यवहार पारदर्शी पद्धतीने व्हावेत यासाठी व्यावसायिक पद्धतीने कार्यरत राहणारी बाजार समिती उभी राहिली पाहिजे, या भावनेतून दादांनी मार्केट

कमिटी स्थापनेचा निर्णय घेतला. सांगलीत तशा प्रकारचा प्रयत्न संस्थान राजवटीत राजे पटवर्धन यांनी करून पाहिला होता. व्यापाऱ्यांचे सहकार्य आणि सहभाग न मिळाल्यामुळे त्यांना त्यात यश आले नाही. दादांनी हा उपक्रम घेतल्यानंतरही व्यापाऱ्यांमधून तशाच प्रकारची प्रतिक्रिया उपटली. वखार भागात मार्केट असताना नवे मार्केट कशाला? असा सवाल व्यापारी करायचे. दादांची दृष्टी मात्र भविष्याचा वेध घेणारी होती. शेतकऱ्यांच्या जीवनात संपन्नता आणण्याबरोबरच व्यापाऱ्यांच्याही कक्षा रुंदावणार असल्याची खात्री त्यांना होती. व्यापाऱ्यांनी समजूत काढण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

अखेर १५ जानेवारी १९५१ रोजी जिल्हाधिकारी एस. ई. सुखटणकर यांच्या अध्यक्षतेखाली बाजार समितीच्या स्थापनेसाठी विशेष बैठक झाली. जिल्हाधिकाऱ्यांनी १५ सभासदांची समिती तयार केली. वसंतदादा यांची चेअरमनपदी, तर आरवाडे यांची व्हाईस चेअरमनपदी निवड करण्यात आली. खऱ्या अर्थाने बाजार समिती स्थापनेच्या प्रक्रियेला सुरुवात झाली. बाजार समितीसाठी स्थानिक बँककडे ३ हजार रुपये कर्ज घेण्यात आले. वखार भागात कार्यालयही सुरू केले. बाजार समिती व्यवस्थेविषयी शेतकऱ्यांना माहिती नव्हती. त्यासाठी बाजार समिती कायद्याविषयी जनजागरण मोहीम हाती घेण्यात आली. वखार भागातील बाजार समितीच्या कार्यालयाचा उद्देश मात्र सफल होईना. त्याच कारणाने दादांनी बाजार समितीसाठी जागेचा शोध घेण्यास सुरुवात केली. शहरातील पूर्वेस एका जागेची निवडही केली. ती१०१ एकर जागा होती. जिल्हाधिकाऱ्यांना विनंती करून ती जागा संपादित करण्याची प्रक्रिया सुरू झाली. बाजार समितीने विनंती केलेल्या जागेपैकी ६२ एकर ८ गुंठे एवढ्या जमिनीच्या ताबा मिळाला. त्या वेळी राज्याचे सहकारी संस्थांचे निबंधक म्हणून पी. जे. चिन्मुळगुंद हे अधिकारी कार्यरत होते. सांगली बाजार समितीच्या उभारणी प्रक्रियेत त्यांनी दादांना वेळोवेळी मदत केली. त्याच कारणाने बाजारसमितीच्या कार्यालय इमारत कोनशिला समारंभासाठी दादांनी त्यांना मानाने निमंत्रित केले होते. ११ ऑगस्ट १९५३ रोजी इमारतीचा कोनशिला समारंभ राजे चिंतामणराव पटवर्धन आणि चिन्मुळगुंद यांच्या उपस्थितीत पार पडला. पुढे मागणी करण्यात आलेली उर्वरित जागाही मिळाली. १०१ एकर जमिनीत अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने दादांनी प्लॉट्स पाडले. त्याला शासनाकडून मंजुरीही मिळविली. एकूण ४६४ प्लॉट्सपैकी २५२ प्लॉट्स खरेदीदार व कमिशन एजंटस्ना लॉट्स पद्धतीने वितरित करण्यात आले. त्यांपैकी २४१ प्लॉट्सना १२५१ रूपये खरेदी किंमत लावून दरसाल ८० रुपये भाडेदर लावण्यात आला. अनेक व्यापाऱ्यांनी नंतर दादांच्या सल्ल्याने बाजार समितीत प्लॉटस् घेतले. बाजार समितीचे कार्यालय व्यावसायिक पद्धतीने चालविण्यासाठी प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची आवश्यकता असते. ते प्रशिक्षण घेण्यासाठी दादांनी बाजार समितीचे कर्मचारी प्रशिक्षणासाठी पुण्याला पाठविले. २३ मार्च १९५५ रोजी नवीन मार्केट यार्डात प्रत्यक्ष व्यवहार सुरू झाला. प्रत्येक व्यवहाराची बाजार समितीकडे नोंद होत असल्याने सर्वच व्यवहार पारदर्शी होऊ लागले. शेतकऱ्यांना भुर्दंड बसणाऱ्या अनेक प्रथा मोडकळीत निघाल्याने शेतकऱ्याचा मालविक्रीसाठी होणारा खर्च कमी झाला होता. बदललेल्या व्यवस्थेमुळे शेतकऱ्यांची एका गाडीमागे १० ते १५ टक्के खर्चाची बचत होऊ लागली. व्यवहारात निर्माण होणाऱ्या वादांची सामंजस्याने सोडवणूक व्हावी, व्यापारी, दलाल व शेतकरी यांच्यात सौहार्दपूर्ण संबंध राहावेत यासाठी दादांनी निर्माण होणाऱ्या संघर्षातून मार्ग काढण्यासाठी 'वांधा कमिटी' ची देखील व्यवस्था केली होती. शेतकऱ्यांच्या मालाचे वजन परवानाधारक मापाड्यांकडूनच करण्याचा नियम अमलात आणण्यातआला. एकूण सर्वच आघाड्यांवर नव्या मार्केट यार्डाचा प्रयोग यशस्वी झाला. सांगलीचा हळद वायदे बाजार हा तर महाराष्ट्राच्या प्रतिष्ठेचा आणि देशातील व्यापारक्षेत्राचा औत्सुक्याचाविषय! त्या काळात सुमारे १५० व्यापारी हळदीच्या व्यवहारात कार्यरत होते. दरवर्षी दीड ते पावणेदोन कोटींची उलाढाल हळदीच्या वायदेबाजारात व्हायची. १० मे १९५५ रोजी भारत सरकारच्या फॉरवर्ड कमिशनने सांगली बाजार समितीला भेट दिली. हळद

अनुक्रमणिका

वायदेबाजाराची पाहणी केली. दादांनी व्यापाऱ्यांच्या मदतीने त्या कमिशनसमोर व्यापाऱ्यांच्या अडचणी प्रभावीपणे मांडल्या. त्याचाच परिणाम म्हणून त्या वेळी भारतात फक्त सांगलीच्या स्पायसेस अँड ऑईल सीड्स एक्सेज् लि. या संस्थेस वायदे बाजारास परवानगी मिळाली. दादांनी त्या वेळी दाखविलेल्या दूरदृष्टीची साक्ष आज मिळते. २०१०-२०११ या आर्थिक वर्षात सांगली हळद वायदेबाजाराची वार्षिक उलाढाल सुमारे ६०० कोटी रुपयांवर जाऊन पोहोचलेली आहे.

एखादा प्रकल्प हाती घेतला की, त्याच्या विस्तारासाठी सातत्याने पाठपुरावा करणे ही दादांची खासियत! १९५५-५६ साली बाजार समितीवर आयकर आकारण्यात आला होता. आयकर हा बाजार समित्यांना आणि पर्यायाने शेतकरी व व्यापाऱ्यांना जाचक ठरणार हे उघड होते. त्यामुळे दादांनी राज्यातील बाजार समित्यांचे शिष्टमंडळ घेऊन मुंबई सरकार आणि केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला. दादांच्या पाठपुराव्याच्या रेट्यांमुळे सरकारने कायद्यात दुरुस्ती करून बाजार समित्यांना आयकरातून सूट दिली. सांगली बाजार समितीची प्रगती आणि वाटचाल पाहण्यासाठी राज्यभरातून अनेक लोक येत होते. देशभरातही सांगली बाजार समितीच्या आदर्श कारभाराची चर्चा होऊ लागली. त्याच काळात संयुक्त राष्ट्रसंघाचे अन्न व शेती सल्लागार बॅ. जे. सी. अबॅट यांनी ८फेब्रुवारी १९६८ रोजी सांगली बाजार समितीला भेट दिली. मार्केट यार्डाची पाहणी केली. तेथील व्यवहार पद्धती व बाजार समितीचे व्यवस्थापन यांचा अभ्यास केला. बॅ. अबॅट प्रभावित झाले. त्यांनी वसंतदादा आणि सांगलीच्या बाजार समितीचा गौरव केला. ३ हजार रुपयांचे कर्ज घेऊन सुरू झालेली सांगली बाजार समिती १९७६ साली ३० कोटी रुपयांच्या वार्षिक उलाढालीवर पोहोचली आणि आजचा विचार केला तर २०१०-२०११ या आर्थिक वर्षात बाजार समितीची उलाढाल १२५० कोटींवर जाऊन पोहोचली आहे. दादा विधायक काम उभे करायचे आणि त्या कामाला योग्य आकार मिळाला की ते काम आपल्या विश्वासू सहकाऱ्यांच्या हातीसोपवून स्वतः मुक्त व्हायचे. बाजार समितीच्या बाबतीतही दादांनी तेच केले. ३० मे १९६२ रोजी दादा चेअरमनपदातून मुक्त झाले आणि ती जबाबदारी त्यांनी आकाराम पाटील यांच्याकडे सोपविली.

बाजार समितीत मिळालेल्या यशामुळे वसंतदादांची लोकप्रियता आणि दबदबा वाढलेला होता. आता ग्रामीण अर्थकारण सुधारण्यासाठी काहीतरी केले पाहिजे, या विचारात दादा होते. त्याच विचारातून विभागीय खरेदी-विक्री संघांची कल्पना पुढे आली. जिल्हा आणि तालुका खरेदी-विक्री संघ असताना विभागीय संघांची आवश्यकता काय? असा प्रश्न उपस्थित झाला. सहकार कायद्यातही विभागीय खरेदी-विक्री संघाची तरतूद नव्हती. दादांना मात्र विभागीय संघ सुरू झाले पाहिजेत,असे वाटत होते. गावागावांतील लोकांचा थेट सहभाग विभागीय संघांमुळे राहील असे दादांचे गणित होते. त्याच कारणाने कितीही अडचणी आल्या तरी हा विषय मार्गी लावायचाच, असा निर्धार त्यांनी केला होता. विभागीय संघाची कायद्यातच तरतूद नसल्याने त्याची नोंदणी आणि परवानगी हाही विषय नव्हता. दादांनी त्यातूनही मार्ग काढला. शासनदरबारी आपली भूमिका प्रभावीपणे मांडून प्रायोगिक तत्त्वावर विभागीय संघांना मान्यता द्यावी अशी मागणी केली. ती मान्य झाली. त्यानुसार मिरज तालुका पश्चिम विभाग सहकारी खरेदी-विक्री संघास १९६२ मध्ये तात्पुरती परवानगी मिळाली. या संघाच्या कार्यक्षेत्रात मिरज तालुक्यातील १९ गावांचा समावेश होता. ९ एप्रिल १९६२ रोजी या विभागीय संघाच्या पहिल्या सभेस केवळ १३० शेतकरी उपस्थित होते. आप्पासाहेब बिरनाळे यांच्याकडे मुख्य प्रवर्तक व अध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली. शेतकऱ्यांना लागणाऱ्या सर्व वस्तू विभागीय संघाच्या माध्यमातून दिल्या जाऊ लागल्या. या संघांना जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या सहकार्यामुळे आणि खरेदीतील लिंकिंग पद्धतीमुळे बळ मिळाले. अल्पावधीत हा संघ लोकप्रिय झाला. संघाने दोन कापड दुकाने,एक भांड्याचे दुकान आणि मार्केट यार्डात

स्वतःच्या मालकीचा गाळा असा आपला विस्तार वाढविला. ग्रामीण पतधोरणाला काळानुरूप व गरजेनुसार दिशा देणे हा वसंतदादांच्या विभागीय खरेदी-विक्री संघाच्या निर्मितीमागे मुख्य उद्देश होता आणि तो सफल झाला.

स्वामी रामानंद भारती, यशवंतराव चव्हाण, वि. स. पागे यांच्या साथीने आणि बॅ. जी. डी. पाटील यांच्यासारख्या मातब्बर सहकाऱ्यांना सोबत घेऊन वसंतदादांची ग्रामविकास आणि सहकार क्षेत्रांतील वाटचाल सुरू होती. राज्यात घडणाऱ्या प्रत्येक चांगल्या घडामोडींचा जिज्ञासू वृत्तीने दादा अभ्यास करीत होते. पद्मश्री विठ्ठलराव विखे-पाटील यांनी अहमदनगर जिल्ह्यात कोरडवाहू शेतकऱ्यांसाठी उभी केलेली चळवळ आणि त्यातून उभा राहिलेला प्रवरानगरचा आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना यांचा प्रभाव दादांच्या व्यक्तिमत्त्वावर पडलेला होता. वैकुंठभाई मेहता, डॉ. धनंजयराव गाडगीळ, आर. जी. सरय्या यांच्या विचाराने दादा प्रभावित झाले होते.

## सहकार चळवळ

१९५२ मध्ये केंद्र सरकारने उठविलेल्या साखरेवरील नियंत्रणामुळे साखरेची मागणी वाढली आणि साखरेच्या वाढीव उत्पादनाची गरज देशाला भासू लागली. त्या काळात साखरेची आयात करण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय राहिलेला नव्हता. या परिस्थितीचा आढावा घेऊन डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना सहकारी साखर कारखानदारीचे महत्त्व पटवून दिले. त्याच कारणाने पंडित नेहरूंनी भारतात २३ नव्या कारखान्यांना परवानगी देण्याचा निर्णय घेतला. त्यात मुंबई राज्यातील १२ नव्या कारखान्यांचा समावेश होता. त्या निर्णयामुळे कोल्हापूर जिल्ह्यात बिद्री, पंचगंगा आणि वारणा सहकारी साखर कारखाना या तीन,तर सातारा जिल्ह्यात कृष्णा सहकारी साखर कारखान्याला परवानगी मिळाली. दोन्ही जिल्ह्यांत भाग भांडवल जमा करण्याच्या मोहिमा सुरू झाल्या. शेतकऱ्यांनी कारखान्याचे शेअर्स घ्यावेत, यासाठी साखर कारखान्यांचे प्रवर्तक कामाला लागले. शेतकऱ्यांना सहकारी साखर कारखानदारीचे महत्त्व पटवून सांगू लागले. या सर्व हालचालींचा अपेक्षित परिणाम वसंतदादांवर झाला. सांगली जिल्ह्यात साखर कारखाना उभा केला पाहिजे, या भावनेने उचल खाल्ली. सांगली जिल्ह्यात कृष्णा,वारणा आणि येराळा या नद्या असूनही जिल्हा कोरडवाहूच होता. उसाचे क्षेत्रही नाममात्र असेच होते. ऊस नसताना साखर कारखाना सुरू करणे हे अव्यवहारी ठरणार होते. जिल्ह्यातील म्हैसाळ भागात थोडे उसाचे क्षेत्र होते. त्या परिसरात पिकविला जाणारा ऊस उगारशुगर फॅक्टरीला पाठविला जायचा. भिलवडी भागातही उसाचे क्षेत्र होते; पण तिथल्या ऊस उत्पादकांनी गुळाच्या उत्पादनावर भर दिलेला होता. अशा परिस्थितीत ऊस नसलेल्या क्षेत्रात साखर कारखान्याला परवानगी मिळणे केवळ अशक्य होते; परंतु दादांनी आपल्या धडाडीने ते शक्य करून दाखविले. साखर कारखाना उभारणीचा आपला मनोदय यशवंतराव चव्हाण आणि धनंजयराव गाडगीळ यांच्याजवळ व्यक्त केला. कारखाना इमारतीचे बांधकाम होईपर्यंत पुरेसा ऊस उपलब्ध करण्याची हमी देताना ऊसक्षेत्र विकासाचे नियोजनही त्यांनी त्यांच्यापुढे ठेवले. दादांनी दिलेल्या हमी आणि विश्वासामुळे मुंबई सरकारने सांगली जिल्ह्यात नियोजित सहकारी साखर कारखान्यास पाच लाख रुपये भाग भांडवल जमा करण्यास परवानगी दिली. दादांनीही आपल्या सर्व सहकाऱ्यांच्या मदतीने साखर कारखान्याचे स्वप्न साकार करण्यासाठी मोर्चेबांधणीस सुरुवात केली.

३१ मे १९५६ रोजी जिल्हा विकास मंडळाचे अध्यक्ष स्वामी रामानंद भारतींच्या अध्यक्षतेखाली प्रगतिशील शेतकऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली. त्या बैठकीत नियोजित साखर कारखान्याच्या वाटचालीची दिशा ठरविली. कारखान्याचे मुख्य प्रवर्तक म्हणून बॅ. जी. डी. पाटील यांची निवड करण्यात आली. भाग भांडवल जमा करणे हे खूप मोठे आव्हान होते. वसंतदादांना या कामी बॅ. जी. डी. पाटील, आबासाहेब शिंदे, राजारामबापू पाटील, आबासाहेब कुलकर्णी, धुळाप्पा नवले, रामभाऊ आरवाडे, शंकरराव शिंदे यांनी जबरदस्त साथ दिली. गावोगोवी फिरून त्यांनी शेतकऱ्यांना साखर कारखान्याची आपल्या भागाची गरज पटवून देण्याचा प्रयत्न केला. अंकलखोपचे दत्ताजीराव सूर्यवंशी यांनी कारखान्याचा पहिला शेअर घेण्याचा मान मिळविला. पूर्वी पाणी योजना आणि त्यासाठी घेतलेल्या कर्जाचा शेतकऱ्यांना कटू अनुभव होता; त्यामुळे सुरुवातीला भाग भांडवल जमा करण्यात अडचणी आल्या. सांगली बाजार समितीच्या यशामुळे वसंतदादांवर असलेला शेतकऱ्यांना विश्वास अधिक दृढ झाला होता. वसंतदादांच्या शब्दांवर विश्वास ठेवून शेतकऱ्यांनी कारखान्याचे शेअर्स घेतले. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकचीही कारखान्याच्या भाग भांडवल उभारणीस मदत झाली. शेअर्स खरेदीसाठी शेतकऱ्यांना कर्ज देणे हे जिल्हा बँकेने केलेले बँकिंग क्षेत्रातील खूप मोठे धाडस मानले गेले.

केवळ एक महिन्यात तीन लाखांचे भाग भांडवल जमा करण्यात यश मिळाले. नंतर उर्वरित दोन लाखही जमा झाले. पाच लाख रुपये भाग भांडवल जमा झाल्यानंतर कारखान्याच्या नोंदणीचा प्रस्ताव सहकार खात्याच्या पुणे कार्यलयाकडे पाठविण्यात आला. कारखान्याची नोंदणी झाली. मुंबई सरकारने या कारखान्याची केंद्र सरकारकडे शिफारस केली. केंद्र सरकारने त्या शिफारशीनुसार सांगलीच्या एक हजार टन गाळप क्षमतेच्या साखर कारखान्यास मंजुरी दिली.

केंद्र आणि राज्य सरकारची मंजुरी मिळाली तरी कारखान्यांपुढील अडथळे मात्र दूर झालेले नव्हते. मुंबई सरकारचे पुणे विभागीय सहकारी संस्था निबंधक पी. डी. कसबेकर यांनी नवी अट कारखान्यांना कळविली. त्या अटीनुसार १० लाखांचे भाग भांडवल मिळविण्यासाठी १० लाखांचेच शेअर्स जमा करणे बंधनकारक होते. त्या अटीमुळे भाग भांडवल गोळा करण्यासाठी वसंतदादांनी पुन्हा धावपळ सुरू केली. त्यात त्यांना यशही चांगले मिळाले. सप्टेंबर १९५६ अखेर नियोजित कारखान्याच्या जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या खात्यावर १३ लाख ९८ हजार ९२६ रुपये एवढे भाग भांडवल जमा झाले होते. एप्रिल १९५७ रोजी मुंबई सरकारने १० लाख रुपयांचे भाग भांडवल कारखान्याच्या खात्यावर जमा केले. राज्य सरकारचे भाग भांडवल आणि शेतकऱ्यांचे भाग भांडवल हे महत्त्वपूर्ण टप्पे पूर्ण झाले. सहकार खात्याचे निबंधक पी. डी. कसबेकर यांनी आर्थिक उभारणीसाठी वसंतदादांना वेळोवेळो मार्ग दाखविले होते. त्यांच्याच सल्ल्यानुसार कारखान्याचे इंडस्ट्रीयल फायनान्स कॉर्पोरेशनकडे कारखाना उभारणीसाठी ५५ लाख रुपयांच्या कर्जासाठी अर्ज केला.

कारखाना उभारणीची तयारी जोरदार सुरू अतसानाच कारखान्याचे मुख्य प्रवर्तक बॅ. जी . डी. पाटील मुंबई सरकारमध्ये मंत्री झाले आणि त्यांनी १ एप्रिल १९५७ रोजी कारखान्याचे चेअरमनपद सोडले. ३० जुलै १९५७ पासून दादांनी कारखान्याच्या चेअरमनपदाची धुरा सांभाळली. भाग भांडवल, इतर शासकीय तांत्रिक प्रक्रिया आणि कारखाना उभारणी कर्जासाठी पाठपुरावाया बाबी मार्गी लागल्या होत्या. आता कारखानास्थळाचा विषय ऐरणीवर आला होता. स्वामी रामानंद भारती यांना कारखाना तासगाव परिसरात व्हावा असे वाटत होते. आबासाहेब शिंदे यांनी पूर्वी म्हैसाळ परिसरात कारखाना उभा करण्याचा प्रयत्न केलेला होता. त्यामुळे त्यांना कारखानाम्हैसाळ परिसरात व्हावा असे वाटत होते; तर बॅ. जी. डी.

पाटील यांना कारखाना सांगलीतच व्हावा असे वाटत होते. सर्वच भागांत कारखान्याच्या नियोजित जागेचा शोध घेण्यात आला. अखेर सर्वांनुमते सांगलीच्या माळावर कारखान्यासाठी जागा घेण्याचा निर्णय झाला. त्यासाठी जमीनमालकाशी वाटाघाटी करून ९० एकर जमीन ८५ हजार रुपयांना खरेदी करण्यात आली. कारखान्याच्या जागेचा प्रश्न मार्गी लागल्याने इमारत उभारणी आणि यंत्रसामग्रीचे नियोजन दादांनी युद्धपातळीवर केले. कारखान्यासाठी बी. एम. ए. या जर्मन कंपनीकडूनयंत्रसामग्री खरेदी करायची होती. त्यासाठी कारखान्याकडे आयातीचा परवाना मात्र नव्हता. आयातीच्या परवानगीसाठी अर्ज करणे आणि इतर बाबींसाठी वेळ जाणार होता. सुदैवाने एका सरकारी कारखान्यासाठी यंत्रसामग्री आयातीचा परवाना मंजूर झाला होता. तो कारखाना भाग भांडवल जमा करू शकत नव्हता. पर्यायाने यंत्रसामग्रीही खरेदी करू शकत नव्हता. तोच परवाना आपल्या यंत्रसामग्री आयातीसाठी मिळविण्याचा निर्णय घेण्यात आला. दादांनी सरकारदरबारी पाठपुरावा करून तो परवाना आपल्या कारखान्यासाठी मिळविला आणि यंत्रसामग्री आयातीचा मार्ग मोकळा झाला. जर्मनीच्या बी. एम. ए. कंपनीला यंत्रसामग्रीची ऑर्डर देण्यात आली. एस्कॉर्ट कंपनीची देशी यंत्रसामग्री पुरवठा करण्याबद्दलही करार झाला. त्याच काळात आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत पोलादाचे भाव वाढल्याने यंत्रसामग्रीला थोडी जास्त किंमत द्यावी लागली.

६ ऑगस्ट १९५७ रोजी इंडस्ट्रीयल फायनान्स कॉर्पोरेशनने ५५ लाखांचे कर्ज कारखान्याला मंजूर केल्याचे कळविले. त्यांपैकी ४० लाखांचा धनादेश मुंबईच्या कार्यालयातून नेण्याची सूचनाही केली. आपल्या इतर कामांसाठी मुंबईला गेल्यानंतर तो धनादेश घ्यावा, या भावनेतून वसंतदादांना मुंबईला जाण्यास चार दिवस उशीर झाला. कॉर्पोरेशनने मात्र त्या चार दिवसांचे कर्जावरील २६०० रुपये व्याज आकारले. मोठी कर्ज आणि त्या संदर्भात पाळावी लागणारी आर्थिक शिस्त यांविषयीचा नवा धडा दादांना त्या व्याजाने शिकविला. जो त्यांना भविष्यातील अनेक मोठे प्रकल्प उभे करताना कामी आला.

नव्या सहकारी साखर कारखानदारीसंदर्भात केंद्र सरकारचे अनुकूल धोरण राहिल्याने नवे कारखाने उभे राहताना त्यांना योग्य मार्गदर्शनाची गरज असते. तांत्रिक,आर्थिक आणि काळाबरोबर धावणारे मार्गदर्शन करणारी यंत्रणा असणे आवश्यक आहे, हे लक्षात घेऊन दादांनी सहकारी साखर कारखान्यांना एकत्र आणून मुंबई राज्य सहकारी साखर संघाची स्थापना करण्यात पुढाकार घेतला. संघ स्थापन झाला. संघाचे पहिले अध्यक्ष म्हणून डॉ. धनंजयराव गाडगीळ यांना निवडण्यात आले. या संघाचा नव्या साखर कारखान्यांना उभारणीच्या काळात आणि नंतरही खूप फायदा झाला.

कारखान्याचा उभारणी काळ हा स्वतः दादा आणि त्यांच्यासोबत काम करणाऱ्यांसाठी एक मंतरलेला असाच काळ होता. स्वप्नपूर्तीसाठी प्रत्येकजण झपाटलेला होता. कामाची सुरुवात झाली तेव्हा बोटांवर मोजण्याएवढाच कर्मचारी वर्ग होता. एक सिव्हिल इंजिनिअर, दोन पर्यवेक्षक, दोन मिस्त्री, दोन शिफ्टकेमिस्ट, सहा कारकून, चार फिल्ड वर्कर्स, तीन शिपाई, दोन वॉचमन आणि कार्यालयीन अधीक्षक, केमिस्ट, चीफ अकौटंट, चीफ मॅकेनिकल इंजिनिअर असा संघ कारखान्याच्या प्राथमिक उभारणी कामासाठी दादांसोबत काम करीत होता. तो संघ निवडतानाही दादांनी विशेष काळजी घेतली होती. काम करणारा माणूस प्राधान्याने स्थानिक तर असावाच; पण त्याला त्या क्षेत्रातील अनुभव असावा, असा निकष त्यांनी निश्चित केलेला होता. त्याच कारणाने प्रत्येक काम जीव ओतून केले जात होते. दिरंगाई आणि वेळेच्या अपव्ययाला कुठेही जागा नव्हती. कारखान्याची यंत्रसामग्री इमारत, कार्यालय आणि इतर आवश्यक वास्तूंचा आराखडा तयार करण्यात आला. त्या आराखड्याप्रमाणे कोणच्या वस्तू लागणार आणि त्यांची व्यवस्था कशी करायची याचे नियोजन करण्यात आले. बांधकामासाठी चुना आवश्यक होता.

अनुक्रमणिका

त्यासाठी कारखान्याच्या जागोवरच चुन्याची भट्टी बांधण्यात आली. पाण्याची सोय व्हावी यासाठी हर्डीकरांच्या शेतातील विहिरीचा वापर करण्यात आला. उभारणीच्या कामात पाण्याची गरज मोठ्या प्रमाणात भासत होती. ती भागविण्यासाठी सांगली-माधवनगर मार्गावरील परांजपे यांच्या जागेत विहीर खोदण्यात आली. सुदैवाने विहिरीत अनेक जिवंत झरे मिळाले. पाणीही गोडे लागले. दादांसह सर्वांनाच त्या विहिरीत लागलेल्या पाण्याचा विशेष आनंद होता. त्याच कारणाने त्या विहिरीतील पाण्याचे दि. २८ जून १९५७ रोजी आबासाहेब शिंदे यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. सर्वच कामे वेळेत आणि मनाजोगती होत होती. कारखान्याच्या आराखड्यातील लोखंडी सांगड्याचीकामे रामभार सामाणी यांच्या आर. एस. कन्सर्नस् या कंपनीला देण्यात आली होती. दादा अक्षरशः २४ तास कारखाना स्थळावर बैठक मारून बसलेले असायचे. तेथे येणाऱ्या प्रत्येक वस्तू आणि साहित्याची पाहणे करायचे. त्यांची सतत देखरेख असायची. उसाचे क्षेत्र नाही हा मुख्य मुद्दा कारखान्याच्या परवानगीवेळीच चर्चिला गेला होता. त्याच्यावर काम करण्यास दादांनी इमारत उभारणीच्या काळातच सुरुवात केली. कृषी अधिकारी वाय. बी. नलावडे यांच्या नेतृत्वाखाली कारखाना परिसरात ५० एकरांत ऊस लागवडीचे काम सुरू केले. काम करणाऱ्यांचे कौतुक करणे, त्यांना शाबासकी देणे आणि संधी मिळाली की मानही देणे हा दादांचा स्वभाव होता. त्याच कारणाने कारखान्याचा संकल्प सोडल्यापासून वेळोवेळी मदत करणारे शासकीय अधिकारी पी. डी. कसबेकर यांच्या हस्ते कारखान्याच्या पायाभरणीचा कार्यक्रम त्यांनी केला.

नोव्हेंबर १९५७ मध्ये कारखान्याने ऑर्डर दिलेली यंत्रसामग्री घेऊन ‘जलकला’ ही बोट हंबुर्ग बंदरातून निघाल्याची वार्ता कारखाना क्षेत्रात आली. त्या वार्तेमुळे सर्वांना आनंद तर झालाच; पण त्यामुळे कामाची गतीही वाढली. कारखान्याला आवश्यक असणारी भारतीय बनावटीची यंत्रसामग्री उपलब्ध झालेली होती. त्यामुळे १० फेब्रुवारी १९५८ रोजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते यंत्रसामग्री उभारणीस प्रारंभ करण्यात आला. जर्मनीहून आयात केलेली यंत्रसामग्री १५ मार्च १९५८ रोजी भारतात पोहोचली. सुदैवाने ३१ मार्च १९५८ रोजी दक्षिण रेल्वेच्या सायडिंगचे काम पूर्ण झाले. ते काम पूर्ण झाल्यामुळे कारखान्याला मालवाहतूक करणे खूप सोईचे झाले. रेल्वेने येणारे साहित्य त्यामुळे थेट कारखान्यापर्यंत पोहोचू लागले. आयात केलेली सर्व यंत्रसामग्री कारखानास्थळावर पोहोचली. तिच्या उभारणीसाठी अनुभवी तंत्रज्ञांची आवश्यकता होती. त्याची सोय जर्मन कंपनीने केली. २ एप्रिल १९५८ रोजी त्या कंपनीचे चीफ इरेक्टर बॉसे व त्यांच्या पाच सहकाऱ्यांनी यंत्रसामग्री उभारणीस प्रारंभ केला. बांधकाम आणि यंत्रसामग्री उभारणीचे काम गतीने आणि वेळेत पूर्ण झाले. सर्व यंत्रणा नवी असल्याने चाचणी व्यवस्थित होणे गरजेचे होते. त्याप्रमाणे काळजीपूर्वक चाचणी करण्यात आली. प्रत्यक्ष हंगाम सुरू झाल्यानंतर येणाऱ्या संभाव्य अडचणींचाही अंदाज घेण्यात आला. पहिल्या गळीत हंगामाच्या बॉयलरप्रदीपनाचा कार्यक्रमदेखील शासकीय अधिकारी पी. डी. कसबेकर यांच्या हस्ते ११ नोव्हेंबर १९५८ रोजी पार पडला. त्या दिवशी दिवाळी होती. पहाटे ३ वाजून ५८मिनिटांनी कसबेकरांनी कारखान्याच्या बॉयलरचे प्रदीपन केले. दिवाळीची पहाट आणि दादांचे भावनिक नाते होते. दादांचा जन्म कोल्हापुरात दिवाळीच्या पहाटेच झाला होता. आता कारखान्याचा जन्मही त्या अर्थाने दिवाळीच्या पहाटेच झाला! दादा आणि यशवंतराव चव्हाण यांचे मैत्रीचे आणि निष्ठावंत कार्यकर्ता-नेता असे घट्ट नाते होते. त्याच कारणाने दादांनी हाती घेतलेल्या कोणत्याही कामात स्वामी रामानंद भारती आणि यशवंतराव चव्हाण यांचा सहभाग अपरिहार्यपणे असायचाच. कारखान्याचा पहिला गळीत हंगामही दादांनी यशवंतराव चव्हाण यांच्याच हस्ते सुरू केला. पुरेसा ऊस नसताना परवानगी मिळवून देण्यापासून कारखान्याचा गळीत हंगाम सुरू करण्यापर्यंतच्या प्रत्येक टप्प्यावर यशवंतराव दादांसमवेत सक्रिय सहभागी होते.

कारखान्याला परवानगी मिळाल्यानंतर अनेक अडचणींना तोंड देत कारखाना उभा राहिला. पहिला गळीत हंगाम सुरू झाला. पहिले काही दिवस यंत्रसामग्री नवी असल्याने अडचणी आल्या. त्यावर मात करीत दररोज दोनशे ते एक हजार टन क्षमतेने कारखाना चालला. पहिल्या हंगामासाठी एक ते दीड लाख टन उसाची गरज होती. ती गरज भागविण्यासाठी सर्वांनीच परिश्रम घेतले. गावागांवात फिरून पूर्वीच उसाचे क्षेत्र वाढविण्यासाठी शेतकऱ्यांची मानसिक तयारी करण्यात आली होती. त्याचाच परिणाम म्हणून कारखाना सभासदांचा ६५ हजार टन ऊस उपलब्ध करण्यात यश आले. ३५ हजार टन ऊस बिगरसभासदांकडून मिळविला गेला. त्यामुळे पहिल्याच हंगामात ४९ हजार १७७ मे. टन उसाचे गाळप झाले. ५१ लाख ८०० पोती साखर उत्पादित झाली. एकरी २५ टन सरासरी उसाचे उत्पन्न शेतकऱ्यांनी त्या वेळी घेतले होते; तर कारखान्याचे उत्पादित केलेल्या साखरेलाही १०·७५ टक्के उतारा मिळाला. सहकार क्षेत्रात वसंतदादांनी सहकारी आणि शेतकऱ्यांच्या साथीने एक विक्रम प्रस्थापित केला. परवानगी मिळाल्यानंतर अवघ्या दोन वर्षांत कारखाना सुरू झाला. सहकारी साखर कारखानदारी क्षेत्रात इतिहास घडविणारा हा साखर कारखाना आज 'पद्मभूषण वसंतदादा शेतकरी सहकारी साखर कारखाना' या नावाने ओळखला जातो.

## पाण्याचे नियोजन

मागील काही वर्षांत या कारखान्यावर अनेक संकटे आली. स्वातंत्र्यानंतर भारतात अन्नधान्याचे पुरेसे उत्पन्न होते नव्हते. महाराष्ट्रात यशवंतरावांनी अन्नधान्याच्या स्वयंपूर्णतेसाठी विशेष योजना हाती घेण्याचे ठरविले होते. राज्यातील नद्यांच्या पाण्याचा योग्य उपयोग होत नाही. त्या पाण्याचे नियोजन करून नदीकाठच्या शेतीसाठी त्याचा योग्य उपयोग झाल्यास शेतीतील उत्पन्न वाढेल, हा हेतू ठेवून योजनांची आखणी करण्यात आली होती. कोरडवाहू जमिनी बागायती करण्याच्या प्रयत्नातील ते महत्त्वाचे पाऊल होते. त्यासाठी शेतकऱ्यांना विशेष सवलती आणि अनुदान देण्याचीही तयारी सरकारने ठेवली होती. तथाच प्रकारचा प्रयत्न वसंतदादांनी आपल्या जिल्ह्यात केला होता. १९५८ साली कृष्णा, वारणा, येराळा या नद्यांच्या दोन्ही तीरांवरील शेतकऱ्यांसाठी पाणीपुरवठा योजना यशस्वी करण्याचा त्यांनी प्रयत्न केला होता. नदीच्या पाण्यावर पंप बसविणे आणि त्या माध्यमातून पाण्याचे वितरण करणे असे नियोजन होते. पद्माळे, कसबे डिग्रज येथे ती योजना कार्यान्वितही झाली होती. सहकारी तत्त्वावर पाणीपुरवठा करणे हे ऐतिहासिक पाऊल दादांनी त्यावेळी टाकले.

पाणीपुरवठा सहकारी संस्थेला त्यासाठी एकरी ३०० रुपये भांडवल दिले जायचे. दोन वर्षांचा त्या संस्थेच्या सचिवाचा पगारही दिला जायचा आणि मूळ कर्जावर २५ टक्के अनुदानही दिले जायचे. पिकांचे वेळापत्रक, पाणी वितरणाचे वेळापत्रक आणि खेळते भांडवल यांच्या अभावामुळे ती योजना तोट्यात गेली. योजनेमुळे शेतकऱ्यांना फायदा होण्याऐवजी त्यांच्यावर कर्जाचा बोजा पडला. सहकारी पाणीपुरवठा योजना एकप्रकारे अडचणीची आणि संकटाचीच असल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली. या पार्श्वभूमीवर नवमहाराष्ट्राच्या निर्मितीनंतर यशवंतरावांनी कोरडवाहू जमिनी अधिकाधिक पाण्याखाली आणण्याचा संकल्प सोडला. वसंतदादांनी त्याला अनुरूप प्रयत्नांची जोड दिली. पूर्वीच्या पाणीपुरवठा योजना अपयशी का ठरल्या, याचा अभ्यास करून नव्याने त्या योजनेची मांडणी करण्याचे ठरले. त्यासाठी बर्वे समितीची स्थापना करण्यात आली. आजारी पाणीपुरवठा योजनांवर उपाय करण्यासाठी गडकरी समिती नेमण्यात आली. एकूण सर्वच पातळ्यांवर ही योजना यशस्वी करण्यासाठी प्रयत्न झाला. शेतकऱ्यांच्या पाणीपुरवठा संस्था स्वतःच्या गुंतवणुकीवर सुरू झालेल्याहोत्या. त्या योजनांना राज्यातील

अनुक्रमणिका

सहकारी साखर कारखान्यांची आधार दिल्यास त्या सशक्तपणे चालू शकतील, असा निष्कर्ष पुढे आला. कारखान्यांनीच या योजना घेतल्यास सरकारने केलेली गुंतवणूक परत मिळेल, शेतकऱ्यांनाही पाणी मिळेल व त्यामुळे शेती उत्पादनात भरीव वाढ होईल, असाही निष्कर्ष अभ्यास समितीने काढला. त्या सर्व निष्कर्षांच्या आधारावर सहकारी पाणीपुरवठा योजना नव्या स्वरूपात सुरू करण्यात आल्या. योजनेविषयी शेतकऱ्यांचे प्रबोधनही करण्यात आले. दादांनी गावोगावी जाऊन शेतकऱ्यांना योजनेची माहिती समजावून सांगितली. या योजनेच्या अंमलबजावणीबरोबरच नगदी पिकांचे नियोजन कशा पद्धतीने करावे याबद्दलही शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. पाणीपुरवठा योजना आणि शेतीचे अर्थकारण यांत कसा मेळ बसवायचा याचे गणितच शेतकऱ्यांपुढे मांडण्यात आले. पूर्वी योजना उभारणीसाठी एकरी ३०० रुपये खर्च देण्यात येत होता. तो ५०० ते ७०० रुपयांपर्यंत दिला गेला. शेतकऱ्यांचे भाग भांडवल एकरी १०० रुपयांनी निश्चित करण्यात आले. केवळ साडेचार टक्के व्याजदराने १५ वर्षांत कर्ज फेडण्याची मर्यादा ठरविण्यात आली. सांगलीच्या शेतकरी सहकारी साखर कारखान्याने सांगलीवाडी, हरिपूर, कसबे डिग्रज व पद्याळे येथील सहकारी पाणी योजना पूर्ण केल्या. त्या योजना पूर्ण होऊन कार्यान्वित झाल्यानंतर शेती उत्पादनात भरीव वाढ होत असल्याचे निदर्शनास आले.

१९६० अखेर ४६ योजना सुरू झाल्या. २० हजार ६५ एकर क्षेत्र त्या योजनांमुळे पाण्याखाली आले. या योजनेसाठी शासनाने १ कोटी ४६ लाख रुपये दिले होते. ते कर्ज व्याजासह फेडण्यात आले. योजना सुरू करताना व शासनाचे कर्ज घेताना जमिनी तारण ठेवायला शेतकरी धजावत नव्हते. त्या वेळी दादांनी शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन पाणी योजनेच्या पाणीपट्टी रकमेतूनच कर्जाची फेड केली जाईल, असा शब्द दिलेला होता. शेतकऱ्यांच्या जमीन तारणाला कुठल्याही प्रकारचा धोका होणार नसल्याची हमी दादांनी दिली होती. शासनाचे कर्ज पाणीपट्टीतून फेडून दादांनी शब्द पाळला. सहकारी पाणीपुरवठा योजनांसाठी सिमेंट पाईपची मोठ्या प्रमाणात गरज पडणार, हे जाणून साखर कारखान्यानेच सिमेंट पाईपचा कारखाना सुरू केला. त्यामुळे शेतकऱ्यांच्या योजनेसाठी योग्य दरात आणि वेळेत सिमेंट पाईप उपलब्ध झाले. शेतकऱ्यांची मालकी असलेला उद्योग म्हणूनच दादा साखर कारखानदारी आणित्याच्याशी निगडीत प्रत्येक प्रकल्पाकडे काळजीपूर्वक पाहत होते. त्यात येणाऱ्या अडचणींची सोडवणूक करीत होते.

अवघ्या दोन वर्षात साखर कारखाना सुरू करण्याचा विक्रम झाला. पहिल्या गळीत हंगामात अपेक्षेप्रमाणे ऊस उपलब्ध झाला आणि गाळपही झाले. उसाचेक्षेत्र वाढल्याने दुसऱ्या हंगामातदेखील कारखाना पूर्ण क्षमतेने चालण्याची अपेक्षा होती. प्रत्यक्षात उसाचे उत्पादन होऊनही कारखाना केवळ ७५ हजार टन उसाचेच गाळप करू शकला. त्या हंगामात गुळाला चांगला भाव असल्याने शेतकऱ्यांनी ऊस कारखान्याला देण्याऐवजी गुळ उत्पादन करण्यावर भर दिला. त्यामुळे कारखाना तोट्यात गेला. कारखाना व्यवस्थित चालावा यासाठी ऊसक्षेत्र वाढविण्यासाठी दादा आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी खूप परिश्रम घेतले होते. त्या परिश्रमाला यश येऊन उसाचे क्षेत्र आणि उत्पन्न वाढले; पण कारखान्याला आवश्यक तेवढा ऊस मात्र शेतकऱ्यांनी दिला नाही. त्यावरही दादा नाराज झाले नाहीत. उलट आपण कारखाना शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी सुरू केला आहे, गुळामुळे चार पैसे शेतकऱ्यांनाच जास्त मिळाले, मग त्यात बिघडले कुठे? असा सवाल ते करीत. शेतकऱ्यांनी उसाचे उत्पन्न वाढवावे आणि शेतीचा विकास करावा यासाठी दादा सातत्यपूर्ण प्रयत्न करीत. त्याच कारणाने ऊस वाहतूक वेळेत आणि सोयीने व्हावी यासाठी कारखान्याने १० ट्रक विकत घेतले. ज्या मार्गावरून ऊस आणला जातो, अशी वाहतुकीच्या रस्त्यांची दुरुस्ती केली गेली. इतर ठिकाणचे प्रयोग पाहून शेतकऱ्यांनी प्रेरणा घ्यावी यासाठी अभ्यासदौरे काढण्यात आले. कारखान्याच्या २५० सभासदांना माळेगाव, वालचंदनगर, माळीनगर, फलटण येथील

साखर कारखाना कार्यक्षेत्रांतील शेती अभ्यासदौऱ्यांत दाखविण्यात आली. पाडेगावच्या कृषी संशोधन केंद्राला भेट देऊन त्या सदस्यांना कृषी क्षेत्रातील नव्या प्रयोगांची माहिती देण्यात आली. अशा पद्धतीने शेतकरी सहकारी साखर कारखाना वाटचाल करीत राहिला.

## कृषि उद्योग

कारखान्याने उपपदार्थांचे उत्पादन करून उत्पन्न वाढविले पाहिजे यासाठी दादांचे प्रयत्न सुरू झाले. त्यातूनच मळीपासून अल्कोहोल निर्मितीसाठी डिस्टिलरी प्रकल्पउभारण्याचा निर्णय झाला. नाशिक येथील सरकारी डिस्टिलरीची यंत्रसामग्री ५ लाख रुपयांना विकत घेतली आणि तिचे उभारणीचे काम १९६३ मध्ये पूर्ण झाले. दररोज ३५०० गॅलन अल्कोहोलचे उत्पादन होऊ लागले. या प्रकल्पाला बळकटी देण्यासाठी २७ लाख ५० हजार किमतीचा दुसरा डिस्टिलरी प्रकल्प १० जुलै १९६४ रोजी उभारण्यात आला. त्याच काळात शेतकऱ्यांना पूरक उद्योगाचे महत्त्व पटू लागले होते. कुक्कुटपालनासारखा व्यवसाय शेतकऱ्यांना फलदायी ठरेल, याची खात्री दादांना होती. त्यामुळे त्यांनी १९६४ मध्ये ‘कोंबडी सहकारी संघा’ ची स्थापना केली. प्रकल्पासाठी लागणाऱ्या आर्थिक तरतुदीचेही नियोजन केले. महाराष्ट्र शासनाचे ३ लाख रुपये, साखर कारखान्याचे १ लाख रुपये, सभासदांचे ३ लाख रुपये आणि इन्शुरन्स फंडाचे ५० हजार रुपये असे ७ लाख ५० हजार रुपयांचे भाग भांडवल उभे करण्यात आले. त्यातून ४५ हजार कोंबड्यांची योजना सुरू झाली. प्रत्येक सभासदाच्या ५०० कोंबड्या असाव्यात असा नियम केला गेला. अशा प्रकारे शेतकऱ्यांचा पूरक व्यवसाय सुरू झाला. दादांनी कच्च्या साखरेची निर्यात करण्याचाही यशस्वी प्रयत्न केला. १९६१-६२ च्या गळीत हंगामापासून कारखान्याची कच्ची साखर निर्यात होऊ लागली व परकीय चलन मिळू लागले. योग्य दर्जा असलेली कच्ची साखर व जागतिक बाजारपेठ यांचा अभ्यास करून साखर निर्यात केली. कच्च्या साखरेच्या निर्यातीसाठी त्या काळात जपान हा प्रमुख देश मानला जात होता. भारत सरकारने कच्च्या साखरेच्या निर्यातक्षमतेचा अभ्यास करण्यासाठी एक शिष्टमंडळ जपानच्या दौऱ्यावर पाठविले. त्या शिष्टमंडळात दादांच्या समावेश होता. ६ मे ते १४ मे १९६४ या कालावधीत त्यांनी जपानचा दौरा केला. पाणी नियोजन, आधुनिक पीक पद्धती, उपपदार्थांतून उत्पन्न आणि शेतीचे अर्थशास्त्र या महत्त्वपूर्ण मुद्दयांवर दादा सतत विचारमंथन करून साखर कारखान्याला प्रत्येक वळणावर नवी दिशा देत राहिले. १ मे १९६६ रोजी कारखान्याची सर्वसाधारण सभा झाली. याच सभेत नव्या संचालक मंडळाची बिनविरोध निवड करण्यात आली. दादांकडेच अध्यक्षपदाची धुरा देण्यात आली. आज मात्र दादांचे नातू विशाल पाटील यांच्या नेतृत्वाखाली २०१०-११ या हंगामात ६ लाख ८३ हजार ५५९ टन उसाचे गाळप झाले. ७ लाख ८१ हजार ४०० पोती एवढ्या साखरेचे उत्पादन झाले. तर साखरेला ११·२८ टक्के उतारामिळाला.

यशवंतरावांचा ४७ वा वाढदिवस दादांनी १२ मार्च १९६० रोजी सांगलीत उत्साहाने साजरा केला. या सोहळ्याला राज्यभरातून हजारो कार्यकर्ते आले होते. या सत्काराचे वैशिष्ट्य म्हणजे यशवंतरावांचा सांगलीकरांनी सूतगुंड्यांनी केलेला सत्कार होय. सुमारे २० मीटर सुताच्या त्या गुंड्या होत्या. त्यापासून पुढे खादीचे कापड तयार करण्यात आले आणि सुधारगृहातील मुलांना ते भेट म्हणून देण्यात आले. दादांच्या या प्रेमाला उत्तर देताना यशवंतरावांनी व्यक्त केलेल्या भावना दादांच्या व्यक्तिमत्त्वातील अनेक पैलूंवर प्रकाश टाकणाऱ्या होत्या. त्या वेळी यशवंतराव म्हणाले होते, ‘दादा ही एक विधायक कामाची शक्ती आहे. या शक्तीचे दर्शन घडल्याने माझा उत्साह द्विगुणित होतो. तो उत्साह घेऊन मी येथून जात असतो.’

नवमहाराष्ट्राचे स्वप्न उराशी बाळगून मुख्यमंत्रिपदाची कारकीर्द यशवंतराव चव्हाण यांनी सुरू केली. कृषी उद्योग आणि ग्रामविकासाच्या नव्या कल्पना घेऊन त्यांनी कारभार सुरू केला होता. राज्याला नवी दिशा द्यायची असेल तर प्रत्येक क्षेत्रातील मान्यवर व तज्ज्ञ मंडळींचा सल्ला आणि सहभाग मिळविणे गरजेचे असते. तीच गरज जाणून यशवंतराव चव्हाण आपल्या कारकिर्दीला आकार देत होते. उद्योग क्षेत्राच्या विकासासाठी काय करायला हवे, या संदर्भात विचारमंथन घडविण्यासाठी पुणे येथे उद्योग परिषद भरविण्यात आली. केवळ मुंबई, पुण्यासारख्या शहरांत उद्योग क्षेत्राचा विकास होऊन भागणार नाही, तर उद्योगाचे जाळे ग्रामीण भागातही विणले पाहिजे, हा विचार त्या परिषदेत उद्योगपती,व्यापारी आणि नेत्यांनी व्यक्त केला. विकासासाठी सोयी-सुविधा उपलब्ध झाल्यास उद्योगविकासाला चालना मिळेल, त्यासाठी देशातील ज्या राज्यात उद्योग क्षेत्राचा विकास झाला आहे. त्यांचे अनुभव जाणून घेऊन महाराष्ट्रात उद्योग सुरू झाले पाहिजेत,या विचाराने वसंतदादांच्या मनात पुण्यातील त्या उद्योग परिषदेनंतर घर केले. त्यांनी सांगली जिल्ह्यातील सहकाऱ्यांशी त्याविषयी चर्चा केली. त्याच चर्चेतून देशभरात ज्या-ज्या राज्यांत उद्योगक्षेत्र विकसित झाले आहे, त्याठिकाणी जाऊन अभ्यास करण्याचा निर्णय झाला. तिथल्या उद्योगांच्या वाटचालीचा अभ्यास केल्यास आपल्या भागात उद्योग उभे करताना कमी अडचणी येतील, असे सर्वांचेच मत होते. त्यामुळे वसंतदादांनी सहकाऱ्यांसह तसा दौरा करण्याचा निर्णयघेतला.

सुरुवातीला हैदराबादला भेट देण्याचे निश्चित झाले. तेथे सनतनगर परिसरात सरकारी औद्योगिक वसाहतीत अनेक उद्योग यशस्वी झाले होते. त्या उद्योगांना भेट देण्यासाठी दादा, बाबूराव आरवाडे, गोपाळराव आरवाडे, रघुनाथराव भिडे, शामराव भिरंगी, दांडेकर, नेमिचंद शहा, चारूभाई शहा, आप्पासाहब सावंत, डॉ. जी. ए. देशपांडे, अण्णासाहेब गोटखिंडे यांचे शिष्टमंडळ हैदराबादला गेले. तेथे पुरविल्या जाणाऱ्या सुविधा आणि इतर बाबींचा त्यांनी अभ्यास केला. त्यानंतर पंजाब राज्यातील आणि त्या परिसरातील उद्योगांना भेटी देण्याचे ठरले. त्या वेळी काकासाहेब गाडगीळ पंजाबचे राज्यपाल होते. त्यांच्याशी संपर्क साधून पंजाबचा दौरा निश्चित करण्यात आला. काकासाहेबांनी शिष्टमंडळाच्या उद्योगक्षेत्राच्या भेटीसाठी सर्व नियोजन केले. अमृतसर, बटाला, लुधियाना,जालंधर येथील अनेक उद्योगांना शिष्टमंडळाने भेटी दिल्या. अनेक उद्योगांचा सर्व बाजूंनी अभ्यास केला. या दौऱ्यानंतर नवा विचार आणि प्रेरणा घेऊन शिष्टमंडळ सांगलीस परतले. सांगलीत सहकारी औद्यौगिक वसाहत सुरू करावी, हा विचारच त्या दौऱ्याने सर्वांना दिला. वसंतदादांनीही त्याच दृष्टीने सर्वांशी चर्चा केली आणि नियोजन केले.

## सहकारी औद्योगिक वसाहत

१५ जुलै १९६० रोजी दादांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक झाली. या बैठकीत सहकारी औद्योगिक वसाहत स्थापन करण्याचा निर्णय झाला. नियोजित सहकारी औद्योगिक वसाहतीचे मुख्य प्रवर्तक म्हणून दादांनी स्वतः जबाबदारी घेतली. मदनराव सिंहासने यांच्याकडे चिटणीसपद, तर चारूभाई शहा व शामराव भिरंगा यांच्याकडे खजिनदारपद देण्यात आले. या नियोजित संस्थेच्या संचालक मंडळात बाबूराव आरवाडे, भवरलाल लढ्ढा,नेमिचंद शहा, डॉ. जी. ए. देशपांडे,मल्लिकार्जुन कराळे, गणपतराव गोटखिंडे, रघुनाथराव भिडे, आप्पासाहेब सावंत, मेघजी नरसी शहा, विनायकराव शिरगावकर, भास्करराव रानडे होते. संस्था स्थापनेचा निर्णय झाल्यानंतर लगेचच पुढील तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी यंत्रणा कामाला लागली. १२ ऑगस्ट १९६० रोजी सहकारी औद्योगिक वसाहतीच्या नोंदणीसाठी अर्ज देण्यात आला. जागेचा शोध सुरू झाला. सहकारी साखर कारखान्याशेजारीच मोकळी जागा उपलब्ध होती. त्या

अनुक्रमणिका

जागेला सर्वांनीच अनुकूलता दर्शविली. त्यातील बऱ्याच अंशी जागेवर सांगली संस्थानचे राजे चिंतामणराव पटवर्धन यांची मालकी होती. दादांनी राजेसाहेबांना सहकारी औद्यौगिक वसाहतीचे नियोजन सांगितले. त्यानंतर राजेंनी वसाहतीसाठी जागा देण्याचे मान्य केले. अन्य जागामालकांशी संवाद साधून एकूण १३५ एकर जमीन संपादित करण्यात आली. जमीन ताब्यात येताच मोजणी आराखडा, प्लॉटस् पाडणे यांसारखे सर्व शासकीय सोपस्कार पार पाडल्यानंतर उद्योजकांना प्लॉटस्चे वितरण करण्यात आले.

३० सप्टेंबर १९६० रोजी जिल्हाधिकारी शिवरामकृष्णन यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. औद्योगिक वसाहतीच्या कामाने गती घेतली. सांगलीच्या उद्योगक्षेत्राला नवी दिशा देणारा महत्त्वाकांक्षी प्रकल्प म्हणून लोक सहकारी औद्योगिक वसाहतीकडे पाहू लागले. २ ऑक्टोबर१९६० रोजी औद्योगिक वसाहतीची पायाभरणी झाली. विधान परिषदेचे अध्यक्ष वि. स. पागे यांच्या हस्ते पायाभरणी कार्यक्रम पार पडला. वसाहतीच्या एका शेअरची किंमत ५०० रुपये ठेवण्यात आली होती. मार्च १९६१ पर्यंत१२ सदस्यांनी आपल्या उद्योगाच्या इमारती व शेड्स उभी केली. ४८ उद्योगांचे काम गतीने सुरू होते. या पार्श्वभूमीवर १० मे १९६१ रोजी वसंतदादांनी सांगलीत औद्योगिक परिसंवादाचे आयोजन केले. मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते परिसंवादाचे उद्घाटन, तर वि. स. पागे यांच्या उपस्थितीत समारोप पार पडला. औद्योगिक वसाहतीच्या वाटचालीला दिशा मिळावी, हाच या परिसंवादाचा उद्देश होता. वसाहतीचे उद्घाटन केंद्रीय उद्योगमंत्री मनुभाई शहा यांच्या हस्ते झाले. राज्याचे अर्थमंत्री बॅ. वानखेडे व दादांचे मित्र डॉ. जी. डी. पाटील या कार्यक्रमाला उपस्थित होते. सहकार्य करणाऱ्या व सहवासात आलेल्या शासकीय अधिकाऱ्यांशी जिव्हाळ्याचे नाते प्रस्थापित करणाऱ्या दादांनी वसाहतीच्या उद्घाटन कार्यक्रमाला उद्योग खात्यातील अधिकारी एस. ई. सुखटणकर आणि एम. डब्ल्यू. देसाई यांना आवर्जून निमंत्रित केले होते. पेपर मिल, पॉवरलूम, रिरोलिंग, फौंड्री, फॅब्रिकेशन, इत्यादी १२ कारखाने वसाहतीत सुरू झाले. उद्योगाला लागणारा तांत्रिक कर्मचारी वर्ग सहज उपलब्ध व्हावा यासाठी दादांनी औद्योगिक प्रशिक्षण केंद्रहीवसाहतीतच सुरू केले. त्यामुळे प्रशिक्षण आणि नोकरी या दोन्ही बाबी तरुणांसाठी सोयीच्या झाल्या. वसाहत आणि वसाहतीतील उद्योग झपाट्याने विकसित होऊ लागले. ४० सभासदांसहसुरू झालेल्या या सहकारी औद्योगिक वसाहतीत ४० लाख रुपयांची गुंतवणूक झाली, तर ५ लाखांचे वार्षिक उत्पादन झाले. ६५० लोकांना त्या वेळी रोजगार उपलब्ध झाला. पुढे या वसाहतीला वसंतदादांचे नाव देण्यात आले. दादांनी राज्यापुढे सहकारी औद्योगिक वसाहतीचा एक नवा आदर्श उभा केला. त्यातूनच प्रेरणा घेऊन राज्यात अनेक ठिकाणी सहकारी औद्यौगिक वसाहती उभ्या राहिल्या व यशस्वीही झाल्या. दादांच्या कल्पक नेतृत्वातून उभ्या राहिलेल्या सांगलीच्या सहकारी औद्योगिक वसाहतीत २०११ मध्ये १८४ कारखाने आहेत. त्यांपैकी केवळ १४ कारखाने बंद होते. चालू कारखान्यांतून ११० कोटी रुपयांची वार्षिक उलाढाल होते, तर २८०० लोकांना रोजगार उपलब्ध झालेला आहे.

शेतकरी सहकारी साखर कारखाना बागायतदार शेतकऱ्यांसाठी सर्वार्थांनी फलदायी ठरला. त्याचबरोबर कृषिउद्योग क्षेत्रालाही चालना देण्याची प्रक्रिया सुरू झाली. सहकारी औद्योगिक वसाहतीच्या माध्यमातून उद्योग विकास क्षेत्रात महत्त्वाचे पाऊल पडले. दादांना जिरायती क्षेत्रातील शेतकऱ्यांसाठी काहीतरी केले पाहिजे हा विचार सतत सतावत होता. ७ सप्टेंबर १९५९ रोजी बॅ. जी. डी. पाटील यांनी सांगली जिल्ह्याच्या जिरायती क्षेत्रातील शेतकऱ्यांची बैठक घेतली. भुईमुगाचे पीक मोठ्या प्रमाणात होत असल्याने त्या संदर्भातील कृषिउद्योग यशस्वी होऊ शकतो, असा विश्वास त्या बैठकीत व्यक्त केला. मग दादांनी तोच धागा पकडून २४ फेब्रुवारी १९६० रोजी 'दि ग्राऊंडनट प्रोसेसर्स को-ऑपरेटिव्ह सोसायटी' स्थापन केली. या सोसायटीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना उत्पन्न देणारे उद्योग सुरू व्हावेत, ही त्यामागील

अनुक्रमणिका

भावना होती. भुईमुगाचे क्षेत्र आणि त्या आधारावर सुरू होऊ शकणारे उद्योग यांचा अभ्यास केला गेला. त्यानुसार जिल्ह्याचे ३० विभाग पाडून ३० तेलगिरण्या सुरू करण्याचे निश्चित केले. तेलगिरण्या आणिएक्स्ट्रॅक्शन प्लँट या दोन्हींचा योग्य समन्वय झाल्यास शेंग, पेंड आणि तेल यांचा व्यवसाय चांगल्या पद्धतीने होऊ शकतो,याचा आराखडा तयार करण्यात आला.

## कृषिउद्योगांची मालिका

२४ तेलगिरण्या सुरू झाल्या. दररोज २४ तासांना ५० टन पेंड निर्मिती अपेक्षित होती. त्यासाठी १२ सप्टेंबर १९६३ रोजी एक्स्ट्रॅक्शन प्लँट सुरू झाला. प्रकल्पाची उभारणी आणि सुरुवात व्यवस्थित झाली; परंतु शेंग, पेंड आणि तेल या व्यवसायांवर बाजारपेठेतील तेजी-मंदीचा खूप मोठा प्रभाव असतो. तो प्रभाव आणि बाजारभावाविषयी शेतकऱ्याला असलेले अज्ञान यांमुळे संपूर्ण प्रकल्प तोट्यात गेला. शेतकऱ्यांना भुईमुगाचे पीक चांगले होऊनही तोटा होऊ लागला. त्यामुळे गिरण्या बंद पडल्या. व्यवहारातील अज्ञानामुळे आलेल्या अपयशाचा दादांवर मात्र काही परिणाम झाला नाही. उलट त्यांनी यश मिळविण्यासाठी वेगळे काय करावे लागेल, यावरच लक्ष केंद्रित केले. पुढे या प्रकल्पाच्या सरव्यवस्थापकपदाची जबाबदारी हंबीरराव मोहिते यांच्याकडे देण्यात आली. संस्थेच्या गिरण्या बंद पडण्यामागच्या कारणांचा त्यांनी शोध घेतला. त्या कारणांवर व्यावसायिक पद्धतीने उपाय शोधले. त्यांच्या परिश्रम आणि कार्यक्षम व्यवस्थापनामुळे चित्र पालटले. व्यवसाय व्यवस्थित चालू लागला. तोट्याचे प्रमाण कमी होऊन नफा मिळणे सुरू झाले. परिणामी या प्रकल्पावर असणारे ४० लाखांचे कर्ज फेडले गेले. कर्मचाऱ्यांना साडेचार महिन्यांचा पगार बोनस म्हणून देण्याचा उच्चांकही केला गेला.

सहकार, कृषिउद्योग क्षेत्रात जोरदार काम सुरू असताना दादांनी समाजाच्या सर्वच क्षेत्रांकडे लक्ष ठेवले होते. त्याच कारणाने सांगली शहरात ज्या वेळी वाढत्या विद्यार्थी संख्येबरोबर महाविद्यालयाची निकड जाणवू लागली, तेव्हा त्यांनी लगेचच लठ्ठे एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून नव्या महाविद्यालयासाठी परवानगी मिळविली. शिक्षणमंत्री बाळासाहेब देसाई यांच्या हस्ते त्याचे उद्‌घाटनही केले.

सांगली संस्थानाचा तुरुंग फोडून मुक्त होताना पोलिसांच्या गोळीबारात जखमी झाल्यानंतर ज्या सांगली सिव्हिल हॉस्पिटलमध्ये त्यांच्यावर शस्त्रक्रिया झाली होती, त्या हॉस्पिटलची इमारत सांगली शहराच्या वाढत्या विस्तारामुळे व लोकसंख्येमुळे अपुरी पडत होती. नवी, प्रशस्त इमारत व्हावी यासाठी दादांनी शासनदरबारी पाठपुरावा केला. त्यामुळे प्रशस्त इमारत उभी राहिली. सिव्हिल हॉस्पिटलच्या या इमारतीचे उद्‌घाटन ५ फेब्रुवारी १९६३ रोजी मुख्यमंत्री यशवंतराव कन्नमवार यांच्या हस्ते पारपडले.

सांगली शहराची 'नाट्यपंढरी' म्हणून ओळख आहे. विष्णूदास भावे, नाट्याचार्य देवल, खाडिलकरांपासून मास्टर दीनानाथ मंगेशकर, लता मंगेशकर यांनी सांगलीचे सांस्कृतिक वैभव शिखरावर नेऊन ठेवले. सांगलीच्या राजे पटवर्धन परिवाराने कलाक्षेत्राला सदैव प्रोत्साहन देण्याचे कार्य केले होते. या पार्श्वभूमीवर सांगलीत आकाशवाणी केंद्र व्हावे, अशी लोकांचा मागणी होती. दादांनी आकाशवाणी केंद्र व्हावे यासाठी सातत्याने प्रयत्न केले. त्यातूनच १९६३ साली सांगली आकाशवाणी केंद्र मंजूर झाले.

अनुक्रमणिका

**पहिले भाषण**

नवमहाराष्ट्राच्या निर्मितीनंतर येणाऱ्या १९६२ च्या सार्वत्रिक निवडणुकांची काँग्रसने जोरदार पूर्वतयारी केली होती. मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या स्वप्नातील महाराष्ट्र घडविणे वत्यासाठी महाराष्ट्र सरकार करीत असलेले नियोजन हेच त्या निवडणुकीचे प्रचारसूत्र असावे, असा सर्वांचा सूर होता. ऑक्टोबर १९६० रोजी त्याच विचाराला नवी दिशा देण्यासाठी वसंतदादा आणि कसम वीर (आबा) यांच्या नेतृत्वाखाली महाबळेश्वर येथे प्रदेश काँग्रेसचे शिबिर झाले. शिबिराच्या नेटक्या आयोजनासाठी दादांना किसन वीर आणि भिलारे गुरुजी यांनी चांगली साथ दिली. प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष आबासाहेब खेडकर यांनी या शिबिरात कार्यकर्त्यांना नव्या भूमिकेची जाणीव करून दिली. १९५७ च्या निवडणुकीत आलेल्या अपयशाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील काँग्रेस पक्षाची वाटचाल कशा पद्धतीने असावी, याविषयी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी प्रभावी प्रबोधन केले. हे शिबिर संपल्यानंतर निवडणूक यंत्रणा अधिक कार्यक्षमतेने राबविण्यासाठी कार्यालयातील निवडणूक यंत्रणा प्रमुख म्हणून यशवंतराव चव्हाण आणि डॉ. आबासाहेब खेडकर यांनी नव्या पिढीतील धडाडीचे व अभ्यासू कार्यकर्ते मोहन धारिया यांनी निवड केली.

वसंतदादांनी ग्रामीण विकास आणि सहकार क्षेत्रांत जोरदार वाटचाल सुरू ठेवतानाच पक्षातील कार्यकर्त्यांना संधी मिळावी,या उद्देशाने विधानसभेची निवडणूक न लढण्याचा निर्णय घेतलेला होता. आपण१० वर्षे आमदार राहिल्याने यापुढेनिवडणूक लढणार नसल्याची घोषणाच त्यांनी कवठेमहांकाळ येथे केली होती. राज्यातील काँग्रेस पक्षात एक क्रांतिकारी पाऊल टाकून कार्यकर्त्यांना संधी देण्याचा पायंडा स्वतः पासूनच पाडण्याचा दादांचा प्रयत्न होता. त्यासाठी त्यांनी त्यांच्याऐवजी आण्णासाहेब राजमाने यांचे नावही उमेदवारीसाठी सुचविलेले होते. दादांचा हा निर्णय कार्यकर्त्यांना आणि प्रदेश काँग्रेसलाही मान्य झाला नाही. प्रदेश काँग्रेसने त्यांना आग्रहाने निवडणुकीला उभे केले.

जाहीर सभांतून मोठमोठी भाषणे देणे हा दादांच्या पिंड नव्हता. लोकांमध्ये राहणे, लोकांची कामे करणे आणि नवनवे विकास प्रकल्प हाती घेऊन ते पूर्ण करणे हा त्यांचा स्वभाव होता. त्यांच्या जाहीर भाषणांची मुहूर्तमेढ ५ जानेवारी१९६२ रोजी सांगली शहरात खणभागातील अमर भारत मंडळाच्या उद्‌घाटनाच्या निमित्ताने रोवली गेली. त्या दिवशी त्यांनी निवडणुक प्रचारसभेतील आजवरच्या राजकीय-सामाजिक जीवनातील पहिले जाहीर भाषण केले. त्या भाषणानंतर लोकांनी दादांना भाषणासाठी सतत बोलते ठेवण्याचा प्रयत्न केला. दादा भाषणे करीत नसत. कवलापूर येथे त्यांचा मोठा सत्कार झाला आणि त्यांचे दुसरे जाहीर भाषण झाले. ८ फेब्रुवारी १९६२ रोजी १०१ बैलांच्या गाडीतून त्यांची मिरवणूक काढण्यात आली. त्यांना वाजत-गाजत सभास्थळी नेण्यात आले. पाच हजारांच्या जमावाच्या उपस्थितीत त्यांचा सत्कार करण्यात आला. त्या वेळी त्यांनी केलेले भाषण हे खऱ्या अर्थाने दुसरे जाहीर भाषण ठरले. ते म्हणाले,

‘मी या भागात गेली २४ वर्षे काम करीत आहे. सातवी शिकलेला मी. माझ्याकडे सामान्य माणसापासून चांगली सुशिक्षित मंडळीही येतात. प्रेमाने बोलतात, दादा म्हणतात. कुटुंबातील दादाचे हे स्थान मला मिळाले आहे. ते मी जर सार्वजनिक जीवनात कोणाला, कोणत्याही स्थानावरून खाली खेचण्याचा प्रयत्न केला असता तर मिळाले नसते. महाराष्ट्राच्या राजकीय जीवनात ज्यांनी हे केले, ते लोक आज कोठे आहेत हे मी पाहत आहे. आमचे टीकाकार म्हणतात, दोन पंचवार्षिक योजना झाल्या, तिसरी सुरू आहे. सुरू सुरू म्हणतात मी अजून कोठे दिसते का? हा प्रश्न चुकीचा आहे. महाराष्ट्रात आज

अनुक्रमणिका

शेकडो वर्षे पंढरपूरची वारी करणारे लोक आहेत. हे वारकरी चार-पाच मुक्कामांनी पंढरपूरला पोहोचतात. दोन मुक्काम झाले, तिसऱ्या टप्प्याचाप्रवास सुरू झाला आणि त्या वारकऱ्याला विचारले की, पंढरपूर अजून कोठे दिसत नाही, तर तो काय सांगेल? तो सांगेल की, आणखी दोन मुक्काम झाले म्हणजे मग पंढरपूरच्या पांडुरंगाचे शिखर दिसते की नाही ते पहा. आमची दिशा बरोबर आहे की नाही ते तपासून पहा. जिल्ह्यातील आम्हा कार्यकर्त्यांचे मतभेद, भांडणे आहेत असा खोटा प्रचार करून खरीच भांडणे व्हावीत अशी विरोधकांची इच्छा आहे. आमच्यात भांडणे लावण्याची ही नीती आमच्या परिचयाची आहे. स्वतःच्या पक्षाशी अशी हरामखोरी करण्याचे आम्ही आमच्या राजकीय जीवनात शिकलो नाही.'

सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचाराच्या निमित्ताने पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी त्या वेळी महाराष्ट्राचा दौरा केला होता. ११ फेब्रुवारी १९६२ रोजी त्यांची पहिली सभा कोल्हापुरात झाली. त्यानंतरची सभा त्याच दिवशी सांगलीत झाली. लोकांचा उत्साह आणि प्रचंड संख्येने असलेली उपस्थिती यांमुळे ती सभा ऐतिहासिक ठरली. सभेसाठी जणू जिल्हाच सांगली शहरात लोटला असल्याचे चित्र दिसत होते. तीन लाख लोकांच्या समुदायाला पाहून पंडित नेहरू खूपच प्रभावित झाले होते. दादांचे नियोजन आणि लोकप्रियताही त्यांच्या लक्षात आली. त्या सभेचा त्यांच्यावर एवढा प्रभाव पडला की, पुढे पुण्यात झालेल्या सभेतही पंडित नेहरू यांनी सांगलीच्या सभेचा उल्लेख करून प्रशंसा केली होती. नेहरूंच्या दौऱ्याबरोबरच प्रभावी प्रचारयंत्रणा आणि कार्यकर्त्यांच्या परिश्रमांमुळे पक्षाला त्या निवडणुकीत घवघवीत यश मिळाले. पंडित नेहरूंच्या दौऱ्यानंतर दादांनी जिल्हा पिंजून काढला. त्या निवडणुकीतील २३ फेब्रुवारी १९६२ रोजीच्या शेवटच्या जाहीर सभेत बोलताना दादा म्हणाले होते.

'मी नेहमी बोलण्याचे टाळले आहे; कारण बोलण्यापेक्षा काम करावे असे मला वाटते. उसाला लायक जमीन असली तर शेतकरी त्यात ऊसच पेरतो; त्याप्रमाणे माझी काम करण्याची वृत्ती आहे. मी इतकी कामे करतो, तर मला बोलता येणार नाही असे कधी वाटले नाही. ती गोष्ट अशक्य वाटत नाही. मी आपल्याला लोकशाही प्रथा सांगतो, लोकशाही प्रथेत पक्षपद्धती असते. ती पद्धती पक्षप्रमुख व सभासद यांच्या संबंधांवर अवलंबून असते. पक्षप्रमुखाजवळ तुमचे वजन किती आहे, शब्दाला मान किती आहे, याला महत्त्व असते आणि आपल्या पुण्याईने व माझ्या भाग्याने माझ्या शब्दाला किंमत प्राप्त झाली आहे. मी पाठविलेल्या अनेक सूचनांचा विचार झालाआहे. मी सार्वजनिक जीवन जगतो, ते उपयोगासाठी नाही, मला स्वतः ला त्यात आनंद आहे. मी सार्वजनिक काम केले नाही तर मला आनंद वाटणार नाही. मी सार्वजनिक जीवन मोक्षाच्या पद्धतीने जगतो आहे. मी निवडणूक लढवू नये अशी माझी इच्छा होती; पण पक्षाच्या आदेशापुढे माझे काही चालले नाही म्हणून मी मत मागण्यास उभा आहे. संगीतात सा रे ग म प याच सुरांवर सर्व गवई गातात; पण प्रत्येकाचे आलाप वेगळे असतात. त्याचप्रमाणे माझ्या पद्धतीने मी काँग्रेसची भूमिका मांडणार आहे. या देशात लोकशाही टिकली पाहिजे, ही आमची भूमिका आहे. लोकशाहीत पाच वर्षांनी निवडणुका झाल्या पाहिजेत. लोकशाही ही पद्धतीत सामान्य माणसाला किंमत देण्याची पद्धती आहे. लोकशाही प्रथेमुळेच मोठमोठ्या माणसांना विनम्र व्हावे लागते. या प्रथेनेच वरिष्ठव व सामान्य माणसे एका पातळीवर येतात. सामान्य माणसाची पातळी उंचावण्याची संधी या प्रथेमुळे मिळते. त्यासाठी लोकशाही टिकेल अशाच पक्षाच्या हातात सत्ता दिली पाहिजे. त्याचबरोबर स्थिर सरकारही हवे. खंबीरपणे राज्य करणाऱ्या पक्षाच्याच हातात सत्ता दिली पाहिजे.' अशा प्रकारची दादांची भाषणे त्या निवडणुकीत खूपच प्रभावी ठरली.

अनुक्रमणिका

२७ फेब्रुवारी १९६२ रोजी निवडणुकीचा निकाल जाहीर झाला आणि काँग्रेसला घवघवीत यश मिळाले. दादांच्या विरोधातील सर्वच उमेदवारांच्या अनामत रकमा जप्त झाल्या. राज्यात विक्रमी अशा ४५ हजार ६७२ मतांनी दादांनी त्या निवडणुकीत विजय संपादन केला. महाराष्ट्रात काँग्रेसला २६५ पैकी २१४ जागा मिळाल्या. मुख्यमंत्रिपदी पुन्हा यशवंतराव चव्हाण यांची निवड झाली. त्यांच्या मंत्रिमंडळात डॉ. आबासाहेब खेडकर यांची मंत्री म्हणून वर्णी लागल्याने त्यांना पक्षाचे प्रदेशाध्यक्षपद सोडावे लागले. नवे प्रदेशाध्यक्ष म्हणून विनायकराव पाटील यांची निवड झाली. दादांनाही प्रदेश उपाध्यक्षपदी काम करण्याची संधी देण्यात आली.

ग्रामीण विकासासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांची चळवळ उभी केली पाहिजे, हा यशवंतरावांचा सदैव प्रयत्न राहिला. त्याच कारणाने त्यांनी राज्यात जिल्हा परिषदा अस्तित्वात आणून ग्रामीण भागात विकास यंत्रणा गतिमान करण्यास सुरुवात केली. त्याच वर्षी नव्याने अस्तित्वात आलेल्या जिल्हा परिषदांच्या निवडणुका झाल्या. सांगली जिल्ह्यात वसंतदादांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने ५५ पैकी ४० जागा जिंकल्या. सांगली जिल्हा परिषदेचे पहिले अध्यक्ष बनण्याचा मान बी. एस. कोरे यांना मिळाला. कोरे पूर्वी सांगली संस्थान असेंब्लीचे मुख्यमंत्री होते. त्यांच्या त्या अनुभवाचा खूप उपयोग झाला. दादांच्या कामाला अधिक गती मिळण्यासाठी जिल्हा परिषद हे प्रभावी माध्यम तयार झाले. त्याला बॅ. जी. डी. पाटील यांच्या मंत्रिपदामुळे अधिकच बळकटी मिळाली. राज्याला दिशा देणाऱ्या आणि नवे आदर्श निर्माण करणाऱ्या अनेक योजना जिल्हा परिषदेमार्फत राबविल्या जाऊ लागल्या. बॅ. जी. डी. पाटील यांची कवलापूर येथे विमानतळ उभा करण्याची तीव्र इच्छा होती. जिल्हा परिषदेने त्यात पुढाकार घेतला. साखर कारखान्यांनीही त्यासाठी १० हजार रुपयांची मदत दिली. विमानतळाचे अडीच लाख रुपयांचे काम श्रमदानाने अवघ्या तीन महिन्यांत पूर्ण करण्यात आले. सांगली जिल्हा परिषदेची ख्याती राज्यभर पसरलेली होती. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी जिल्हा परिषदेला भेटी देऊन आपल्या भागात तसे काम करण्याचा प्रयत्न करीत होते. त्याच काळात १९६२ साली वसंतदादांची महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघाच्या अध्यक्षपदी निवड झाली. नव्याने उभ्या राहिलेल्या साखर कारखान्यांचे अनेक प्रश्न होते. उसाचा भाव, साखरेचा भाव आणि वेळोवेळी कारखान्यांना येणाऱ्या तांत्रिक अडचणी यांतून मार्ग काढण्यासाठी साखर कारखानदारांना दादांसारख्या अनुभवी व्यक्तीचे नेतृत्व लाभले. दादांनी राज्यातील साखर कारखान्यांचे अर्थकारण सुधारण्यासाठी केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्यात प्रभावी समन्वय राखला.

यंशवंतरावांच्या नेतृत्वाखाली सर्वच आघाड्यांवर महाराष्ट्राची प्रगती चाललेली असतानाच स्वातंत्र्यानंतरचे मोठे संकट भारतावर आले. चीनने भारतावर आक्रमण केले. देशाच्या चिंतातुर नजरा या युद्धाकडे लागल्या. युद्धाची परिस्थिती संरक्षणमंत्री कृष्णा मेनन प्रभावीपणे हाताळू शकले नाहीत. त्यांच्या या अपयशामुळे यशवंतरावांना तातडीने दिल्लीस बोलावून घेण्यात आले. देश अडचणीत असताना यशवंतरावांना संरक्षणमंत्रिपद बहाल करण्यात आले. एका आव्हानात्मक आणि ऐतिहासिक वळणावर यशवंतरावांवर आलेल्या नव्या जबाबदारीचे वर्णन प्रत्येकजण 'हिमालयाच्या मदतीला सह्याद्री धावला' असेच करू लागला. यशवंतरावांनीही नावाला साजेसे असेच कार्य चीनविरुद्धच्या लढाईत संरक्षणमंत्री म्हणून केले. संयुक्त महाराष्ट्र चळवळकालावधीत यशवंतराव चव्हाण सदैव विरोधकांच्या टीकेचे लक्ष्य बनलेले होते. त्यांचा अनेक वेळा अवमानही करण्याचा प्रयत्न झाला होता. त्या पार्श्वभूमीवर दादांनी १६ डिसेंबर १९६२ रोजी सांगलीत यशवंतरावांचा खूप मोठा सत्कार करून गौरव केला.

अनुक्रमणिका

पुढे राज्य सहकारी बँक आणि राज्य सहकारी साखर संघाच्या माध्यमातून दादांचे कार्य सुरू असताना जनरल इन्शुरन्सवर राज्यातील सहकारी संस्थांचा खूप मोठ्या प्रमाणावर खर्च होत असल्याचे दादांच्या लक्षात आले. राज्यातील सहकारी संस्थांच्या जाळ्याचा अभ्यास केल्यानंतर राज्याची जनरल इन्शुरन्स सहकारी संघ संस्था असावी असा विचार पुढे आला. ती साकार करण्यासाठी दादांनी राज्य सहकारी साखर संघ आणि राज्य सहकारी बँक यांची मदत घेतली. सांगलीच्या शेतकरी सहकारी साखर कारखान्याकडून नव्या संस्थेसाठी ५० हजार रुपयांचे भाग भांडवल मिळविले. १९६३ साली 'महाराष्ट्र राज्य को-ऑप. जनरल इन्शुरन्स सोसायटी' या संस्थेची स्थापना झाली. सहकार चळवळीने एका नव्या क्षेत्रात पाऊल टाकण्याचा इतिहास घडविला.

यशवंतराव चव्हाण संरक्षणमंत्री म्हणून दिल्लीला गेल्यानंतर नागपूर करारानुसार मुख्यमंत्रिपदाचा मान विदर्भाला देण्यात आला. दादासाहेब कन्नमवार यांना मुख्यमंत्रीपद देण्यात आले. दुर्दैवाने कन्नमवार यांचे २३ नोव्हेंबर१९६३ रोजी अकाली निधन झाले आणि मुख्यमंत्रिपदाची संधी वसंतराव नाईक यांना मिळाली. कन्नमवारांच्या मंत्रिमंडळात सांगली जिल्ह्याचे राजारामबापू पाटील व बॅ. जी. डी. पाटील हे उपमंत्री म्हणून कार्यरत होते. वसंतराव नाईकांच्या मंत्रिमंडळात राजारामबापूंना उपमंत्रिपदावरून महसूलमंत्री पदावर बढती देण्यात आली. दादांचे मित्र बॅ. जी. डी. पाटील यांना मात्र उपमंत्रिपदावरच ठेवण्यात आले. या बदलामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात नवे वादळ उठले. वसंतदादांना जिल्ह्यात रोखण्यासाठी यशवंतरावांनीच तसे पाऊल टाकल्याचा गैरसमज पसरला गेला. अखेर यशवंतराव दिल्लीहून स्वतः मिरजेला आले. त्यांनी वसंतदादांची भेट घेतली. दोघांमध्ये चर्चा झाली आणि ते वादळ शमले.

## शालिनीताईंशी विवाह

१९५७ पासून संपर्कात आलेल्या शालिनीताईंशी दादांचे स्नेहाचे संबंध प्रस्थापित झाले होते. १९६४ सालात त्या स्नेहाने नवे वळण घेतले. महाराष्ट्राच्या आणि सांगली जिल्ह्याच्या राजकारणात त्या वळणामुळे काही काळ वादळ उठले. वसंतदादा व शालिनीताई वैदिक पद्धतीने विवाहबद्ध झाले. त्या संदर्भात शालिनीताई म्हणतात, '१९६४ साली नैसर्गिक संकटात मी एकटी झाले. त्या वेळी माझे वय ३० वर्षे होते. मुले लहान होती. घर, जमीन, जायदाद, पैसा-अडका, सोने-नाणे असं काही माझ्याजवळ नव्हतं! मी बी. ए. एलएल. बी. असल्यामुळे मला वकिली करता आली असती; परंतु वकिलीत जम बसायला काही अवधी लागला असता. घरात कोणी मोठा माणूस नसल्यामुळे मला मार्गदर्शनाची, संरक्षणाची आणि आधाराची गरज होती. वसंतरावदादांना या साऱ्यापरिस्थितीची माहिती होती. तेही एकटेच राहत होते. जेवणाची वेळ होईल तिथे जेवण करायचे आणि जिथे रात्र होईल तिथे झोप काढायचे. वैयक्तिक जीवनामध्ये त्यांना सहचारिणीची गरज होती आणि म्हणून आमच्या दोघांच्या विवाहाचा प्रस्ताव दादासाहेबांकडून आला. प्राप्त परिस्थितीत मलाही तो प्रस्ताव योग्य वाटला. मुंबईला फोर्ट येथील पटेल चेंबर्समधील निवासस्थानी आमच्या दोघांचा विवाह वैदिक पद्धतीने संपन्न झाला. ती जागा वसंतरावदादांना आमदार म्हणून राहायला मिळाली होती. विवाह समारंभाला दादासाहेबांच्या व माझ्यावतीने आठ-दहा माणसे हजर होती. मी स्वतः काही काम केले पाहिजे, ही विवाहाची पहिली अट होती. दादासाहेबांना आमदार म्हणून दरमहा ४०० रुपये मानवेतन मिळत होते. तेवढ्यात मुंबई शहरात मुला-बाळांसकट प्रपंच करणं अवघड होतं. म्हणून मी स्वतः काही काम करावं अशी गरज होती. घरही सांभाळता येईल आणि दादासाहेब व मुलांकडेही लक्ष देता येईल, तसेच आर्थिक उत्पन्नाचे साधनही निर्माण होईल,अशा दृष्टिकोनातून विचार करताना साखर कारखान्याकडून वसंतरावदादांना मिळणाऱ्या पर्सनल सेक्रेटरीच्या जागी मी काम करावे असे ठरले.

घरच्या घरी टेलिफोन अटेंड करणे, अपॉइंटमेट देणे, पत्रव्यवहार सांभाळणे, मीटिंगची तयारी करणे व दादासाहेबांच्या बरोबर दौऱ्यात राहणे या सर्व गोष्टी करीत असताना मुलांकडेही माझे दुर्लक्ष झाले नाही.

आमच्या दोघांच्या विवाहाची बातमी कळल्यानंतर केवळ सांगली जिल्ह्यातच नव्हेतर संपूर्ण महाराष्ट्रात एक मोठा सामाजिक उद्रेक झाला. त्या वादळामध्ये सर्वसाधारण मनुष्य डगमगला असता;परंतु दादासाहेब हे पोलादी पुरुष होते. त्या सगळ्या वादळाला आणि प्रतिकूलतेला धैर्याने तोंड देत होईल त्या परिणामाला सामोरे जाण्याची तयारी ठेवली. जनतेचे म्हणणे असेच होते किंवा म्हणण्यापेक्षा आग्रह होता की, वसंतदादांनी हा विवाह करू नये; कारण वसंतदादा आणि शालिनीताई हे दोघेही ९६ कुळी मराठा खानदानातील आहेत. या समाजामध्ये स्त्रियांच्या दुसऱ्या विवाहाला मान्यता नाही; त्यामुळे समाजाच्या रागाचा भडका होईल. दादासाहेबांना विधानसभेची आणि सांगली साखर कारखान्याची निवडणूक जिंकणे अशक्य होईल. दादासाहेबांचे सामाजिक आणि राजकीय जीवन तसेच सहकारातील त्यांचे नेतृत्व संपुष्टात येईल; म्हणून स्वतःच्या भवितव्याचा विचार करून दादासाहेबांनी विवाहाच्या बंधनातून अजूनही मुक्त व्हावे असे जनतेचे म्हणणे होते. मात्र स्वतःच्या भवितव्याचा विचार करीत बसून आता शालिनीताईंना धोका देणे हे भ्याडपणाचे होईल आणि त्यांच्या मुलांच्या आयुष्याचा मी खेळखंडोबा करू शकत नाही म्हणून मला पुढचा रस्ता चालणे भाग आहे. त्याचा जो काही परिणाम होईल त्यासाठी माझी तयारी आहे, असे कणखरपणाने दादासाहेबांनी सर्वांना उत्तर दिले.

दादासाहेबांसमोर हतबल झाल्यानंतर लोकांनी आम्हाला एकप्रकारे वाळीतच टाकले. सुमारे वर्षभर दादासाहेबांची आणि माझी नात्या-गोत्याची व जिवाभावाची सात-आठ मंडळी सोडली तर आम्हाला कुणीही भेटायला आले नाही. कुणी आम्हाला कार्यक्रमाला बोलावले नाही. आमच्याशी संबंध ठेवले नाहीत. अशा परिस्थितीत एकांतवासाचा वर्षभराचा कालखंड संपला. एकांतवासाच्या त्या काळामध्ये आमचा वेळ कसा गेला असेल? दादासाहेब साखर संघाच्या राज्य सहकारी बँकेच्या आणि काँग्रेस कमिटीच्या मीटिंगला जाऊन आले. मर्यादित स्वरूपाचा पत्रव्यवहार आणि क्वचित येणाऱ्या टेलिफोनवरचे संभाषण झाले की आमचा बराच वेळ आम्ही सिनेमा पाहण्यामध्ये आणि पत्ते खेळण्यामध्ये घालवीत असायचो. ते दादासाहेबांचे दोन आवडते छंद होते. आम्ही दोघांनी मुंबईतील ईरॉस थिएटरमध्ये पाहिलेला पहिला चित्रपट म्हणजे 'क्लिओपात्रा' ! या सिनेमाला आमच्याबरोबर तात्यासाहेब कोरे आणि आबासाहेब खेबुडकर हेदेखील होते. मदर इंडिया, मुघल-ए-आझम आणि ममता हेदादासाहेबांचे आवडते चित्रपट! मी त्यांच्या आयुष्यात येण्यापूर्वीच त्यांना हायपरटेंशन आणि डायबेटिस हे आजार चिकटलेले होते. मी आल्यानंतर त्यांवर उपचार सुरू झाले. दादासाहेबांच्या घराला आता घरपण आले, घरामध्ये गृहिणी आली. घरचे ताजे जेवण त्यांना मिळू लागले. औषध-पाणी आणि तब्येतीची काळजी घेणारे कुणीतरी घरात आले. त्यामुळे त्यांची प्रकृती चांगली राहायला लागली. अस्ताव्यस्तपणा जाऊन त्या जागी नीटनेटकेपणा आला. इंग्रजी भाषेची त्यांची अडचण दूर झाली. एकूणच दादासाहेबांच्या जीवनामध्ये शिस्त आणि नीटनेटकेपणा येऊन विवाहामुळे त्यांचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झालेली नाही, हे लोकांना समजू लागले व लोक हळूहळू आमच्या जवळ येऊ लागले. भेटणाऱ्यांची संख्या वाढायला लागली. लोक कार्यक्रमाला बोलावू लागले. आमचा जनसंपर्क वाढायला लागला आणि एक वर्षातील सामाजिक प्रतिकूलता दूर होऊन आता आमचे जीवन साधारण व्हायला लागले.

प्रतिकूलतेच्या वादळामध्ये काही विचारवंत आमच्या पाठीशी उभे राहिले. सुप्रसिद्ध साहित्यिक वि. स. खांडेकर यांनी आमच्याबद्दल लेख लिहून विवाहाचे समर्थन केले. दादासाहेब आणि शालिनीताई हे

एकमेकांच्या गरजेतून एकत्र आलेले आहेत. विवाह ही त्यांची वैयक्तिक बाब आहे. इतरांनी त्याच्यामध्ये हस्तक्षेप करू नये, असे परखड विचार त्यांनी मांडले. आचार्य अत्रे यांनीदेखील आम्हा दोघांना घरी जेवायला बोलावून आमचा सन्मान केला. आबासाहेब खेबुडकर, तात्यासाहेब कोरे, आबासाहेब शिंदे, वसंतराव फाळके, लक्ष्मणराव विचारे, जयवंतराव गुजर, विष्णुअण्णा पाटील ही मंडळी सर्वप्रथम आमच्याजवळ आली आणि सतत आमच्याबरोबर राहिली.

पत्नीला बरोबर घेऊन नाटकाला, सिनेमाला, लग्न समारंभाला, सभा-संमेलनाला जाणे, एकत्र प्रवास करणे आणि वेगवेगळ्या विषयांवर चर्चा करणे ही अपूर्वाई दादासाहेबांच्या आयुष्यात प्रथमच घडत होती. '

## साखर कारखानदारीला दिशा

दादांच्या व्यक्तिगत जीवनात परिवर्तन घडलेले असतानाच सांगली भागात ऊसक्षेत्रआणि इतर पिकांचा विकास होत असूनही कारखान्याला ऊस न देता तो गूळ उत्पादनाकडे वळविण्याच्या शेतकऱ्यांच्या भूमिकेमुळे राज्यतील अनेक साखर कारखान्यांपुढे नवे प्रश्न उभे राहिले होते. सांगलीच्या साखर कारखान्याची १९६४ ची वार्षिक सर्वसाधारण सभा झाली. त्या सभेत दादांनी केलेले भाषण साखर उद्योगाला सदैव मार्गदर्शक ठरावे असेच होते. दादा म्हणाले, 'शेतकरी सहकारी साखर कारखाना आपण एका ध्येयाने चालवितो आहोत. कारखाना चालविण्यात आमची केवळ फायद्याची दृष्टी नाही किंवा काही भागाचा आणि व्यक्तींचाच विकास डोळ्यांसमोर नाही. सहकारी साखर कारखाने निव्वळ मोठ्या बागायतदार सभासदांच्या फायद्यासाठी चालविले जातात, अशी टीका अलीकडे ऐकू येते. आमचा दृष्टिकोन एवढा संकुचित खास नाही. सहकारी सेक्टरमध्ये साखर कारखान्यांची यंत्रणा संपूर्ण भागाच्या विकाससाठी कशी राबविता येईल, याचा आम्ही सातत्याने विचार करतो. आपल्या भागातील ऊस उत्पादक, जिरायत शेतकरी, लहान लहान उद्योगधंदेवाले, शेतीला पूरक असे ग्रामोद्योग यांच्या वाढीसाठी व वृद्धीसाठी आम्ही झटत आहोत. बेकारांना पूर्ण रोजगार कसा उपलब्ध करता येईल, मागासलेल्या भागांची विशेष काळजी घेऊन कशी उन्नती करता येईल, शैक्षणिक सोयी, पाणीपुरवठा, बी-बियाणे व औषधांचा पुरवठा व वापर या सर्व बाबी आमच्या डोळ्यांसमोर आहेत. आमचा कारखाना म्हणजे आमच्या भागातील प्रगतीचे प्रतीक आहे. सहकारी चळवळीमार्फत लोकांत आत्मविश्वास व जिद्द निर्माण करण्यासाठी आमचा कारखाना गेली चार-पाच वर्षे शक्ती व बुद्धी पणास लावून प्रयत्न करीत आहे. ग्राहकास परवडणाऱ्या किमतीत साखर देता आली पाहिजे, यासाठी कारखान्याने तात्पुरत्या फायद्यावर लक्ष ठेवू नये. ज्याप्रमाणे साखर कारखाने उत्पादक सभासदाचा फायदा पाहतात, त्याचप्रमाणे कारखान्याचे धोरण कामगारांना व ग्राहकांना कसे पोषक राहील हे पाहिले पाहिजे. गेल्या वर्षी गुळाच्या किमती अधिक असताना देशातील काही सहकारी साखर कारखान्यांच्या उत्पादक सभासदांनी कारखान्यास ऊस न घालता त्याचा गूळ निर्माण केला. ही घटना हानिकारक आहे. सहकारी साखर कारखान्यावर होणाऱ्या टीकेला फक्त कागदोपत्री उत्तर देऊन चालणार नाही. तुम्ही म्हणता ते चूक आहे व आम्ही म्हणतो तेच बरोबर आहे, असे म्हणत बसल्याने प्रश्न संपणार नाही. या उलट त्यांचेम्हणणे आपण कृतीने व सप्रयोग चूक आहे हे सिद्ध करून दाखविले पाहिजे.' दादांचे साखर कारखानदारीतील नेमक्या समस्यांवर व उपायांवरही नेमके बोट ठेवणारे हे विचार साखर कारखानदारीला कोणत्याही काळात लागू पडणारे असेच होते.

अनुक्रमणिका

साखर कारखानदारीच्या उत्पादन प्रक्रियेत उपलब्ध होणाऱ्या प्रत्येक वस्तूचा उत्पन्नाचे साधन म्हणून उपयोग व्हावा, असा दादांचा सततचा प्रयत्न असायचा. त्यातूनच पुढे बगॅसपासून कागदनिर्मितीचा विचार होऊ लागला. त्या विचारातूनच दादा, तात्यासाहेब कोरे आणि रत्नाप्पाण्णा कुंभार, जयवंतराव भोसले यांनी प्रयत्नाला सुरुवात केली. कृष्णा सहकारी साखर कारखाना,वारणा सहकारी साखर कारखाना आणि शेतकरी सहकारी साखर कारखाना या चार साखर कारखान्यांनी एकत्र येऊन कागद कारखाना सुरू करावा असे ठरले. त्यासाठी लागणारे भांडवल या कारखान्यांनी संयुक्तपणे द्यावे आणि राज्य सरकारची मदत घ्यावी असे ठरले. त्यातूनच दि. २५ सप्टेंबर ते १० नोव्हेंबर १९६४ या कालावधीत कागद कारखाना उद्योगाच्या अभ्यासासाठी एक शिष्टमंडळ विविधदेशांच्या दौऱ्यांवर गेले. त्या शिष्टमंडळात दादा, तात्यासाहेब कोरे, जयवंतराव भोसले, रत्नापाण्णा कुंभार, आबासाहेब कुलकर्णी आणि राज्य सरकारचे प्रतिनिधी माधवराव राजवाडे यांचा समावेश होता. ४६ दिवसांच्या या दौऱ्यात पश्चिम जर्मनी, लंडन, मॉट्रियल, न्यूयॉर्क,न्यू ऑर्लिन्स, सांनसुआन, कॅटकस, बोगारा, पनामा, मेक्सिको, सॅनफ्रॅन्सिस्को, होनोलूलू, टोकिओ, हॉंगकॉंग येथे भेटी दिल्या. त्या भागातील कागद कारखान्यांची पाहणी केली. या दौऱ्यात दादांनी लंडन मुक्कामात तिथे असलेल्या भारतीय विद्यार्थ्यांची भेट घेऊन चर्चा केली. न्यूयॉर्कमध्ये पोल्ट्री व्यवसायात जगात प्रसिद्ध असलेल्या एकर अर्बर कंपनीचा फार्म पाहिला. याच कंपनीने पुण्याजवळ तळेगाव येथे एक पोल्ट्री फार्म विकसित केला होता. अमेरिकेच्या कृषी अधिकाऱ्यांशीदेखील दादांनी चर्चा केली. पश्चिम जर्मनीमध्ये चिपाडापासून कागद तयार केला जातो. त्या कारखान्यालादेखील भेट देऊन तिथल्या कार्यपद्धतीचा त्यांनी अभ्यास केला. कागदउद्योगाबरोबरच कृषी क्षेत्रातील नव्या प्रयोग व तंत्रांची माहिती घेऊन शिष्टमंडळ भारतात परतले. नंतरच्या काळात कागदनिर्मिती कारखान्याचा उपक्रम कोणत्या ना कोणत्या कारणाने पुढे ढकलला गेला आणि अखेर तो प्रकल्पच बारगळला.

### अनेक संस्थांचे मार्गदर्शक

१९६२ ते १९६५ या कालावधीत दादा महाराष्ट्र रॉ मटेरिअल ॲडव्हायझरी कमिटीवर सदस्य म्हणून काम करीत होते. कच्चा माल आणि त्याचे वितरण हा राज्याच्या अत्यंत जिव्हाळ्याचा विषय होता. अनेक व्यापारी कच्चा माल अधिक मिळवून त्याचा काळाबाजार करीत होते. या समितीचे सदस्य होताच कच्च्या मालाच्या वितरण निश्चितीमधील त्रुटी त्यांनी शोधल्या. मालाच्या वाटपाचे प्रमाण आणि निकष चुकीचे होते. त्यामुळे ग्रामीण भागावर अन्याय तर व्हायचाच; शिवाय काळ्याबाजारालादेखील संधी मिळायची. या समितीचा कारभारही इंग्रजी भाषेतूनच चालायचा. त्या समितीवर जाताच दादांनी समितीचा कारभार हिंदी भाषेतून करण्याच्या सूचना दिल्या. मालाच्या वाटपाचे प्रमाण शहरी भागास ९० टक्के तर ग्रामीण भागास १० टक्के असे होते. ते तसे विषम प्रमाणात का आहे, याचे उत्तर कोणी देऊ शकले नाही. शहरी आणि ग्रामीण भागांना मिळणाऱ्या कच्चा मालाच्या विषम वाटपामुळे काळाबाजार कसा वाढतो, हे मात्र स्पष्ट झाले. दादांनी तत्काळ वाटपाचे प्रमाण बदलले. शहरी भागाला ६० टक्के तर ग्रामीण भागाला ४० टक्के असे प्रमाण निश्चित करण्यात आले. ज्याचा फायदा ग्रामीण महाराष्ट्रातील उत्पादकांना मोठ्या प्रमाणात झाला.

१९६४ मध्ये राज्य सरकारने ज्वारीसाठी एकाधिकार खरेदी योजनेची सुरुवात केली. मार्केटिंग फेडरेशनच्या माध्यमातून दादांनी ही योजना यशस्वी करण्यासाठी खूप मोठे योगदान दिले. खरेदी, साठा आणि वितरण या संदर्भात सामान्य शेतकऱ्याला येणाऱ्या अडचणींची जाणीव त्यांना होती. त्यामुळे मार्केटिंग फेडरेशनच्या माध्यमातून त्या अडचणी दूर होऊन शेतकऱ्यांना फायदा होईल, असा विश्वास त्यांना वाटत

होता. फेडरेशनच्या व्यवहारात बऱ्याच वेळा व्यावसायिक तंट्यांमुळे अडचणी आल्या. तशा अडचणीच्या काळात अधिकाऱ्यांना वाऱ्यावर न सोडता त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहण्याची भूमिका दादांनी घेतली. १९६३ साली मार्केटिंग फेडरेशनने इटली व रशियाला केळी निर्यात केली. भारतीय केळ्यांना जागतिक बाजारपेठ उपलब्ध होणे व देशाच्या परकीय चलनात वाढ होणे ही सर्वांसाठीच अभिमानाची गोष्ट होती. या निर्यात व्यवहारात मालाच्या दर्जावरून काही तंटे निर्माण झाले. त्या देशातील कंपन्यांनी मालनाकारला आणि त्या व्यवहारात सात लाखांचे नुकसान झाले. त्या नुकसानीनंतर दादांनी अधिकारी व सभासदांची बैठक घेतली. त्या व्यवहारावर नाराजी व्यक्त करण्याऐवजीअसे व्यवहार बरेच काही शिकवून जातात, आपल्याला अनुभव नाही; आपण शिकून तो घेऊ आणि नव्याने कामाला लागू, असे म्हणत त्या विषयावर पडदा टाकला. दादांच्या अशा कार्यपद्धतीमुळे प्रयोगशील व प्रामाणिक अधिकाऱ्यांना धाडसाने निर्णय घेणे, काम करणे सोपे जात असे. त्यामुळे लोकांची कामेही होत आणि विकासालागतीदेखील मिळत असे.

पुढे १९६४ मध्ये भुवनेश्वर येथे काँग्रेसचे अधिवेशन झाले. वसंतदादा आणि मोहन धारिया रेल्वेने नागपूरमार्गे या अधिवेशनाला गेले होते. याच अधिवेशनातपंडित नेहरूंची प्रकृती बिघडली. ते विश्रांतीसाठी डेहराडून गेले होते. संसदेचे अधिवेशन सुरू होणार होते म्हणून ते तिथून दिल्लीला परतले. त्याच रात्री त्यांची प्रकृतीपुन्हा बिघडली आणि २७ मे १९६४ रोजी सकाळी त्यांचे निधन झाले. देशावर खूप मोठा आघात झाला. देशभर शोककळा पसरली. नेहरूंच्या निधनानंतर लालबहादूरशास्त्री यांच्याकडे पंतप्रधानपद आले. पुढे ९ एप्रिल १९६५ रोजी पाकिस्तानने भारताच्या विरोधात युद्ध पुकारले. भारतीय सैन्याच्या शौर्याने युद्धभूमीवर पाकिस्तानची दाणादाण उडाली. भारतीय जवानांनी लाहोरपर्यंत मजल मारली. या युद्धाचे पडसाद जागतिक राजकारणात उमटले. अनेक देश युद्ध थांबवून सामोपचाराचा सल्लादेऊ लागले. भारतीय जवानांच्या कामगिरीमुळे पाकिस्तानवर नामुष्की ओढाविली. नुकसानीनंतर युद्ध समाप्त झाले. रशियाचे पंतप्रधान कोसीजीन यांनी पुढाकार घेऊनभारत पाकिस्तानमध्ये समझोता करार करण्यासाठी प्रयत्न केले. त्यानुसार ताश्कंद येथे पंतप्रधान लालबहाद्दूर शास्त्री यांच्या उपस्थितीत ऐतिहासिक ‘ताश्कंद करार’ झाला. त्याच वेळी ११ जानेवारी १९६६ रोजी लालबहाद्दूर शास्त्री यांचे निधन झाले. देशाच्या पंतप्रधानपदाचा विषय पुन्हा ऐरणीवर आला. इंदिरा गांधी व मोरारजीभाईदेसाई दावेदार होते. १९ जानेवारी १९६६ रोजी इंदिरा गांधी यांची पंतप्रधान म्हणून निवड झाली. देशाच्या इतिहासात एक नवे पर्व सुरू झाले. जागतिक राजकारणावरवेगळा ठसा उमटविणाऱ्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधीच्या पंतप्रधान पदाच्या कारकिर्दीस प्रारंभ झाला. इंदिरा गांधीच्या पंतप्रधानपदी निवडीमुळे राज्याराज्यांतीलकाँग्रेसअंतर्गत राजकारणावर परिणाम झाला.

१९६५ च्या दरम्यान सांगलीच्या साखर कारखाना विस्ताराची योजना पुढे आली. सांगलीत मुक्कामी राहून दादांनी विस्तारीकरणाचे काम स्वतःच्यादेखरेखीखाली करावे, असा आग्रह कारखान्याच्या संचालक मंडळाने धरला. त्याप्रमाणे दादा, शालिनीताई व मुलांसह मुंबईहून कारखानास्थळी राहण्यासाठी आले. अपेक्षेप्रमाणे विस्तारीकरणाचे काम गतीने आणि दर्जेदार झाले. त्याच वर्षी म्हणजे २४ मार्च १९६६ रोजी वसंतदादांची प्रदेश काँग्रेसच्या अध्यक्षपदी निवड झाली.

पक्षाचे राज्यपातळीवरील संघटन, राज्य सहकारी साखर सहकारी संघाचा व्याप आणि सांगली जिल्ह्यात चाललेल्या विकासकामांचा पाठपुरावा अशासर्व आघाड्यांवर दादांचे कार्य विस्तारत होते. सांगलीचा शेतकरी सहकारी साखर कारखाना हा प्रत्येक विकास प्रकल्पाचा कार्यबिंदू होता. १९५८ साली

१९४२ एकरउसाचे क्षेत्र होते, ते दादांच्या दूरदृष्टीच्या नेतृत्वामुळे १९६६ साली ९ हजार ३३० एकरांवर जाऊन पोहोचले होते. चौफेर प्रगतीमुळे कारखान्याच्या गाळप विस्ताराचीआवश्यकता होती. ते कामही दादांनी युद्धपातळीवर मार्गी लावले. १० एप्रिल १९६६ रोजी २६०० टन गाळपक्षमतेच्या विस्तार योजनेचे उद्घाटन यशवंतराव चव्हाणयांच्या हस्ते झाले. पुढे सहकार क्षेत्रात १० वर्षांनंतर सत्तेवर न राहण्याच्या नियम व विचारांची जोरदार चर्चा राज्यात सुरू झाली. प्रदेश काँग्रेसचे अध्यक्षअसलेल्यादादांनी राज्य सहकारी बँक, साखर संघ आणि सांगलीच्या साखर कारखान्याच्या अध्यक्षपदाचाही राजीनामा दिला. आपले कुटुंबही सांगलीहून मुंबईलाहलविले. मुंबईतील माहीम परिसरातील 'ज्योतीसदन' येथे त्यांचे वास्तव्य सुरू झाले.

जिरायती शेती आणि त्यावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांच्या विकासासाठी दादा सदैव सतर्क असायचे. त्याच सतर्कतेतून जिरायती कापूस उत्पादनालाचालना देण्यासाठी त्यांनी भारत को-ऑप, स्पिनिंग मिल्सची स्थापना केली. २५ हजार चात्यांच्या सूतगिरणीचा कोनशिला समारंभही १० एप्रिल १९६६ रोजीयशवंतरावांच्या हस्ते झाला. शेतकरी आणि त्याच्या दैनंदिन जीवनाशी निगडित प्रत्येक वस्तू आणि सेवा सहकाराच्या माध्यमातून उपलब्ध करणे हे दादांचे ध्येय होते. खत आणि औषधांचा पुरवठा वेळेत आणि किफायतशीर भावात होणे हे शेतीव्यवसायासाठी आवश्यक असते. सहकाराच्या माध्यमातून खते आणि औषधांचीही निर्मिती झाल्यास शेतकऱ्यांची मोठी सोय होणार होती. त्यासाठी दादांनी ठाण्यात संस्थास्थापन करण्यासाठी मदत केली. महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह फर्टिलायझर्स अँड केमिकल्स ही १६ कोटी रुपये भांडवलाची संस्था ठाण्यात उभी राहिली. तिच्या उभारणीसाठीजपानची तांत्रिक मदत घेण्यात आली. १९६६ साली स्थापन झालेल्या या संस्थेसाठी दादांनी आपल्या साखर कारखान्यामार्फत एक लाखाचे भाग भांडवलही घेतले. प्रत्येक संस्थेच्या उभारणीला प्रोत्साहन देताना दादांनी आपल्या साखर कारखान्याचा आर्थिक सहभाग आणि मदत कशी राहील, याचीही वेळोवेळी काळजी घेतली होती. कृषी अवजारे आणि उपकरणे हा शेती व्यवसायाचा अविभाज्य भाग आहे. नवे तंत्र अंगीकारलेली सामग्री शेतकऱ्यांना उपलब्ध व्हावी यासाठी दादांनी कोल्हापुरात महाराष्ट्रको-ऑपरेटिव्ह इंजिनिअरिंग सोसायटीची स्थापना केली. त्या माध्यमातून अवजारे, यांत्रिक उपकरणे, सुटे भाग यांचा शेतकऱ्यांना पुरवठा होणार होता. ५ सप्टेंबर १९६६रोजी स्थापन झालेल्या या संस्थेचेही दादांच्या साखर कारखान्याने २५ हजार रुपयांचे भाग भांडवल घेतले. याच वर्षी महाराष्ट्र राज्य सहकारी साखर संघाच्या अध्यक्षपदी१९६६-६७ सालासाठी त्यांची निवड झाली. त्याच वेळी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या अध्यक्षपदाची धुराही दादांकडेच सोपविण्यात आली. राज्य पातळीवरील अनेकसंस्थांची जबाबदारी दादांवर आल्याने त्यांची धावपळ तर वाढलीच; शिवाय त्यांना मुंबईत जास्त काळ वास्तव्य करावे लागत होते. मुंबईत गनबो स्ट्रीट फोर्ट येथीलपटेल चेंबरमध्ये ते वास्तव्यास असत.

### शामरावदादांचे निधन

इकडे स्वातंत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्यानंतर अनेक अडचणींना तोंड देत दादांचे बंधू शामरावदादा पाटील यांनी कौटुंबिक जबाबदाऱ्यांना न्याय दिला होता. दादांचा भक्कम आधार म्हणून ते दादांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले होते. याच काळात त्यांना अर्धांगवायूचा झटका आला. ते अंथरुणाला खिळले. मुंबईच्या सेंटजॉर्ज हॉस्पिटलमध्ये त्यांना दाखल करण्यात आले. तेथे उपचार चालू असताना दादा स्वतः प्रत्येक बाबीत लक्ष घालत. त्यांची प्रकृती लवकर बरी व्हावी यासाठीहॉस्पिटलच्याडॉक्टरांशी सतत संपर्कात असत. तिथल्या उपचारांनंतर शामरावदादांच्या प्रकृतीत सुधारणा झाली, म्हणून त्यांना सांगलीला

अनुक्रमणिका

नेण्यात आले. सांगलीत असतानाचशामरावदादांची प्रकृती अचानक बिघडली. त्यांना उपचारांसाठी मिरजेच्या मिशन हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. त्या वेळी दादा मुंबईत आपल्या कार्यात व्यस्तहोते. उपचार चालू असतानाच ४ सप्टेंबर १९६६ रोजी शामरावदादांचे निधन झाले. दादांवर दुःखाचा डोंगर कोसळला. ते तातडीने सांगलीत परतले. शामरावदादांवरकृष्णाकाठी अंत्यसंस्कार करण्यात आले. दादांच्या जीवनाला आकार देण्यासाठी शामरावदादांनी नेहमीच त्यागी वृत्ती ठेवली होती. येणाऱ्या कुठल्याही संकटाला सामोरेजात दादांच्या कार्याला प्रोत्साहनच दिले होते. त्यांच्या जाण्याने आता खऱ्या अर्थाने दादांवर कौटुंबिक जबाबदारी येऊन पडली होती.

दादांच्या कौटुंबिक जीवनात असे चढउतार सुरू असतानाच महाराष्ट्रात १९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकांची तयारी सुरू झाली. सर्व मतदारसंघांचा आढावाघेणे, तेथील राजकीय जनमानसाचा अंदाज घेऊन उमेदवार निवडणे यासाठी दादांनी यंत्रणा गतिमान केली होती. नेमक्या त्याच काळात यशवंतराव चव्हाण यांच्यावरएक शस्त्रक्रिया झाली होती. विश्रांतीसाठी ते नरिमन पॉइंट येथील त्यांच्या निवासस्थानी वास्तव्यास होते. यशवंतराव मुंबईतच असल्याने उमेदवार निवडीसाठी मुलाखतीआणि बैठका त्या वेळी तेथेच घेण्यात आल्या. त्या निवडणुकीसाठी दादांच्या मदतीला मोहन धारिया, बॅ. विठ्ठलराव गाडगीळ, पक्षाचे सरचिटणीस शिवाजीराव पाटीलआणि खजिनदार भाऊसाहेब वर्तक यांची नियुक्ती प्रदेश काँग्रेस समितीने केली होती. उमेदवार निवडीची प्रक्रिया पूर्ण झाली आणि प्रचारयंत्रणा गतिमान झाली. दादाआणि मोहन धारिया प्रदेश कार्यालयातून सर्व सूत्रे हलवीत होते. राज्य काँग्रेस समितीतील इतर पदाधिकारी निवडणूक लढत असल्याने या दोघांनी कार्यालयाचा ताबा घेतला. त्याचा परिणामही दिसून आला. प्रदेश कार्यालयातील विस्कळीतपणा दूर झाला. कार्यकर्त्यांमधून कार्यालयीन शिस्तीला महत्त्व आले. एकीकडे दादांनी कार्यालयातच तळ ठोकला, तर दुसरीकडे वसंतराव नाईक यांनी राज्य पिंजून काढले. त्या वेळी देशात जातीयवादाचे वातावरण निर्माण झालेले होते. त्यामुळे महाराष्ट्रातील निवडणुकीचा प्रचार आणि यश हे दादा आणि नाईक यांच्यासाठी आव्हान होते. १९६७ च्या फेब्रुवारी महिन्यात मतदान झाले. दादांच्या संघटनात्मक कौशल्याला पुन्हा एकदा घवघवीत यश मिळाले. सांगलीतून दादांचे विश्वासू स्नेही आप्पासाहेब बिरनाळे विजयी झाले. वसंतराव नाईक यांना पुन्हा मुख्यमंत्रिपदाची संधी मिळाली. देशातही काँग्रेस सत्तेवर आली. लोकसभेच्या ५२१ जागांपैकी २७३ जागा काँग्रेसला मिळाल्या. केवळ १३ जागांचे बहुमत काँग्रेस संपादन करू शकली. त्या निवडणुकीत गुजरात, आंध्र प्रदेश, म्हैसूर आणि महाराष्ट्राने इंदिरा गांधींना भक्कम साथ दिल्यामुळेच काँग्रेस सत्तेवर आली. या राज्यांमध्ये थोडे वेगळे चित्र निर्माण झाले असते तर त्या निवडणुकीत काँग्रेस अडचणीत आली असती. देशाच्या पंतप्रधानपदी इंदिरा गांधी विराजमान झाल्या, तर मानाचे गृहमंत्रिपद यशवंतराव चव्हाण यांना मिळाले. इतर राज्यांत काँग्रेसची पिछेहाट का झाली या मुद्दयांवर त्या काळात देशभर चर्चा सुरू झाली. त्या निवडणुकीत महाराष्ट्र एकसंधपणे काँग्रेसच्या पाठीशी उभा करण्यात दादांचा मोलाचा वाटा होता. सकाळी उठल्यापासून रात्री बारापर्यंत दादा लोकांना उपलब्ध असायचे. प्रदेश काँग्रेसचे टिळक भवन हे कार्यालय सतत कार्यकर्त्यांच्या गर्दीने फुललेले असायचे. दादांना भेटणारा माणूस समाधानी होऊनच तिथून बाहेर पडायचा. भेटणाऱ्या माणसाला गट-तट वा पक्षाची कोणतीही अट नसायची. भेटणाऱ्या प्रत्येक माणसाचा प्रश्न मार्गी लावणे हेच दादांचे तत्त्व होते. त्याच कारणाने राज्यभरात कार्यकर्त्यांची मजबूत फळी त्यांनी निर्माण केली. तिची शक्ती १९६७ च्या निवडणूक निकालाने दिसून आली.

जून १९६७ मध्ये दिल्लीत काँग्रेस वर्किंग कमिटीची बैठक झाली. या बैठकीला दादा व मोहन धारिया उपस्थित होते. देशात झालेल्या काँग्रेसच्या पिछेहाटीवर चिंतन करून दिशा ठरविणे हाच या बैठकीचा

अनुक्रमणिका

मुख्य विषय होता. सात दिवस चाललेल्या या बैठकीत देशभरातील काँग्रेस नेत्यांनी अनेक सूचना मांडल्या. पक्षाच्या विकासासाठी अनेक योजनाही सादर केल्या. लोकसभेत घटलेले संख्याबळ हा चिंतेचा विषय होता. याच बैठकीत व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करावे, अशी उपसूचना मोहन धारिया यांनी मांडली. प्रदेशाध्यक्ष वसंतदादांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसने देशातील सर्व संस्थानिकांचे तनखे व सवलती बंद करण्याविषयी सूचना केली होती. ती प्रदेश काँग्रेसच्यावतीने धारिया यांनीच बैठकीत मांडली. तिला मोरारजीभाई देसाई, एस. के. पाटील यांचा विरोध असूनही बैठकीत त्यांना मंजुरी देण्यात आली. देशाला दिशा देण्यासाठी एक विशिष्ट आणि कालबद्ध कार्यक्रम तयार केला पाहिजे, त्या कार्यक्रमाला आर्थिक विकासाचा पाया असला पाहिजे, या भूमिकेतून १० कलमी कार्यक्रमही तयार करण्यात आला होता.

त्याच काळात कामकाज यांच्या अध्यक्षपदाची मुदत संपल्याने नव्या अध्यक्षांची निवड हा विषय ऐरणीवर होता. अध्यक्षपदाच्या उमेदवारीसाठी इच्छुक हा प्रदेश काँग्रेसचा सदस्य असला पाहिजे, असा नियम होता. महाराष्ट्रातून मोहन धारिया अध्यक्षपदाच्या उमेदवारीसाठी इच्छुक होते; पण ते प्रदेश काँग्रेसचे सदस्य नव्हते. ही तांत्रिक अडचण लक्षात येताच दादांनी धारिया यांना सांगली जिल्ह्यातून प्रदेश काँग्रेसने समितीवर पाठविले. तशी तार सांगली जिल्हा काँग्रेसच्यावतीने प्रदेश काँग्रेसला धाडण्यात आली. धारियांच्या अध्यक्षपद निवडणूक उमेदवारी अर्जासाठीचा तांत्रिक अडसर दूर झाला होता. धारियांनी अर्ज दाखल केला. निजलिंगप्पा हे अध्यक्षपदासाठी प्रमुख दावेदार आणि उमेदवार होते. अखेर काँग्रेस नेत्यांच्या आग्रहावरून धारिया यांनी उमेदवारी मागे घेतली. अध्यक्षपदी निजलिंगप्पा यांची निवड झाली.

## आंतरराष्ट्रीय पातळीवर गौरव

डिसेंबर १९६६ मध्ये वसंतदादांच्या कार्याला आणि कारकिर्दीला वेगळी प्रतिष्ठा प्राप्त करून देणारी घटना घडली. बंगळूर येथे 'इंटरनॅशनल को-ऑपरेटिव्ह अलायन्स लंडन' या आंतरराष्ट्रीय सहकारी संस्थेने एक परिसंवाद आयोजित केला होता. त्या परिसंवादात जागतिक पातळीवर चाललेल्या ग्रामविकास चळवळीवर विशेष प्रकाश टाकण्यात येणार होता. त्या परिसंवादात एक दिवस सहकारी साखर कारखानदारीने ग्रामीण भागात घडविलेल्या परिवर्तनावर तसेच क्रांतीवर चर्चा झाली. वसंतदादा आणि त्यांनी सहकारी साखर कारखानदारीच्या माध्यमातून विणलेले सहकाराचे जाळे आणि ग्रामीण भागात झालेली क्रांती यांवर चर्चा झाली. त्याच चर्चेतून त्या संस्थेने सांगली जिल्ह्याला भेट देण्याचा निर्णय घेतला. जिल्ह्यातील सहकारी साखर कारखाना, जलसिंचन योजना आणि शेती यांचा अभ्यास आणि पाहणी करण्यासाठी त्या संस्थेच्या प्रतिनिधींनी भेट दिली. साखर कारखान्यासह सांगली जिल्ह्यात राबविल्या जातअसलेल्या सर्वच योजनांची प्रत्यक्ष पाहणी केली. त्या पाहणीनंतर दादांनी उभे केलेले हे कार्य एका पुस्तिकेद्वारे संस्थेच्या जगातील २२ कोटी सभासदांपर्यंत पोहोचविण्यात आले. दादांची ख्याती जगभर पोहोचली. त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव करण्यात यावा, अशी शिफारस महाराष्ट्र शासनाकडे करण्यात आली. या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर दादांना 'पद्मभूषण' या मानाच्या किताबाने गौरविण्याची घोषणा झाली. वयाच्या ५० व्या वर्षी दादा २६ जानेवारी १९६७ रोजी दिल्लीत पोहोचले. स्वातंत्र्यासाठी पदोपदी जिवाची बाजी लावणाऱ्या एका क्रांतिवीराचा गौरव त्या दिवशी होणार होता. देशाच्या प्रजासत्ताकदिनी स्वातंत्र्यसेनानी वसंतदादा बंडूजी पाटील यांना राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या हस्ते 'पद्मभूषण' किताब बहाल करण्यात आला. १९४२ च्या क्रांतिलढ्यात ब्रिटिशांना जेरीस आणणाऱ्या आणि स्वातंत्र्यानंतर ग्रामीण जीवनात विकासाची क्रांती करणाऱ्या स्वातंत्र्यवीराचा सार्थ गौरव झाला!

अनुक्रमणिका

राज्यात सहकारी साखर कारखानदारीला बळ देण्याचे काम दादांनी अविरतपणे केले. त्या कामात अनेक वेळा केंद्र सरकारच्या अडवणुकीच्या धोरणामुळे अडचणी निर्माण झाल्या. दादांची धडाडी आणि एकदा स्वतःला पटलेला मुद्दा शेवटपर्यंत लावून धरण्याची हातोटी यांमुळे अनेक अडचणींमधून त्यांनी सहज मार्ग काढला. उसाच्या दराच्या बाबतीतही महाराष्ट्रावर अन्याय करणारी भूमिका केंद्र सरकारने घेतली होती. बिहार, उत्तर प्रदेश, पंजाब, हरियाणा आणि केरळ या राज्यांना साखरेचे भाव वाढवून दिले; परंतु महाराष्ट्राला डावलले. त्या विरोधात दादांनी जबरदस्त मोर्चेबांधणी केली. महाराष्ट्रातील साखर कारखानदारी केंद्र सरकारने योग्य आणि सकारात्मक दृष्टिकोनातूनच हाताळली पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. दादांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे केंद्र सरकारला आपली भूमिका तर बदलावी लागलीच; शिवाय त्याचवर्षी नवे साखर धोरणदेखील जाहीर करावे लागले. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठीही केंद्राने अनुकूल असा निर्णय घेतला आणि १९६६-६७ या कालावधीत उसाला प्रतिटन ६९ रुपये हा दर मान्य केला. दादांना मिळणाऱ्या यशामागे त्यांचा शुद्ध हेतू, सखोल अभ्यास आणि त्या अभ्यासाला त्या-त्या क्षेत्रातील तज्ज्ञांच्या सल्ल्याची जोड असे. स्वतः अभ्यास केल्याशिवाय दादा कधीही मत बनवत नसत. ज्या-ज्या ठिकाणी जाण्याची संधी मिळे, त्या-त्या ठिकाणी चांगले काय आहेहे हेरण्याचे उपजत कौशल्य त्यांच्याकडे होते. सप्टेंबर १९६७ ते नोव्हेंबर १९६७ या काळात त्यांनी युरोप, अमेरिका, कॅनडा, हवाई, दक्षिण अमेरिका या देशांचा दौरा केला. त्या देशांची शेती, साखर कारखानदारी, ऊस पीक पद्धती, बँकिंग, आदींचा अभ्यास केला. त्या अभ्यासाला आपल्या देशातील वास्तववादी परिस्थितीशी तुलनात्मकदृष्ट्या जोडण्याचा सदैव प्रयत्न केला. त्याच कारणाने दादांच्या विचाराला आणि कृतीला आपोआपच व्यापक दृष्टी प्राप्त झाली.

१९६७ च्या डिसेंबर महिन्यात अखिल भारतीय कॉंग्रेसचे अधिवेशन सांगलीत भरणार होते. वसंतदादा या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष होते. अधिवेशन ऐतिहासिक ठरावे यासाठी सर्वच कार्यकर्त्यांनी जोरदार तयारी सुरू केली होती. शहरातील रस्ते, चौक आणि संमेलनस्थळ सुशोभित करण्याचे विशेष नियोजन करण्यात आले होते. या अधिवेशनाची तयारी पाहण्यासाठी गृहमंत्रीयशवंतराव चव्हाण यांनी सांगलीला भेट देण्याचा निर्णय घेतला. १० डिसेंबर १९६७ रोजी अधिवेशनाच्या तयारीची पाहणी करण्यासाठी यशवंतराव सांगलीत आले. तोकाळ बेळगाव सीमाप्रश्नामुळे तणावग्रस्त बनलेला होता. सीमावासीयांनी आक्रमक धोरण स्वीकारलेले होते. त्यात महाजन समितीचा अहवाल जाहीर झाल्याने मराठी भाषिकांमध्ये संतापाची लाट उसळलेली होती. यशवंतरावांचा सांगली दौरा निश्चित झाला आणि सीमावाद्यांनी त्यांच्या विरोधात निदर्शने करण्याचा निर्णय घेतला. निदर्शकांचे नेते ताराचंद शहा यांनी निदर्शनांची जय्यत तयारी केली होती. पोलिसांचा बंदोबस्तही मोठा होता. यशवंतराव सांगलीत दाखल झाले. दादा, यशवंतराव व वसंतराव नाईक यांना उघड्या जीपमधून अधिवेशन स्थळाकडे घेऊन निघाले होते. त्याचवेळी निदर्शकांनी पोलिसांचे कडे तोडून जीपकडे धाव घेतली. एकच गोंधळ उडाला. निदर्शकांना रोखण्यासाठी पोलिसांनी लाठीमार सुरू केला. त्या लाठीमारात ताराचंद शहा यांच्यासह अनेक कार्यकर्ते जखमी झाले. घडलेल्या प्रकारामुळे सारेच अस्वस्थ झाले. निदर्शकांच्या आक्रमक कृतीमुळे अधिवेशनाच्या तयारीला लागलेले कॉंग्रेसचे कार्यकर्तेही उदास झाले. अखेर यशवंतराव व वसंतराव नाईक त्याच दिवशी दुपारी चार वाजता मुंबईला निघून गेले. दुर्दैवाने दुसऱ्याच दिवशीमहाराष्ट्रावर निसर्गाने घाला घातला. ११ डिसेंबर १९६७ रोजी कोयना परिसर भूकंपाच्या धक्क्यांनी हादरून गेला. भूकंपाने अनेकांचे संसार उद्ध्वस्त केले. घरांच्या पडझडीत अनेकांचे जीव गेले. कोयना परिसर आणि उभा महाराष्ट्र शोकाकुल बनला. भूकंपग्रस्तांच्या मदतीसाठी जग धावले. महाराष्ट्र शासनाने तातडीने भूकंपग्रस्तांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी अनेक योजना हाती घेतल्या. वसंतदादांनी टनास एक

अनुक्रमणिका

रुपया याप्रमाणे सांगलीच्या साखर कारखान्याच्यावतीने मुख्यमंत्र्यांच्या कोयना पुनर्वसन निधीस ३ लाख ३४ हजार ६५१ रुपयांचा निधी दिला. भूकंप झाला त्याचदिवशी साडेचौदा हजार रुपये रोख आणि १० पोती साखरही कोयना परिसरात पाठविली. दुसऱ्या वर्षीदेखील कोयना भूकंपग्रस्त पुनर्वसन निधीसाठी ६ लाख १ हजार ८० रुपये एवढा निधी साखर कारखान्याच्यावतीने दिला.

## काँग्रेसमध्ये अस्वस्थता

१९६८ साल देशाच्या आणि काँग्रेस पक्षाच्या दृष्टीने कठीण परिस्थितीचे होते. जातीयवाद आणि त्यातून निर्माण होणारा तणाव यांमुळे वातावरण गढूळ बनत चालले होते. देशात अनेक ठिकाणी जातीय दंगली घडल्या होत्या. महाराष्ट्रही त्या दंगलीमध्ये अपवाद ठरला नाही. सोलापूर,नगर,मालेगाव येथे दंगली घडल्या. या दंगलींचा परिणाम महाराष्ट्राच्या समाजजीवनावर होणे साहजिकच होते. देशाचे गृहमंत्री म्हणून त्या परिस्थितीत यशवंतराव चव्हाण टीकेचे लक्ष्य बनले होते. या पार्श्वभूमीवर वसंतदादांनी परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी मार्ग काढण्याच्या हेतूने कार्यकर्त्यांचे तीन दिवसांचे शिबीर आयोजित केले होते. राज्याच्या गेल्या दोन वर्षांतील राजकीय वाटचालीचा अभ्यास करून पक्षाचे सरचिटणीस शिवाजीराव पाटील यांनी एक प्रबंध तयार केला होता. पक्षाचे ध्येयधोरण व कार्यपद्धतीतील त्रुटी आणि कार्यकर्त्यांची मानसिकता या मुद्दयांवर त्या प्रबंधाचा भर होता. या शिबिरात दादांनी काँग्रेसच्या अंतर्गत गटबाजीमुळे पक्षाचे होणारे नुकसान यावर कार्यकर्त्यांचे प्रबोधन करण्यावर भर दिला होता. यशवंतरावांनीही या शिबिरात काँग्रेसच्या तात्त्विक-वैचारिक बैठकीचे महत्त्व कार्यकर्त्यांना प्रभावीपणे समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. एकात्मता, धर्मनिरपेक्षता, समाजवाद आणि लोकशाही विचार ही चार तत्त्वे पक्षाचा मुख्य आधार आहेत. ज्या-ज्या वेळी या आधारांपैकी एखादा आधार कमकुवत झाला, त्या-त्या वेळी काँग्रेस पक्षाला अपयशाला तोंड द्यावे लागले, असेही यशवंतरावांनीकार्यकर्त्यांना सांगितले. या शिबिरातील चर्चेचा कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण करण्यासाठी खूप उपयोग झाला. कार्यकर्ते तोच विचार घेऊन आपापल्या भागात कार्यरत झाले.

दरम्यान, शेतकरी सहकारी साखर कारखान्याची स्थापना होऊन बारा वर्षे लोटली होती. ती बारा वर्षे म्हणजे शेतकऱ्याने स्वतःचा उद्योग उभा करण्यासाठी घेतलेल्या कष्टाचा आदर्श होता. जो आदर्श राज्याच्या ग्रामविकास चळवळीला प्रेरणा देत होता. बारा वर्षांत दादांनी कारखाना १ हजार टन क्षमतेपासून ५ हजार टन गाळप क्षमतेपर्यंत नेऊन पोहोचविला. यशाच्या एका उच्च शिखरावर कारखाना पोहोचलेला असताना २ एप्रिल १९६९ रोजी दादांनी कारखान्याची सूत्रे आपले सहकारी दिनकरराव (आबा) कृष्णाजी पाटील यांच्याकडे सोपविली होती.

१९६९ मध्ये फरिदाबाद येथे काँग्रेसचे अधिवेशन झाले. अधिवेशनाच्या अध्यक्षपदी निजलिंगप्पा होते. ३ मे १९६९ रोजी राष्ट्रपती डॉ. झाकीर हुसेन यांचे निधन झाले. उपराष्ट्रपती व्ही. व्ही. गिरी यांच्याकडे हंगामी राष्ट्रपतिपद देण्यात आले. पुढे १० जुलै १९६९ रोजी बंगळूर येथे काँग्रेसचे तीन दिवसांचे अधिवेशन भरविण्यात आले होते. राष्ट्रपतिपदाचा उमेदवार निश्चित करणे हा या अधिवेशनातील महत्त्वाचा विषय होता. प्रकृती अस्वास्थ्यामुळे अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी इंदिरा गांधी उपस्थित राहू शकल्या नव्हत्या. त्याचवेळी निजलिंगप्पा व त्यांच्या समर्थकांनी राष्ट्रपतिपदासाठी संजीव रेड्डी यांची उमेदवारी जाहीर केली. नंतर इंदिरा गांधीच्यावतीने जगजीवनराम यांचे नाव सुचविण्यात आले. काँग्रेस पक्षातील 'सिंडिकेट' आणि 'इंडिकेट' गटांच्या घडामोडी सुरू होत्या. त्यात निजलिंगप्पा यांनी 'सिंडिकेट' च्यावतीने

संजीव रेड्डी यांचेच नाव पुढे केले. कामराज, यशवंतराव चव्हाण, स. का. पाटील, मोरारजी देसाई या नेतेमंडळींनीही रेड्डींच्या बाजूने मत नोंदविले.

या घडामोडी सुरू असतानाच दिल्लीत व्ही. व्ही. गिरी यांनी राष्ट्रपतिपदासाठी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला. बंगळूर अधिवेशनातील घडामोडींवर इंदिरा गांधी संतप्त झाल्या. त्यांनी तातडीने मोरारजींचे अर्थखाते काढून घेतले आणि ते यशवंतरावांकडे दिले. यशवंतरावांकडे असलेले गृहखाते त्यांनी स्वतःकडे ठेवले. त्याचवेळी देशातील १४ मोठ्या बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. उपराष्ट्रपतिपदी असलेल्याव्ही. व्ही. गिरी यांचा पारंपरिक संकेताप्रमाणे राष्ट्रपतिपदावर अधिकार होता; पण 'सिंडिकेट' गटाने इंदिरा गांधींना शह देण्यासाठी तो नाकारला. काँग्रेस दुभंगली. कार्यकर्त्यांमध्ये दोन फळ्या निर्माण झाल्या. इंदिरानिष्ठांनी वेगळी काँग्रेस स्थापन करून सी सुब्रह्मण्यम् यांना हंगामी अध्यक्ष केले. या सर्व राजकीय उलथापालथीचा राज्यांच्या राजकारणावर मोठा परिणाम झाला. त्यात डिसेंबर १९६९ मध्ये इंदिरा काँग्रेसचे खुले अधिवेशन मुंबईत भरविण्याचे निश्चित झाले. या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष वसंतदादा होते. देशातील काँग्रेसअंतर्गत संघर्षाने सीमा गाठली असताना या अधिवेशनाच्या स्वागताध्यक्षपदाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडणे हे खूप मोठे आव्हान वंसतदादांपुढे होते. या अधिवेशनाच्या निमित्ताने काँग्रेसचे पुनरुज्जीवन होणार होते. सभ्रंमात असलेल्या कार्यकर्त्यांना दिशा मिळणार होती. दादांनीही संघटन कौशल्य पणाला लावले. राज्यभरातील कार्यकर्त्यांची फौज कामाला लावली. आझाद मैदानावरील भव्य मंडपात अधिवेशनाची सुरुवात झाली. इंदिरा गांधी, जगजीवनराम आणि यशवंतराव चव्हाणांच्या भाषणांनी काँग्रेस कार्यकर्ते प्रभावित झाले. कार्यकर्त्यांमध्ये चैतन्य निर्माण झाले. या अधिवेशनात यशवंतरावांनी मावळत्या सूर्याला साक्षी ठेवीत काँग्रेस पक्षाने स्वीकारलेल्या नव्या धोरणांची शपथ दिली. ‘दोर कापले गेले आहेत; आता माघार नाही’ अशी ऐतिहासिक घोषणाही केली. या अधिवेशनाने देशाचे राजकारण ढवळून निघाले.

१९७० मध्ये देशातील पहिल्या महिला सहकारी बँकेची स्थापना करण्याचा मान शालिनीताईंच्या नेतृत्वाखाली सांगली जिल्ह्याने मिळविला. सुलोचनाताई कदम यांनी सुचविलेल्या महिला बँकेच्या संकल्पनेस माणिकताई गायकवाड, सरोजिनीताई पाटील, विमलताई पाटील, शकुंतला रणखांबे यांनी शालिनीताईंच्या नेतृत्वाखाली आकार दिला. दादांनी बँक उभारणीत खंबीर साथ दिली व बँकेचे उद्‌घाटन आमदार प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते झाले.

## मालतीताईंचे निधन

राजकारणात आणि सहकारात विविध घडामोडी सुरू असतानाच दादांवर दुःखाचे डोंगर कोसळणे सुरूच होते. शामरावदादांच्या निधनाचे दुःख उराशी बाळगून वाटचालसुरू असतानाच दादांच्या पत्नी मालतीताई यांच्यावरही काळाने झडप घातली. ८ ऑगस्ट १९७० रोजी दादांच्या पद्माळे या गावी त्यांचे निधन झाले. मालतीताई अनेक दिवसांपासून आजारी होत्या. दादा राज्यभरातील दौरे आणि कामाच्या व्यापातून वेळ काढून मालतीताईची प्रकृती सुधारावी यासाठी सदैव प्रयत्नशील राहिले होते. बालपणी दादा व शामरावदादा यांचा सांभाळ करणारे कागलचे मामा (जगदाळे-पाटील) यांच्या कन्या मालतीताई यांनी दादांच्या जीवनात सोशिकता आणि कर्तव्याची भूमिका समर्थपणे बजावली होती. लग्नापूर्वीच दादांनी स्वतःला स्वातंत्र्यासाठीच्या क्रांतिलढ्यात झोकून दिले होते. त्यात शामरावदादा आणि पार्वतीवहिनी यांनी दादांना संपूर्ण पाठबळ दिले होते. लग्नानंतर दादांच्या घरात पत्नी म्हणून प्रवेश केलेल्या

मालतीताईंनादेखील शामरावदादा व पार्वतीवहिनी यांच्याच वाटेवरून जावे लागले. दादांच्या कार्याला साथ देणे आणि येणाऱ्या प्रत्येक प्रसंगाला समर्थपणे तोंड देणे, हीभूमिका त्यांनी आयुष्यभर पार पाडली. त्यांची पहिली कन्या अकाली गेली. त्यानंतर झालेली दोन अपत्येही काळाने हिरावून घेतली. मातृत्वावर नियतीने बेतलेल्या त्या संकटांना मालतीताईंनी धीराने तोंड दिले. त्यांचे निधन दादांच्या ह्रदयावर खूप मोठी जखम करून गेले. त्या दुःखालाही ह्रदयात सामावून घेऊन दादांनी समाजासाठी हाती घेतलेल्या कामांमध्ये स्वतःला झोकून दिले.

## प्रदेशाध्यक्षपदाचा प्रभाव

देशासाठी आणि समाजासाठी जीवन अर्पण करणाऱ्या विभूतींना स्वतःचे जीवन आणि व्यक्तिगत सुखःदुःख नसते असे म्हणतात. दादा तसेच एक उदाहरण होते. आपले सर्व दुःख विसरून पुन्हा ते कामाला लागले. डिसेंबर १९७० मध्ये लोकसभेचे हिवाळी अधिवेशन संपण्यापूर्वी इंदिरा गांधींनी राष्ट्रपतींकडे लोकसभा बरखास्तीची शिफारस केली आणि लोकसभा बरखास्त झाली. मार्च १९७१ मध्ये मुदतपूर्व निवडणुका घेण्याचा निर्णय झाला. प्रदेशाध्यक्ष म्हणून दादांनी महाराष्ट्रात मुदतपूर्व निवडणुकीच्या तयारीला आणि पक्षाच्या बांधणीला सुरुवात केली. राज्यभर दौरे केले. त्या वेळी पक्षाचे चिन्ह 'गाय-वासरू' होते. हे चिन्ह घराघरांत पोहोचविण्यासाठी दादांनी कार्यकर्त्यांना कामाला लावले. इंदिरा गांधीच्या नेतृत्वाचे नवे पर्व देशात सुरूझाले होते. त्यांच्या 'गरिबी हटाव' या नाऱ्याने देश भारावून गेला होता. त्याचा प्रभाव आणि परिणाम निवडणुकीच्या निकालावरून देशाला दिसला. काँग्रेसला ३६० जागा म्हणजेच दोन तृतीयांश बहुमत प्राप्त झाले. दादांच्या सांगली लोकसभा मतदारसंघातून अपेक्षेप्रमाणे आर. के. खाडिलकर विजयी झाले.

देशात 'इंदिरा राज' सुरू झाले असताना दादांनीही हाती घेतलेल्या कामांची मालिका त्याच गतीने गुंफली होती. जुलै १९७१ मध्ये पशू व कोंबडी खाद्य कारखान्यात उत्पादन सुरू झाले. कारखान्याने डिस्टिलरी प्रकल्पाला जोडून देशी व विदेशी मद्याची निर्मिती सुरू केली. कापूस उत्पादकांना नवसंजीवनी देण्यासाठी उभारण्यात आलेल्या भारत सूतगिरणीत प्रत्यक्ष सूत उत्पादनास प्रारंभ झाला. ज्या रेल्वेच्या प्रश्नी दादांनी रेल्वे परिषद घेऊन रेल्वेमंत्री लालबहाद्दूर शास्त्री यांना मिरज-पंढरपूर असा बार्शी लाईट रेल्वेने प्रवास घडविला होता, त्या रेल्वेचे रुंदीकरण त्याच काळात झाले. दक्षिण रेल्वेची ब्रॉडगेज लाईन १५ एप्रिल १९७१ रोजी कार्यान्वित झाली. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी सामना करीत जे मार्केट यार्ड दादांनी उभे केले होते, त्याच मार्केट यार्डाजवळ ब्रॉडगेज रेल्वेचे नवे स्टेशनही झाले. याच काळात दादांचे सुपुत्र प्रकाश व पुतणे विश्वास यांचा ११ मे १९७१ रोजी सांगलीच्या महात्मा गांधी बोर्डिंगमध्ये विवाह झाला. दादांच्या जीवनातील एक महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला. इंदिरा गांधींच्या नेतृत्वाने जगावर मोहिनी घातली होती. तशातच पाकिस्तानमध्ये बांगलादेशचा स्वातंत्र्यलढा सुरू झाला होता. इंदिरा गांधीनी बांगलादेशच्या स्वातंत्र्यासाठी अनुकूल भूमिका घेतली. त्यामुळे पाकिस्तानने भारतावर आक्रमण केले. भारतीय जवानांनी त्याला सडेतोड उत्तर दिले. भारतीय सैन्याच्या पराक्रमाने पाकिस्तानचा पराभव झाला. पाकिस्तानचे दोन तुकडे झाले. इंदिरा गांधींच्या आक्रमक नेतृत्वाने जगाचे लक्ष वेधले. त्यांची जागतिक राजकारणातील प्रतिष्ठा वाढली. इंदिरा गांधींच्या ऐतिहासिक कामगिरीची दखल घेऊन राष्ट्रपती व्ही. व्ही. गिरी यांनी त्यांना 'भारतरत्न' ही मानाची पदवी देऊन गौरविले.

१९७१ मध्ये झालेल्या लोकसभेच्या मुदतपूर्व निवडणुकांनंतर महाराष्ट्रात १९७२ च्या विधानसभेच्या पंचवार्षिक निवडणुकीची तयारी सुरू झाली. नागपूर करारानुसार महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद निवडणुकीनंतर मराठवाड्याला मिळणे अभिप्रेत होते; परंतु१९७१ मध्ये औरंगाबाद येथे यशवंतराव चव्हाणांनी विधानसभेच्या निवडणुकीनंतर वसंतराव नाईकच मुख्यमंत्री होणार असल्याची घोषणा केली होती. त्याचा परिणाम मरावाड्यातील जनतेवर झाला. नागपूर कराराचा भंग करून मराठवाड्याचा मुख्यमंत्रिपदावरील अधिकार नाकारला जात असल्याबद्दल लोकांमध्ये असंतोष निर्माण झाला. त्यात वसंतराव नाईक यांनी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्याकडून मुख्यमंत्रिपदाची आणखी दोन वर्षे वाढवून घेतली. या पार्श्वभूमीवर वसंतरावांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस विधानसभेच्या निवडणुकीला सामोरी गेली. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस निवडणूक समिती जुनीच होती. समितीत दोन जागा रिक्त होत्या. पक्षश्रेष्ठींनी त्या दोन जागा शंकरराव चव्हाण यांच्या सल्ल्याने भरण्याची सूचना दादांना केली. त्यानुसार दादांनी शंकररावांनी सुचविलेले मराठवाड्याचे बाबासाहेब सावनेरकर, तर विदर्भाचे बाबूराव देशमुख यांना समितीवर सदस्य म्हणून घेतले. उमेदवार निवडीची प्रक्रिया सुरू झाली. दादांनी उमेदवार निवडीत कोणत्याही प्रकारची आग्रही भूमिका घेतली नाही. स्वातंत्र्यलढ्यात दादांसोबत खांद्याला खांदा लावून लढणारे स्वातंत्र्यसेनानी गणपतराव कोळी यांच्यासाठी विधान परिषदेची जागा मागून घेतली. सांगली विधानसभा मतदारसंघातून प्राचार्य पी. बी. पाटील यांना उमेदवारी मिळाली.

११ मार्च १९७२ रोजी विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाला. निकालानंतर प्रदेशाध्यक्ष वसंतदादा पाटील आणि मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या प्रभावशाली संघटन कौशल्यावर आणि लोकप्रियतेवर शिक्कामोर्तब झाले. राज्यातील २७० पैकी २२२ जागा काँग्रेसने जिंकल्या. ठरल्याप्रमाणे मुख्यमंत्रिपदी वसंतराव नाईक यांची निवड झाली. मंत्रिमंडळाची यादी घेऊन मुख्यमंत्री नाईक व दादा इंदिरा गांधींना भेटण्यासाठी दिल्लीला रवाना झाले. दादा प्रदेशाध्यक्ष असल्यामुळे त्यांच्या मंत्रिपदाचा विषयच नव्हता; परंतु जेव्हा नाईक यांनी मंत्रिमंडळाची यादी इंदिरा गांधींना सादर केली, तेव्हा त्यांनी यादी अपूर्ण असल्याचा शेरा मारला. त्या यादीत दादांचे नाव प्रथम घ्या, अशी सूचना त्यांनी नाईक यांना केली. दादांच्या ध्यानीमनी नसताना इंदिरा गांधीच्या अनपेक्षित भूमिकेमुळे दादांकडे मंत्रिपद चालून आले.

## पाटबंधारे मंत्रिपदाची धुरा

१६ मार्च १९७२ हा गुढी पाडव्याचा दिवस. त्याच दिवशी दादांनी राज्याचे पाटबंधारे मंत्री म्हणून शपथ घेतली. दादांच्या राज्यभरातील चाहत्यांनी आणि सांगली जिल्ह्याने दादांच्या मंत्रिपदाची गुढी उभी करून सण साजरा केला. दादांना मंत्रिपदाचा कधी सोस नव्हता. कोणतेही काम उभे करणे आणि ते सक्षम व विश्वासू कार्यकर्त्यांच्या हाती देऊन पुढे नव्या कामाच्या मागे लागणे हा दादांचा शिरस्ता होता. वयाच्या ५५ व्या वर्षी ते मंत्रिपदावर आरूढ झाले. १९३७ ते १९७२ अशी तब्बल ३५ वर्ष त्यांनी देशासाठी आणि ग्रामीण महाराष्ट्रासाठी सतत कार्य केले. स्वातंत्र्यलढ्यातील १० वर्षे तर त्यांनी दररोज मृत्यूशी संघर्ष केला. स्वतःच्या कुटुंबाला विसरून, क्रांतीसाठी भूमिगत राहून जिवाची बाजी लावली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर विधायक कामाने झपाटले जाऊन सहकार आणि ग्रामविकासाचे नवे पर्व सुरू केले. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी लढणारा एक क्रांतिवीर २५ वर्षांत लोकांसाठी काय करू शकतो याचा आदर्श त्यांनी महाराष्ट्रापुढे ठेवला. पदाच्या पलीकडे जाऊन काम करण्याच्या त्यांच्या उपजत गुणामुळेच ते सत्ता नसतानाही महाराष्ट्रातील तमाम जनतेचे हक्काचे 'दादा' बनले होते. पाटबंधारे मंत्री म्हणून त्यांनी शपथ

अनुक्रमणिका

घेतली, तेव्हा ते राज्यात ६८ संस्थांवर काम करीत होते. त्या संस्थांच्या कामाचे मूल्य आणि लोकशक्ती मंत्रिपदापेक्षा कितीतरी मोठी होती.

पाटबंधारे मंत्रिपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर सरकारी निवासस्थानात जाणे त्यांनी टाळले. मुंबईत माहीम भागात कामगार वस्तीत ते 'ज्योतीसदन' येथे पूर्वीपासून राहत होते. मंत्री म्हणूनही त्यांनी तेथेच राहणे पसंत केले. ते निवासस्थान गेल्या अनेक वर्षापासून राज्यभरातील अनेक कार्यकर्त्यांचे आधार बनले होते. तेथे कधीही आणि कोठेही वावरण्यास मनाई नव्हती. दादा जेवण करताहेत की विश्रांती घेताहेत, याविषयीही कार्यकर्त्यांना फिकीर नसायची. दादांना कोणीही, कधीही मुक्तपणे भेटू शकत. मंत्रिपद स्वीकारल्याने दादांनी तातडीने काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा दिला. पुढे जिल्हा परिषद निवडणुका होत्या. त्यामुळे ३ एप्रिल १९७२ रोजी झालेल्या प्रदेश काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीत दादांनी जिल्हा परिषद निवडणुका होईपर्यंत अध्यक्षपदी राहावे, असा एकमताने ठराव करण्यात आला. त्या ठरावानुसार दादाप्रदेशाध्यक्ष राहिले. जून १९७२ मध्ये राज्यातील जिल्हा परिषदेच्या निवडणुका झाल्या. अपेक्षेप्रमाणे २२ जिल्हा परिषदांत काँग्रेसला निर्विवाद बहुमत मिळाले. सांगली जिल्हा परिषदेतही दादांच्या समर्थकांनी बाजी मारुन ४९ पैकी ४३ जागा मिळविल्या.

दादांकडे आलेले पाटबंधारे मंत्रिपद आणि जिल्हा परिषदांमध्ये आलेली काँग्रेसची निर्विवाद सत्ता यांमुळे कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते. त्या आनंदातच दुष्काळाच्या संकटाने महाराष्ट्रावर आक्रमण केले. टंचाईग्रस्त परिस्थितीने ग्रामीण जनता हैराण झाली होती. शेतीचे पाणी, पिण्याचे पाणी, अन्नधान्य आणि गुरांच्या चाऱ्याच्या प्रश्नाने महाराष्ट्र ग्रासून गेला होता. त्या परिस्थितीत दादांनी लोकांना आधार देण्याचे, त्यांचे प्रश्न तातडीने सोडविण्याचे खूप मोठे काम केले. दादांचे स्वातंत्र्यलढ्यातील साथी व विधान परिषदेचे सभापती वि. स. पागे यांनी 'रोजगार हमी योजने' ला जन्म दिल्याने दुष्काळाला तोंड देणे थोडे सुसह्य झाले. लोकांच्या हातांना काम मिळण्याबरोबरच अनेक छोटे-मोठे प्रकल्प रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून उभे राहू लागले. दादांनी नांदेड, नाशिक, सोलापूर जिल्ह्यांतील अनेक धरणांना भेटी दिल्या. अपूर्ण कामे, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन, पाणीपुरवठ्यातील अडथळे आणि टंचाईग्रस्त भागातील जनतेच्या दैनंदिन गरजा यांचा अभ्यास करून तातडीने धाडसी निर्णय घेतले. टंचाईग्रस्त भागातील जनतेला दिलासा मिळाला, नांदेड, सोलापूर, नाशिक जिल्ह्यांतील पाटबंधारे प्रकल्पांना दादांनी त्या काळात भेटी दिल्या. रेंगाळलेल्या प्रकल्पांचे प्रश्न, प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न, पाणीपुरवठा योजनांची स्थिती आणि टंचाईग्रस्त भागांतील शेतकऱ्यांच्या व जनतेच्या समस्या ध्यानात घेऊन त्यांवर तातडीने निर्णय घेतले. भूविकास बँकेच्या माध्यमातून सिंचन विहिरीसाठी योजना सुरू होती. १० वर्षांपासून कार्यरत असणारी ती योजना एक वर्षापूर्वी बंद करण्यात आली होती. दादांनी ती नव्याने सुरू केली. विहिरीसाठी येणाऱ्या खर्चाच्या २५ टक्के किंवा ५०० रुपये आणि पंपासाठी २५ टक्के किंवा ८०० रुपये कर्ज त्या योजनेच्या माध्यमातून देण्यात आले.

निमदुष्काळी जिल्ह्यांतील पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठीदेखील त्यांनी ठोस पावले उचलली. अशा जिल्ह्यांसाठी १०० टक्के अर्थपुरवठा करणारी योजना आखण्यात आली. या योजनेतर्गत नऊ वर्षांच्या परतफेडीच्या अटीवर नऊ टक्केव्याजाने विहिरीसाठी कर्ज देण्यात आले. या योजनेचा त्या काळाक औरंगाबाद, नांदेड, परभणी, यवतमाळ आणि पुणे जिल्ह्यांना लक्षणीय फायदा झाला. महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीची माहिती केंद्र सरकारला पाठविण्यात आली होती. केंद्रीय अर्थमंत्री यशवंतराव चव्हाण, मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी वसंतदादांसह दुष्काळी गावांचा संयुक्त दौरा केला. केंद्राची मदत

अनुक्रमणिका

मिळविण्यासाठी हा दौरा उपयोगाचा ठरला. त्याच दौऱ्यावेळी शेतीपंप व पंपाची उपकरणे खरेदी करण्यासाठी दुष्काळग्रस्त जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे दोन कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात आले. दादा व मुख्यमंत्री नाईक यांचा पाठपुरावा आणि यशवंतरावांकडे असलेले केंद्रीय अर्थखाते यामुळे महाराष्ट्राला त्यावेळी टंचाई निवारण व पाटबंधारे कामासाठी ५३ कोटी ९३ लाख रुपयांचे कर्ज मिळाले. परिणामी दुष्काळी भागाला दिलासा तर मिळालाच; शिवाय राज्यातील काही पाटबंधारे प्रकल्पही मार्गी लागले. दुष्काळी कामातून लोकोपयोगी प्रकल्प उभे राहिले पाहिजेत, या दादांच्या आग्रही भूमिकेचाही फायदा अनेक दीर्घकालीन प्रकल्प उभे राहण्यासाठी झाला.

## राजारामबापूंशी तात्त्विक मतभेद

त्याच काळात कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यांच्या जिव्हाळ्याचा वारणा नदीवरील धरणाचा प्रश्न वादग्रस्त ठरला. त्या प्रकल्पाविषयीच्या दादांच्या भूमिकेवरून दोन्ही जिल्ह्यांतून नाराजीचा सूर उमटू लागला. वारणा नदीवरील खुजगाव येथे अडीच लाख एकर जमीन क्षेत्र पाण्याखाली आणणारे मोठे धरण १९६५-६६ मध्ये मंजूर झालेले होते. त्याधरणाचे काम मात्र सुरू न झाल्याने सांगली-कोल्हापूर भागांत असंतोष होता. याच प्रकल्पावरून वसंतदादा आणि राजारामबापू पाटील यांच्यात टोकाचे तात्त्विक मतभेद होते. दादा पाटबंधारे मंत्री झाल्यानंतर याच प्रश्नावरून दादांच्या विरोधात चर्चा होऊ लागली. विधानसभेतही या प्रश्नी विरोधकांनी दादांना धारेवर धरून टीका केली. त्या टिकेला दादांनी उत्तर दिले. धरणासंदर्भातील त्यांची भूमिका त्यांनी विधिमंडळात मांडली. विधानसभेत खुजगाव धरणासंदर्भातील टीकेला त्यांनी दिलेले उत्तर असे, 'या धरणामुळे ३५ ते ४० हजार एकर जमीन पाण्याखाली बुडणार असून, ३६ हजार लोक उठणार आहेत. सुपीक भागात वसलेल्या लोकांचाया धरणास विरोध आहे. वाटाघाटीच्या मार्गाने हा विरोध दूर करण्याचा प्रयत्न केला; पण यश आले नाही. चीफ इंजिनिअर चाफेकर व इतर तीन इंजिनिअर तज्ज्ञांच्या समितीने धरणाच्या जागेबद्दल चौकशी केली. धरणाची जागा सोईची आहे, परंतु धरण आणखी वर घ्या, असे समितीने सुचविले. त्यातच भूंकपाचा दुर्दैवी प्रसंग घडला आणि त्याच्या परिणामामुळे कोयना धरणाच्या पाण्यामुळे भूकंप झाला, असा गैरसमज झाला व विरोध वाढत गेला आणि पुनर्वसनाचा प्रश्न निर्माण झाला. धरणामुळे ओलिताखाली येणाऱ्या जमिनीचे मालक किती जमीन देतात हे पहिले पाहिजे. हा एक नवीन विचार आहे. धरणाच्या पाण्याचा फायदा मिळणाऱ्या मालकाकडून जमीन घेऊन संचय करावा व त्यातून सर्वांना ती देण्याचा प्रयत्न करावा, असा शासनाचा विचार आहे. शेवटी पुनर्वसनाचा प्रश्न लोकांशी बोलून व चर्चा करून सुटणार आहे.' विधानसभेत दादांनी खुजगाव धरणासंदर्भातील आपली भूमिका स्पष्ट केली, तरी तो वाद मात्र त्यावेळीसंपला नाही.

विधानसभेत दादांनी बाजू मांडूनही खुजगाव धरणाविषयीचा प्रश्न राजकारणात गाजतच होता. अखेर दादांनी सांगली व कोल्हापूर जिल्ह्यांतील पत्रकार, शेतकरी आणि तज्ज्ञ अधिकारी यांची खुजगाव व चांदोली परिसरात भेट आयोजित केली. तज्ज्ञांनी दोन्ही प्रकल्पांची आकडेवारीसह माहिती दिली. त्यानंतर २ ऑक्टोबर १९७२ रोजी सांगलीत वारणा नदीवरील चांदोली धरणाची घोषणा केली. खुजगाव प्रकल्पासाठी ७० कोटी रुपयांचा खर्च येणार होता. ती योजना पूर्ण होण्यास किमान १२ वर्षे लागणार होती. त्या योजनेनुसार निव्वळ कॅनॉलसाठी ३२ कोटी रुपये खर्च येणार होता. ७० कोटी रुपये खर्चाच्या खुजगाव प्रकल्पाच्या एकूण रकमेच्या निम्म्या रकमेत चांदोली धरण पूर्ण करता येईल, असा दादांचा दावा होता. त्यामुळे खुजगावऐवजीचांदोली धरणाचा निर्णय शासनाने त्याच कारणाने घेतला होता.

अनुक्रमणिका

पाण्याचे नियोजन आणि शेतकऱ्यांच्या गरजा यांवर दादांचा जबरदस्त अभ्यास होता. त्या अभ्यासाला अनुभवातून मिळालेल्या ज्ञानाचा आधार होता. त्यामुळे पाटबंधारेमंत्री म्हणून ते ऐतिहासिक काम करू शकले. धान्योत्पादनासाठी पाण्याची जेवढी गरज असते, तेवढेच पाणी शेतकऱ्यांनी वापरले पाहिजे, हा विचारही त्यांनी ग्रामीण महाराष्ट्रात रुजविण्याचा प्रयत्न केला. पूर्वी ज्या शेतकऱ्यांना बारा महिनेशेतीसाठी पाणी उपलब्ध असायचे, त्यांच्या शेतीला 'बागायती शेती' म्हटले जायचे. दादांनी ती व्याख्या बदलली आणि आठमाही पाणी उपलब्ध असलेल्या शेतीला 'बागायती शेती' म्हटले जाऊ लागले.

## स्वामी रामानंद भारतींचे निधन

१९७३ मध्ये दादांना आणखी एक धक्का बसला. जे दादांना प्रेमाने 'केशव' म्हणून हाक मारायचे, ते स्वामी रामानंद भारती यांनी मिरज येथे जगाचा निरोप घेतला. दादांनी स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर या दोन्ही काळांत स्वामींवर गुरू म्हणूनच श्रद्धा ठेवली होती. अनेक निर्णय त्यांच्या सल्ल्यानेच घेतले होते. स्वामी तर दादांना आपले मानसपुत्र मानायचे. क्रांतिलढ्यात आणि काँग्रेसच्या वाटचालीत दादांना त्यांनी समर्थ साथ दिली होती. सांगली जिल्हा नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष म्हणून काम करीत असताना स्वामींचा दादांच्या प्रत्येक मोहिमेत सक्रिय सहभाग असे. त्यांचे निधन दादांसाठी खूप क्लेशदायक ठरले. ती बातमी कळताच दादा व वि. स. पागे सांगलीत दाखल झाले. सांगलीत खूप मोठी अंत्ययात्रा निघाली. हजारो लोकांनी स्वामींना अभिवादन केले. कृष्णाकाठी स्वामींच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. ५० वर्षांपूर्वी सातारा जिल्ह्यात दाखल झालेल्या या संन्याशाने स्वातंत्र्यासाठी लढा तर दिलाच; शिवाय नवनिर्मित सांगली व सातारा जिल्ह्यांच्या विकासासाठी अखेरच्या श्वासापर्यंत प्रयत्न केले. त्याच कारणाने सांगली जिल्ह्यात 'रामानंदनगर' हे गाव त्यांच्या कार्याची नेहमीच आठवण देते आणि त्यांना अभिवादन करते!

जीवनचक्राने सुख दुःखाच्या फेऱ्याची दादांना सवयच लावलेली होती. स्वामी रामानंद भारती यांच्या निधनाचे दुःखही त्यातीलच! दादा पुन्हा कामाला लागले. कृष्णा पाणीवाटप लवाद हा दक्षिण महाराष्ट्राच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. पाणीवाटपासंदर्भात नियुक्त केलेल्या लवादाचा निकाल लागत नसल्याने कृष्णा नदीवरील अनेक पाटबंधारे प्रकल्पांचे भवितव्य धोक्यात आले होते. हाती घ्यावयाच्या प्रकल्पांचेही नियोजन करता येत नव्हते. पाटबंधारे मंत्री या नात्याने दादांनी या प्रश्नी पाठपुरावा केला. २४ डिसेंबर १९७३ रोजी लवादाने निकाल जाहीर केला. कृष्णा नदीच्या एकूण २ हजार ६० टीएमसी पाण्याचे वाटप जाहीर केले. महाराष्ट्र ५६५टीएमसी, कर्नाटक ६९५ टीएमसी तर आंध्र प्रदेशला ८०० टीएमसी पाण्याचा वाटा लवादाने दिला. पाणीवाटपाचा प्रश्न मार्गी लावल्यामुळे पुढे अनेक पाटबंधारे प्रकल्प गतिमान झाले.

## पाटबंधारे क्षेत्रास दिशा

७ जानेवीरी १९७३ रोजी पंतप्रधान इंदिरा गांधींनी मराठवाड्यातील जायकवाडीधरणास भेट दिली. मातीकामाचे सार्वांत मोठे धरण म्हणून हे धरण ओळखले जाते. पंतप्रधानांच्या भेटीवेळी त्यांच्यासमवेत मुख्यमंत्री वसंतराव नाईक व पाटबंधारेमंत्री वसंतदादा होते. या धरणाच्या पहिल्या टप्प्याच्या कामावर ७४ कोटी ३६ लाख रुपये खर्च झाले होते. त्यावर्षीच्या रब्बी हंगामापासून या प्रकल्पामुळे ६० हजार एकर क्षेत्र ओलिताखाली आले होते. औरंगाबाद, परभणी, अहमदनगर, बीड, नांदेड या जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना या

अनुक्रमणिका

धरणाचा फायदा होत होता. उरलेल्या टप्प्याचे कामही गतीने चालू होते. या प्रकल्पाची पाहणी करून इंदिरा गांधी यांनी पाटबंधारे खात्याच्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना शाबासकी दिली.

आवश्यक तेवढ्याच पाण्याचा उपयोग झाला पाहिजे, ही विचार गतिमान करण्यासाठी स्वतंत्र अशी व्यवस्था निर्माण केली पाहिजे, असे दादांना वाटत होते. त्यातूनच उपसा जलसिंचन योजनांचे नियोजन, देखभाल आणि सिंचन योजनेच्या कार्यक्षम अंमलबजावणीसाठी १६ नोव्हेंबर १९७३ रोजी सिंचन विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. पाटबंधारे मंत्री म्हणून दादा त्या महामंडळाच्या अध्यक्षपदी विराजमान झाले. या महामंडळाच्या माध्यमातून राज्यातील अनेक सिंचन योजनांना गती मिळणार होती. राज्याची पीक पद्धती आणि तिला अनुरूप पाणी वितरण पद्धती यांचा मेळ घालण्यात या महामंडळाची मदत होणार होती. ५ फेब्रुवारी १९७४ रोजी या महामंडळाची मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या उपस्थितीत बैठक झाली. या बैठकीत सिंचनासंदर्भात महामंडळ करीत असलेल्या नियोजनाची माहिती दादांनी दिली. रब्बी धडक योजनेंतर्गत राज्यातील ३६६ उपसा सिंचन योजना कार्यान्वित करण्यात महामंडळाला यश आले असल्याचेही त्यांनी सांगितले. दादांनी पाटबंधारे खात्याची सूत्रे हाती घेतल्यानंतर त्या खात्याच्या कार्यपद्धतीत आमूलाग्र बदल केले. यंत्रणेमध्येही त्यांनी बदल केले होते. त्याचाच परिणाम म्हणून पाटबंधारे खात्याने १ कोटी १४ लाखांची बचत केली होती. जायकवाडी प्रकल्पाच्या कामातही त्यावेळी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ऐतिहासिक अशी कामगिरी केली. जायकवाडी प्रकल्पाचे काम नियोजित वेळेपूर्वीच पूर्ण केल्याने प्रकल्प खर्चात १६ टक्के म्हणजे २ कोटी ७० लाख रुपयांची बचत झाली. अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या या कामगिरीला प्रोत्साहन देण्यासाठी पाटबंधारे खात्याने त्यांना उत्तेजनार्थ चार लाख रुपयांचे बक्षीस दिले.

## संघटन कौशल्याची छाप

१९७४ मध्ये अनेक महत्त्वाच्या घटनांची नोंद झाली. ६ एप्रिल १९७४ रोजी पुण्याच्या रेसकोर्स मैदानावर पंतप्रधान इंदिरा गांधी यांची खूप मोठी सभा झाली. या सभेपूर्वी सभेत विघ्न आणण्यासाठी विरोधक कामाला लागले होते. त्यामुळे ही सभा कशी होणार, याकडे सर्वांचेच लक्ष लागले होते. दादांनीयेथेही आपल्या नियोजन आणि संघटन कौशल्याची छाप इंदिरा गांधी यांच्यावर पाडली. सभा विक्रमी गर्दीने आणि प्रभावने गाजली. त्यामुळे दादांचे दिल्ली दरबारातील वजन आणखी वाढले. १ मे रोजी मुंबईत 'शिवसृष्टी' प्रदर्शनाचे यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. २ जून रोजी रायगडावर सिंहासनारूढ छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे मोठ्या थाटामाटात अनावरण झाले. या अनावरण समारंभाचे उद्‌घाटक म्हणून यशवंतराव चव्हाण उपस्थित होते. हाती घेतलेला प्रत्येक उपक्रम दादा यशस्वी करीत होते. त्याच काळात १८ मे रोजी देशाच्या दृष्टीने महत्त्वाची ऐतिहासिक घटना घडली. पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी राजस्थानच्या वाळवंटात अणुस्फोटाची चाचणी घेतली. या चाचणीमुळे भारताचे संरक्षण सामर्थ्य तर जगाला दिसलेच दिसले; त्याशिवाय संशोधन क्षेत्रात भारत करीत असलेल्या प्रगतीची प्रचितीदेखील जगाला आली. ९ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्राच्या राजकारणात थोडी उलथापालथ झाली. राज्याच्या मंत्रिमंडळात खांदेपालट झाली. शिक्षणमंत्री नामजोशी यांना वगळून त्यांच्या जागी शरद पवार यांना शिक्षणमंत्रीपद देण्यात आले. रत्नाप्पाण्णा कुंभार यांना गृहराज्यमंत्रीपद, तर उदयसिंगराव गायकवाड यांना ऊर्जा व आरोग्य राज्यमंत्रिपद देण्यात आले. या दोहोंच्या रुपाने कोल्हापूर जिल्ह्याला दोन मंत्रिपदे मिळाली.

अनुक्रमणिका

नागपूर कराराप्रमाणे मराठवाड्याला मुख्यमंत्रिपद देण्याची मागणी सातत्याने पुढे येत होती. वसंतराव नाईक यांच्या मुख्यमंत्रिपदाला बारा वर्षे पूर्ण झाल्याने मराठवाड्यातून त्या मागणीने जोर धरला होता. १४ फेब्रुवारी १९७५ रोजी शंकरराव चव्हाण, दादा, बाळासाहेब सावंत, डॉ. रफिक झकेरिया, बॅ. ए. आर. अंतुले यांचे शिष्टमंडळ पंतप्रधान इंदिरा गांधी यांना मराठवाड्याला मुख्यमंत्रिपद देण्याबाबतच्या मागणीसाठी भेटले. त्या मागणीनुसार शंकरराव चव्हाण यांची मुख्यमंत्रीपदी वर्णी लावून मराठवाड्याची मागणी पूर्ण करण्याचा निर्णय झाला. २५ फेब्रुवारी १९७५ रोजी शंकरराव चव्हाण यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. अपेक्षेप्रमाणे त्यांच्या मंत्रिमंडळात दादांना घेण्यात आले व त्यांच्याकडे पाटबंधारे, दारूबंदी व उत्पादन शुल्क ही खाती देण्यात आली. 'पाण्याचे नियोजन आणि उपलब्ध पाण्याचा पुरेपूर वापर' हा दादांच्या ग्रामविकास चळवळीचा नेहमीच आधार राहिला. त्याच आधारातून सांगली जिल्ह्यात दादांनी कसबे डिग्रज पाणीपुरवठा योजना कार्यान्वित केली होती. त्या योजनेमुळे शेतकऱ्यांचा विकास तर झालाच झाला; परंतु दादांच्या शेतकरी सहकारी साखर कारखान्याला ऊस क्षेत्र वाढविणेही सोपे झाले. २९ मार्च १९७५ रोजी त्याच योजनेचा रौप्यमहोत्सव साजरा करताना दादांनी लोकांना पाणी वापरण्याच्या तंत्रावर भर देण्याचे आवाहन केले. अतिरिक्त पाणीवापरामुळे निर्माण होत असलेल्या क्षारपड जमिनीसंदर्भात त्यांनी चिंता व्यक्त केली. धान्योत्पादनात गरजेएवढेच पाणी द्यावे. अतिरिक्त पाण्यामुळे जमिनीच्या कसावर होणारा परिणाम टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी विशेष काळजी घ्यावी, हेही सांगितले.

१९७५ साल हे देशाच्या इतिहासात अनेक कारणांनी विशेष नोंदले गेले. १२ जून १९७५ रोजी अलाहाबाद उच्च न्यायालयाने इंदिरा गांधी यांची रायबरेली लोकसभा मतदारसंघातून झालेली निवड बेकायदेशीर ठरविली. त्यांना सहा वर्षे निवडणूक लढविण्यासही मनाई केली. उच्च न्यायालयाच्या या निकालाने देशात आणि काँग्रेसच्या राजकारणात खळबळ उडाली. देशात अविश्वासाचे आणि अस्थिर वातावरण निर्माण झाले. इंदिरा गांधींच्या विरोधकांनी राजकीय धोरण अधिक आक्रमक बनविले. या पार्श्वभूमीवर देशातील परिस्थितीवर नियंत्रण आणण्यासाठी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी आणीबाणी जाहीर करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार राष्ट्रपतीफक्रुद्दीन अली अहमद यांनी २५ जून १९७५ रोजी देशात आणीबाणी जाहीर केली. देशाच्या वाटचालीतील एका नव्या पर्वाचा प्रारंभ झाला. त्यानंतरच्या काळात राजकारणात अनेक परिवर्तने घडून आली. इतिहासाने नोंद घ्यावी अशा खळबळजनक घटना घडल्या.

१ जुलै १९७५ रोजी २० कलमी कार्यक्रमाची घोषणा करण्यात आली. त्या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी शासकीय यंत्रणेने केलेल्या अतिरेकामुळे देशभर संतापाची लाट उसळली. कुटुंब कल्याणाच्या नसबंदी योजनेच्या अंमलबजावणीच्या अतिरेकाने इंदिरा गांधी आणि काँग्रेसच्या विरोधात गावागावांत असंतोष निर्माण झाला. देशातील या वातावरणाचा परिणाम महाराष्ट्रावरही मोठ्या प्रमाणात होत होता. त्याही परिस्थितीत वसंतदादांनी ग्रामविकासाचे कार्य खंडित होऊ दिले नाही. ६ ऑक्टोबर १९७५ रोजी गोदावरी पाणीवाटपाचा तंटा मिटला. त्यामुळे गोदावरीच्या लाभक्षेत्रात येणाऱ्या पाटबंधारे प्रकल्पांसंदर्भात कार्यवाही करण्याकामी दादांनी वेग घेतला. सांगलीच्या साखर कारखान्यात सतत नवे प्रकल्प आणणे आणि त्या माध्यमातून राज्याच्या साखर कारखानदारीपुढे आदर्श ठेवणे, हे कार्य त्याहीवर्षी चालूच राहिले. ४ नोव्हेंबर १९७५ रोजीकारखान्याच्या उत्पादन क्षमतेत वाढ करण्यात आली. विस्तारीकरणाचा विशेष प्रकल्प हाती घेऊन ५ हजार मेट्रिक टन क्षमतेपर्यंत उत्पादन नेण्यात आले. या विस्तारित प्रकल्पाचे उद्घाटन राज्य साखर संघाचे अध्यक्ष आणि दादांचे जिवलग मित्र शंकरराव मोहिते-पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. एवढ्या मोठ्या गाळप क्षमतेचा कारखाना हे महाराष्ट्रासाठी भूषणच ठरले.

साखर कारखानदारीत काळानुरूप तांत्रिक बदल व्हावेत, ऊस उत्पादनात वाढ करण्यासाठी संशोधन व्हावे आणि एकूणच साखर कारखानदारीला तांत्रिक आणि शास्त्रीय दृष्टिकोनांतून मार्गदर्शन व्हावे यासाठी संस्था स्थापन करण्याचा दादांचा मानस होता. त्याच उद्देशाने १९ नोव्हेंबर १९७५ रोजीडेक्कन शुगर इन्स्टिट्यूट या संस्थेची दादांनी स्थापना केली. त्या संस्थेवर स्वतः दादा, यशवंतराव मोहिते, रत्नाप्पाण्णा कुंभार, तात्यासाहेब कोरे आणि शंकरराव कोल्हे हे विश्वस्त म्हणून काम पाहू लागले. पुण्याजवळील नायगावशेजारी या संस्थेसाठी ६०० एकर जमीन घेण्यात आली. राज्यातील सहकारी साखर कारखान्यांनी या संस्थेस आर्थिक पाठबळ दिले. टपलेले जनता सरकार अशा कोंडीत दादासापडले. फेब्रुवारी १९७८ मध्ये होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षश्रेष्ठींनी ऐक्य राखावे, असा प्रयत्न त्यांनी शेवटच्या टोकापर्यंत केला; पण ऐक्याचे प्रयत्न निष्फळच ठरले आणि अखेर काँग्रेस पक्षात फूट पडली.

## काँग्रेस ऐक्यासाठी प्रयत्न

अशा वातावरणातच १३ नोव्हेंबर १९७७ रोजी दादांनी वयाची ६० वर्षे पूर्ण करून ६१ व्या वर्षात पदार्पण केले. त्यावेळी पत्रकारांशी बोलताना दादा म्हणाले होते, ‘माझ्या राजकीय व सामाजिक जीवनाची सुरुवात एक स्वातंत्र्यसैनिक म्हणून झाली. स्वातंत्र्य प्राप्त झाल्यावर प्रथम मी होमगार्ड कमांडंट झाली. राजकीय कार्यकर्ता झालो. सहकारी क्षेत्रातील कार्यकर्ता बनलो. प्रदेश काँग्रेसचा अध्यक्ष झालो आणि आता राज्याचा मुख्यमंत्रीही आहे. ६० वर्षांच्या जीवनात मला अनेक मानसन्मान मिळाले, तसेच अपमानही सोसले. अनेक स्तरांवरील सत्तास्थाने मला मिळाली; पण हे सर्व मिळत असताना मी एक कार्यकर्ता आहे, हा विचार मी कधीच विसरलो नाही. मानाची स्थाने अल्पकाळ असतात. ती येतात आणि जातात; पण कार्यकर्ता हे माझे स्थान कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. मी एक कार्यकर्ता आहे, हे मी कधीच विसरलो नाही, हीच माझ्या जीवनाची प्रेरणा आहे.’ दादांचे हे विचार राजकारण आणि समाजकारणात कार्यरत राहणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्यांला मार्गदर्शक असेच होते.

दादा सरकारला अडचणीत आणण्याच्या विरोधी पक्षाच्या मोहिमा सुरूच होत्या. राज्यातील तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांना विरोधी पक्षाने भक्कम समर्थन दिले. सरकारने प्रयत्न करूनही कर्मचारी संघटना ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हत्या. अखेर सरकार आणि कर्मचारी संघटनांमध्ये संघर्ष सुरू झाला. १४ डिसेंबर १९७७ पासून तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांनी बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतला. दादांनीदेखील खंबीर भूमिका घेतली. त्या भूमिकेला शंकरराव चव्हाण यांनीदेखील पाठिंबा दिला होता. पुढे ५४ दिवसांनंतर तो संप मिटला.

फेब्रुवारी १९७८ मध्ये निवडणुका जाहीर झाल्या. महाराष्ट्रात नासिकराव तिरपुडे यांच्या अध्यक्षतेखाली प्रदेश इंदिरा काँग्रेस कार्यरत झाली. इंदिरा काँग्रेस व समाजवादी(रेड्डी-चव्हाण) काँग्रेस अशा स्वतंत्र फळ्या काँग्रेसमध्ये तयार झाल्या. विधानसभेची निवडणूक स्वतंत्रपणे लढविण्याचा निर्णय दोन्ही काँग्रेसनी घेतला. निवडणुकीचा प्रचार सुरू झाला. दोन्ही काँग्रेस प्रचारात एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करीत राहिल्या. जनता पक्ष मात्र निवडणूक प्रचारात दोन्ही काँग्रेसवर तुटून पडला. मतदान झाले, २७ फेब्रुवारी १९७८ रोजी निवडणुकीचा निकाल जाहीर झाला. २८८ जागांपैकी सर्वाधिक ९९ जागा जनता पक्षाला मिळाल्या. इंदिरा काँग्रेसला ६९, समाजवादी काँग्रेसला ६२, तर अपक्षांना ३६ जागा मिळाल्या होत्या. शेतकरी कामगार पक्षाला १३ तर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला ९ जागा मिळाल्या. या निवडणुकीत सांगली जिल्ह्यात समाजवादी काँग्रेसने सर्वच्या सर्व ९ जागा जिंकल्या व दादांनीही

जिल्ह्यावरील आपला प्रभाव दाखवून दिला. सर्वच्या सर्व जागा जिंकून देणारा सांगली जिल्हा राज्यात त्या वेळी एकमेव ठरला.

निवडणुकीची धामधूम आणि आणि दौऱ्यांमुळे त्या काळात दादा काविळीने आजारी पडले होते. निवडणूक निकाल जाहीर झाल्यानंतर विधीमंडळ पक्षनेतेपदी दादांची निवड करण्यात आली. दोन्ही काँग्रेसना एकत्र येऊन सत्ता स्थापन करण्याशिवाय पर्याय नव्हता. जनता पक्ष काँग्रेस पक्षाला संपविण्याची भाषा करीत होता. त्यामुळे जनता पक्षाला मदत करून कोणाचा फायदा होणार, या प्रश्नाभोवती दोन्ही काँग्रेसमधील कार्यकर्ते चर्चा करीत होते. अखेर दादांनी दिल्लीत नेत्यांच्या गाठीभेटी घेण्याचा निर्णय घेतला. माजी मुख्यमंत्री खासदार वसंतराव नाईक व दादांनी दोन्ही काँग्रेसमध्ये समझोता घडवून आणण्याचे प्रयत्न चालू केले. दोघेही दिल्लीत इंदिरा गांधी, यशवंतराव चव्हाण आणि चंद्रशेखर यांना भेटले. दोन्ही काँग्रेसच्या भवितव्यासाठी एकत्र येणे गरजेचे का आहे, हे पटवून देण्याचा प्रयत्न केला. यशवंतरावांनी दादांना इंदिरा काँग्रेससोबत वाटाघाटी करण्याची परवानगी दिली. दादा व खासदार वसंतराव नाईक इंदिरा गांधीला भेटले. इंदिरा गांधींनी सशर्त पाठिंबा देण्याची भूमिता घेतली. दादांनी मात्र बिनशर्त पाठिंबा असेल तर समझोता होईल असे स्पष्ट सांगितले. अखेर इंदिरा गांधींशी झालेल्या वाटाघाटी निष्फळ ठरल्या आणि दादा नाईकांसह मुंबईला परतण्यासाठी विमानतळावर गेले. ते मुंबईला निघण्याच्या तयारीत असतानाच इंदिरा गांधींनी त्यांना विमानतळावरून परत बोलावले आणि विनाअट समझोत्याची तयारी दाखविली. विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी निवड अगोदरच झाली असल्यामुळे दादांचा मुख्यमंत्रिपदाचा मार्ग मोकळा झालेला होता. काँग्रेस फुटीच्या पार्श्वभूमीवर विधानसभा निवडणुकीत राज्यभरातील प्रचारसभांमधून 'मीच मुख्यमंत्री होणार' अशी आत्मविश्वासपूर्ण घोषणा केलेली होती, ती खरी ठरण्याचा क्षण आला. ७ मार्च १९७८ रोजी दादा महाराष्ट्राचे दुसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले. राज्यपाल सादिक अली यांनी दादांना मुख्यमंत्रीपदाची तर इंदिरा काँग्रेसचे नासिकराव तिरपुडे यांना उपमुख्यमंत्रिपदाची शपथ दिली. ११ मार्च १९७८ रोजी २८ मंत्र्यांचा शपथविधी झाला. १७ मार्च १९७८ रोजी दादांनी मुख्यमंत्रिपदाची सूत्रे घेतली. मुख्यमंत्रिपदाच्या पहिल्याच वर्षात त्यांनी अनेक धाडसी निर्णय घेऊन राज्याला नवी दिशा दिली. धान्योत्पादन वाढीसाठी विशेष प्रोस्ताहन योजना, जमीन सुधारणा, मागासवर्गीयांची कर्जवसुलीतून मुक्तता, बेघरांना घरे, अतिरिक्त जमिनींचे वाटप, रोजगार हमी योजनेला विशेष प्राधान्य, शासकीय योजनांसाठी घेतलेल्या जमिनींची नुकसान भरपाई देण्यात गती, ग्रामीण भागात रस्तेबांधणी, सुशिक्षित बेरोजगारांसाठी भांडवलाची सोय, शेतीवीज ग्राहकांना सवलती, शहरी क्षेत्र घरटंचाई निवारण आणि झोपडपट्टी सुधारणा यांसारखी महत्त्वपूर्ण धोरणे त्यांनी महाराष्ट्रात अमलात आणली.

१० मे १९७८ रोजी दादांच्या पुतळा त्यांच्या हयातीतच सांगलीच्या बाजार समिती आवारात उभारण्यात आला. त्या पुतळ्याचे अनावरण यशवंतराव चव्हाण आणि वि. स. पागे यांच्या उपस्थितीत झाले. सांगली जिल्ह्यातील जनतेचे दादांविषयी असणारे प्रेम आणि आदर व्यक्त करण्यासाठी हा पुतळा बाजार समितीचे अध्यक्ष रामभाऊ निकम यांच्या नेतृत्वाखाली जनतेने उभा केला. त्यावेळी यशवंतरावांनी दादांच्या कर्तृत्वावर टाकलेला प्रकाश उल्लेखनीय होता. ते म्हणाले होते, 'वसंतदादांच्या आजवरच्या बहुमोल कार्याच्या आठवणीबरोबरच त्यांचा हा पुतळा भावी पिढ्यांना स्फूर्ती देत राहील. मुख्यमंत्री म्हणून वसंतदादांचा पुतळा उभा केला असता तर मी आलो नसतो. त्यांचे थोरपण हे त्यांच्या मुख्यमंत्री होण्यापूर्वीच्या अजोड अशा विधायक कार्यात व स्वातंत्र्यलढ्यातील कर्तृत्वात आहे. आमच्या पिढीतील कार्यकर्त्याचा हा बहुमान घडला हे आमचे सद्भाग्य आहे. वसंतदादा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या,

बहुजनांच्या व सर्वसामान्य जनतेच्या अनेक प्रश्नांच्या बाबतीत थंडस्वाभावाने खोल व अचूक निर्णय घेत आहेत. सांगली जिल्ह्यात एकही संस्था अशी नसेल की, तेथे दादांचा स्पर्श झाला नाही. त्यांच्या आशीर्वादाने अनेक संस्था वाढल्या आहेत. लोकांच्या अंतःकरणात असलेली आपुलकी व जिव्हाळ्यापोटी हा पुतळा उभारणीचे काम हे वसंतदादांचे ऋण फेडण्याचा एक प्रयत्न आहे. हा पुतळा या मार्केट कमिटीच्या परिसरात येणाऱ्यांना सांगत राहील की, दादांनी त्यांच्यासाठी काय केले आहे. जनतेची सेवा दीर्घकाल निरलसपणे करणाऱ्या व्यक्तींबद्दल जनताही कृतज्ञतेची भावना अशा रूपाने प्रगट करते. जनतेचा मुख्यमंत्री म्हणून दादांबद्दल आम्हा सर्वांना आनंद व अभिमान वाटतो. त्यांच्या हयातीत हा पुतळा उभा केला आहे. जिवंतपणी पुतळा उभारण्याचे भाग्य एखाद्यालाच लाभते.'

## शरद पवारांचे बंड

त्यानंतरच्या काळात रेड्डी-चव्हाण काँग्रेस आणि इंदिरा काँग्रेस यांच्या संयुक्त सरकारमध्ये काहीच महिन्यांत संघर्षाला सुरुवात झाली. उपमुख्यमंत्री नासिकराव तिरपुडे यांच्या कार्यपद्धतीवरून दोन्ही काँग्रेसमध्ये नेहमीच तणावाचे वातावरण राहिले. राज्यातील विविध महामंडळांच्या नियुक्त्यांवरून दोन्ही काँग्रेसमधील वाद टोकाला गेला. विधिमंडळ पक्षामध्ये समन्वय राहावा म्हणून दादा, रामराव आदिक, जांबुवंतराव धोटे आणि रा. सू. गवई यांची समिती स्थापन करण्यात आली; पण या समितीलाहीविशेष काही करता आले नाही. इंदिरा काँग्रेस मनमानी करीत आहे, असे काँग्रेसच्या आमदारांना वाटायचे. दादांनी मात्र आपल्या पक्षातील व इंदिरा काँग्रेसमधील नेत्यांची मोट बांधण्याचा सदैव प्रयत्न केला; परंतु दोन्ही पक्षांमधील दरी रुंदावत जाऊन काँग्रेसमध्येच दादांच्या विरोधात शरद पवारांच्या नेतृत्वाखाली एक गट प्रभावीपणे कार्यरत झाला. याचा फायदा राज्यातील विरोधी पक्षानेही घेतला. दादांच्या विरोधात विरोधी पक्षाने काँग्रेसमधील काही नेत्यांच्या मदतीनेच कारवाया सुरू केल्या. त्याच काळात विधान परिषदेच्या अध्यक्षपदी रा. सू. गवई यांची एकमताने निवड झाली. इंदिरा काँग्रेसच्या राज्यातील नेत्यांचा अपरिपक्वपणा आणि काँग्रेसमधील आमदारांनी घेतलेली दादांविरोधी भूमिता यांमुळे दादा अडचणीत सापडले. बंडाळी आणि अस्थैर्य यांमुळे त्या काळात नेहमीच अफवांचे पेव फुटत असे. त्यात 'सरकार गडगडले', 'दादांनी राजीनामा दिला' अशा अफवांचा समावेश होता. जून १९७८ मध्ये दादांनी दिल्लीत जाऊन यशवंतराव चव्हाण यांची भेट घेतली. राज्यातील राजकीय परिस्थिती आणि त्यांच्या विरोधात चाललेल्या कारवायांची माहिती दिली. यशवंतरावांसोबत झालेल्या त्या बैठकीनंतर महाराष्ट्रातील राजकीय वातावरण निवळेल, असे दादांना वाटत होते. विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू झाले. विरोधी पक्षाने दादांच्या विरोधात अविश्वास ठराव दाखल करण्याची तयारी सुरू केली. त्याच काळात दादांनी राजीनामा दिल्याची अफवा दिल्लीत उठली आणि खळबळ उडाली. हे सर्व प्रकार चालू असताना शरद पवार यांचा गट इंदिरा काँग्रेससोबत राहणे शक्य नसल्याचा मुद्दा पुढे करून दबाव वाढवीतच राहिला. काही मंत्री व आमदार सामूहिक राजीनामे देणार असल्याच्या बातम्याही त्या काळात येत होत्या. १२ जून १९७८ रोजीशरद पवार, सुंदरराव सोळंकी, सुशीलकुमार शिंदे आणि दत्ता मेघे या चार मंत्र्यांनी पदांचे राजीनामे दिले. इंदिरा काँग्रेसची मनमानी आणि शासकीय समित्यांवर इंदिरा काँग्रेसचीच लावण्यात आलेली वर्णी हे मुद्दे पुढे करून इंदिरा काँग्रेससोबत राहणे शक्य नसल्याचे राजीनामे देणाऱ्या चारही मंत्र्यांनी जाहीर केले. शरद पवार यांनी जनता पक्षाशी वाटाघाटी करून 'पुरोगामी लोकशाही दल' स्थापन करण्याच्या प्रक्रियेला सुरुवात केली. १७ जुलै १९७८ रोजी दादांनी राज्यपालांकडे मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा सादर केला. त्यानंतर १८ जुलै १९७८ रोजी शरद पवार 'पुलोद' चे मुख्यमंत्री झाले.

अनुक्रमणिका

महाराष्ट्रात अशा राजकीय उलथापालथी झाल्या होत्या. रेड्डी अध्यक्षपदावरून जाऊन स्वर्णसिंग काँग्रेसचे अध्यक्ष, तर यशवंतराव चव्हाण हे कार्याध्यक्ष झाले होते. स्वर्णसिंग काँग्रेसची देशातील चांगली परिस्थिती नव्हती. केवळ केरळमध्ये ए. के. अँटोनी यांच्या मुख्यमंत्रिपदाखाली त्यांची सत्ता होती. विविध राज्यांतील काँग्रेसजनांना मात्र दोन्ही काँग्रेसमध्ये ऐक्य व्हावे असेच वाटत होते. त्या ऐक्यासाठी दादा व खा. वसंतराव नाईक विशेष प्रयत्नशील होते. काँग्रेसला संपवायला निघालेल्या जनता पक्षाला सोबत घेऊन शरद पवारांनी स्थापन केलेल्या 'पुलोद' ला यशवंतरावांनी आशीर्वाद दिल्याने दादा नाराज झाले होते. यशवंतरावांनी आपला विश्वासघात केला हे शल्य दादांना होते. अनेक वर्षे एकमेकांना खंबीर साथ देणाऱ्या या दोन नेत्यांमध्ये कटुता आली. एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप सुरू झाले. जिल्ह्या-जिल्ह्यांत दोन फळ्यानिर्माण झाल्या. त्याचा कार्यकर्त्यांवर विपरीत परिणाम झाला. कार्यकर्त्यांची कुचंबणा होऊ लागली. दादा मात्र काँग्रेस संघटना मजबूत झाली पाहिजे याच भूमिकेशी ठाम होते. त्याच भूमिकेतून त्यांनी वसंतराव नाईकांसोबत दोन्ही काँग्रेसमध्ये ऐक्याचे प्रयत्न चालविले होते. हे प्रयत्नही स्वर्णसिंग काँगेसच्या श्रेष्ठिंना रुचत नव्हते. त्याच कारणाने ऐक्यवाद्यांना श्रेष्ठींनी तीन आठवड्यांत ऐक्याच्या वाटाघाटी संपविण्याच्या सूचना दिल्या.

महाराष्ट्राच्या राजकारणात मतभेद, कटुता, संघर्ष आणि अविश्वासाचे पर्व सुरू असताना नोव्हेंबर १९७८ मध्ये सांगलीच्या साखर कारखान्याची निवडणूक जाहीर झाली. दादांच्या विरोधकांनी पॅनेल उभे केले. सभासदांना संभ्रमात टाकण्याची मोहीम हाती घेतली. कारखान्याच्या सभासदांनी मात्र दादांवरील विश्वास मतदानाच्या माध्यमातून दाखवून दिला. दादांचे पॅनेल विजयी झाले. कारखान्याच्या अध्यक्षपदी दादांचे पुतणे विष्णुअण्णा पाटील व उपाध्यक्षपदी हिंदकेसरी मारुती माने यांची निवड झाली. राज्यातील साखर कारखानदारी केंद्र सरकारच्या आडमुठ्या धोरणामुळे अडचणीत आलेली होती. उत्तर प्रदेशात गळीत हंगाम उशिरा सुरू केल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत होते, या मुद्द्यांवरून केंद्र सरकारने एक वटहुकूम काढून कारखाने १५ नोव्हेंबरपूर्वी सुरू करण्याचे बंधन घातले.

उत्तर प्रदेशातील खासगी कारखान्यांच्या कृतीचा फटका देशातील साखर कारखानदारीला बसत होता. शेतकऱ्यांची कारखान्याकडे १० टक्क्यांपेक्षा अधिक थकबाकी असल्यास त्या कारखान्यावर कारवाई करण्याचे धोरणही अवलंबिण्यात आले होते. उत्तर प्रदेश व बिहारमधील साखर कारखान्यांच्या अनियंत्रित कारभारविरोधात केंद्र सरकारने आखलेल्या धोरणांचा फटका महाराष्ट्राला बसत होता. त्यावेळी साखरेच्या खुल्या धोरणामुळे उसाचे विक्रमी उत्पादन होऊनही महाराष्ट्रातील साखर कारखाने अडचणीत आले होते. विक्रमी उसामुळे साखरेचे उत्पादन मोठ्या प्रमाणात झाले. खुल्या साखर धोरणामुळे साखरेच्या किमती झपाट्याने घसरू लागल्या. कारखान्यांचे साखरेचे साठे पडून राहू लागले. शेतकऱ्यांच्या उसाला चांगला दर देणे तर दूरच; पण कारखान्याच्या खर्च कसा भागवायचा, असा प्रश्न अनेक कारखान्यांपुढे उभा राहिला. यशवंतराव चव्हाण आणि दादांच्या मदतीने सरकारचेभक्कम पाठबळ लाभल्याने महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारी विकसित झाली होती. आता मात्र परिस्थिती बदललेली होती. केंद्र सरकारने सहकारी साखर कारखानदारीबद्दल नकारात्मक धोरण स्वीकारलेले होते. त्याचा परिणाम राज्यातील साखर कारखानदारीवर ठळकपणे झाला होता.

अनुक्रमणिका

## काँग्रेस ऐक्यासाठी प्रयत्न

सहकार आणि साखर कारखानादारी क्षेत्रांत राज्याची अशी वाटचाल चाललेली असताना राज्यात स्वर्णसिंग काँग्रेसमध्ये पक्षांतर्गत संघर्ष सुरूच होता. ७ जानेवारी १९७९ रोजी शरद पवार यांनी 'निष्ठावान कार्यकर्ते परिषद' घेतली. वसंतराव नाईक व दादांनी सुरू केलेल्या ऐक्य प्रयत्नाला शह देण्यासाठीच ही परिषद आयोजित करण्यात आली होती. 'व्यक्तीपेक्षा पक्ष, पक्षापेक्षा राष्ट्र मोठे' अशी भूमिका या परिषदेत व्यक्त झाली आणि इंदिरा काँग्रेसच्या विरोधी सूर उमटला. पक्षाचे अध्यक्ष नरेंद्र तिडके, वसंतराव नाईक आणि दादांनी पक्षाध्यक्ष स्वर्णसिंग यांच्याकडे या परिषदेच्या विरोधात तक्रार केली. 'सच्चे काँग्रेसजन कोण?' या प्रश्नाची जोरदार चर्चा होऊ लागली. पक्षश्रेष्ठी ऐक्याला अनुकूल नसल्याचे स्पष्ट झाले. या सगळ्या राजकीय परिस्थितीचा अचूक अंदाज घेत दादांनी २० जानेवारी १९७९ रोजी सांगलीत एक खूप मोठा शेतकरी मेळावा घेतला. याच मेळाव्यात दादांनी राज्यातील सर्व कार्यकर्त्यांसह इंदिरा काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला होता. या मेळाव्यात यशवंतराव मोहिते यांनी इंदिरा काँग्रेस हीच खरी काँग्रेस आहे असा दावा केला. दादांनी त्यावेळी त्या मेळाव्यात केलेले भाषण त्यांची बेरजेच्या राजकारणाची तळमळ स्पष्ट करते. ते म्हणाले होते, '१९७६ च्या नोव्हेंबरमध्ये एक मेळावा नगरपरिषदेच्या याच स्टेडियमवर भरला होता आणि याच वेळेला माझे भाषण झाले होते. एकूण देशाचे राजकारण पाहिले म्हणजे मनात चीड येते. मनाला खिन्नता वाटते; पण जेव्हा मी येथे येतो तेव्हा मनाला हुरूप येतो. लोक ज्या भावनेने पाहतात, भेटतात, त्यावेळी वाटते की, कसलीही संकटे येवोत, लोकांच्या भल्यासाठी काम करीत राहिले पाहिजे. आपल्या प्रेमाचा हा संदेश आहे. आपण रोज वर्तमानपत्रे पाहतो. आमच्या काँग्रेस पार्टीने चुका केल्याचे प्रायश्चित आम्हाला मिळाले. जेव्हा लोक आपल्यालानाकारतात, तेव्हा आग्रहपूर्वक सत्तेवर बसण्याची गरज नसते. माझा व यशवंतरावांचा संबंध म्हणजे भावाभावाचं नातं, असं मी मानत आलो. आपण पायाचे दगड; त्या शिखराचा भाग उंच दिसावा या भावनेने वागलो. मला जर यशवंतराव म्हणाले असते की, दादा, मेहरबानी करून तुम्ही मुख्यमंत्री होऊ नका; तुम्हाला बलिदानास तयार झाले पाहिजे, तर मी तयार झालो असतो. तुमचा निर्णय मानला असता आणि सार्वजनिक कामात वेळ घालविला असता; पण त्यांनी मला फसवलं! आपण यापुढे त्यांना अधिक नावे ठेवण्याचे काम करणार नाही. त्यांच्याबद्दल आपुलकी असूनसुद्धा त्यांनी चुकाचा मार्ग पत्करला, तो मला पसंत नाही. ती परिस्थिती सांगणं आमचं काम आहे.' नंतरच्या काळात सांगली जिल्हा परिषद निवडणूक जाहीर झाली. राज्यात पुलोद आणि इंदिरा काँग्रेस असा थेट संघर्ष सुरू झाला. दादांनी त्या निवडणुकीतही विजय मिळविला. ५१ पैकी २८ जागा मिळवून सांगली जिल्हा परिषदेवर दादांच्या समर्थकांची सत्ता आली. त्याच निवडणुकीत शरद पवारांचे निष्ठावंत समर्थक आर. आर. (आबा) पाटील यांचा खऱ्या अर्थाने राजकीय उदय झाला.

साखर कारखान्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी दादांचे प्रयत्न सुरूच होते. त्यासाठी त्यांनी केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा चालू ठेवला होता. साखरेचे भाव आटोक्यात आणण्यासाठी साखर कारखान्यांना साखरेचा कोटा दर महिन्याला खुला करण्याची मुभा मिळणे आवश्यक होते. ती मागणी दादांनी लावून धरली होती. केंद्र सरकारने त्या मागणीला अनुकूल अशी भूमिका घेतली आणि जून १९७९ पासून साखरेचा कोटा दरमहा खुला करण्याची पूर्वीची पद्धत पुन्हा सुरू झाली. शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील 'पुलोद' सरकारच्या कारभारावर यशवंतराव चव्हाण यांनी अनेक स्तुतिसुमने उधळलेली होती. दादा मात्र सरकारच्या विरोधात आक्रमक बनत चालले होते. जनतेचे प्रश्न घेऊन सरकारच्या विरोधात त्यांनी आंदोलने छेडली. त्याचवेळी काँग्रेस ऐक्याचे समर्थन करणाऱ्या प्रदेशाध्यक्ष

अनुक्रमणिका

नरेंद्र तिडके यांना स्वर्णसिंग काँग्रेसने प्रदेशाध्यक्षपदावरून हटविले. त्यांच्या जागी अण्णासाहेब शिंदे यांची निवड केली.

देशाचे राजकारण त्यावेळी एका वेगळ्याच वळणावर येऊन थांबलेले होते. इंदिरा गांधींच्या पाठिंब्याने चरणसिंग पंतप्रधान, तर यशवंतराव चव्हाण उपपंतप्रधान बनलेलेसुरुवातीच्या काळात प्रत्येक साखर कारखान्यात उत्पादित होणाऱ्या एक टन साखरेमागे एक रुपया संशोधन निधी म्हणून या संस्थेसाठी घेण्यात आला. नंतरच्या काळात प्रत्येक पोत्यामागे ७५ पैसे या दराने निधी गोळा करण्यात आला. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या पाठबळावर या संस्थेने कोणत्याही प्रकारची सरकारी मदत न घेता ८ कोटी रुपयांची भांडवली गुंतवणूक केली. कोणतीही संस्था असो वा उपक्रम; दादा त्या-त्या क्षेत्रातील अनुभवी व तज्ज्ञ लोकांचे मार्गदर्शन व सहभाग घेऊनच कामाला लागत. डेक्कन शुगर इन्स्टिट्यूट हा तर दादांच्या दृष्टीने अत्यंत जिव्हाळ्याचा आणि महत्त्वाकांक्षी प्रकल्प होता. तो यशस्वी करण्यासाठी नॅशनल शुगर इन्स्टिट्यूटचे माजी संचालक एस. एस. गुंडूराव यांची डेक्कन शुगर इन्स्टिट्यूटचे प्रकल्प संचालक म्हणून निवड केली. गुंडूराव यांचा अनुभव व अभ्यासाचा संस्थेला खूप मोठा उपयोग झाला. देशातील एक प्रतिष्ठित संस्था म्हणून डेक्कन शुगर इन्स्टिट्यूटचा नावलौकिक झाला. या संस्थेच्या माध्यमातून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना उसाच्या नव्या जातींपासून तंत्रांपर्यंतचे मार्गदर्शन मिळू लागले. शेतकऱ्यांची ती गरज भागल्यानंतर दादांनी आपले लक्ष साखर कारखान्यांना लागणाऱ्या यंत्रसामग्रीच्या निर्मितीकडे वळविले. राज्यात झपाट्याने वाढत असलेली साखर कारखान्यांची संख्या आणि कारखान्यांना लागणाऱ्या सुट्या भागांची गरज लक्षात घेऊन त्यांनी 'नॅशनल को-ऑप. हेवी इंजिनिअरिंग लिमिटेड' ही संस्था स्थापन करण्यासाठी पुढाकार घेतला. २० कोटी रुपयांचे भांडवल असणारा हा प्रकल्प पुणे जिल्ह्यातील तळेगाव येथे उभारण्यात आला.

पाटबंधारे खात्यात आमूलाग्र बदल करणारे दादा या खात्याला उच्चांकी निधी मिळविण्यातही यशस्वी ठरले होते. १९६९ ते १९७४ या कालावधीत राज्यातील विविध प्रकल्पांवर या खात्याने २३३ कोटी रुपये खर्च केले होते. राज्यात पाटबंधारे खात्याची लोकप्रियता वाढत असताना काळम्मावाडी धरणाच्या दिरंगाईबद्दल मात्र कोल्हापूर जिल्ह्यात असंतोष वाढत होता. विरोधकांनी हाच मुद्दा घेऊन दादांना लक्ष्य बनविले होते. ८ जानेवारी १९७६ रोजी काळम्मावाडी धरणासंदर्भात मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांनी मुंबईत एक बैठक घेतली. या बैठकीस दादा, पाटबंधारे खात्याचे राज्यमंत्री के. एन. पाटील, कोल्हापूर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधीआणिविरोधी पक्षांचे नेते उपस्थित होते. त्यानंतर काही घडामोडी घडल्या आणि २६ फेब्रुवारी १९७६ रोजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हस्ते काळम्मावाडी धरणाचे भूमिपूजन झाले. तत्पूर्वी २४ फेब्रुवारी १९७६ रोजी जायकवाडी प्रकल्पाचा पहिला टप्पा पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हस्ते राष्ट्राला अर्पण करण्यात आला. त्याच वेळी त्या प्रकल्पाचे 'नाथसागर' असे नामकरण करण्यात आले. या वेळी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण व पाटबंधारे मंत्री वसंतदादा उपस्थित होते.

## राजकारण संन्यास

दादांच्या नेतृत्वाखाली पाटबंधारे विभागाला नवी दिशा देण्याचे काम प्रशंसनीय ठरत होते. त्याच काळात देशातील राजकीय परिस्थिती मात्र चिघळत चाललेली होती. इंदिरा गांधीच्या विरोधात सर्व विरोधी पक्षांनी एकत्र येऊन लढा देण्यासाठी मोर्चेबांधणी सुरू केली. जयप्रकाश नारायण यांच्याकडे या चळवळीचे नेतृत्व होते. त्यातूनच मार्च १९७६ मध्ये जनता पक्षाची स्थापना झाली.

अनुक्रमणिका

इकडे महाराष्ट्रात शंकरराव चव्हाण यांनी त्याच काळात मुख्यमंत्र्यांचे विशेष अधिकार वापरून मंत्रिमंडळातील क्रमांक दोनचे मंत्री असणाऱ्या वसंतदादांना तसेच मधुकरराव चौधरी यांना मंत्रिमंडळातून वगळले. या घटनेचे पडसाद महाराष्ट्रभर उमटले. दादांना वगळल्याबद्दल काँग्रेस कार्यकर्त्यांत नाराजीचा सूर उमटला. दादा मात्र विचलित न होता हसतमुखाने मंत्रिपदावरून पायउतार झाले. मंत्रिपदाचा राजीनामा देताच शासकीय वाहन न घेता ते खासगी वाहनाने गावी परतले. दादांना वगळल्याचे पडसाद सांगली जिल्ह्यात तर मोठ्या तीव्रतेने उमटले. दादांच्या भविष्यातील भूमिकेबद्दल लोकांमध्ये उलटसुलट चर्चा सुरू झाली. अशाच चर्चेत काळ पुढे सरकला आणि १३ नोव्हेंबर १९७६ या ६० व्या वाढदिवसादिवशी दादांनी आपल्या पुढील वाटचालीची घोषणा केली. विधान परिषद सदस्यत्वाचा राजीनामा देऊन 'राजकारण संन्यास' घेण्याचा निर्णय त्यांनी जाहीर केला. या निर्णयाचे पडसाद राज्यभर उमटले. दादांनी निर्णय मागे घ्यावा यासाठी हजारो कार्यकर्ते सांगलीत दाखल झाले. कार्यकर्त्यांनी दादांचा तो वाढदिवस अभूतपूर्व अशाच पद्धतीने साजरा केला. सांगलीच्या वसंत कॉलनीतील 'स्फूर्ती' या निवासस्थानी दादा कार्यकर्त्यांच्या शुभेच्छास्वीकारत होते. त्या दिवशी सांगली शहरातून निघालेली दादांची मिरवणूक ऐतिहासिक होती. दोन किलोमीटरचे अंतर गर्दीने व्यापले होते. हजारो लोक दादांना शुभेच्छा देण्यासाठी चौकाचौकांत उभे होते. या मिरवणुकीत ढोल-ताशे, भजनी मंडळे, लेझीम, झांज अशी ५० पथके दाखल झाली होती. तसेच ५०० ट्रक्सचा ताफाही होता.

मिरवणुकीनंतर झालेल्या सत्काराला दादांनी उत्तर दिले. ते म्हणाले, 'महाराष्ट्रात बेरजेचे राजकारण व्हावे, वजाबाकीचे नको! प्रमुखांना चांगले म्हणावयाचे आणि अनुयायांना झोडपावयाचे हा धंदा सुरू आहे. अशा वेळी कार्यकर्त्यांनी बदनामीची पर्वा न करता पुढे जावे. संघटितपणे व ताकदीने उभे राहिल्यास कोणी वाकडे करू शकणार नाही. सूडाचे राजकारण न करता सहकार्याने एकत्र येऊन समाजसेवा केली पाहिजे; पण सत्ता आली की कुणालाही नेस्तनाबूत करता येते, हे खरे नाही. असे एकही उदाहरण दाखवता येणार नाही. सत्तेने सर्वकाही करता येते, ही कल्पना सोडून दिली पाहिजे. खोटी स्तुती केली तर तो चांगला पुरोगामी व इतर प्रतिगामी हे देशाच्या संदर्भात योग्य नव्हे. महाराष्ट्राच्या संदर्भात तर नव्हेच नव्हे! कंजूस पैसा जतन करतो, पैशाला परमेश्वर मानतो, तसे मी आयुष्यात माणसे जतन करीत आलो, हे माझे भांडवल. त्यावर मी जगतो; त्यामुळे पुष्कळ वेळा माझ्या वागण्याच्या पद्धती वेगळ्या वाटतात. मी माणसे सांभाळतो. मी माणूस आहे. माणसे न सांभाळणाऱ्या माणसांशी माझे पटत नाही. भावना कळत नाहीत, मग गोंधळ होतो. मी जो विचार करतो, निर्णय घेतो, नेमकी त्याच्या विरुद्ध माझी मित्रमंडळी विचार करतात. कृपा करून हे होऊ देऊ नये. माणसाने माणसासाठी जेवढे करावयास हवे तेवढे मी केले, हे कोणाला वेडेपणाचे वाटणे शक्य आहे. माझ्या निवृत्तीबद्दल अनेक गैरसमज पसरवले गेले आहेत; पण निवृत्तीचा निर्णय मी विचारपूर्वक ठरवला आहे. सत्तेबाहेर राहून समाजकार्य करता येते, हे दाखविण्याचा माझा प्रयत्न राहील. मंत्रीमंडळातून बाहेर पडण्याचा संबंध कृपा करून त्याच्याशी जोडू नये. आज महाराष्ट्राला सामूहिक नेतृत्व हवे. मी अत्यंत सामान्य, कमी शिकलेला शेतकरी कार्यकर्ता आहे. देशाला नेतृत्व द्यावे इतकी माझी लायकी नाही. महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी हेच आमचे नेते. यशवंतराव चव्हाणांचे उपकार मी विसरू शकत नाही. माझा विधायक कार्यासाठी उपयोग करून घ्या. राजकारणात मात्र माझी मदत मिळणार नाही. आज काही बाबी नाइलाजानेउघडपणे बोलाव्या लागल्या. यापुढे अशी भाषणे मी करणार नाही. मी प्रदेशाध्यक्ष, आमदार, मंत्री झालो तेव्हा सत्कार घेतले नाहीत. हा माझा पहिला व कदाचित अखेरचा सत्कार असेल.' दादांचे हे भाषण महाराष्ट्राच्या राजकारणात ऐतिहासिक ठरले.

अनुक्रमणिका

राजकारण संन्यास घेऊन लोकसेवेला लागलेल्या दादांना ६ डिसेंबर १९७६ रोजी आणखी एक धक्का बसला. १९४२ च्या क्रांतिलढ्यात आपल्या पराक्रमाने ब्रिटिश सरकारला सळो की पळो करून सोडणारे क्रांतिसिंह नाना पाटील यांचे त्या दिवशी निधन झाले. क्रांतिलढ्यात दादा आणि त्यांनी अनेक चळवळी समर्थपणे राबविल्या होत्या. देशात 'प्रतिसरकार' चा दबदबा निर्माण करून क्रांतिलढ्यात इतिहास घडविणाऱ्या नानांबद्दल दादांना विशेष प्रेम होते. त्या प्रेमामुळे क्रांतिसिंहांच्या निधनाने दादांना अतीव दुःख झाले.

महाराष्ट्राच्या राजकारणापासून दूर राहूनही दादांनी आपल्या कामात मात्र कधी खंड पडू दिला नाही. येणाऱ्या प्रत्येक माणसाची कामे करणे आणि लोकांत राहून नव्या योजना साकार करणे हे त्यांचे काम सुरूच होते. १५ डिसेंबर १९७६ रोजी दादांची 'नॅशनल फेडरेशन ऑफ शुगर फॅक्टरीज्' या संस्थेच्या अध्यक्षपदी निवड झाली. देशभरातील सुमारे १६५ साखर कारखाने त्यावेळी या संस्थेचे सदस्य होते. साखर कारखानदारीच्या उभारणीपासून येणाऱ्या अडचणींच्या आणि एकूणच साखर कारखानदारीच्या अर्थकारणाचा दादांचा असलेला अभ्यास या संस्थेला उपयोगी पडला. देशातील साखर कारखानदारीचे अनेक प्रश्न मार्गी लावण्यासाठी दादांनी परिश्रम घेतले.

## पहिल्यांदा मुख्यमंत्री

आणीबाणीच्या पार्श्वभूमीवर देशात उठलेले वादळ आणि गढूळ राजकीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर १८ जानेवारी १९७७ रोजी इंदिरा गांधी यांनी लोकसभा निवडणुकीची घोषणा केली. आणीबाणीच्या काळात अनेक नेते 'राजकीय कैदी' म्हणून तुरुंगात होते. त्या सर्वांची सुटका झाली. देशातील परिस्थिती आणि जाहीर झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जयप्रकाश नारायण यांनी सुरू केलेलेआंदोलन मागे घेतले. त्यानंतर ते सर्व काँग्रेसविरोधी पक्षांना एकत्र करून तयार झालेल्या जनता पक्षाच्या झेंड्याखाली निवडणुकीच्या तयारीला लागले. त्याच काळात जगजीवनराम आणि हेमवंतीनंदन बहुगुणा यांनीदेखील काँग्रेस पक्ष सोडला. दररोज १० ते १५ सभा घेत इंदिरा गांधी यांनी प्रचारासाठी देशभर दौरे केले. निवडणुकीत यश मिळविण्यासाठी परिश्रम घेतले. लोकसभेची निवडणूक झाली आणि मतदारांनी देशाच्या राजकारणाला कलाटणी देणारा निकाल दिला. आणीबाणी आणि २० कलमी कार्यक्रम अंमलबजावणीतून निर्माण झालेली देशाची नाराजी या पार्श्वभूमीवर इंदिरा गांधी यांच्या विरोधात वातावरण तयार झाले होते. जयप्रकाश नारायण या स्वातंत्र्यसेनानींच्या नेतृत्वामुळे देशातील सर्व इंदिराविरोधक एकत्र आले आणि देशातील त्या वातावरणाचा परिणाम मतपेटीतून व्यक्त झाला. इंदिरा काँग्रेसला मतदारांनी नाकारले. लोकसभेच्या ५४२ जागांपैकी ३७४ जागा जनता पक्षाला मिळाल्या. इंदिरा गांधींना सदैव साथ देणाऱ्या महाराष्ट्रातही काँग्रेसची पीछेहाट झाली. महाराष्ट्रात ४८ पैकी २८ जागा जनता पक्षाला मिळाल्या. त्या 'जनता लाटे' तही सांगली लोकसभा मतदारसंघातून दादांचे मित्र काँग्रेस समर्थक अण्णासाहेब गोटखिंडे विजयी झाले. २२ मार्च १९७७ रोजी इंदिरा गांधी यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला आणि मोरारजी देसाई पंतप्रधान झाले.

आणीबाणीच्या पार्श्वभूमीवर देशात आणि महाराष्ट्रात काँग्रेस पक्ष खीळखिळा झाल्याचे चित्र उभे राहिले. महाराष्ट्रातील काँग्रेसजनांमधील आत्मविश्वास रसातळाला पोहोचला होता. या सगळ्या वातावरणाचा अभ्यास करून दादांनी दिल्लीला जाण्याचा निर्णय घेतला. राजकारण संन्यास घेऊन अलिप्त झालेले दादा परत गतिमान झाले. 'घर पेटलेले असताना, मी बघ्याची भूमिका घेणार नाही' असे जाहीरपणे

अनुक्रमणिका

सांगत त्यांनी दिल्ली गाठली. महाराष्ट्रातील वातावरण बदलून पक्षाला नवचैतन्य देण्यासाठी राज्यात मुख्यमंत्री बदलण्याची गरज त्यांनी इंदिरा गांधी यांना पटवून दिली. राज्यातील खासदारांनाही ते भेटले. महाराष्ट्रात पक्षाला नवसंजीवनी देण्यासाठी नेतृत्वबदलाशिवाय पर्याय नाही, हे पक्षश्रेष्ठींना पटले आणि त्यांनी मुख्यमंत्री बदलण्याचा निर्णय घेतला. राज्यातील आमदारांचा कानोसा घेऊन व त्यांच्या मतानुसार नवा नेता निवडला जावा, अशी श्रेष्ठींची इच्छा होती. त्यासाठी १७ एप्रिल १९७७ रोजी विधिमंडळ पक्षनेतानिवडीसाठी मुंबईत आमदारांची बैठक बोलावण्यात आली. या बैठकीला निरीक्षक म्हणून दिल्लीहून सी. सुब्रह्मण्यम् यांना पाठविण्यात आले. १९७२ ते ७७ या कालावधीत दादा आमदार नव्हते. सी. सुब्रह्मण्यम् यांनी सर्व आमदारांचे मत अजमावले. अखेर विधिमंडळ पक्षनेता निवडीसाठी मतदान घेण्याचा निर्णय झाला. त्या मतदानात दादांना १८९, तर त्यांच्या विरोधात उभे राहिलेल्या यशवंतराव मोहिते यांना ८८ मते मिळाली. दादांची मुख्यमंत्री म्हणून निवड झाली. १९ एप्रिल १९७७ या अक्षय्यतृतीयेदिवशी दादांना हंगामी राज्यपाल आर. एम. कांतावाला यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ दिली. २१ एप्रिल १९७७ रोजी मंत्रिमंडळाचा शपथविधी पार पडला. त्यांच्या मंत्रिमंडळात ४० सदस्य होते. बाळासाहेब देसाई यांची विधानसभेचे सभापती, तर शिवराज पाटील-चाकूरकर यांची उपसभापती म्हणून निवड झाली. मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीत दादांच्या विरोधात लढलेल्या यशवंतराव मोहिते यांनाही दादांनी मंत्रिमंडळात मानाचे स्थान दिले.

मुख्यमंत्री म्हणून कारकीर्द सुरू होताच दादांनी अनुभवसंपन्न कारभाराची चुणूक राज्याला दाखवायला सुरुवात केली. त्यांनी शेतकऱ्यांची थकबाकी रद्द केली. ५० पैशांपेक्षा कमी शेतसारा असणाऱ्या कोरडवाहू जमिनीची बंडिंग व टेरेसिंगची कामे शासनाच्या खर्चाने करण्याचा निर्णय घेतला. कोयना भूकंपग्रस्तांची कर्जे माफ केली. १५०० रुपयांपेक्षा कमी असणारी कर्जे व्याजासह माफ केली. त्याचबरोबर राज्यातील जनतेची सोय व्हावी म्हणून जनतेसाठी मंत्रालय खुले केले.

१ मे १९७७ या राज्याच्या वर्धापनदिनी महाराष्ट्रात मराठीचा वापर जास्तीत जास्त करण्याचे आश्वासन दिले. आणीबाणीमध्ये शासन आणि वृत्तपत्रे यांच्यातील बिघडलेले संबंध सुधारण्याच्या प्रयत्नांबरोबरच काँग्रेसने महाराष्ट्र निर्मितीवेळी जनतेला दिलेली आश्वासने पूर्ण करण्याचा विश्वास त्यांनी दिला. शेतकरी, कामगार, कलावंत, सैनिक, लेखक, कवी यांनी महाराष्ट्राच्या विकासात दिलेल्या योगदानाचा गौरव करून राज्यात सर्व स्तरांतील जनतेच्या समस्या सोडविण्याचे अभिवचन त्यांनी दिले.

२६ मे १९७७ रोजी मुख्यमंत्री झाल्यानंतर दादा प्रथमच सांगलीला गेले. त्यावेळी सांगली जिल्ह्याच्या आनंदाला पारावर उरला नव्हता. राजकारण संन्यासाच्या निर्णयावेळी अनेकजण दादांवर नाराज झाले होते. दादांनी राजकारणात सक्रिय राहावेव जनतेची कामे करीत राहावे, अशी भावना प्रत्येकाने त्यावेळी व्यक्त केली होती. जिल्ह्यातील जनतेने केलेल्या सत्काराला उत्तर देताना दादा म्हणाले, ‘माझी राजकीय निवृत्ती आपणास पसंत नव्हती, त्यासाठी आपण पूर्वी एकत्र आलात आणि निवृत्त न होण्याची विनंती केली. पुढे त्याचा पाठपुरावा करीतच राहिलात. त्यात तुमचा विजय झाला आणि माझा पराजय झाला; परंतु तुमच्या विजयात मी पूर्णपणे सहभागी आहे. मी जेव्हा राजकीय निवृत्ती जाहीर केली तेव्हा काँग्रेस पक्ष बलवान होता. पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांचा दबाव होता. पुढे निवडणुका जाहीर झाल्या आणि निकाल पाहिल्यावर सारे चित्रच बदलले असल्याचे दिसले. केंद्र सरकार जनता पक्षाचे बनले. भारताप्रमाणेच महाराष्ट्रातही घडले. मी गेली चाळीस वर्षे काँग्रेस संघटनेत राहून माझ्या कुवतीप्रमाणे सामाजिक काम केले; परंतु ही संघटनाच नष्ट होण्याची वेळ आली तेव्हा मला गप्प बसणे

शक्य झाले नाही. स्वतःच्या घराला आग लागली तेव्हा मी स्वतः पुन्हा राजकारणात आलो! पुढे महाराष्ट्राच्या नेतृत्वाबदलाच्या घटना घडू लागल्या. त्यात माझी नेतेपदी निवड झाली. माझे राजकारण गरिबांसाठीच राहील आणि त्याचा पाठपुरावा सातत्याने केला जाईल. श्रमाचा मोबदला प्रत्येकाला पुरेपूर मिळाला पाहिजे आणि मागेल त्याला कामही मिळाले पाहिजे. राजगार हमीखाली जो काम मागेल त्याला ते देण्यासाठी १५ दिवसांत व्यवस्था होईल. त्या दृष्टीने कायदा करण्याची योजना आहे. काहीही संभ्रम निर्माण झाला तर त्यांनी माझ्याशी संपर्क साधून खुलासा घ्यावा. मला मोठा भाऊ मानता, माझा शब्द अखेरचा मानता, त्या शब्दाला मी प्रामाणिकपणे जागेन!'

मुख्यमंत्री म्हणून दादांची जोरदार वाटचाल सुरू होती. लोकहिताचे अनेक निर्णय त्यांनी आपल्या मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांना विश्वासात घेऊन केले होते. तरीही पक्षांतर्गत राजकारण आणि त्यांना होणारा विरोध वाढत चालला होता. विरोधी पक्षांनीही दादांच्या विरोधात टीकेची झाडे उठविली होती. त्यातच काँग्रेस पक्षांतर्गत बंडाळी उफाळली. दादांनी ती रोखण्यासाठी सदैव समन्वयवादी भूमिका घेतली. प्रत्येकाचे गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी केंद्रात जनता पक्षाचे सरकार होते. त्यामुळे राज्यातील विरोधी पक्ष आक्रमक होता. त्याला काँग्रेसच्या पक्षांतर्गत विरोधाची जोड मिळाल्यामुळे दादांच्या विरोधातील मोहिमा अधिक प्रभावी वआक्रमक बनत गेल्या. त्यात काँग्रेसच्याच २० आमदारांनी त्यांचा स्वतंत्र गट तयार करून दादांना खुले आव्हान दिले. दादांनी प्रत्येक वेळी होणाऱ्या आरोपांना उत्तर देण्याचा प्रयत्न केला होता; परंतु त्याचा फारसा उपयोग झाला नाही. उलट विरोधी पक्ष आणि पक्षांतर्गत विरोधक अधिक आक्रमक बनले. त्यातच १० ऑगस्ट १९७७ रोजी विरोधी पक्षनेते गणपतराव देशमुख यांनी दादांच्या विरोधात विधानसभेत अविश्वास ठराव मांडला. दादांच्या मुत्सद्देगिरीमुळे ती परिस्थिती व्यवस्थित हाताळली गेली आणि अविश्वासाचा ठराव आवाजी मतदानाने फेटाळला गेला. पुढे १७ ऑगस्ट १९७७ रोजी जनता पक्षाचे नेते एस. एम. जोशी यांनी दादांच्या विरोधात ४८ पानांचे निवेदन पंतप्रधान व केंद्रीय गृहमंत्र्यांना सादर करून दादांचे मंत्रिमंडळ बरखास्त करण्याची मागणी केली.

त्याच दरम्यान कर्नाटकातील चिकमंगळूर लोकसभा मतदारसंघातून इंदिरा गांधी पोटनिवडणुकीत विजयी झाल्या. त्यांच्या लोकसभेतील आगमनामुळे जनता पक्षाचे सरकार पुन्हा बिथरले. त्यांनी इंदिरा गांधींच्या द्वेषाचे प्रदर्शन चालूच ठेवले. त्याचाच एक भाग म्हणून जुन्या आरोपांखाली इंदिर गांधींना अटक करून तुरुंगात पाठविण्यात आले. जनता सरकारच्या या कृतीचे देशभर पडसाद उमटले. महाराष्ट्रात दंगल उसळली. इंदिरा गांधीच्या अटकेचा निषेध करण्यासाठी लोक रस्त्यावर उतरले. महाराष्ट्रातील दंगलीचे विरोधी पक्षाने वेगळ्या पद्धतीने भांडवल करण्यास सुरुवात केली. दंगलीवेळी महाराष्ट्रातील पोलीस निष्क्रिय राहिले व त्यांनी बघ्याची भूमिका घेतली, असा आरोप जनता दलाचे सरचिटणीस नानाजी देशमुख यांनी केला. दादांचे सरकार हरतऱ्हेने बदनाम करण्याचा प्रयत्न होत होता. त्यातच काँग्रेस महासभेचे अधिवेशन बोलावण्यावरून इंदिरा गांधी, रेड्डी व यशवंतराव चव्हाण यांच्यात संघर्ष सुरू झाला. तो संघर्ष पराकोटीला जाऊन त्यांच्यात वितुष्ट निर्माण झाले. राज्याच्या मुख्यमंत्रिपदावर असलेल्या दादांना मात्र सर्वांनीच सामोपचाराने घ्यावे असे वाटत होते. अखेर यशवंतरावांशी असलेल्या स्नेहाचा आणि अनेक वर्षांच्या संबंधाचा परिणाम म्हणून दादांनी रेड्डी-चव्हाण यांच्या भूमिकेला पाठिंबा दिला. श्रेष्ठींमध्ये चाललेले वाद मिटविण्याचाही त्यांनी प्रयत्न केला. त्यात त्यांना यश मात्र आले नाही. एकीकडे श्रेष्ठींमध्ये दिलजमाई होत नाही आणि दुसरीकडे दादांचे सरकार बरखास्त करण्यासाठीदुष्काळी भागांचा दौरा केला. पहिल्याच दौऱ्यात दुष्काळग्रस्त जनतेला दिलासा देणारे महत्त्वाचे निर्णय घेतले. अर्ध्या किलोमीटर अंतरावरील पाणी आणाव्या लागणाऱ्या गावांसाठी तातडीने तात्पुरत्या पाणीपुरवठा

अनुक्रमणिका

योजना मंजूर केल्या. त्यासाठी चार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी खासगीविहिरीच्या ताबा विहीर मालकांनी समजूतदारपणे न दिल्यास तो कायद्याने घेण्याचा इशारा देण्यात आला. दुष्काळी भागातील विद्यार्थ्यांची फी मुख्यमंत्री फंडातून भरण्याचा निर्णय घेण्यात आला. टंचाईग्रस्त भागातील रोजगार हमी योजनांवरील मजुरांना दररोज साडेपाच ते साडेसहा रुपयांपेक्षा कमी रोजगार मिळणार नाही, याची दक्षता घेण्याचे आदेश देण्यात आले. रोजगार हमी योजनेवरील महिला मजुरांसाठी एक महिन्याच्या पगारी रजेची तरतूद करण्यात आली. गुरांच्या चाऱ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी उपाययोजना करण्यात आली. दुष्काळग्रस्त भागांच्या समस्या हाताळण्यासाठी स्वतंत्र खात्याची निर्मिती करण्यात आली. या सर्व निर्णयांमुळे दुष्काळग्रस्त भागाचे प्रश्न बऱ्याच अंशी कमी झाले. 'विदर्भ-मराठवाड्याचा अनुशेष' या विषयावर होणाऱ्या चर्चेची सुरुवात दादा मुख्यमंत्री असतानाच पहिल्यांदा झाली होती. दादांनी त्यासाठी अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांची सत्यशोधक समिती नेमली. त्यानंतर विदर्भमराठवाड्याकडे अनुशेषाच्या नावाखाली निधी जाऊ लागला.

दुष्काळाच्या समस्येतून मार्ग काढल्यानंतर दादांनी विदर्भासाठी अमरावती विद्यापीठाची स्थापना केली. त्या विद्यापीठाचे उद्‌घाटन १ मे १९८३ रोजी राज्यपाल आय. एच. लतीफ यांच्या हस्ते करण्यात आले.

त्याच महिन्यात राज्यात प्रदेशाध्यक्ष बदलण्याची चर्चा सुरू झाली. इंदिरा गांधी यांनी महाराष्ट्राच्या प्रदेशाध्यक्षपदी प्रा. एम. एस. आय. असीर यांची निवड केली. त्याच काळात सांगली विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक झाली. ३ जुलै १९८३ रोजी त्या निवडणुकीत दादांनी कॉम्रेड संतराम पाटील यांचा ३९ हजार ८९ मतांनी पराभव केला. तेव्हा कपिल देवच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने विश्वचषक जिंकला होता. विश्वविजेत्या संघाचा पहिला सत्कार करण्याचा मान महाराष्टाने संपादन केला. ४ जुलै १९८३ रोजी वानखेडे स्टेडियमवर दादांनी विश्वविजेत्या संघाचा शानदार सत्कार केला.

## तंत्रशिक्षणाचे ऐतिहासिक धोरण

शिक्षण क्षेत्र हा दादांच्या विशेष आवडीचा आणि जिव्हाळ्याचा विषय, ते स्वतः सातवीच्या पलीकडे शिक्षण घेऊ शकले नव्हते. त्याच कारणाने सर्व स्तरांतील विद्यार्थ्यांना शिक्षण मिळाले पाहिजे, अशी त्यांची तळमळ होती. माध्यमिक शालान्त परीक्षा आणि उच्च माध्यमिक शालान्त परीक्षा उत्तीर्णहोणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांना महाविद्यालये नसल्यामुळे प्रवेश मिळत नसल्याचे दादांनी अनेक तज्ज्ञांच्या अभ्यास-निष्कर्षावरून जाणले होते. दरवर्षी पास होणाऱ्या विद्यार्थीसंख्येच्या पाच टक्के विद्यार्थ्यांनाही प्रवेश देण्याचीक्षमता राज्यातील तंत्र महाविद्यालयांमध्ये नव्हती. त्याचाच परिणाम म्हणून राज्यातील अनेक विद्यार्थ्यांना शेजारच्या कर्नाटकसारख्या राज्यांकडे धाव घ्यावी लागत होती. दादांनी या समस्येवर अनेक तज्ज्ञांसमवेत विचारमंथन केले होते. विनाअनुदानित तत्त्वावरशिक्षण संस्था उभ्या राहिल्यासराज्याच्या शिक्षण क्षेत्राला वेगळी दिशा मिळेल, तसेच ग्रामीण महाराष्ट्रातील विद्यार्थी चांगले शिक्षण घेऊ शकेल, या निष्कर्षापर्यंतदादा आले होते. त्याच कारणाने १९८३ मध्ये राज्यात ५१ नवीन अभियांत्रिकी महाविद्यालये, ८० तंत्रनिकेतने आणि १०० तंत्रशाळांना परवानगी देण्याचा ऐतिहासिक निर्णय दादांनी तत्कालीन शिक्षणमंत्रीसुधाकरराव नाईक यांच्या साथीने घेतला. सुरूवातीला दादांच्या या निर्णयावर उलटसुलट चर्चा सुरू झाली; परंतु दादांनी आपली भूमिका ठाम राखली आणी विनाअनुदानित शिक्षण संस्थांचा पुरस्कार केला.

अनुक्रमणिका

विनाअनुदानित शिक्षण संस्थांच्या महत्त्वाकांक्षी निर्णयाच्या जोडीलाच मुलींना पाचवी ते दहावीपर्यंतचे शिक्षण मोफत देण्याचा निर्णय घेण्यात आला. शुल्क माफीसाठी असलेल्या पालकांच्या उत्पन्न मर्यादेतही वाढ करण्यात आली. ४८०० रूपये उत्पन्न मर्यादेवरून ती १० हजार रूपयांवर नेण्यात आली.

राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग यांनी पंढरपूरला भेट दिली होती. त्या भेटीवेळी दादाही त्यांच्यासोबत होते. तेव्हा संत नामदेवांच्या वाङ्मयाचे अध्यासन स्थापन करण्याची सूचना झैलसिंग यांनी दादांनी केली होती. त्यांच्या सूचनेनुसार दादांना ताताडीने पुणे विद्यापीठाला १० लाख रूपये देऊन संत नामदेव अध्यासन सुरू केले.

ऑक्टोबर १९८३ मध्ये मुंबईच्या षण्मुखानंद हॉलमध्ये काँग्रेसचे अधिवेशन पारपडले. हजारों कार्यकर्त्यांनी या अधिवेशनाला हजेरी लावली. दादा या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष होते. काँग्रेसचे सरचिटणीस राजीव गांधी या अधिवेशनाला उपस्थित राहिले. याच दौऱ्यात राजीव गांधी यांनी धारवी झोपडपट्टीत पदयात्रा काढली होती. त्यांनीदिल्लीप्रमाणेमुंबई शहर सुंदर व स्वच्छ करण्याचीअपेक्षा व्यक्त केली होती. दादांच्या स्वागताध्यक्षपदाखाली पार पडलेले अधिवेशन यशस्वी झाले. त्याच दरम्यानसांगलीलोकसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक झाली व त्यात शालिनीताई पाटील ३६ हजार मतांनी विजयी झाल्या. त्या निवडणूकीत यशवंतराव चव्हाणांनी शालिनीताईच्या प्रचारसाठी तब्बल १५ दिवस दिले होते. जनता पक्षाचे विश्वासराव पाटील विरूद्ध शालिनीताई अशी ती सरळ लढत 'दादा विरूद्ध राजारामबापू पाटील' या राजकीय संघर्षाने विशेष गाजली. त्याचवेळीपाटण विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणूक झाली होती. त्या निवडणुकीत मात्र इंदिरा काँग्रेसचे शिवाजीराव देसाई यांना त्या जागेवर विजय मिळविता आला नाही. ती जागा अपक्ष विक्रमसिंह पाटणकर यांनी जिंकली.

सर्वच आघाड्यांवर दादांची जोरदार वाटचाल चालली असताना अवघ्या नऊ महिन्यांतच काँग्रेसमधील एका गटाने नेतृत्त्वबदलासाठी प्रयत्न सुरू केले. त्यासाठी पक्षाध्यक्ष इंदिरा गांधी यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा सुरू केला. राज्यातीलपरिस्थितीचा आढावा घेण्यासाठी इंदिरा गांधींनी पक्षाचे सरचिटणीस जी. के. मूपनार यांना महाराष्ट्रात पाठविले. मूपनार यांनी कार्यकर्त्यांशीचर्चा करून परिस्थितीचा अंदाज घेतला आणि नेतृत्वबदल होणार नसल्याची ग्वाही दिली. तरीही पक्षात प्रदेशाध्यक्षपदी असलेले प्रा. असीर यांना काढून एन. एम. कांबळे यांना आणल्याने आमदार आणि कार्यकर्त्यांमध्ये धुसफूस सुरूच राहिली.

डिसेंबर १९८३ मध्ये विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन मंडल आयोगाच्या विषयावरून वादळीठरणार अशी चर्चा होती. पक्षांतर्गत विरोधकत्या आशेवर बसलेले होते. मंडल आयोगाचानिर्णय दादांनी केंद्राकडे टोलविल्याने या विषयातील हवाच निघून गेली. नागपूरचे अधिवेशन पार पडले. विरोधकांना गप्प बसविण्यात दादांना यश मिळाले.

४ जानेवारी १९८४ रोजी विधानभवनात अखिल भारतीय सभापती परिषद झाली. या परिषदेच्या अध्यक्षस्थानीलोकसभेचे सभापती बलराम जाखड होते. पक्षविरोधी कारवाया, पक्षांतर्गत संघर्ष आणि पक्षांतराच्या पार्श्वभूमीवर या परिषदेत व्यक्त होणाऱ्या विचारांना विशेष महत्त्व होते. या परिसंवादात दादांनी मांडलेले विचार प्रत्येक लोकप्रतिनिधीला विचार करायला भाग पाडणारे असेच होते. परिसंवादात बोलताना ते म्हणाले, 'देशातील विधिमंडळ किंवा संसद ही लोकशाहीची पवित्र मंदिरे आहेत. या गृहांत

अनुक्रमणिका

आपल्याला बहुमत आहे, म्हणून बेपर्वाई करू नये किंवा बहुमत नाही म्हणून दांडगाई करू नये. लोकशाहीप्रधान देशात विधिमंडळ हे शासन संस्थेतील महत्त्वाचे अंग आहे. या देशातील जनता सार्वभौम देवता असून लोकप्रितिनिधी म्हणजे आमदार, खासदार हे जनतेचे नम्र उपासक आहेत. या उपासकांची सेवा, साधना म्हणजे सदनातील चर्चा. ही चर्चा करताना अल्पमताने व बुहमताने लोकमताचा साद आणि प्रतिसाद म्हणजे लोकांच्या आशा, आकांक्षा,राग,लोभ या सर्वांचे प्रतिबिंब लोकशाहीच्या सदनात उमटत असते. म्हणून कारभार योग्य रीतीने चालावा यासाठी डोळ्यांत तेल घालून चर्चेत सहभागी झाले पाहिजे.'

जानेवारी १९८४ मध्ये दादा व प्रदेशाध्यक्ष एन. एम. कांबळे यांनी राज्याचा दौरा केला. टंचाईग्रस्त भागांच्या समस्यांची सोडवणूक आणि काँग्रेस कार्यकर्त्यांत चैतन्य निर्माण करणे हा या दौऱ्याचा प्रमुख उद्देश होता. १५ जानेवारी १९८४ रोजी साताऱ्यात पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा आणि सोलापूर या जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीतही दादांनी काँग्रेसचे विरोधक एकत्र येण्याचा प्रयत्न करीत असल्याचा इशारा दिला. आपण जर आपापसांत भांडत बसलो तर त्याचा फायदा विरोधकांना होईल. अंतर्गत मतभेद संपविले नाहीत तर पक्षाची अवस्था १९७७ सारखी होण्याचा धोकाही या बैठकीत व्यक्त करण्यात आला. पक्षीय पातळीवर आणि मुख्यमंत्री म्हणून पक्षांतर्गत भांडणे मिटविण्याचा प्रयत्न दादा करीत होते; परंतु बॅ. अंतुले, बॅ. बाबासाहेब भोसले, शंकरराव चव्हाण यांचे मात्र दादांना मुख्यमंत्रिपदावरून हटविण्याचे जोरदार प्रयत्न चालूच राहिले. काँग्रेसअंतर्गत सर्व वादांचा फायदा घेऊन विरोधक सरकारच्या विरोधात वातावरण चिघळविण्याचा प्रयत्न करीत होते. त्यात न्हावाशेवा बंदरासाठी संपादित केलेल्या जमिनीसाठी जास्त दर द्यावा, यावरून झालेल्या आंदोलनाची भर पडली. बंदरासाठी संपादित केलेल्याजमिनीला एकरी ४० हजार रुपये दर शेतकरी मागत होते. मात्र, तो दर देण्यास सरकार तयार नव्हते. त्यातूनच आंदोलन चिघळत गेले. रस्त्यावर उतरून आक्रमक बनलेल्या विरोधकांवर पोलिसांनी गोळीबार केला. उरणच्या शेतकरी आंदोलकांच्या समर्थनार्थ विरोधी पक्षांनी १ फेब्रुवारी १९८४ रोजी 'मुंबई बंद' पाळला.

२ फेब्रुवारी १९८४ रोजी दादांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकिर्दीस एक वर्ष पूर्ण झाले. आपल्या वर्षभराच्या कारकिर्दीत दादांनी अनेक धाडसी आणि लोकोपयोगीनिर्णय घेतले. ग्रामीण भागातील विनाअनुदानित वैद्यकीय, अभियांत्रिकी महाविद्यालयांना मान्यता आणि 'पाणी अडवा, पाणी जिरवा' हे दोन मुख्यमंत्रिपदाच्या कारकिर्दीतील सर्वांत महत्त्वाचे निर्णय मानले जातात. २० कलमी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीवर विशेष भर दिला. सुशिक्षित-बेरोजगारांसाठी विनातारण २५ हजार रुपये कर्जाची योजना सुरू केली. ग्रामीण भागात दुग्धव्यवसाय मोठ्या प्रमाणात वाढावा यासाठी 'दुधाचा महापूर' योजना सुरू केली. अशी अनेक कामे सुरू असताना काँग्रेसमधील वाद मात्र संपत नव्हते. काँग्रेस पक्षातील जुने आणि नवे निष्ठावंत या वादानेही पक्षात डोके वर काढल्याने नवे प्रश्न निर्माण झाले होते. दादा मात्र गट-तट बाजूला ठेवून सकारात्मक दृष्टिकोनाने वाटचाल करीत होते. दादा आणि राजारामबापू पाटील यांच्यातील तथाकथित राजकीय वादामुळे ते दोघे एका व्यासपीठावर येतील का, या संदर्भात अनेकांच्या मनात शंका असायच्या. प्रत्यक्षात राजारामबापूंच्या वाळवा सहकारी साखर कारखान्याच्या ॲसिटोन प्रकल्पाच्या समारंभास दादा स्वतः चंद्रशेखर व राजारामबापूंसोबत कार्यक्रमास हजर राहिले होते, तर १९७८ मधील राजकीय कटुता विसरून फेब्रुवारी १९८४ मध्ये बारामती येथील माळेगाव कारखान्याच्या कार्यक्रमास दादा जातिनिशी हजर होते. माळेगाव कारखान्याने उभारलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग यांच्या हस्ते आणि दादा आणि शरद पवार यांच्या उपस्थितीत पार पडले. या सर्व घडामोडी राज्याला दादांचे गटा-तटापलीकडचे सकारात्मक राजकारण दाखवीत होत्या.

अनुक्रमणिका

६ मार्च १९८४ रोजी दादांच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला. अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी कृषी विद्यापीठाच्यावतीने दादांना ‘डॉक्टरेट ऑफसायन्स’ ही पदवी बहाल केली गेली. स्वातंत्र्यपूर्वकाळात दादांनी ब्रिटिशांच्या विरोधात दिलेला लढा, स्वातंत्र्यानंतर प्रत्येक गोष्टीत विधायक दृष्टिकोन ठेवून ग्रामीण विकासासाठी दिलेले योगदान आणि सहकार क्षेत्राच्या विकासासाठी आयुष्यभर केलेले प्रयत्न या सर्व कार्यांचा गौरव म्हणूनच राहुरी कृषी विद्यापीठाने दादांना ही मानाची पदवी बहाल केली.

## कृष्णा खोऱ्याचा विकास

सांगलीजिल्ह्याचा पूर्वभाग कायम दुष्काळी म्हणूनच ओळखला जातो. या भागाचा विकास करायचा असेल तर त्या भागात पाण्याची सोय होणे आवश्यक होते. त्यासाठी कृष्णा नदीतील पाणी ताकारीजवळ उचलून पूर्वभागातील दुष्काळी भागास देण्याची ८० कोटी रुपये खर्चाची योजना राज्याचे मुख्यमंत्री म्हणून दादांनी मंजूर केली. ३ एप्रिल १९८४ रोजी दादांनी नागेवाडी येथे या योजनेची घोषणा केली. एक महत्वाकांक्षी योजना म्हणूनच या योजनेकडे पाहिले गेले. ९० हजार एकर शेती क्षेत्राला या योजनेचा फायदा होणार होता. जिल्ह्यातील हा सर्वांत मोठा उपसा सिंचन प्रकल्प ठरला.

एप्रिल १९८४ मध्ये बॅ. रामराव आदिक यांनी उपमुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. बॅ. आदिक यांच्या पाठीशी १४ मंत्री होते. त्या मंत्र्यांनी आदिकांना दिलेल्या पाठिंब्याचे निवेदनही पक्षश्रेष्ठींना दिले होते. त्या मंत्र्यावर शिस्तभंगाची कारवाई करावी, अशी मागणी दादांनी पक्षश्रेष्ठीकडे केली होती. या सर्व प्रकरणाची चौकशी करण्यासाठी व्ही. पी. सिंग मुंबईत आले होते. त्यांनी चौकशी केली मात्र, कोणत्याही मंत्र्यावर त्या वेळी कारवाई झाली नाही. उपमुख्यमंत्री बॅ. आदिक यांच्या राजीनाम्यामुळे मंत्रिमंडळात खांदेपालट झाला. दादांनी महत्वाची खाती स्वतःकडेच ठेवली. पुढे २१ मे रोजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी भिवंडीच्या दंगलग्रस्त भागाच्या पाहणीसाठी मुंबई दौरा केला. त्या दौऱ्यात इंदिरा गांधींसमवेत दादा होते.

दादांनी शिक्षण क्षेत्रात टाकलेले महत्वाकांक्षी पाऊल म्हणून विनाअनुदानित शिक्षण संस्थांकडे पाहिले गेले. तेच काम त्यांनी पुढे चालू ठेवेले. अमरावती, कराड, प्रवरानगर येथे विनाअनुदानित तत्त्वावरील वैद्यकीय महाविद्यालयांना मंजुरी देण्यातआली. या निर्णयाच्या विरोधात वादही निर्माण झाला होता. शासनाचा हा निर्णय वैद्यकीय क्षेत्राच्या गुणवत्तेला मारक ठरणार असल्याचा दावा वैद्यकीय क्षेत्रातील अनेक संघटनांनी केला होता. डॉक्टरांच्या संघटनेनेही शासकीय धोरणाच्या विरोधात आंदोलन पुकारले होते. दादा मात्र आपल्या निर्णयावर ठाम राहिले. त्याच काळात दादांनी राज्य सरकारी सेवानिवृत्तांना वेतनवाढ मंजूर करण्याचा निर्णय घेतला. अपघातात बळी पडलेल्यांच्या वारसांना नुकसानभरपाई देण्यासंदर्भातील योजनाही जाहीर केली. तसेच टंचाईग्रस्त भागात निर्णय घेण्यात होणाऱ्या दिरंगाईमुळे निर्माण होणारे अडथळे दूर करण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. त्या निर्णयानुसार टंचाईग्रस्त परिस्थितीत विभागीय आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांना निर्णय घेण्याचे अतिरिक्त अधिकार देण्यात आले. दरम्यान, त्याच काळात १ जून १९८४ रोजी सांगली कारखान्याची निवडणूक झाली. अपेक्षेप्रमाणे दादा समर्थकांचे पॅनेल विजयी झाले. दादांचे पुतणे विष्णुआण्णा पाटील अध्यक्ष, तर बाजीराव पाटील उपाध्यक्ष झाले.

अनुक्रमणिका

## इंदिरा गांधी व यशवंतरावांचे निधन

३१ ऑक्टोबर १९८४ रोजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची त्यांच्या निवासस्थानी त्यांच्याच अंगरक्षकांनी गोळ्या घालून हत्या केली. या घटनेचे वृत्त वाऱ्यासारखे देशभर पोहोचले आणि देशावर शोककळा पसरली. त्यावेळी दादा मुंबईत होते. ते तातडीने दिल्लीला रवाना झाले. इंदिरा गांधींचे चिरंजीव आणि पक्षाचे सरचिटणीस राजीव गांधी त्यावेळी पश्चिम बंगालच्या दौऱ्यावर होते. कुटुंबावर कोसळलेल्या संकटाची माहिती मिळताच ते दुपारी दिल्लीकडे रवाना झाले. अंगरक्षकांनी केलेल्या इंदिरा गांधींच्या हत्येचे तीव्र पडसाद देशभर उमटले. अनेक ठिकाणी जाळपोळ आणि मारहाणीचे प्रकार घडले. देशातील वातावरण तणावग्रस्त बनले होते. या पार्श्वभूमीवर आता देशाचे नेतृत्व कोण करणार आणि पंतप्रधान कोण होणार, हा प्रश्न देशापुढे उभा राहिला. दादांनी दिल्लीत गेल्यानंतर काँग्रेसमधील अनेक ज्येष्ठ नेत्यांशी चर्चा केली व पंतप्रधानपदाची सूत्रे राजीव गांधी यांच्याकडे देण्याची सूचना केली. राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग यांची भेट घेऊन त्यासंदर्भात त्यांना विनंती केली. राष्ट्रपतींनी राजीवगांधीयांना पंतप्रधानपदाची शपथ त्याच दिवशी दिली. एकूण देश दुःखाच्या खाईत लोटलेला असताना राजीव गांधी यांच्याकडे पंतप्रधानपदाची सूत्रे दिल्याने एक संभाव्य वाद टळला होता. ३ नोव्हेंबर १९८४ रोजी यमुनेच्या काठावर इंदिरा गांधी यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. पुढे राष्ट्रपतींनी २४ व २७ डिसेंबर १९८४ रोजी लोकसभेची निवडणूक घेण्याचा निर्णय घेतला.

पंतप्रधान इंदिरा गांधीच्या निधनानंतर आणखी एका दुःखद घटनेला देशाला आणि महाराष्ट्राला सामोरे जावे लागले. २५ नोव्हेंबर १९८४ रोजी नवमहाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांचे नवी दिल्ली येथे निधन झाले. देशाच्या राजकारणात महाराष्ट्राला मानाचे स्थान निर्माण करून देण्यात यशवंतरावांचा खूप मोठा वाटा राहिला. पुरोगामी आणि प्रत्येक आघाडीवर पहिल्या क्रमांकावर राहणारे राज्य असा राज्याचा दबदबा यशवंतरावांमुळेच निर्माण झाला. त्यांना आदराने 'साहेब' म्हटले जायचे. दादा आणि त्यांच्यातील संबंध भावाभावांप्रमाणे होते. स्वातंत्र्यानंतरच्या अनेक कसोटीच्या प्रसंगी त्या दोघांनीही एकमेकांना खंबीर साथ दिलेली होती. चीनने भारतावर आक्रमण केल्यानंतर संरक्षणमंत्री म्हणून यशवंतराव दिल्लीत गेले तेव्हा 'हिमालयाच्या मदतीला सह्याद्री धावला' असे देशाने म्हटले. तो विश्वास साहेबांनी आपल्या शेवटच्या श्वासापर्यंत अबाधित राखला. दादांच्या प्रत्येक उपक्रमाचे आणि प्रकल्पाचे उद्घाटक 'साहेब' असायचे. सहकार आणि कृषीउद्योग चळवळीला नवी दिशा देण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. त्यांचे जाणे म्हणजे दादांच्या दृष्टीने त्यांच्या जीवनातील खूप मोठी हानी होती. यशवंतरावांवर कृष्णा-कोयना नद्यांच्या प्रीतिसंगमावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

इंदिरा गांधी आणि यशवंतरावांच्या निधनाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र त्यावेळी लोकसभा निवडणुकीला सामोरा गेला. इंदिरा गांधींचे अपुरे राहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठीच काँग्रेसला मते देण्याचे आवाहन राजीव गांधी यांनी देशाला केले होते. देशात इंदिरा गांधीच्या निधनामुळे राजीव गांधी आणि इंदिरा काँग्रेसबद्दल सहानुभूतीची लाट होती. ती लाट निवडणुकीनंतर जाहीर झालेल्या निकालात स्पष्ट दिसली. ५०८ जागांपैकी ४०१ जागा राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखालील इंदिरा काँग्रेसला मिळाल्या होत्या. महाराष्ट्रातून इंदिरा काँग्रेसने ४८ पैकी ४३ जागांवर विजय संपादन केला. होते. या सरकारला इंदिरा काँग्रेसने बाहेरून पाठिंबा दिला, त्याचवेळी भविष्यात काय घडणार आहे, याचा अंदाज राजकीय पंडितांना आला होता. चरणसिंग सरकारचे भवितव्य पूर्णपणे इंदिरा गांधीच्या हाती होते. सरकार केव्हाही गडगडू शकते, असा अंदाजही व्यक्त करण्यात येत होता. नेमके तसेच घडले. २० ऑगस्ट १९७९ रोजी

अनुक्रमणिका

इंदिरा गांधींनी सरकारचा पाठिंबा काढून घेतला आणि सरकार कोसळले! राष्ट्रपतींनी लोकसभा बरखास्त करून डिसेंबर १९७९ मध्ये मुदतपूर्व निवडणुका घेण्याची घोषणा केली. देशातील अनेक राज्यांच्या राजकारणाची समीकरणे बदलून गेली. महाराष्ट्रात दादांनी घेतलेली भूमिका योग्य होती हे सिद्ध झाले.

सप्टेंबर १९७९ मध्ये दादांसह शंकरराव चव्हाण, यशवंतराव मोहिते, नरेंद्र तिडके, स. का. पाटील या नेत्यांनी कार्यकर्त्यांसह इंदिरा काँग्रेसमध्ये प्रवेश केला. देशात इंदिरा काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याची लाटच उसळली होती. ३१ ऑक्टोबर १९७९ रोजी पक्षाने सांगितल्यास लोकसभेची निवडणूक लढविण्याची तयारी दादांनी केली होती. नोव्हेंबर १९७९ मध्ये लोकसभा निवडणुकीची तयारी सुरू झाली. जनता पक्षाने राज्यात ४८ पैकी केवळ २५ जागा लढविण्याचा निर्णय घोषित करून दुबळेपणा सिद्ध केला. त्या निवडणुकीत इंदिरा काँग्रेसने सांगलीतून दादा, कराडमधून यशवंतराव मोहिते, कोल्हापूरमधून उदयसिंगराव गायकवाड यांना तर साताऱ्यातून दादांच्या पत्नी शालिनीताईंना लोकसभेची उमेदवारी दिली होती. साताऱ्यातील यशवंतराव चव्हाण विरूद्ध शालिनीताई या लढतीने देशाचे लक्ष्य वेधले. त्यात यशवंतरावांचा विजय झाला; परंतु मताधिक्य मात्र घटले. सांगली लोकसभा मतदारसंघात दादा १ लाख हजार मतांनी विजयी झाले. देशात इंदिरा गांधींचे राज्य आले. १९८० मध्ये दादांची लोकसभेतील कारकीर्द सुरू झाली. खासदार म्हणून दिल्लीतील विलिंग्टन क्रिसेंट मार्गावर २४ क्रमांकाचा बंगला त्यांनाराहण्यासाठी मिळाला. त्या काळात त्यांच्या पत्नी शालिनीताई मात्र मुलांसमवेत मुंबईत राहिल्या.

इकडे महाराष्ट्रात शरद पवारांचे 'पुलोद' सरकार गतीने वाटचाल करीत होते. पुलोदचे सरकार अकार्यक्षम असल्याने ते बरखास्त करावे, अशी मागणी काँग्रेसजन करू लागले. महाराष्ट्रातील इंदिरा काँग्रेसच्या खासदारांनी पंतप्रधान इंदिरा गांधीकडे राज्य सरकार बरखास्त करण्याची मागणी केली. १७ फेब्रुवारी १९८० रोजी शरदपवार यांच्या नेतृत्वाखालील सरकार व विधानसभा बरखास्त करण्याचा निर्णय जाहीर झाला. मे १९८० मध्ये विधानसभेची निवडणूक घेण्याची घोषणा झाली. दादा खासदार असल्याने राज्याच्या उमेदवार निवडीत त्यांचा सक्रिय सहभाग नव्हता. त्यावेळी इंदिरा काँग्रेसचेप्रदेशाध्यक्ष म्हणून प्रेमलाताई चव्हाण कार्यरत होत्या. त्यांनी विधानसभा निवडणूक उमेदवारांची यादी पक्षश्रेष्ठींना सादर केली. सांगली विधानसभा मतदारसंघातून शालिनीताई पाटील यांना उमेदवारी देण्यात आली. पक्षश्रेष्ठींनी राज्यातील उमेदवार निवडताना दादांना विश्वासात घेतले नाही. त्यांचे सल्लेही मानले नाहीत. उलट सांगली जिल्ह्यातील तासगाव आणि वाळवा मतदारसंघांसंदर्भातील त्यांच्या सूचनाही डावलल्या गेल्या. त्या परिस्थितीत दादा अस्वस्थ झाले. 'मी गोधळलो आहे, सर्व ठिकाणी अविश्वास आहे, म्हणून मी निराश आहे,' असे म्हणत त्यांनी आपली नाराजी नोंदविली. ताणतणावामुळे त्यांच्या प्रकृतीवर प्रतिकूल परिणाम झाला. उपचारासाठी मुंबईच्या सेंट जॉर्ज हॉस्पिटलमध्ये त्यांना दाखल करण्यात आले.

## शालिनीताई महसूलमंत्री

३० एप्रिल १९८० रोजी इंदिरा काँग्रेसने २८८ उमेदवारांची यादी जाहीर केली. निवडणुकीची धामधूम सुरू झाली. शरद पवारांनी त्याच काळात एक धूर्त खेळी केली. 'मुख्यमंत्रिपदासाठी आम्ही दादांना पाठिंबा देऊ,' असे जाहीर करून एकच खळबळ उडवून दिली. दादांनी मात्र 'मी इंदिरा काँग्रेस कधीच सोडणार नाही' असे म्हणत ती खेळी उलथवून टाकली. दादा आजारी असल्याने, सांगली मतदारसंघात शालिनीताईंच्या प्रचाराची धुरा त्यांचे पुतणे विष्णुअण्णा पाटील यांनी वाहिली. १४ मे १९८० रोजी इंदिरा गांधीची सांगली येथे खूप मोठी सभा झाली. या सभेवरूनच इंदिरा गांधींना दादांच्या प्रभाव पुन्हा स्पष्टपणे

दिसून आला. राज्यात आपल्या पक्षाचे राज्य येणार याची खात्रीही त्यांना त्याच दिवशी पटली. निवडणूक निकाल जाहीर झाला. इंदिरा काँग्रेसला १८७ तर समाजवादी (अर्स) काँग्रेसला केवळ ४७ जागा मिळाल्या. त्याच काळात ३ जून १९८० रोजी दिल्लीत इंदिरा काँग्रेसच्या संसदीय पक्षाची बैठक झाली. मुख्यमंत्रिपदाच्या लढतीत खासदारांनी भाग घेण्यास हरकत नाही असे ठरले. त्यामुळे दादांनी पक्षश्रेष्ठींचा अंदाज घेतला. राज्याच्या मुख्यमंत्रिपदावर बॅ. ए. आर. अंतुले यांना बसविण्सास इंदिरा गांधी उत्सुक असल्याचे दिसताच दादा मुख्यमंत्रिपदाच्या स्पर्धेतून स्वतःहून बाजूला झाले. त्याअगोदर त्यांनी प्रतिभाताई पाटील किंवा शिवराज पाटील-चाकूरकर यांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री करण्यासंदर्भात पक्षश्रेष्ठींकडे सूचना केली होती. विधिमंडळ पक्षनेता निवडीसाठी निरीक्षक म्हणून दिल्लीहून सीताराम केसरी व ए. पी. शर्मा हे नेते मुंबईत येऊन दाखल झाले होते. अपेक्षेप्रमाणे बॅ. अंतुले यांची विधिमंडळ पक्षनेतेपदी आणि राज्याच्या मुख्यमंत्रिपदी निवड झाली. अंतुलेंच्या मंत्रिमंडळात दुसऱ्या क्रमांकाचे पद दादांच्या पत्नी शालिनीताई पाटील यांना देण्यात आले व त्या महसूलमंत्री झाल्या.

दादा लोकसभेत कार्यरत असतानाच इंदिरा गांधी यांनी त्यांना केंद्रीय मंत्रिपदाची ऑफर दिली होती. त्यांना केंद्रीय मंत्रिमंडळात काम करताना इंग्रजी भाषेची अडचण येणार नाही, याची हमीदेखील दिली होती. दादांनी मात्र केंद्रीय मंत्रिपद नाकारले. अखेर इंदिरा गांधी यांनी २० ऑगस्ट १९८० रोजी त्यांच्याकडे अखिल भारतीय काँग्रेसच्या सरचिटणीसपदाची जबाबदारी दिली. उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेश आणि काश्मीर या राज्यांची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली. ते कामही दादांनी अत्यंत मन लावून केले. त्या राज्यांमध्ये पक्षाचे संघटनात्मक बळ वाढविण्यासाठी प्रयत्न केले. अल्पावधीतच ते उत्तर भारतातील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये 'दादाजी' म्हणून प्रसिद्ध झाले. प्रेमळ स्वभाव, येणाऱ्या प्रत्येक माणसाचा प्रश्न सोडविण्याची तळमळ आणि प्रत्येकाला मिळणारी माणुसकीची वागणूक या दादांच्या गुणांमुळे हिंदी भाषिक राज्यांतही दादांच्या कार्यकर्त्यांची फळी तयार झाली. दिल्लीतील २४, विलिंग्टन क्रिसेंट हे दादांचे निवासस्थान होते. ते विमानतळाच्या मार्गावरच होते. दादांच्या निवासस्थानासमोर सदैव असणारी गर्दी हा दिल्लीत चर्चेचा विषय असे. महाराष्ट्रातून दिल्लीत जाणाऱ्या लोकांप्रमाणेच उत्तर भारतातील कार्यकर्त्यांचे हक्काचे घर म्हणून दादांचे निवासस्थान नावारूपास आले.

काही महिन्यांपूर्वी चरणसिंग यांनी दिल्लीत शेतकऱ्यांचा मेळावा घेतला होता. त्या मेळाव्याला देशभरातील शेतकऱ्यांनी बऱ्यापैकी प्रतिसाद दिला होता. काँग्रेसनेही दिल्ली 'किसान मेळावा' घेण्याचा निर्णय घेतला. त्या मेळाव्याचे संयोजन आणि संघटन दादांकडे देण्यात आले. दादांच्या दिल्लीतील कारकिर्दीमधील एक महत्वाचाटप्पा म्हणून त्या किसान मेळाव्याकडे पाहता येईल. मेळाव्याची तयारी दादांनी एवढी जबरदस्त केली होती की, त्या मेळाव्यामुळे दादांचे दिल्लीतील वजन आणखी वाढले. बोट क्लब मैदानावर देशातील लाखो शेतकारी जमा झाले. मैदानावर तंबू उभे करून मेळाव्यालायेणाऱ्या शेतकऱ्यांची व्यवस्था करण्यात आली होती. मेळाव्यासाठीमहाराष्ट्रातून आलेल्या शेतकऱ्यांची दादांच्या निवासस्थानीच व्यवस्था करण्यात आली होती. शेतकऱ्यांची लाखोंची गर्दी आणि प्रतिसाद पाहून मेळाव्याला हजर असलेल्या पंतप्रधान इंदिरा गांधी खूपच प्रभावित झाल्या, इंदिरा गांधी, एच. के. एल. भगत, केंद्रीय कृषिमंत्रीराव वीरेंद्रसिंग व दादा त्या मेळाव्याला व्यासपीठावर उपस्थित होते. दादांच्या कारकिर्दीतील तो मेळावा अविस्मरणीय आणि ऐतिहासिक ठरला. त्यामेळाव्यानंतर दादा सांगलीत आले होते. त्याच काळात त्यांची प्रकृती बिघडली. सांगलीतच उपचार घेतल्यानंतर दादा विश्रांतीसाठी पक्षाकडून एक महिन्याची रजा घेऊन महाबळेश्वरला गेले. त्या काळात महाराष्ट्रात बॅ. ए. आर अंतुले यांचीमुख्यमंत्रिपदाची कारकीर्द वादग्रस्त ठरतहोती. सिमेंट घोटाळ्यांसारख्या प्रकरणामुळेपक्षात बदनामी

होत होती. अंतुलेच्या विरोधात न्यायालयात खटलाही चालू होता. त्या खटल्याचा निकाल लागला आणि न्यायालयाने अंतुले यांच्यावर ठपका ठेवला. त्या कारणाने १२ जानेवारी१९८२ रोजी अंतुले यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. दादांनी लगेचच आपण मुख्यमंत्रिपदासाठी इच्छुक नसल्याचेजाहीर करून टाकले. अखेर इंदिरा गांधींने सोलापूरचे स्वातंत्र्यसेनानी तुळशीदास जाधव यांचे जावई बॅ. बाबासाहेब भोसले यांची मुख्यमंत्रिपदी निवड केली.

बॅ. भोसले यांची कारकीर्द सुरू झाली. थोड्याच दिवसांत त्यांच्या कारकिर्दीबद्दल राज्यात नकारात्मक वातावरण निर्माण झाले. राज्यात अडचणीत आलेले सहकार क्षेत्र, मुंबईत गिरणी कामगारांचा चाललेला संप आणि बॅ. भोसले यांचा निष्क्रिय कारभार यांमुळे काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये मरगळ आलेली होती. दादांचे मात्र काम सुरूच होते. २५ मार्च १९८२ रोजी डेक्कन शुगरइन्स्टिट्यूटची वार्षिक सभा होती. या सभेत दादांनी केलेले भाषण भविष्यातील इंधन समस्येचा वेध घेणारे होते. 'साखर उद्योगाला' स्थिरता येण्यासाठी सरकारने पुढील आठ-दहा वर्षे निश्चित राहील असे धोरण पक्के केले पाहिजे. पेट्रोल-डिझेल आयातीसाठी कोट्यवधी रूपये परदेशाला द्यावे लागतात. पृथ्वीच्या पोटातील पेट्रोलचा साठा कधीतरी संपणार आहे. याउलट ऊसपीक दरवर्षी नव्याने मिळतच राहणार आहे. याचा विचार करून साखर उद्योगापासून निर्माण होणाऱ्या अल्कोहोलपासून पॉवर अल्कोहोल उत्पादित करून त्याचा उपयोग वाहनांसाठी इंधन म्हणून कसा करता येईल, इकडे लक्ष देण्याची गरज आहे.'

त्याचवेळी दादांचे स्नेही व अहमदनगर जिल्ह्यातील नेते संगमनेरचे भाऊसाहेब थोरात यांची राज्य सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी निवड झाली. मुंबईतील गिरणी कामगारांचा संप चिघळत चालला होता. राज्य सरकार त्या संदर्भात कोणतीही ठाम भूमिका घेत नव्हते. त्यामुळे गिरणी कामगारांच्या संपात वसंतदादांनी मध्यस्थी करावी, अशी मागणी मुंबईतील कामगार नेत्यांनी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्याकडे केली होती. दादांनी मुंबईत जाऊन कामगारांच्या भेटी घेतल्या. कामगार नेत्यांशी चर्चा केली. प्रथम संप मागे घेतल्याशिवाय मार्ग निघणार नाही, हा मुद्दा कामगारांना समजावून सांगितला. दादांवर मुंबईतील कामगारांचा विश्वास होता. त्याच कारणाने दादांनी केलेल्या मध्यस्थीमुळे कामगारांनी संप मागे घेतला.

यशवंतराव चव्हाण आणि दादा यांच्यात आलेले राजकीय वितुष्ट संपलेले नव्हते. देशातील आणि राज्यातील राजकीय परिस्थिती दोघांनाही अस्वस्थ बनविणारी अशीच होती. दादांना मुख्यमंत्रिपदावरून हटवून शरद पवारांनी केलेल्या 'पुलोद' च्या प्रयोगानंतर दादा आणि यशवंतरावांचे संबंध सातत्याने ताणले गेले होते. त्या दोघांना एकत्र आणून त्यांच्यात दिलजमाई करण्याचा प्रयत्न राज्यातील काही नेते करीत होते. तो प्रयत्न यशस्वी करण्याचे काम सांगली जिल्ह्यातील धुळाप्पा नवले आणि बाजीरावआप्पा पाटील यांनी केले. २४ मे १९८२ रोजी अंकलखोप येथे दोन्ही नेत्यांना एकाच व्यासपीठावर आणण्यात आले. त्यावेळी दादा म्हणाले, 'या समारंभाकडे अवघ्या महाराष्ट्राचे नव्हे, तर बाहेरील राज्यांचेही लक्ष लागून राहिले आहे. दिल्लीपर्यंत या कार्यक्रमाचे सूप वाजले आहे. मी आणि साहेब एका व्यासपीठावर येत असल्याने हे औत्सुक्य वाढले आहे. आम्ही एकत्र आलो म्हटल्यावर काही मंडळींनी मराठ्यांचे एकत्रीकरण झाले, असा गवगवा सुरू केला आहे. आमचे काही मतभेद होते म्हणून आम्ही दूर गेलो होतो; परंतु ते सर्व विसरून आम्ही एक झालो आहोत. याकरिता जातीय रंग लावण्याचा कुणीही प्रयत्न करू नये. ते सर्वांनाचहानिकारक आहे. मध्यंतरीच्या काळात आम्ही एकमेकांना काय वाटेल ते बोललो. या बोलण्याने, भांडणाने महाराष्ट्राचे नुकसान झाले आहे आणि पर्यायाने आमचेही नुकसान झाले. असे वाद पुन्हा करणार नाही. मी साहेबांना प्रथमपासून नेता मानले आहे आणि त्यांना नेता म्हणूनच मानणार!काँग्रेस पक्षातील

लोकशाहीच्या कल्पनांना मूठमाती देण्याचा प्रयत्न होत आहे. परवाच्या छोट्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये कॉँग्रेसला जबरदस्त हादरा बसला आहे. याकरिता कॉँग्रेस संघटना बळकट करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने झटले पाहिजे.'

१९८२ साल हे सांगलीच्या सहकारी साखर कारखान्याचे रौप्यमहोत्सवी वर्ष होते. हा कारखाना सदैव दादांच्या जिव्हाळ्याचा विषय राहिला. कारखान्याच्या वाटचालीत येणाऱ्या प्रत्येक अडचणीला शेतकरी आणि कामगारांनी समर्थ साथ देत वेळोवेळी मार्ग काढला होता. त्याचेच फळ म्हणून कारखान्याने चौफेर प्रगती केली होती. ऑक्टोबर १९८२ मध्ये कारखान्याच्या रौप्यमहोत्सवी वर्षातच १५ परदेशीतज्ज्ञांनी कारखान्याला भेटी दिल्या. इजिप्त, पश्चिम जर्मनी, कोरिया, इंडोनेशिया, युगोस्लोव्हाकिया, थायलंड, बांगलादेश या देशांचे प्रतिनिधी त्या शिष्टमंडळात होते. याचवेळी कामगारांनी स्वतः वर्गणी गोळा करून दादांना ॲम्बॅसिडर कार भेट दिली.

## पुन्हा मुख्यमंत्रिपद

पुढे १३ नोव्हेंबर १९८२ रोजी सांगलीत दादांचा ६५ वा वाढदिवस साजरा करण्यात आला. राज्यात वादग्रस्त ठरत असलेल्या बॅ. भोसले यांच्या कारकिर्दीच्या पार्श्वभूमीवर दादा काय बोलणार याकडे महाराष्ट्राचे लक्ष लागले होते. देशपातळीवर आपण इंदिरा गांधींचे, तर राज्य पातळीवर यशवंतराव चव्हाणांचे निष्ठावंत असल्याचे सांगतानाच त्यांनी पक्षाने सांगितल्यास राज्याचे नेतृत्व करण्याची तयारी दर्शविली आणि राज्यात खळबळ सुरू झाली. त्या दिवशीच्या सत्काराला उत्तर देताना दाद म्हणाले, 'मी पुन्हा राजकारणात येऊन नेतृत्व करावे अशी इच्छा आज माझ्या वाढदिवस समारंभासाठी जमलेल्या मित्रमंडळींनी माझ्यावरील हक्कामुळे व्यक्त केली आहे; पण आज त्या संदर्भात बोलणे योग्य नाही. आज माझा वाढदिवस असल्याने विधायक कामाला नवी दृष्टी कशी देता येईल, याचा मी विचार करीत आहे. महाराष्ट्रातील आजची परिस्थिती तितकीशी बरी नाही, याबद्दल कार्यकर्त्यांनी व्यक्त केलेल्या भावनांशी मी सहमत आहे. यासंबंधीची चर्चा मी सोडलेली नाही. पंतप्रधान इंदिरा गांधींना ते पटवून दिले पाहिजे. त्यासाठी बंडखोरी करणे मला मान्य नाही; कारण मी इंदिरा गांधींचे नेतृत्व मानणारा एक कार्यकर्ता आहे; पण वेळ आलीच तर मात्र तुमचे नेतृत्व करण्यासाठी मी पुढे येईन. देशपातळीवर इंदिराजींबरोबर व राज्य पातळीवर यशवंतराव चव्हाणांबरोबर मी काम करीत आहे. आजपर्यंत त्या-त्या परिस्थितीत वेळ पाहून काम केले आहे. मी कोणाकडे सत्ता मागितली नाही आणि कोणी ती काढून घेतली तरी त्याचे दुःख मानले नाही. सामान्यांसाठी आणि त्यांना सुखी पाहण्यासाठी सतत काम करण्याचा माझा पिंड आहे. मी आता शरीरप्रकृतीने थकलो असलो तरी मनाने बळकट आहे. सामान्य माणसाची कामे केली पाहिजेत, त्याला घडविले पाहिजे, त्याला सुखी केले पाहिजे, यासाठी काही विधायक काम करण्याचा माझा विचार आहे.' वाढदिवसानंतर दादा निसर्गोपचारासाठी दीड महिन्याच्या दौऱ्यावर बंगळूरला निघून गेले.

राज्यात बॅ. बाबासाहेब भोसले यांच्याविषयीची नाराजी आता चव्हाट्यावर आली होती. खासदार बाळासाहेब पवार व आमदार शंकरराव कोल्हे यांनी बॅ. भोसले यांच्या विरोधात जोरदार मोहीम सुरू केली होती. नेतृत्वबदल झालाच पाहिजे, या मागणीसाठी पक्षश्रेष्ठीकडे पाठपुरावाही करण्यात येत होता. १४० पेक्षा अधिक आमदार बॅ. भोसलेंविरोधी मोहिमेत दाखल झाले होते. या सर्व वातावरणाचा परिणाम पक्षश्रेष्ठींवर झाला होता. नेतृत्वबदलास श्रेष्ठीही तयार होते; पण महाराष्ट्राच्या नेतृत्वात बदल केल्यास नवा मुख्यमंत्री कोण? या प्रश्नाचे उत्तर मात्र पक्षश्रेष्ठींना सापडत नव्हते. शंकरराव चव्हाण व शिवराज पाटील-

अनुक्रमणिका

चाकूरकर यांनी मुख्यमंत्रिपद स्वीकारण्यास नकार दिला होता. दादा, बॅ. अंतुले, बॅ. रामराव आदिक, बळिराम हिरे, प्रतिभाताई पाटील, यशवंतराव माहिते या नेत्यांच्या नावांची चर्चा प्रसारमाध्यमांमध्ये सुरू होती. नेतानिवडीची कोंडी फुटत नव्हती. शेवटी पक्षश्रेष्ठींनी बॅ. भोसले यांना मुख्यमंत्रिपदावरून हटविण्याचा निर्णय जाहीर केला.

३१ जानेवारी १९८३ रोजी नव्या विधानभवनाच्या दहाव्या मजल्यावर नेता निवडीसाठी विधिमंडळ पक्षाची बैठक बोलाविण्यात आली. पक्षश्रेष्ठींनी निरीक्षकम्हणून बुटासिंग व शिवशंकर यांना मुंबईत पाठविले होते. चर्चेतून आणि सामोपचाराने निवड होत नव्हती, हे निदर्शनास आल्यानंतर मतदान घेण्याशिवाय पर्याय उरला नाही. त्या वेळी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष म्हणून सांगलीचे गुलाबराव पाटील कार्यरत होते. दादा आणि यशवंतराव मोहिते यांच्यात मुख्यमंत्रिपदासाठी लढत होती. २६७ आमदारांनी मतदान केले. रात्री १२. ३० वाजता दादांची निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले. २ फेब्रवारी१९८६ रोजी राज्यपाल आय. एच. लतीफ यांनी दादांना मुख्यमंत्रिपदाची, तर उपमुख्यमंत्रिपदाची शपथ रामराव आदिक यांना दिली. पुढे ७ फेब्रुवारी रोजी ३३ मंत्र्यांचा शपथविधी झाला. मुख्यमंत्री झाल्यानंतर दादांनी राज्यातील जनतेला उद्देशून भाषण केले. त्या भाषणात ते म्हणाले होते, ‘गेली चार वर्षे जरी मी या राज्याला सोडून गेलो होतो तरीही वेगवेगळ्या क्षेत्रांत काम करीत राहिलो. पूर्वी दोनवेळा मी मुख्यमंत्री झालो होतो. त्यानंतर जे-जे मुख्यमंत्री गेले, ते पुन्हा मुख्यमंत्री झाले नाहीत; पण माझे सौभाग्य म्हणूनच मला तिसऱ्यांदा हे पद मिळत आहे. महाराष्ट्रातील जनतेचे ऋण मी पूर्णांशाने फेडू शकलो नाही म्हणून मला पुन्हा हे पद मिळाले असे वाटते. पक्ष, कार्यकर्ते, आमदार, पक्षाध्यक्षा श्रीमती इंदिरा गांधी या सर्वांच्या सदिच्छेमुळे हे घडले. माझे प्रशासन राज्यासंबंधीचा विश्वास जनतेत निर्माण करून स्वच्छ कारभार देईल. महाराष्ट्रातील समस्यांची व प्रश्नांचीमला माहिती आहे. त्यांवर मात करण्याचा माझा प्रयत्न राहील. राज्यकारभाराबरोबर पक्ष संघटना मजबूत करण्याकडे आपण लक्ष देऊ, जनतेने सदिच्छा देऊन सहकार्य करावे.’

त्या वेळी खासदार असलेले दादा विधिमंडळाच्या कोणत्याही सभागृहाचे सदस्य नव्हते. त्यामुळे त्यांनी पुढे शालिनीताईंना राजीनामा देण्यास सांगून सांगली विधानसभा मतदारसंघातून पोटनिवडणूक लढविली आणि जिंकली. बॅ. बाबासाहेब भोसले मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी मुख्यमंत्री निवासस्थानाचे नाव बदलून ‘रायगड’ असे नामकरण केले होते. दादांनी ते बदलून पूर्वीचेच ‘वर्षा’ हे नाव कायम ठेवले. राज्यातील जनतेची कामे गतीने व्हावीत यासाठी मंत्रालयाचे द्वार जनतेसाठी खुले ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. दुष्काळ महाराष्ट्राची पाठ सोडत नव्हता. त्याच काळात राज्यात पुन्हा दुष्काळाचे संकट तीव्र झाले. राज्यातील १७ हजार खेड्यांमध्ये पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली. पाणीटंचाईमुळे लोक हैराण झाले. दादांनी तातडीनेदेशात ‘राजीव पर्व’ सुरू झाले.

१० जानेवारी १९८५ रोजी दादांचे खास मित्र आणि अनेक वर्षांचे साथी आप्पासाहेब बिरनाळे यांचे निधन झाले. या घटनेनेही दादांच्या दुःखात भर घातली. देशावर इंदिरा काँग्रेसची हुकमी सत्ता आलेली असताना २ व ३ मार्च १९८५ रोजी महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका लागल्या. देशातील ११ राज्यांत ही निवडणूक होणार होती. पक्ष आणि पक्षश्रेष्ठी बलशाली बनलेले होते. लोकसभा निवडणुकीत राज्यातील विधानसभेच्या २८८ मतदारसंघापैकी २२७ मतदारसंघांत इंदिरा काँग्रेसला मताधिक्य मिळाले होते. त्यामुळे पक्षाला निवडणुकीतील घवघवीत यशाबद्दल खात्री झाली होती. ५ फेब्रुवारी १९८५ रोजी प्रदेशाध्यक्ष एन. एम. कांबळे यांनी पक्षाचे उमेदवार जाहीर केले. पक्षाने १२१ विद्यमान आमदारांना उमेदवारी नाकारली होती. १९८४ मध्ये राजीव गांधी पंतप्रधान झाल्यानंतर लगेचच दोन महिन्यांत लोकसभा निवंडणुका जाहीर

अनुक्रमणिका

केल्या. त्या वेळी त्यांनी महाराष्ट्रातील ज्या काँग्रेस आमदाराच्या विधानसभा मतदारसंघात काँग्रेसच्या लोकसभा उमेदवाराला दुसऱ्या क्रमांकाची मते पडतील, त्या आमदाराला १९८५ च्या विधानसभा निवडणुकीचे तिकीट द्यायचे नाही, असे धोरण पक्षश्रेष्ठींनी स्वीकारले होते. त्या धोरणामुळे 'दादांचे कट्टर समर्थक' आणि मंत्रिमंडळातील सहकारी एदलाबादमधून प्रतिभाताई पाटील, निलंगामधून शिवाजीराव निलंगेकर-पाटील तर इचलकरंजी विधानसभा मतदारसंघातून कल्लाप्पाण्णा आवाडे यांच्या तिकिटांना कात्री लागली. तत्पूर्वी १९८० मध्ये दादांनी मुख्यमंत्रिपदासाठी प्रतिभाताईंच्या नावाचा आग्रह धरला होता; पण संजय गांधींच्या हट्टामुळे बॅ. अंतुले मुख्यमंत्री झाले, तर १९८५ मध्ये दादांचा निलंगेकर आणि प्रतिभाताईंसाठी आग्रह होता; पण दोघांचाही आमदारकीची तिकिटे कापली गेल्याने स्वतः दादाच मुख्यमंत्री झाले. मात्र, पुढे संधी आल्यावर दादांनी निलंगेकरांचे नाव पुढे केले तेव्हा ते आमदार नव्हते तरीही दादांनी त्यांना मुख्यमंत्रिपदी बसविले. एकूणच 'दिल्लीकरांनी ज्याचे तिकीट कापले आहे, त्याला मुख्यमंत्री करून दाखवीन' ही दादांची शपथ होती! ती त्यांनी खरी करून दाखवली.

उमेदवारी नाकारलेल्यांमध्ये १३ मंत्र्यांचाही समावेश होता. दादांना सांगली मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली होती. दादांनी आपल्या दोन वर्षांच्यामुख्यमंत्रिपदाच्या कारकिर्दीवर प्रकाश टाकणारी एक पुस्तिका प्रकाशित केली होती आणि ती राज्यातील मतदारांपुढे ठेवली. दादांनी घेतलेल्या अनेक क्रांतिकारी आणि धाडसी निर्णयांबरोबरच त्यांनी ११ हजार ३०० गावांत केलेल्या पिण्याच्या पाण्याच्या सोईचा उल्लेख त्या पुस्तिकेत आवर्जून करण्यात आला होता. राज्यातील प्रचारासाठी पंतप्रधान राजीव गांधी यांनीदेखील दौरा केला. २० फेब्रुवारी १९८४ रोजी सांगलीत झालेली सभा खूप गाजली. सभेला झालेली गर्दी आणि कार्यकर्त्यांचा उत्साह राजीव गांधींना प्रभावीत करून गेला. केंद्रात काँग्रेसचे सरकार आहे व देश बलवान करून राज्याचा विकास करण्यासाठी इंदिरा काँग्रेसला पाठबळ देण्याचे आवाहन राजीव गांधींनी महाराष्ट्रातील मतदारांना त्यावेळी केले होते.

मतदान पार पडले आणि अपेक्षेप्रमाणे राज्यात इंदिरा काँग्रेस विजयी झाली. २८८ जागांपैकी १६१ जागा काँग्रेसने जिंकल्या. नवा मुख्यमंत्री कोण? हा प्रश्न पुन्हा चर्चिला जाऊ लागला; पण दादांनी सर्वच आघाड्यांवर बाजी मारली. विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत नेतेपदासाठी दादांचे नाव बॅ. रामराव आदिक यांनी सुचविले आणि प्रभा राव यांनी त्यास अनुमोदन दिले. १० मार्च १९८५ रोजी दादांनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदाची चौथ्यांदा शपथ घेतली. राज्यपाल आय. एच. लतीफ यांनी त्यांना गुप्ततेची शपथ दिली. १९७७,१९७८, १९८३ आणि १९८५ असा चार वेळा मुख्यमंत्री होण्याचा मान दादांना मिळाला. महाराष्ट्राच्या निर्मितीचेही ते रौप्यमहोत्सवी वर्ष होते हे विशेष! १२ मार्च १९८५ रोजी ७ मंत्री आणि १५ राज्यमंत्र्यांचा शपथविधी पार पडला. दादांनी मुख्यमंत्रिपदाच्या कारकिर्दीस नव्या जोमाने सुरुवात केली. अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. पिण्याच्या पाणी योजनांसाठी असणारी १० टक्के योजनेची अट रद्द केली, मुंबईच्या विकासासाठी केंद्र सरकारकडे १ हजार कोटी रुपयांची मागणी केली, पर्यावरण संरक्षणासाठी स्वतंत्र पर्यावरण विभाग, प्रत्येक खेड्यात किमान एक गोबर गॅस प्रकल्प उभा करण्याचा प्रयत्न करणे, प्रत्येक तालुक्यात मुलींचे एक वसतिगृह उभे करणे, किमान १ हजार शाळांमार्फत रोपवाटिका तयार करणे, कृषी विद्यापीठांमधून 'कमवा व शिका' योजना, खासगी व सेवाभावी संस्थांना वनीकरणासाठी जंगल जमिनी देणे, पुणे व नागपूरसाठी नागरी विकास प्राधिकरणे स्थापन करणे, मुंबई शहर 'स्वच्छ व सुंदर शहर' योजना, जागतिकबँकेच्या मदतीने राज्यात २८२ कोटींचा निवारा प्रकल्प साकार करणे, सार्वजनिक उपयोगासाठी गरजेच्या नसलेल्या जागांवरील झोपड्यांमध्ये राहणाऱ्यांना मालकी हक्क देणे असे महत्त्वाकांक्षी उपक्रम आणि धोरणे दादांनी राबविली.

अनुक्रमणिका

पुढे मुंबईत येणाऱ्या परप्रांतीयांच्या लोंढ्यांवर नियंत्रण आणण्याच्या विधानावरून महाराष्ट्रात आणि देशात गदारोळ निर्माण झाला. तो वाद लोकसभेतही चर्चिला गेला. एखादी भूमिका घेतली की, त्या भूमिकेशी ठाम राहणे हा दादांचा पिंड असल्याने त्या वादातही दादा विचलित झाले नाहीत. परप्रांतीयांच्या विधानावरून उठलेले वादळ शांत होते न होते तोच २२ मे १९८५ रोजी नवा वाद उद्‌भवला. पंतप्रधानपद व पक्षाचे अध्यक्षपद एकाच व्यक्तीकडे असावे काय, या संदर्भात दादांनी केलेल्या विधानाचा विपर्यास झाला आणि तो वाद श्रेष्ठींपर्यंत पोहोचला. अशी राजकीय वादांची मालिका सुरू असतानाच काँग्रेसच्या शताब्दीनिमित्त पुणे शहर इंदिरा काँग्रेसचे आयोजिलेल्या कार्यक्रमातील दादांचे भाषण गाजले आणि वादग्रस्तही ठरले. त्यावेळी कार्यकर्ते आणि नेत्यांची त्यांनी केलेली कानउघांडणी खूपच गाजली.

त्या भाषणात ते म्हणाले होते, ‘सध्याच्या काँग्रेसचे स्वरूप फक्त निवडणुकीवेळी उत्साहाने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा पक्ष असे झाले आहे, ही चिंतेची बाब आहे. निवडणुका झाल्यानंतर अनेक जिल्हा आणि तालुका समित्यांच्या कार्यालयांना कायम कुलूप लावलेले आढळते. त्यातील दूरध्वनी वा कोणी देखभाल करायला नसल्यामुळे अनेकदा तोडण्यात आलेला असतो. एकीकडे निवडणुकीवेळी कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह असतो, तर एरव्ही हाच पक्ष खंगत चालल्यासारखा दिसतो. अलीकडे अनेक शहरांत आणि गावांत मी काँग्रेस कार्यकर्त्यांची भेट घेतो. माझा आणि इतर मंत्र्यांचा नेहमीचा अनुभव म्हणजे सर्व कार्यकर्ते भेटतात ते तक्रारी करण्यासाठी. आपल्याच पक्षातील दुसरा एखादा कार्यकर्ता किंवा गट आपल्याविरुद्ध कसा वागतो, निवडणुकीत पराभव झाला असेल तर तो त्याच्या कारवायांनीच कसा झाला, याच्याच तक्रारी ऐकावयास येतात. त्याला पक्षातून काढून टाका, ही मागणीही तो करतो. आपण काय काम करतो याचे विश्लेषण कोणीही करीत नाही. एकीकडे काँग्रेस शताब्दीच्या निमित्ताने पुढील १०० वर्षांत देशाला पुढे कसे न्यायचे याबद्दल विचार मांडण्यात येत असताना, दुसरीकडे कार्यकर्त्यांचे परस्पराविरुद्ध बोलणे आणि वागणे हेच आपले कामअसल्यासारखे वागतात; ही काळजी करण्याजोगी परिस्थिती आहे. प्रत्येकाला सत्तेत वाटा मिळणे शक्य नसते, हे कार्यकर्त्यांनी समजून घ्यायला हवे. शिवाय कोणीही कायम मुख्यमंत्री, मंत्री किंवा आमदार राहू शकत नाही, याची जाणीव त्यांनी ठेवायला हवी. आपापसातील मतभेद विसरून जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी आणि पक्षाच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी एकदिलाने काम केले पाहिजे. एकीकडे श्रीमंती वाढत आहे, दुसरीकडे गरीब अधिकच गरीब होत आहेत. संघटित लोक अनेक क्षेत्रांत हवे ते हिसकावून घेतात. गरिबांना हताशपणे वावरावे लागते. याचा कार्यकर्त्यांनी आणि नेत्यांनी गंभीरपणे विचार केला पाहिजे. एकत्रितपणे काम केल्याशिवाय ही परिस्थिती बदलणार नाही. आजच्यासारखा समारंभ झाला की, आपले काम संपले असे न समजता त्यापासून कामाची सुरुवात झाली असे मानून वागावयास हवे. देशाचे चांगले करण्यासाठी कामाचा निर्धार केला पाहिजे. निराशेचे प्रसंग आले, पदे गेली तरी दुःखी न होता काम केले पाहिजे.’ या भाषणाने महाराष्ट्राच्या राजकारणात आणि काँग्रेस संघटनेत एकच खळबळ उडाली. पक्षहिताच्या एका नव्या वादाला दादांनी तोंड फोडले होते.

नंतरच्या काळात प्रदेशाध्यक्षपदाचा वाद निर्माण झाला. पक्षश्रेष्ठींनी एन. एम. कांबळे यांच्याऐवजी प्रदेशाध्यक्षपदी प्रभा राव यांची निवड केली. याबाबत विश्वासात न घेतल्याच्या कारणावरून दादांनी आपल्या पदाचा राजीनामा राज्यपालांकडे दिला. दादा राज्यपालांकडे राजीनामा देऊन खासगी गाडीने माहीमच्या घराकडे रवाना झाले. तेव्हा सांगलीचे चारूभाई शहा त्यांच्यासोबत होते. ते सांगत होते, ‘दादा, दमाने घ्या, एवढा त्रागा करू नका...’ त्यावर दादा म्हणाले, ‘अरे चारू, राजकारणात स्वाभिमानाने राहावे....’ दादांचे हे पाऊल महाराष्ट्राच्या राजकारणात खूप गाजले. प्रसिद्धीमाध्यमांनी दादांच्या

अनुक्रमणिका

स्वाभिमानी व बाणेदार भूमिकेचे तोंड भरून कौतुक केले. राजीव गांधी आणि इतर पक्षश्रेष्ठीही बुचकळ्यात पडले. दादांचा राजीनाम्याच्या निर्णय अनपेक्षित होता. दादांची नाराजी काढण्यासाठीदिल्लीहून नेतेमंडळी मुंबईत आली; पण दादांनी कोणाचेही ऐकले नाही. अखेर पक्षश्रेष्ठींनी दादांनाच नव्या मुख्यमंत्रिपदासाठी नावे सुचविण्याचा आग्रह केला. दादांचे विश्वासू मानले जाणारे शिवाजीराव पाटील-निलंगेकर यांना मुख्यमंत्रिपदी संधी देण्यात आली. दादा मुख्यमंत्रिपदावरून गेले तरीनिलंगेकरांच्या मंत्रिमंडळाला मात्र दादांच्याच मंत्रिमंडळाला चेहरा राहिला. दादांनी मुख्यमंत्र्यांचे 'वर्षा' हे निवासस्थान सोडून दिले आणि ते 'बी-१' या बंगल्यात राहायला गेले.

त्यानंतरच्या काळात शेतकऱ्यांचे प्रश्न आणि शेतकऱ्यांची संघटना या जिव्हाळ्याच्या विषयांकडे दादा वळले. पक्षाचे सरचिटणीस असताना त्यांनी आयोजित केलेला दिल्लीच्या बोट क्लब मैदानावरील शेतकरी मेळावा अभूतपूर्व ठरला होता. आता देशपातळीवर शेतकऱ्यांची संघटना स्थापण्याचा दादांचा मानस होता. त्याच काळात महाराष्ट्रात शरद जोशी यांची शेतकरी संघटना आक्रमक पद्धतीने नावारूपास येऊ लागली होती. शेतकरी संघटनेने राहुरी येथे शेतकऱ्यांच्या मेळाव्याचे आयोजन केले होते. त्या मेळाव्यासाठी शेतकरी संघटनेने दादांना उपस्थित राहण्याचे निमंत्रण दिले होते. ते निमंत्रण दादांनी स्वीकारले होते. दादांच्या या कृतीमुळे पक्षश्रेष्ठी अस्वस्थ बनले होते. दादांनी त्या मेळाव्याला हजर राहू नये असे त्यांना वाटत होते. पुढे दादांनी त्या मेळाव्याला जाणे टाळले. ९ ऑक्टोबर १९८५ रोजी दादांनी पत्रकारांसोबत संवाद साधला आणि त्यावेळी मनातील व्यथांना वाट मोकळी करून दिली. त्यांनी व्यक्त केलेल्या भावना अशा, 'काही दिल्लीकरांना महाराष्ट्रात कायम अस्थिरता हवी आहे. माझ्या तसेच अंतुले, भोसले यांच्या बाबतीत या लोकांनी हेच केले व आता शिवाजीराव पाटील-निलंगेकर यांच्या बाबतीतही तेच प्रयत्न झालेले आहेत. सतत अस्थिरतेची हवा निर्माण करायची. अन्य प्रांतांतही हेच चालले आहे. ही देशाच्या भल्याची नीती नाही. अशी अस्थिरता निर्माण केल्यामुळे राजकारणाला चुकीचे वळण लागले. सध्या शेतकरी नाराज, दुःखी आणि हैराण झाले आहेत. शेतकऱ्यांचे प्रश्न सुटले पाहिजेत, त्याकरिता पक्षीय मतभेद विसरून सर्वांनीच एकदिलाने काम केले पाहिजे. या कामाबद्दल पक्षश्रेष्ठींनी माझ्याविरूद्ध कारवाई करून मला पक्षातून काढले तरी हरकत नाही. पक्षाला रामराम करून मी घरी बसेन.'

त्यानंतर दादांची प्रकृती बिघडली. हृदयविकार आणि रक्तदाबाच्या विकारामुळे त्यांना बॉम्बे हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. त्यावेळी देशातील अनेक नेत्यांनी रुग्णालयात जाऊन दादांच्या प्रकृतीची विचारपूस केली होती. राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग यांनीही रूग्णालयात जाऊन दादांची भेट घेतली.

१३ नोव्हेंबर १९८५ रोजी दादांचा ६९ वा वाढदिवससाजरा करण्यात आला. त्यावेळी दादाप्रेमींना दादांविषयी अनेक अपेक्षा होत्या. वाढदिवसाच्या निमित्ताने दादांसाठीकार्याचे नवे दालन खुले व्हावे, अशीहीसर्वांची अपेक्षा होती. १४ नोव्हेंबर १९८५ रोजी दादांना दिल्लीहून दूरध्वनी आला आणि त्यांचीराजस्थानच्या राज्यपालपदीनिवड झाल्याचे सांगण्यातआले. दादाप्रेमींमध्ये आनंदाची लाट पसरली. 'श्रेष्ठींनी दादांना वाढदिवसाची भेट दिली' अशी प्रतिक्रिया सर्व स्तरांतून उमटली. १७ नोव्हेंबर १९८५ रोजी सांगलीत दादांचा खूप मोठासत्कार झाला. या सत्कारात दादांनी जनतेशी असलेल्या नात्याविषयीआपल्या भावना मोकळ्या केल्या.

‘लोकांचा प्रतिनिधी म्हणून मी आजवर कोणतीही गोष्ट चुकीची केली, असे मला मुळीच वाटत नाही. मग भूखंड प्रकरण असो वा इतर अन्य काही असो, मी जे काही केले ते कायद्याला धरून व सार्वजनिक हित डोळ्यांसमोर ठेवूनच केले. अशा परिस्थितीत भूखंडप्रकरणी चौकशी होऊ द्या. त्यामुळे खरे-खोटे बाहेर येईल. माझ्याआजवरच्या स्वभावानुसार मी लोकांसाठी धाडसाने कामे केली आहेत. कुठलीही गोष्ट दडवली नाही अथवा सामान्य जनतेला कमीपणा वाटेल असे काहीही केले नाही. जनतेसाठी आजवर जगलो आणि जमतेसाठीच देह ठेवायला मी तयार आहे. जे फारसे कोणाच्या वाट्याला येत नाही, ते सतत यशस्वी होण्याचे सुख माझ्या वाट्याला आले. मी मुख्यमंत्रिपद सोडले ते काही कारणासाठीच! स्वाभिमानापोटी ते सोडले आहे व त्यात चुकीचे काही नाही, असे आपण राजीव गांधी यांना सांगितले होते. ज्या काँग्रेस पक्षात मी ४८ वर्षे आहे; तो पक्ष सोडण्याचा प्रश्नच नाही. पक्षाच्या विरोधात मी कधी गेलो नाही व जाणारही नाही. पूर्वी केंद्रीय मंत्रिमंडळात या, हवे ते खाते घ्या, अशी इच्छा स्व. इंदिरा गांधी यांनीही व्यक्त केली होती. राज्यपालपदही देऊ केले होते; पणपक्षकार्यकरण्याची इच्छा होती, म्हणून मी ती पदे स्वीकारलीनव्हती. राजीव गांधीनीही चार महिन्यांआधी अशीच इच्छा व्यक्त केली होती;पण त्यावेळीही पक्षकार्य करण्याची आवड असल्याचे मी सांगितले होते. आता प्रकृतीमुळे व इतरांना संधी मिळावी या उद्देशाने मी राज्यपालपद स्वीकारले. पक्षाचे स्वरूप खालावत चालले आहे, हे जरी खरे असले तरी नवीन कार्यक्रम तरूण पिढीपुढे येत आहे, त्यांना संधीहवी हे मला पटले आहे. सध्या पक्षातील ज्येष्ठ मंडळींना बाजूला केले जात आहे वउमेदीच्या तरूणांना त्या जागी आणले जात आहे. अशावेळी इंदिरा काँग्रेसचे कार्याध्यक्षपद दिले तरी ते स्वीकारायचे नाही असे मनाशी ठरविले होते म्हणूनच राज्यपालपद घ्या, असे राजीवजी म्हणाले म्हणून मी ते स्वीकारले. इंदिरा काँग्रेसच्याकार्यकर्त्यांना माझे सांगणे आहे की, वसंतदादा आता तुम्हाला किती दिवस पुरणार? एकखांबी तंबू आता किती दिवस चालणार? तेव्हा कार्यकर्त्यांनीच आपापसांतील मतभेद विसरून सामुदायिकरीत्या निर्णय घ्यावेत. माझ्या जिल्ह्याचे वाटोळे होईल असे काही करू नका! आज मी हे राजस्थानचे राज्यपालपद स्वीकारतोय ते माझ्या आनंदसाठी. आजवर मी माझ्या गावाचे, जिल्ह्याचे, महाराष्ट्राचे ऋण फेडत आलो आहे. आता देशाच्या कामासाठी काहीतरी करू द्या. मानाने जगायची माझी इच्छा आहे.’

## राजस्थानचे राज्यपाल

३० नोव्हेंबर १९८५ रोजी जयपूर येथे दादांनी राज्यपालपदाची शपथ घेतली. भगवा फेटा परिधान करून दादांनी स्वीकारलेल्या या नव्या जबाबदारीचे साक्षीदार म्हणून त्यावेळी शपथविधीला राजस्थानचे मुख्यमंत्री हरदेव जोशी उपस्थित होते. महाराष्ट्रातून शेकडो कार्यकर्ते दादांवरील प्रेम व्यक्त करण्यासाठी त्या शपथविधी समारंभाला उपस्थित राहिले होते. राज्यपालपदाची कारकीर्द दादांनी सुरू केली. लोकाभिमुख कार्यपद्धती हे त्यांचे वैशिष्ट्य राजस्थानमध्येही कायम राहिले. तेथेही सामान्य माणसाला खुला प्रवेश देताना दादांनी राज्यपालपदाच्या राजशिष्टाचाराच्या कायदेशीर चौकटी कधीही आडव्या आणल्या नाहीत. त्याच कारणाने राज्यपालांचे निवासस्थान लोकांच्या गर्दीने गजबजून जायचे. राजस्थानमधील जनतेलाही तो अनुभव आगळा होता. दादा राज्यपाल म्हणून जयपूरमध्ये राहिले तरी त्यांचे लक्ष सदैव महाराष्ट्रातील घडामोडींकडे आणि जनतेकडेच राहिले.

पुढच्या काळात महाराष्ट्राच्या राजकारणातही अनेक बदल झाले. दादांचे निष्ठावंत म्हणून महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी विराजमान झालेले शिवाजीराव पाटील-निलंगेकर जेमतेम नऊ महिने आपल्या पदावर राहू शकले. मराठवाडा विद्यापीठाच्या एम. डी. अभ्यासक्रमाच्या परीक्षेत मुलीला अतिरिक्त

अनुक्रमणिका

गुण वाढविण्यासाठी आपल्या पदाचागैरवापर केल्याचा त्यांच्यावर आरोप झाला. हे प्रकरण विधिमंडळातही गाजले. त्यानंतर न्यायालयात पोहोचलेल्या या प्रकरणात न्यायालयाने त्यांच्यावर ठपका ठेवला आणि त्याच कारणाने त्यांना मुख्यमंत्रिपद सोडावे लागले. त्याच काळात महाराष्ट्राचे राज्यपाल आंध्र प्रदेशचे कोंडा व्यंकटराव यांनाही तशाच एका प्रकरणात राजीनामा द्यावा लागला होता. वैद्यकीय महाविद्यालयात आपल्या नातीला मागास जातीचे खोटे प्रमाणपत्र मिळवून प्रवेश दिला, असा आरोप व्यंकटराव यांच्यावर होता. त्यातूनच त्यांना राज्यपालपदावर पाणी सोडावे लागले. शिवाजीराव पाटील-निलंगेकर मुख्यमंत्री पदानंतर गेल्यावर त्यांच्या जागी दिल्लीहून अर्थमंत्रिपद सोडून शंकरराव चव्हाण यांना मुख्यमंत्रिपदावर परत यावे लागले. शंकररावांचा कडक शिस्तीचा कारभार राज्यात सुरू झाला. तो कारभार पक्षातील आमदारांना आणि नेत्यांनाही भावला नाही. चव्हाणांच्या विरोधात असंतुष्ट नेत्यांच्या मोहिमा सुरू झाल्या. महाराष्ट्राच्या नेतृत्वात बदल करण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. दादा जयपूरला राज्यपाल म्हणून कार्यरत असले तरी त्यांचा कार्यकर्त्यांशी असलेला संवाद आणि संपर्क मात्र खंडित झाला नाही. महाराष्ट्रातील घटना, घडामोडींचे परिणाम दादांवर व्हायचे व ते त्याविषयी पक्षश्रेष्ठींना अभिप्राय कळवायचे. अखेर जुलै १९८७ मध्ये दादांनी राज्यपालपदाचा राजीनामा दिला आणि ते पुन्हा सक्रिय राजकारणात आले. १३ नोव्हेंबर १९८७ रोजी ७१ व्या वाढदिवसादिवशी दादांनी सांगलीत अभूतपूर्व असा शेतकरी मेळावा आयोजित केला. या मेळाव्याला राज्यातून तीन लाख शेतकरी आले होते. याच मेळाव्यात दादांनी देशव्यापी शेतकरी संघटना स्थापन करण्याचा मानस पुन्हा व्यक्त केला.

शंकरराव चव्हाण यांच्या विरोधातील राज्यातील वातावरण तीव्र होत गेले. श्रेष्ठींनीही राज्यात नेतृत्वबदलाला अनुकूलता दर्शविली. राजीव गांधींनी दादांना नवा नेता कोण असावा, याविषयी विचारणा केली. दादांनी त्यावेळी प्रतापराव भोसले व शरद पवार यांची नावे सुचविली होती. २४ जून १९८८ रोजी पक्षश्रेष्ठींनी शरद पवार यांना मुख्यमंत्री करण्याचा निर्णय घेतला. या शपथविधीसाठी वसंतदादा आवर्जून उपस्थित राहिले होते. शरद पवारांच्या मंत्रिमंडळात शिवाजीराव देशमुख यांच्यासारखी दादांची निष्ठावंत मंडळीही होती. शेतकऱ्यांचे प्रश्न घेऊन संघटनात्मक मांडणी करण्याची दादांची भूमिका पक्षश्रेष्ठींना आवडलेली नव्हती. दादांनी पक्षाच्याचव्यासपीठावरून शेतकरी संघटन करावे असे त्यांना वाटत होते. त्याच पार्श्वभूमीवर औरंगाबाद येथे काँग्रेसचे अधिवेशन झाले. या अधिवेशनाला दादा अनुपस्थित राहिले. त्यांनी चिरंजीव खासदार प्रकाशबापू यांना आपला संदेश घेऊन त्या अधिवेशनाला पाठविले होते. प्रकाशबापूंनी दादांचा संदेश तेथे वाचून दाखविला. काँग्रेसने शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र संघटन करावे, अशी सूचना त्यांनी त्या संदेशात केली होती. अप्रत्यक्षपणे देशपातळीवरील शेतकरी संघटना स्थापन करण्याचा त्यांचा मानस त्यांनी रद्द केल्याचेच त्या संदेशातून स्पष्ट झाले होते.

### माणसांचे मोहोळ आणि हळवा स्वभाव

लोकसंग्रह, लोकांविषयीची आत्मीयता व जिव्हाळा आणि त्यातून प्रत्येकाच्या मनाचा विचार करून काम करण्याची पद्धती यामुळे वसंतदादा स्वातंत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्यानंतरही सतत लोकांमध्ये राहिले. जिथे दादा तिथे माणसांचे मोहोळ! हे चित्र त्यांच्या अखेरच्या क्षणापर्यंत समाजाला अनुभवायला मिळाले. प्रेमळ आणि हळवा स्वभाव हे त्यांचे बलस्थान होते; पण ते बलस्थान कधीही कर्तव्यात अडथळा निर्माण करू शकले नाही. येरवड्याच्या तुरुंगात दंडाबेडीची शिक्षा भोगत असताना त्यांच्या कन्येचे निधन झाल्याची वार्ता समजली तरी ते खंबीर राहिले. पत्नी मालतीताई यांचे दुःख हलके करण्यासाठी माफी मागून तुरुंगातून सुटका करून घेण्याऐवजी स्वातंत्र्यासाठी त्यांनी तुरुंगात दंडाबेडीत राहणेच पसंत केले.

दंडाबेडीच्या शिक्षेमुळेच त्यांचा एक पाय आयुष्यभर दुखावलेला राहिला. जीवनाच्या उत्तरार्धात १५ वर्षांहूनही अधिक काळ त्यांना काठीचा आधार घ्यावा लागला. संघर्ष आणि अभिमान तर दादांच्या पाचवीला पूजला होता. स्वातंत्र्यपूर्व काळातील क्रांतिलढ्यामुळे पत्नी मालतीताईंसमवेत त्यांना कौटुंबिक सौख्याचा आनंदही मनाजोगता घेता आला नाही. द्वितीय पत्नी शालिनीताई पाटील यांच्याशी विवाहबद्ध होताना त्यांनी आपले राजकीय जीवन पणाला लावण्यासही मागे-पुढे पाहिले नाही. शालिनीताईंशी संसार करतानादेखील कुणाचीही पर्वा केली नाही. राजकारणात बॅ. जी. डी. पाटील यांच्यासारख्या मित्रांना मंत्रिपदांसाठी पुढे करून आपण लोकांसोबत राहून विधायक कामे करण्याचा मनाचा मोठेपणा देखील त्यांनी दाखविला. समाजासाठी तब्बल ६०वर्ष आपले जीवन झिजवणारे दादा चार वेळा मुख्यमंत्री होऊनदेखील त्यांची कारकीर्द मात्र जेमतेम ३ वर्ष ८ महिन्यांचीच राहिली. जीवनातील ५० हून अधिक वर्षांचाकाळ त्यांनी स्वातंत्र्यलढा, काँग्रेस पक्ष संघटना आणि सहवासात येणाऱ्या प्रत्येक लहान-मोठ्या माणसांचे काम करण्यातच कामी आणला. राजकारण करताना 'आत एक आणि बाहेर दुसरे' या व्यवहारी तत्त्वाला त्यांनी स्वतःच्या आसपासही फिरकू दिले नाही. राजकारणात विरोधकांवर मात करताना सदैव खुलेपणा जतनकेला. समोर इंदिरा गांधी असोत वा राजीव गांधी त्यांच्याशी राजकीय व्यवहार करताना परखड आणि स्वाभिमानी भूमिकाच कायम राखली. गुरू आणि ज्येष्ठ बंधूंच्यास्थानी असलेल्या यशवंतराव चव्हाणांवर त्यांनी निःस्सीम प्रेम केले. 'एक यशवंत आणि दोन वसंत' या समीकरणाने महाराष्ट्र आणि देशाच्या राजकारणात इतिहास घडविला होता. त्या समीकरणातील एक महत्त्वाचा धागा म्हणजे दादांचेयशवंतरावांवरील निखळ प्रेम हाच होता! दादा आणि उभा महाराष्ट्र यशवंतरावांना 'साहेब' म्हणूनच ओळखायचा. त्या साहेबांशी संघर्ष करतानाही दादांनी खुलेपणाजतन केला. राजारामाबापू पाटील यांच्याशी त्यांचा राजकीय आणि तात्त्विक संघर्ष आयुष्यभर सुरू राहिला. त्यात व्यक्तिगत कटुता येऊ न देण्याचे मोठेपण राजारामबापूआणि दादांनी जपले होते. सहकार,कृषी आणि पाणी नियोजनाबरोबरच तांत्रिक शिक्षणाची द्वारे विनाअनुदानित शिक्षण संस्थांना खुली करून क्रांती घडविणाऱ्या दादांनीराज्यातील प्रत्येक जिल्ह्यात त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या लाखो कार्यकर्त्यांची फळी निर्माण केली होती. त्याच कारणाने त्यांच्या सहवासात आलेल्या प्रत्येकाच्या अनुभवांनासामाजिक मूल्य प्राप्त झाले...

### नामदेवराव कराडकर

क्रांतिलढ्यात दादांच्या खांद्याला खांदा लावून लढलेले सांगलीचे क्रांतिकारक नामदेवराव कराडकर यांनी त्या काळातील आठवणी जागविल्या, तेम्हणाले, 'दादा, मोठा दिलदार आणि धाडसी माणूस! सांगलीचा जेल आम्ही त्यांच्यासोबत फोडला. मी अवघ्या १४ वर्षांचा होतो तरी स्वातंत्र्यलढ्याने झपाटलेलोहोतो. त्यावेळी मी सिटी पोस्टाजवळ असलेल्या सरकारी दवाखान्याच्या कर्मचारी निवासात राहत होतो. त्या काळात ब्रिटिशांच्या सैन्यदलात अनेक भारतीय सैनिकहोते. सैनिकांसाठी ब्रिटिश सरकार 'वॉर बुलेटिन' प्रकाशित करायचे. त्याच बुलेटिनचा नेमका उपयोग मी क्रांतिलढ्यात केला. ते सरकारी बुलेटिन पोस्टानेसगळीकडे पाठवले जायची. वरची दोन पाने सरकारी बुलेटिनची आणि आतमध्ये आमची क्रांतिलढ्याची पत्रके घुसडून मी ती पोस्टाद्वारेच चळवळीतील कार्यकर्त्यांनापाठवायचो. वर सरकारी बुलेटिन असल्यामुळे पोलिसांना संशय येत नसे, तसेच आमच्या घरात क्रांतिलढ्यासाठी लागणाऱ्या स्फोटके आणि शस्त्रांचा साठाही असे. मला आठवते, त्याच काळात भाई पेंडसे या स्वातंत्र्यवीराला पोलिसांनी अटक केली होती. त्याच्याजवळ जनरल लायब्ररीचे एक पुस्तक सापडले आणि माझ्यानावावरील त्या पुस्तकाच्या माध्यमातून पोलीस माझ्यापर्यंत पोहोचले. घरातील स्फोटके आणि शस्त्रांचा मुख्य साठा पोलिसांना मिळू नये यासाठी मी पोलिसांच्यालगेच नजरेस येतील अशा

अनुक्रमणिका

सायक्लोस्टाईल मशीन, काचेच्या बाटल्या, आपटबार यांसारख्या वस्तू मुद्दाम पोलिसांपुढे आणल्या आणि स्वतःच पोलिसांच्या स्वाधीनझालो. आमची मुख्य स्फोटके आणि हत्यारे सुरक्षित राहिली! दादा ज्या सांगली संस्थानच्या जेलमध्ये होते तेथेच मला पोलिसांनी टाकले. सांगली संस्थान हे त्याकाळात स्वातंत्र्यलढ्यातील कार्यकर्त्यांसाठी सुरक्षित मानले जायचे. ब्रिटिशांना जेरीस आणणाऱ्या विध्वंसक कारवाया सांगली संस्थानच्या बाहेर करायच्या आणि सांगलीत येऊन सुरक्षित लपायचे, असे त्यावेळी कर्नाटक आणि दक्षिण महाराष्ट्रातील स्वातंत्र्यवीरांचे धोरण असायचे. भाई पेंडसे हे देखील त्याच काळात त्याच जेलमध्ये होते. दादांच्या नेतृत्वाखाली जेल फोडण्याचा निर्णय आम्ही सर्वांनी घेतला. आम्ही सर्वांनी 'आमच्या दादांना का मारले?' असा कांगावा करत गोंधळ सुरूकेला. मी व भाई पेंडसेंनी सहा बंदुका व काडतुसा आमच्या ताब्यातघेतल्या आणि इतर क्रांतिवीरांसोबत तटावर पोहोचलो. सर्वजण तटावरून खंदकात उड्या मारून पळून जाणार होते. मला व पेंडसेंना पोहायला येत नसल्यानेआम्हाला पाण्याने तुडुंब भरलेल्या खंदकात उड्या मारणे शक्य नव्हते, त्यामुळे आम्ही पोलिसांना निःशस्त्र करण्यासाठी बंदुरा व काडतुसे खंदकात फेकूनदिली आणिआम्ही जेलच्या आमच्या खोलीत जाऊन बसलो.

आपल्या आठवणी सांगताना कराडकर दादा भावनाविवश बनलेले होते. स्वातंत्र्यांनंतर कामगार चळवळीत काम करीत असताना दादांशी असलेली मैत्रीत्यांनी कशी अबाधित राखली हेही ते सांगायला विसरले नाहीत. या क्रांतिवीराचे ज्येष्ठ चिरंजीव महेश हे सध्या सांगलीतील प्रथितयश 'चतुरंग' या जाहिरात संस्थेचेसंचालक आहेत. तसेच त्यांचा साहित्य, सांस्कृतिक आणि समाजिक चळवळीत सक्रिय सहभाग असतो. दुसरे चिरंजीव राजेश हे पुरोगामी आणि भ्रष्टाचारविरोधीचळवळीत असतात. त्यांना दोन कन्या असून, गीता अरूण वायचळ (सांगलीवाडी) शिक्षिका आहेत, तर दुसरी कन्या सुप्रिया अविनाश पिसे या चिपळूण येथे असतात.

### शैलजा वहिनी

दादा जेवढे कणखर आणि धाडसी होते तेवढेच कुंटुंबाच्या बाबतीत हळवेदेखील होते. दादांविषयी स्व. प्रकाशबापू पाटील यांच्या पत्नी आणि दादांच्यास्नुषा शैलजाताई यांच्याशी प्रस्तुत लेखकाने संवाद साधला. दादांचे आई-वडील दादा अजाण असतानाच निवर्तले. दादांनी पहिली मुलगी आणि दोन अपत्येदेखीलकाळाने हिरावून घेतली होती. त्यामुळे दादा कुटुंबाविषयी कमालीचे भावनिक होते. शैलजाताई म्हणाल्या, 'मी ज्याच्यावर प्रेम करतो, ज्याला जीव लावतो, त्याच्यावर 'देव संकट आणतो, अशा प्रकारचा भाबडा विचार दादांच्या मनात अनेकदा येऊन जायचा. त्यांनी ज्यांच्यावर प्रेम केले, ते शामरावदादा आणि काही मित्रअकाली गेल्यामुळे दादांना तसे वाटत असावे. म्हणूनच दादा आम्हा कुटुंबीयांची कमालीची काळजी घ्यायचे. सतत लक्ष ठेवायचे. निर्णय आणि राजकारणात बऱ्याच वेळा कठोर वाटणारे दादा कुटुंबातील एखाद्या छोट्या-मोठ्या घटनेवेळीही हळवे झाल्याचा अनुभव यायचा. दादांसारख्या लोकनेत्याची सून म्हणून वावरत असताना, संसार, कौटुंबिक आणि समाजिकजबाबदाऱ्या पार पाडत असताना दादांचे संस्कारच मला उपयोगी पडले.

मला आठवते, माझी कन्या चिमू (मधू) हिच्या जन्मावेळची ती घटना आहे. चिमूला प्रकृतीच्या काही समस्या निर्माण झाल्या होत्या. त्यामुळे माझ्या आणिमाझ्या पोटातील चिमूच्या वैद्यकीय तपासण्या तज्ज्ञ डॉक्टरांकडून करून घेण्यात आल्या. चिमूच्या हृदय आणि किडनीसंदर्भात अडचणी होत्या. दादांनी देशभरातील तज्ज्ञांचा सल्ला घेतला आणि माझे बाळंतपण लंडन येथे तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली

करायचे ठरले. त्याप्रमाणे आम्ही लंडनला रवाना झालो. चिमूवरील शस्त्रक्रिया यशस्वी झाली; पण त्याचवेळी काहीतरी तांत्रिक अडचणींमुळे टेलिफोन सेवा ७-८ तासांसाठी बंद झाली होती. आम्ही लंडनहून आणि दादा मुंबईतूनआमच्याशी संपर्क साधायचा प्रयत्न करीत होते. मात्र संपर्क होत नव्हता. शस्त्रक्रिया आणि सर्व उपचार यशस्वी झालेली होते; पण संपर्क होत नसल्यामुळे तसा निरोपदादांपर्यंत पोहोचत नव्हता. दादा त्यावेळी अस्वस्थ बनले. आमच्या काळजीने त्यांच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या... असे भावनिक आणि हळवे दादा!दुसऱ्याचे दुःख पाहून व्यथित होणारे. ते माझ्यासाठी देवासमान होते.

आपल्या मुलाने स्वतःच्या पायावर उभे राहावे असेच त्यांचे तत्त्व होते. त्यांनी प्रकाशबापूंनादेखील त्याच तत्त्वाने वागविले. सुरुवातीच्या काळात बापू एकउद्योग उभा करू इच्छित होते. त्यावेळी त्यांना आर्थिक मदतीची गरज होती. दादांनी मात्र स्वतःमदत केली नाही. आपल्या एका मित्राला बापूंना उसने पैसे द्यायला सांगितले आणि बापूंनाही ते मित्राचे पैसे वेळेत देण्याची ताकीद दिली. आपल्या तत्त्वासाठी त्यांनी कधीही तडजोड केली नाही आणि कुटुंबालाही तत्त्वाने वागण्याचा संस्कार दिला. तोच संस्कार माझ्या कुटुंबाचा आयुष्याचा आधार आहे, याचा मला आनंद वाटतो.

## मदन पाटील

स्वर्गीय विष्णुअण्णा पाटील हे दादांचे पुतणे. दादांच्या राजकीय वाटचालीत दादांच्याच कार्यपद्धतीचा अंगीकार करून विष्णुअण्णांनी सांगली जिल्ह्याचे राजकारण केले. त्यांचे चिरंजीव मदन हे दादांचे आवडते नातू! दादांच्या आठवणी सांगताना माजी मंत्री मदन पाटील म्हणाले, ‘ज्येष्ठ नातू म्हणून दादांचा माझ्यावर विशेष जीवहोता. त्याच कारणाने ते मला अनेकवेळा सोबत न्यायचे. त्यांच्या सहवासात लोकांकडून मिळणारे प्रेम आणि मान यामुळे कार्याची प्रेरणा मिळायची. दादा मला प्रोत्साहन द्यायचे; पण प्रत्येकवेळी लोकांची इच्छा असेल तरच कुठलेही काम आणि जबाबदारी स्वतःकडे घे, असे बजावून सांगायचे. दादा राजस्थानचे राज्यपाल असताना मी सांगलीचा नगराध्यक्ष झालो. त्यावेळी दादांना खूप आनंद झाला. त्यांचे आशीर्वाद घेण्यासाठी मी जयपूरला गेलो होतो. त्यावेळी दादांनी जयपूरमधील मान्यवरांना बोलावून माझा तेथे सत्कार केला. ते प्रत्येकाला ‘मेरा पोता सांगली का मेयर बन गया’ असे भूषणाने आणि कौतुकाने सांगायचे. दादांनी केलेल्या त्या कौतुकाने माझा ऊर भरून आला होता. त्याचकाळात राजस्थानमधील एका मंदिराचा कळस चढविण्याचा कार्यक्रम होता. दादांनी त्या कार्यक्रमाला त्यांचा प्रतिनिधी म्हणून मला पाठविले आणि माझ्याच हस्ते त्या मंदिराला कळस चढविला गेला. उत्साह आणि धडाडीचे माझे ते वय होते. त्याच धडाडीतून एक किस्सा सांगलीत घडला. शिवाजीराव देशमुख सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री होते. जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती होती. त्या परिस्थितीवर उपाययोजना तातडीने व्हावी यासाठी मी जोश आणि धडाडीने ‘पालकमंत्र्यांना जिल्हा बंदी’ चा निर्णय जाहीर केला. वृतपत्रांमधून बातम्या प्रसिद्ध झाल्या आणि खळबळ उडाली. दादांचा नातू काँग्रेसच्याच पालकमंत्र्याला ‘जिल्हा बंदी’ करतो म्हणजे काय? दादांनी लगेचच मला बोलावून घेतले. पालकमंत्री देशमुखसाहेबांची भूमिका मला समाजावून सांगितली आणि तो वाद संपविला. राजकारण असो अथवा वैयक्तिक संबंध असोत, दादा प्रत्येकाला प्रेमाने आणि विश्वासानेच जपायचे. अनेकदा एखाद्या लहान मुलासारखे वागणे देखील त्यांना गैर वाटत नसे. दादा दिल्ली वास्तव्यात असताना आम्हा नातवंडांवर एक-एक महिना त्यांच्याकडे राहायची जबाबदारी असायची. ती आनंददायी जबाबदारी पार पाडत असताना दादांचा असाच एक अनुभव मला आला. लोक तिजोरीत पैसा-अडका ठेवतात. दादांनी दिल्लीतील

अनुक्रमणिका

निवासस्थानी मला तिजोरीची चावी दिली आणि सांगितले, 'तिजोरी उघड आणि त्यातील पेटी घेऊन ये.' मी उत्सुकतेने तिजोरी उघडली. ती पेटी हातात घेऊन दादांसमोर आलो. दादांनी ती पेटी माझ्या हातातून घेतली आणि उघडली. त्या पेटीत दादांनी 'सुरक्षित' ठेवलेली मिठाई होती. आपल्याला आवडणाऱ्या मिठाईलातिजोरीत ठेवणारे दादा! डायबेटीसचा विकार वाढल्याने त्यांना गोड खाण्यापासून परावृत्त करायचा आमचा प्रयत्न असे. दादा मात्र आपल्याला आवडेल तसेच करायचे. लोकांमध्ये राहून, लोकांसाठी जीवन झिजविण्याचा वसा आमच्या कुटुंबाला दादांनी बहाल केला आहे. त्यांचा नातू म्हणून मला त्या वारशाचा अभिमान तर आहेच; पण त्याच्या जपणुकीच्या जबाबदारीची जाणीव देखील दादांच्या आठवणी सतत देत राहतात.'

## प्रतीक पाटील

दादांनी आपल्या नातवंडांवर नेहमीच प्रेम केले. त्यात पप्पू म्हणजे विद्यमान केंद्रीय कोळसा राज्यमंत्री प्रतीक पाटील यांच्यावर तर त्यांचा विशेष जीव होता. पप्पू खोडकर आणि खट्याळ म्हणूनच कुटुंबात प्रसिद्ध होता. दादांच्या अंगाखांद्यावर खेळताना आपण ज्या व्यक्तीच्या अंगाखांद्यावर खेळतो, ती व्यक्ती उभ्या महाराष्ट्राचा कारभार पाहते आहे आणि ती खूप मोठी व्यक्ती आहे याची समज त्या वयात असायचे कारणच नव्हते. त्याच कारणाने दादांचा लाडका पप्पू लहानपणी दादांसोबत अनेक ठिकाणी फिरायचा. छोटेमोठे कार्यक्रम असोत वा बैठका प्रतीकना प्रत्येक ठिकाणी मुक्त प्रवेश असे. त्यांनी कुठेही केलेली, कुठलीही कृती निरागस अशीच असे. प्रतीक पाटील यांनी दादांच्या सहवासातील अनेक आठवणी सांगितल्या. दादांना भेटायला येणाऱ्या अतिमहत्त्वाच्या व्यक्तींपासून मंत्र्यांपर्यंतच्या व्यक्तींशी प्रतीक सहज आणि निरागसपणे कसे वागायचे, अनेक मंत्री दादांचा ठावठिकाणा जाणून घेण्यासाठी प्रतीकना कसे विचारायचे, याचे अनेक किस्से प्रतीक यांनी सांगितले. लोकनेता आणि त्याचे लोकांशी असलेले अतूट नाते काय असते, याचा अनुभव त्यांनी लहानपणापासून दादांच्या सहवासात घेतला.

दादांनी आपल्या नातवंडांवर प्रेम केले. आपल्या नावावर त्यांना समाजात वेगळी आणि खास वागणूक दिली जाऊ नये, अशी त्यांची इच्छा असे. आपल्या नातवंडांनी सर्वसामान्य विद्यार्थ्यांप्रमाणेच वागले पाहिजे आणि इतरांनीही त्यांना खास वागणूक न देता सर्वसामान्य वागणूकच द्यावी, हा दादांचा अट्टहास असे. त्याच कारणाने प्रतीक यांना वसतिगृहात ठेवण्यात आले होते. दादांचा नातू म्हणून त्यांना वेगळी वागणूकदिली जाणार नाही, याची तेथे दादांनीच सोय करून ठेवली होती. त्यामुळे जो न्याय इतर विद्यार्थ्यांना तोच प्रतीकना! त्यातूनही प्रतीक काहीतरी शक्कल लढवायचे आणि दादांना तेथे बोलावून घेऊन शाळेला दांडी मारायचे.

प्रतीक आणि त्यांच्या भावंडांचे बालपणातील लाड दादांनी पुरेपूर पुरविले; पण त्यातही शिस्त आणि संस्कारांची काळजी होती. त्याचीच साक्ष देणारा एक किस्सा प्रतीक पाटील यांनी सांगितला. ते म्हणाले, 'मी आणि आमची भावंडे 'वर्षा' बंगल्यावर खेळणी घेऊन खेळत बसलो होतो. आमच्याजवळ खेळण्यातील रायफली होत्या. त्याच रायफली घेऊन आमचा खेळ चालला होता. तेवढ्यात ऑफिसला जाता जाता दादा आमच्याजवळ आले. त्यांनी आमच्या खेळण्यातील रायफली पाहिल्या आणि ते रागावले. रायफली खेळायला का आणल्या यावरून ते चिडले होते. त्यांनी सेवकाला आमच्या खेळण्यातील रायफली काढून घ्यायला सांगितले. आम्ही वैतागलो. दादांशी लाडाने भांडू लागलो; त्यावेळी दादांनी तुम्हाला संध्याकाळी नवी खेळणी आणून देतो असे समजावले. त्याच संध्याकाळी दादा आम्हाला वरळीच्या

एका खेळण्यांच्या दुकानात घेऊन गेले. आम्हाला आवडतील ती आणि हवी ती सर्व खेळणी स्वतः घेऊन दिली. पुढे रायफलसारखी विध्वंसक खेळणी आणायची नाहीत, असे आम्हाला बजावून सांगितले. त्या वयात मला दादांनी केलेल्या या कृतीचा अर्थ समजला नव्हता; पण पुढे समजू लागल्यानंतर दादांच्या त्या कृतीमागे कोणता विचार दडलेला होता, ते लक्षात आले.

दादांनी क्रांतिलढ्यात ब्रिटिशांशी लढण्यासाठी हातात बंदूक घेतली होती. अनेक विध्वंसक कारवाया बुंदकीच्या आधाराने केल्या होत्या. स्वातंत्र्यानंतर मात्र त्यांनी विधायक काम हेच आपल्या जीवनाचे उद्दिष्ट ठेवून विध्वंसाच्या आठवणींना तिलांजली दिली होती. त्याच कारणाने आपल्या नातवंडांच्या हाती खेळण्यातील बंदूकदेखील त्यांना सहन होत नव्हती. आज मला त्यांचा नातू म्हणून अभिमान वाटतो की, मी दादांच्याच तत्त्वाशी प्रमाणिक राहत समाजसेवा करीत आहे. दादांनी सांगली जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्पासंदर्भात जे स्वप्न उराशी बाळगून कार्य केले, त्याच स्वप्नाला साकार करण्याचे भाग्य मला लाभत आहे. ही दादांची खूप मोठी पुण्याई माझ्या गाठीशी आहे. त्या पुण्याईचा ठेवा मला लोकांची सेवा करताना पदोपदीप्रोत्साहन आणि प्रेरणा दतो.'

## यशवंत हाप्पे

दादांच्या जीवनात एक सेवक आणि सहायक म्हणून काम करीत असताना ज्यांनी 'दादांचे मानसपुत्र' हा लौकिक प्राप्त केला होता. सध्या प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस असलेले यशवंत हाप्पे दादांबद्दल म्हणतात, '१९७१ मध्ये मी एस. एस. सी. त शिकत होतो. त्याच काळात प्रदेश काँग्रेसच्या कार्यालयात माझा वावर एक शाळकरी मुलगा म्हणून असे. त्यामुळे काँग्रेस कार्यालयात पडतील ती कामे मी खुशीने करत असे. त्याच दरम्यान दादांची आणि माझी भेट व्हायची. एकेदिवशी दादांनी मला त्यांच्यासोबत काम करण्याची सूचना केली आणि त्या दिवसापासून त्यांच्या अखेरच्या श्वासापर्यंत मी सावलीसारखा त्यांच्यासोबत राहिलो. त्यांची सेवा करू शकलो, हे मी माझे भाग्य समजतो. त्यांच्या औषधांच्या वेळा, जेवणाच्या वेळा पाळण्याचा माझा हट्ट असे. त्या हट्टामुळे अनेकदा ते माझ्यावर रागवायचे; पण त्या रागातही प्रेम असे. एखाद्यावर विश्वास बसला की, दादा त्या व्यक्तीवर जिवापाड प्रेम करायचे. माझ्या लग्नाची गोष्ट आठवते. माझे लग्न ठरले आणि मी दादांना आनंदाने ती बातमी सांगितली. दादा खूश झाले; पण लग्नाची तारीख मात्र त्यांनी निश्चित करू दिली नाही. मी विचारायचो; पण दादा फक्त 'जरा थांब' एवढेच म्हणायचे, दोन महिने असेच गेले. माझ्या लग्नाची तारीख निश्चित होईना. शेवटी दादांनीच मला लग्नाची तारीख सांगितली! ते माझ्या लग्नाची तारीख निश्चित करण्यासाठी विलंब का करत होते, तर त्यांना माझे लग्न त्यांचे पुतणे अरविंद व पुतणी विजया यांच्या लग्नातच करायचे होते. ठरविल्याप्रमाणे सांगलीच्या महात्मा गांधी वसतिगृहाच्या प्रांगणात मोठ्या थाटात दादांनी माझे लग्न त्याच मांडवात लावून दिले. हा जिव्हाळा आणि प्रेम माझ्या नशिबी आले. मुंबई, दिल्ली आणि जयपूरच्या वास्तव्यात अनेक प्रसंगांचा साक्षीदार मी ठरलो. दादा राजस्थानचे राज्यपाल असताना जयपूरच्या राजभवनात दादांची प्रकृती बिघडली. मी तातडीने तिथल्या डॉक्टरना बोलावून उपचार सुरू केले; पण त्यांच्या प्रकृतीत सुधारणा झाली नाही. अखेर मध्यरात्री त्यांना मुंबईला उपचारासाठी हलवावे असे ठरले. त्यावेळी शिवराज पाटीलसाहेब केंद्रीय हवाई वाहतूक मंत्री होते. दादांनाविशेष विमानाने मुंबईला हलविण्याची गरज असल्याने तशी व्यवस्था करण्याची विनंती करण्यासाठी मी शिवराजजींना मध्यरात्री फोन लावला. दादांची प्रकृती बिघडल्याचा निरोप तातडीने शिवराजजींनी तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांना दिला. राजीवजींनी पंतप्रधान म्हणून त्यांच्या सेवेत असलेले विमान दादांसाठी जयपूरला पाठविण्याची सूचना

अनुक्रमणिका

शिवराजजींना केली. मध्यरात्री विमान जयपूरला आले आणि आम्ही तातडीने दादांना घेऊन मुंबईला रवाना झालो. बॉम्बे हॉस्पिटलमध्ये त्यांच्यावर वेळेत उपचार झाले आणि त्यावेळी दादांच्या जिवावरील संकट टळले. प्रकृतीने कितीही त्रास दिला तरी दादा आग्रहाने अनेक कार्यक्रमांना हजर राहायचे. त्यांच्या शेवटच्या काळातील सोलापूरच्या कार्यक्रमाला जातानाही त्यांची प्रकृती साथ देत नव्हती. सोलापूरला जाण्यापूर्वी त्यांनी लोणावळ्याच्या एका कार्यक्रमाला उपस्थिती लावली होती. त्या कार्यक्रमाला शरद पवारसाहेब देखील होते. त्यांनी दादांना सोलापूरला न जाता विश्रांती घेण्याची विनंती देखील केली होती; पण दादांनी ऐकले नाही आणि ते सोलापूरच्या कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी निघून गले. प्रत्येकाचे मन व भावनांचा विचार करून, त्यांचा आदर राखून दादा वागायचे. माझ्या मुलाच्या नामकरणाचा विधी दादांच्या व्यस्त कार्यक्रमामुळे व दादा मला सोडत नसल्याने सतत लांबणीवर पडायचा. अखेर दादा स्वतः माझ्या मुलाच्या नामकरण विधीस उपस्थित राहिले. आनंदात सहभागी झाले. आमच्या कुटुंबाचा मान वाढवला. राज्यपालपद सोडल्यानंतर दादा मला अनेकदा एखाद्या मंत्र्याकडे तू सेवा कर, मी काही मंत्र्यांना सांगतो असे म्हणायचे. मला मात्र दादांना सोडायचे नव्हते. दादांच्या शेवटच्या श्वासापर्यंत त्यांची मी सेवा करू शकलो, याचा मला आनंद वाटतो.'

## डॉ. डी. वाय. पाटील

डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे सर्वेसर्वा आणि त्रिपुराचे विद्यमान राज्यपाल डॉ. डी. वाय. पाटील सक्रिय राजकारणात असताना दादांचे विरोधक म्हणून ओळखले जायचे. राजकारणातील मतभेदाची सावली व्यक्तिगत संबंधांवर दादांनी कधीही पडू दिली नाही हे डॉ. डी. वाय. पाटील यांच्याच शब्दांत... 'राजारामबापू पाटील आणि माझी मैत्री घट्ट होती. त्याच कारणाने माझ्या राजकीय भूमिका या दादांच्या विरोधातीलअसायच्या; पण त्या भूमिकांना तात्त्विक व सैद्धांतिक आधार असे. असे असूनही दादांच्या प्रेमाचा व जिव्हाळ्याचा माझ्यावरील वर्षाव मात्र कधी कमी झाला नाही. १९५४ मध्ये माझे वडील आबाजींचे निधन झाले. त्यावेळी माझे सांत्वन करण्यासाठी दादा कोल्हापुरात कसबा बावड्यात माझ्या घरी आले. आबाजींनी क्रांतिलढ्यात दादांना केलेल्या मदतीच्या अनेक घटनांची त्यांनी मला तपशीलवारपणे माहिती सांगितली. आबाजींनी क्रांतिलढ्याला मदत म्हणून एक हजार चांदीचे रुपये दिले होते हेही सांगितले. आपलेपणा आणि निखळ प्रेम हे दादांमध्ये ओतप्रोत भरलेले होते. पुढे १९६९ मध्ये इंडिकेट व सिंडीकेट काँग्रेसच्या राजकारणात मी दादांना न आवडणारी भूमिका घेतली. राजारामबापू पाटील आणि दादांमध्ये ज्या खुजगाव पाटबंधारे प्रकल्पावरून तात्त्विक मतभेद होते, त्या बाबतीत मी बापूच्या बाजूची भूमिका घेतली. नंतर १९७६ मध्ये शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री असताना मंत्रिमंडळाच्या पुनर्रचनेत दादांना वगळले जाणार अशी चर्चा होती. शंकररावांचा आणि माझा चांगला स्नेह होता. २५ फेब्रुवारी १९७६ रोजी सकाळी मी शंकररावांना भेटलो तेव्हा त्यांनी मला दादांना मंत्रिमंडळातून वगळणार नसल्याचे विश्वासाने सांगितले. त्यामुळे मी उत्साहाने सकाळी १० वाजता दादांना फोन करून तुम्हाला शंकरराव मंत्रिमंडळातून वगळणार नसल्याचे ठामपणे सांगितले पण; घडले मात्र वेगळेच! माझ्या फोननंतर दादा मंत्रालयात गेले, तर तेथे त्यांना वगळल्याचे समजले. त्यांचा माझ्याबद्दल गैरसमज झाला. मला पश्चाताप झाला; पण नियतीने मला दादांकडे तसा खुलासा करण्याची संधीच दिली नाही. पुन्हा १९७८ मध्ये तसेच घडले. शरद पवार काँग्रेस सोडणार आणि दादांचे सरकार गडगडणार अशी चर्चा होती. मी शरद पवारांच्या बाजूने होतो. दिल्लीत चंद्रशेखर, शरद पवार यांची माझ्यासमक्ष बैठक झाली. पुढची दादांविरोधातील राजकीय नीती माझ्यासमक्षच ठरली. त्याचदिवशी मी दिल्लीहून विमानाने मुंबईला निघालो होतो. नेमके त्याच विमानात दादा, नरेंद्र तिडके आणि नासिकराव तिरपुडे होते. मी विमानात असल्याचे लक्षात येताच दादांनी

तिरपुडेंना माझ्याकडे पाठवले व शरद पवारांच्या हालचालीची चौकशी करायला सांगितली. मी मात्र राजनीती सांभाळली.' शरद पवार काँग्रेस सोडणार नाहीत, ते तुमच्यासोबत राहणार आहेत' असे मी तिरपुडेंना सांगितले. शरद पवारांना काँग्रेस सोडून मुख्यमंत्री व्हायचे होते! मलाराजकारणातील तत्त्व सांभाळायचे होते; पण त्या घटनेमुळे पुन्हा दादांचा रोष मी ओढवून घेतला. नंतरच्या काळात शिक्षण क्षेत्रात काम करणे हेच मी माझ्या जीवनाचे ध्येय ठेवले आणि राजकारणातून संन्यास घेतला.

डिसेंबर १९८६ मध्ये ताज हॉटेलमध्ये माझी आणि दादांची भेट झाली. रामराव आदिकही तेथे होते. दादा मला तिथून त्यांच्या बंगल्यावर घेऊन गेले. तिथे गेल्यानंतर त्यांनी माझ्याकडे दहा मिनिटे पाहिलेच नाही. नंतर काही क्षणात बोलते झाले. तू २५ फेब्रुवारी १९७६ रोजी शंकरराव मंत्रिमंडळातून तुम्हाला वगळणार नाहीत असा मला खोटा फोन का केलास? १९७८ मध्ये विमानात खोटे का बोललास? असे दोन प्रश्न विचारले. मी मात्र माझ्या मनात जे सत्य होते ते बोलून दाखविले. त्यावर दादांचे समाधान झाले. पुण्याला, कोल्हापूरला कॉलेज काढतो काय? असा सवाल त्यांनी केला आणि पुढे जी कृती त्यांनी केली, ती माझ्या आयुष्यभर मी विसरू शकणार नाही. माझ्या संस्थांच्या विविध कामांविषयीच्या एकाचवेळी ३६ ऑर्डर्सवर त्यांनी जागेवरच सह्या केल्या! पुण्याच्या संकुलाच्या जागेचा प्रश्नही फक्त सोडवला असे नाही, तर ती जागा घेण्यासाठी १५ लाख रुपयांची व्यवस्थाही करून दिली. नवी मुंबईतील शैक्षणिक संकुलाच्या जागा खरेदीसाठी महाराष्ट्र बँकेच्या चेअरमनला स्वतः फोन करून कर्जाची सोय केली. दादा म्हणजे राजासारखे विशाल अंतःकरण असलेला माणूस! ते राजस्थानचे राज्यपाल असताना त्यांनी मला आग्रहाने बोलावून चार दिवस थांबवून घेतले. ते लौकिकार्थाने शिकलेले नसले तरी शिक्षण क्षेत्राविषयी त्यांचे विचार क्रांतिकारी होते. कमी शिकलेले कामराज नाडर मद्रासचे (कर्नाटक) मुख्यमंत्री झाले तेव्हा १९६२ मध्ये मी दादांच्या मुंबईतील 'पटेल चेंबर्स' या निवासस्थानी एक पत्र लिहून 'कामराज मद्रासचे मुख्यमंत्री होऊ शकतात, मग दादा का नाही?' असा सवाल केला होता. १९७७ मध्ये ज्यावेळी दादा पहिल्यांदा मुख्यमंत्री झाले, तेव्हा त्यांनी तेच पत्र मला आवर्जून दाखविले.

## प्राचार्य पी. बी. पाटील

ध्यानी-मनी नसताना दादांनी ज्यांना आमदार केले, ते 'शांतिनिकेतन' शिक्षण संकुलाचे संस्थापक प्राचार्य पी. बी. पाटील यांच्याशी दादांचा विशेष स्नेह होता. प्राचार्य पाटील म्हणतात, 'अत्यंत खडतर आणि दुःखद पार्श्वभूमी लाभलेल्या दादांकडे माणसे जतन करण्याची उपजत शक्ती होती. माझा त्यांच्याशी संपर्क आला तो जे. पी. नाईक आणि यशवंतराव चव्हाण यांच्यामुळेच. ग्रामविकास संदर्भातील श्रीलंकेतील विशेष अभ्यास पूर्ण करून आल्यानंतर मला वेगळे काहीतरी करायचे होते. मी माझामानस जे. पी. नाईक यांच्याकडे बोलून दाखवला. त्यांनी मला या कामासाठी सांगलीची निवड करण्याचा सल्ला दिला. याकामी वंसतदादा मला मदत करतील अशी खात्रीही त्यांनी दिली. त्याच कामासाठी यशवंतराव चव्हाण यांनी दादांना फोन केला आणि त्यांना भेटण्यासाठी मी सांगलीत आलो. दादा तेव्हा १९६२ च्या विधानसभा निवडणुकीच्या पूर्वतयारीच्या धामधुमीत होते. तेथेच मी त्यांना भेटलो व माझ्या प्रकल्पाची माहिती दिली. त्या प्रकल्पासाठी मला २५ एकर जागेची आवश्यकता होती. दादांशी चर्चा झाल्यानंतर जागा निवडीसाठी ते माझ्यासोबत फिरले. जागेची निवड केली आणि मला फक्त एवढेच म्हणाले, 'आता सांगली सोडण्याचा पुन्हा विचार नको'. त्यानंतर प्रत्येक कामात दादांनी सक्रिय सहभाग राखला. अनेक विषयांवर ते माझ्याशी चर्चा करायचे. पंचायत राज संदर्भातील त्यांच्या कल्पना क्रांतिकारी होत्या. स्वच्छ मनाचा आणि दिलदार असाच हा माणूस होता.'

अनुक्रमणिका

## डॉ. पतंगराव कदम

भारती विद्यापीठाचे कुलपती व विद्यमान वनमंत्री डॉ. पंतगराव कदम हे स्वर्गीय यशवंतराव मोहिते यांचे शिष्य; पण त्यांचे आणि दादांचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते. दादांविषयीच्या आठवणी सांगताना डॉ. कदम म्हणाले, 'दादा म्हणजे एक भला माणूस! सांगली जिल्ह्याच्या राजकारणात यशवंतराव मोहिते भााऊंचा शिष्य म्हणूनच काम करत असल्याने व तेथे दादांचे पूर्वीचेच लोक असल्याने दादा मला आमदारकीला संधी देऊ शकत नव्हते हे स्पष्टच होते; पण दादांनी मला कधी दूर केले नाही. संधी मिळेल तिथे मला प्रोत्साहन आणि मदतच केली. १९६७ ते ७८ या काळात एस. टी. महामंडळाने महाराष्ट्रात खूप मोठे काम केले. त्यावेळी मी महामंडळाचा संचालक होतो. त्या काळात सांगली आणि कोल्हापूर जिल्हे महामंडळाच्या सातारा विभागात येत होते. मला सांगली जिल्ह्यासाठी स्वतंत्र विभागकरायचा होता. तसा प्रस्तावही महामंडळामार्फत शासनाला देण्यात आला होता. सांगली विभागाला मंजुरी मिळाली; पण जागा मात्र उपलब्ध नव्हती. हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी मी मुंबईत दादांना माहिम येथे त्यांच्या घरी जाऊन भेटलो. अडचण सांगितली. त्यांनी चुटकीसरशी प्रश्न सोडवला! साखर कारखान्याच्या गोदामाचीजागा देण्याचा फक्त निर्णयच घेतला नाही तर तातडीने कारखान्याच्या अध्यक्षांना फोन करून तशी कार्यवाही करण्याची सूचनाही देऊन टाकली. त्यामुळे त्यावेळी एस. टीमहामंडळाचे सांगली आणि जळगाव विभाग अस्तित्वात आले आणि कार्यरतही झाले. असे अनेक प्रसंग जीवनात आले की, त्या प्रसंगी दादा खंबीरपणे पाठीशी उभे राहिले.

आणखी एक प्रसंग आठवतो, भारती विद्यापीठाच्या पुण्यातील जागेचा वाद काही अपप्रवृत्तींनी उगीचच निर्माण केला होता. सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता झालेली असतानाही त्यावर काही मंडळी वृतपत्रांतून वाद वाढवीत होती. अशा प्रकरणांवर उपाय करण्याची दादांची खास शैली होती. ते मुख्यमंत्री असताना मी त्यांना एका कार्यक्रमासाठी बोलावले होते. दादांनी त्या कार्यक्रमानंतर भारती विद्यापीठ इमारतीच्या प्रतिकृतीसमोर मला आणि स्वतःला उभे केले आणि छायाचित्र काढायला सांगितले. त्या छायाचित्रावरूनच सर्वांना काय समजायचे ते समजले! येणाऱ्या कोणत्याही माणसाचे काम करणे हा दादांचा पिंड होता. त्यांच्या या स्वभावामुळे कॉंग्रेस पक्ष संघटनेला खूप उपयोग झाला. महाराष्ट्रात पक्ष संघटना मजबूत झाली. १९५७ च्या काळात कॉंग्रेसला मरगळ आलेली होती. द्विभाषिक राज्यपद्धती स्वीकारल्यामुळे महाराष्ट्रातील जनता कॉंग्रेसवर नाराज झाली होती. अशा परिस्थितीत दादांसारख्या नेत्याने कॉंग्रेस कार्यकर्त्यांमध्ये चैतन्य निर्माण केले. पक्ष मोठा केला. ते सत्तेपासून सतत दूर राहिले. मनात आणले असते; तर १९७५ पासून ते मंत्री बनू शकले असते; पण त्यांनी तसे न करता आपल्या सहकाऱ्यांना मोठे केले. यासाठी मनाचा मोठेपणा लागतो. तो त्यांच्यात उपजतच होता. कणखर बाणा हा त्यांचा विशेष गुण होता. तो त्यांनी आयुष्यभर जतन केला. कुठेही झुकणे नाही अथवा तडजोड करणे नाही, ही त्यांची कार्यप्रणाली आजही माझ्यासारख्या कार्यकर्त्यांला प्रेरणादायी ठरते.'

## विलासराव देशमुख

माजी मुख्यमंत्री व विद्यमान केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्री विलासराव देशमुख यांचा दादांशी घनिष्ठ संबंध होता. आपल्या जडणघडणीत वसंतदादांच्या सहवासाचा खूप मोठा वाटा असल्याचेही विलासरावांनी अनेकवार जाहीर कार्यक्रमांमधून कबूल केले आहे. ते दादांच्या मंत्रिमंडळात होते. त्याचबरोबर सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणूनदेखील त्यांनी काम पाहिलेले होते. त्यामुळे दादांशी

अनुक्रमणिका

त्यांचा जवळून संपर्क आला. दादांची नेतृत्वशैली व व्यक्तिमत्त्वासंदर्भात प्रस्तुत लेखकाने विलासरावांशी संवाद साधला तेव्हा विलासराव म्हणाले, 'राजकारणात बऱ्याच गोष्टी विसरायला शिकले पाहिजे, हे तत्त्व दादा स्वतःच्या कृतीने अप्रत्यक्षपणे शिकवायचे. ज्यांना दादांचे हे तत्त्व उमजले ते मोठे झाले. हा खूप मोठा गूण त्यांच्याकडे होता. त्याच कारणाने आलेल्या माणसाने भूतकाळात आपल्यासाठी काय चांगले-वाईट केले, याचा हिशेब दादांनी कधी मांडलाच नाही. भेटायला येईल त्याचे काम! मला आठवते... दादा त्यावेळी राजस्थानचे राज्यपाल होते. ते मुंबईत आले की, लोकांचा त्यांच्याभोवती गराडा असायचाच. त्या गराड्यातून कामासाठी त्यांना निवेदने दिली जायची. त्यावेळी त्या काळात मी राज्यमंत्री होतो. दादांनी एका निवेदनावर थेट माझ्या नावाने शेरा मारून एका कार्यकर्त्याला माझ्याकडे पाठवून दिले. राजस्थानचे राज्यपाल असताना महाराष्ट्रातील मंत्र्याला लेखी सूचना करणे संकेताला सोडून होते; पण सामान्य माणसाच्या कामापुढे दादांना असे संकेत कसे अडवतील? त्यांच्या उपजत सवयीप्रमाणे त्यांनी तो शेरा मारला. अखेर मी ते निवेदन बाजूला ठेवले आणि काम करून टाकले!

मुख्यमंत्रिपद असो वा राज्यपालपद; कुठलीही पदे दादांना कधीच नियम व शिष्टाचारांच्या बंधनात बांधून ठेवू शकली नाहीत. त्याच कारणाने ते सर्वार्थांनी 'लोकनेते' ठरले. माझा आणि दादांचा पहिला परिचय मी राज्य सहकारी बँकेचा संचालक असताना झाला. दादांनी अध्यक्षपदासाठी अर्ज दाखल केला. त्यांच्या उमेदवारी अर्जावर अनुमोदक म्हणून माझी सही होती, याचे मला सुरूवातीपासून भूषण वाटत होते. दादा एकदा माझ्यावर रागावलेही होते. दादा आणि अंतुले यांच्यामध्ये राजकीय संघर्ष सुरू असताना त्या संदर्भात एका इंग्रजी दैनिकाने माझा संदर्भ देऊनबातमी दिली. आमच्या काही 'हितचिंतकांनी' त्या बातमीचे कात्रण मराठीत भाषांतर करून दादांपर्यंत पोहोचविले. दादांनी मला बोलाविले. हे काय आहे? असे विचारले आणि एक-दोन दिवसांत खुलासा करण्याचा सल्ला दिला. मी अत्यंत नवखा होतो. आता काय करायचे? या प्रश्नाने अस्वस्थ बनलो. शेवटी काही पत्रकार मित्रांच्या मदतीने एका मराठी नियतकालिकात खुलासा दिला. १०-१५ दिवसांनंतर भेट झाल्यानंतर दादा एवढेच म्हणाले, 'विलासराव, ते वाचलं बरं का!'

माझ्यासाठी दादांची प्रत्येक गोष्ट ही वडीलकीच्या भूमिकेतून असायची. दादांच्या मंत्रिमंडळात माझा समावेश झाला. शिवाजीराव देशमुख गृहमंत्री आणि मी त्या खात्याचा राज्यमंत्री. शपथविधी झाला आणि दादांनी आम्हा दोघांनाही भेटायला बोलावले. दादांनी खास बोलावले म्हटल्यानंतर नक्की कशासाठी बोलावले असावे हे काही समजेना. अखेर शिवाजीराव व मी दादांना भेटायला त्यांच्या घरी पोहोचलो. आम्हा दोघांना घेऊन ते एका खोलीत गेले आणि बोलते झाले, 'गृहखातं हे खूप महत्त्वाचं खातं आहे. त्यात महत्त्वाचे म्हणजे मुंबई शहर! मुंबई ही मायानगरी आहे. तुमच्या खात्याचे काम करताना सतत हे लक्षात ठेवा. कुठल्याही मोहाला बळी पडू नका!' दादांनी एवढाच सल्ला दिला आणि आम्हाला शुभेच्छा देऊन रवाना केले. छोट्या-छोट्या वाटणाऱ्या गोष्टी किती मोठ्या असतात हे दादांच्या सहवासातून समजायचे. लोकांशी बांधीलकी असली की, सगळे प्रश्न आपोआप सुटू शकतात, हे दादांच्या प्रत्येक कृतीतून पटायचे. निखळ आणि निःस्पृह हा त्यांचा स्थायीभाव होता. त्यामुळे विरोधी पक्षदेखील बऱ्याच वेळा दादांना समजून घ्यायचे. एकदा विधिमंडळाचे अधिवेशन सुरू होते. सभागृहात गृहखात्याचा प्रश्न निघाला आणि नेमके मी व शिवाजीराव गैरहजर होतो. दादांनी विरोधकांनाच थेट सांगितले, 'ते दोघे येऊ द्यात, मग त्या प्रश्नावर बोलू! विरोधकांनीही ते मान्य केले. हे केवळ दादांनाच शक्य असे.'

अनुक्रमणिका

## सुशीलकुमार शिंदे

वसंतदादांना मुख्यमंत्रिपदावरून हटवून शरद पवार यांनी महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात नोंदविलेल्या 'पुलोद' च्या प्रयोगात एक मित्र म्हणून त्यांना साथ देणारे सुशीलकुमार शिंदे आणि दादांमध्ये जिव्हाळ्याचे नाते होत. त्या नात्याला राजकीयगटबाजीचा स्पर्श कधीही झाला नाही. त्याच कारणाने सुशीलकुमारांच्या दादांविषयीच्या भावनाही प्रेमाच्या आणि आपुलकीच्याच राहिल्या. दादांविषयी माजी मुख्यमंत्री व विद्यमान केंद्रीय ऊर्जामंत्री सुशीलकुमार म्हणतात, 'माझ्या राजकीय वाटचालीतील तो काळ अत्यंत महत्त्वाचा असा होता. दादा मुख्यमंत्री असताना पवार साहेबांसोबत मंत्रिपदाचा राजीनामा देऊन मी विरोधी बाकावर जाऊन बसलो. पुढे दादा मुख्यमंत्री झाल्यानंतर माझे मंत्रिमंडळात स्थान काय असेल? हा प्रश्न अनेकांपुढे होता; पण घडले वेगळेच! दादांनी मला बोलावून घेतले आणि चक्क राज्याच्या तिजोरीची चावी माझ्या स्वाधीन केली. मला पहिल्यांदा राज्याचा अर्थमंत्री होण्याची संधी दादांनी दिली. राजकारणातील कटुतेच्या पलीकडे जाऊन माणसांवर प्रेम कसे करावे आणि त्यांचे जतन कसे करावे हे दादांनी आम्हाला शिकविले. सोलापुरात सरकारी रुग्णालयाच्या उद्‌घाटनाचा कार्यक्रम होता. मुख्यमंत्री असलेल्या दादांच्या हस्तेच तो खूप मोठा कार्यक्रम झाला. त्यावेळच्या भाषणात दादांनी माझ्याबद्दल काढलेले उद्‌गार मी कधीही विसरू शकत नाही. 'राज्याच्या तिजोरीच्या चाव्या तुमच्या सुशीलकुमारांकडे आहेत' असे सोलापूरकरांना ठणकावून सांगताना त्यांनी माझा जो गौरव केला, ते माझ्या जीवनातील कामासाठी अत्यंत मौल्यवान असे प्रशस्तिपत्रच होते. एक मोठ्या मनाचा, दिलदार आणि वडीलकीच्या भूमिकेतून प्रत्येकाकडे पाहणारा माणूस म्हणूनच दादांकडे पाहिले गेले. येणाऱ्या प्रत्येक माणसाचे समाधान करण्याचा मनापासून अव्याहतपणे चाललेला प्रयत्न हा दादांचा गुण आमच्यासाठी सतत प्रेरणादायी ठरला. दादांच्या उत्तरार्धात त्यांची प्रकृती साथ देत नसतानाच्या काळात मला त्यांची सेवा करण्याची संधी दोन वेळा मिळाली. मुंबईत एकदा त्यांना प्रकृतीचा त्रास झाला होता, त्यावेळी मी त्यांना रूग्णालयात नेऊन त्यांच्यावर तातडीने उपचार करण्याची व्यवस्था केली होती. पुढे व्यापारी परिषदेच्या निमित्ताने दादा सोलापूरला आले होते. त्या परिषदेत भाषण करतानाच त्यांची प्रकृती बिघडली आणि त्यांना रुग्णालयात हलवावे लागले. त्या वेळी देखील दादांची सेवा करण्याचे भाग्य मला लाभले. शेतकरी, कामगार आणि मागासवर्गीयांच्या विकासाविषयीची त्यांची कणव दादांच्या मंत्रिमंडळात अर्थमंत्री म्हणून काम करत असताना मला अनेकदा अनुभवायला मिळाली. समाजाच्या शेवटच्या घटकाचाविचार करूनच राज्याचा संसार केला पाहिजे, हा दृष्टिकोन त्यांच्या प्रत्येक निर्णय आणि कृतीतून स्पष्ट व्हायचा. त्या दृष्टिकोनाचा माझ्या जीवनात खूप मोठा उपयोग मला झाला. आपल्या मुख्यमंत्रिपदाच्या विरोधात गेलेल्या मागासवर्गीय आमदाराला आपल्याच मंत्रिमंडळात जेव्हा मंत्री करण्याचा प्रसंग येतो; तेव्हा त्याला अर्थ खात्यासारखे प्रतिष्ठेचे खाते देण्याचा दिलदारपणा आणि पारख केवळ दादाच दाखवू शकतात. !'

## विजयसिंह मोहिते-पाटील

सहकार आणि ग्रामविकासाच्या आघाडीवर दादांसोबत आपल्या अखेरच्या क्षणापर्यंत राहिलेले 'बिनीचे शिलेदार' म्हणून सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांचे नाव आवर्जून घेतले जाते. सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यात दादांच्या प्रेरणेने आणि मदतीने माळरानावर नंदनवन फुलविण्याची किमया मोहिते-पाटलांनी केली. त्यांच्या निधनानंतर मोहिते-पाटील परिवाराचे राजकीय-सामाजिक पालकत्व दादांनी घेतले. त्या परिवारातील विजयसिंह मोहिते-पाटील या तरुणाची जडणघडण करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील दादांविषयी भरभरून

अनुक्रमणिका

बोलतात... ते म्हणाले, ‘दादा आणि माझ्या वडिलांच्या दोस्तान्यामुळे मला दादांचा लहानपणापासूनच सहवास लाभला. प्रत्येकाशी प्रेमाने वागावे, विश्वासाने कामे करावीत, जिव्हाळा वाढवत राहावा आणि सतत लोकांमध्ये राहण्याची शिकवण त्यांनी आम्हाला दिली. माझ्या विवाहास ते आवर्जून उपस्थित होते. जीवनाच्या प्रत्येक वळणावर आमच्या कुटुंबावर त्यांनी प्रेम केले. त्यांचे आमच्या जीवनात वडिलांचेच स्थान होते. त्यामुळे राजकारणाच्या पलीकडे जाऊनच प्रत्येक बाबतीत त्यांच्याशी माझा संवाद असे. त्यांचे रागावणे आणि रागावण्याचे कारण देखील आमच्याच हिताचे असे. ते माझ्यावर रागावले आहेत, असे क्वचितच प्रसंग आले. ते प्रसंग निभावून नेताना दादांनी मला जीवनाचे तत्त्वज्ञान शिकविले. त्याच शिदोरीवर लोकसेवेचे कार्य आम्ही अविरतपणे करीत आहोत. गावागावांत माणसे उभी करण्याच्या कौशल्याची दैवी देणगी दादांना लाभली होती. त्याचमुळे ते स्वतः कोणत्याही परिस्थितीत असले तरी दुसऱ्याच्या मनाचा विचार करूनच वागायचे,बोलायचे. मला आठवते, दादांच्या उपस्थितीत आम्ही अकलूजला शेतकरी मेळावा आयोजित केला होता. त्याच दौऱ्यात ते सोलापूर शहरातील व्यापारी परिषदेला उपस्थित राहणार होते. प्रकृती साथ देत नसतानाही लोकांमध्ये राहण्याच्या जिद्दीतून त्यांनी तो दौरा केला. व्यापारी परिषदेच्या कार्यक्रमातच त्यांची प्रकृती बिघडली आणि त्यांना रुग्णालयात दाखल व्हावे लागले. त्यांच्या प्रकृतीबद्दल निरोप मिळताच मी सोलापुरात आलो. त्यांच्यासोबत राहिलो. त्यांच्या पुढील उपचाराचे नियोजन केले. त्यांना पुढील उपचारासाठी रेल्वेने मुंबईला नेण्याचा निर्णय झाला. डॉक्टरांच्या पथकासह मुंबईला घेऊन जाताना मी त्यांच्या जवळच उभा होतो. थोडा वेळ गेला आणि मी बराचवेळ उभा असल्याचे दादांच्या लक्षात आले. ते माझ्याकडे पाहात मला म्हणाले, ‘बाळ, कितीवेळ उभा राहतोस? आता थोडा बस! स्वतःची प्रकृती बरी नसतानाही दादांना मात्र दुसऱ्याची चिंता! दादांच्या याच जिव्हाळ्याने अनेकांना बांधून ठेवले होते. त्याची प्रचिती आजही राज्यात दौरे करत असताना अनेकांना येते. सहकार क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य देशाला दिशा देणारे होते. ‘ग्रामीण माणूस आणि त्याचा विकास’ या विषयीचा स्पष्ट विचार व धोरण याची सांगड सहकार क्षेत्राशी घालण्याची किमया त्यांनी केली. त्यांच्या जयंती दिनाला ‘सहकार दिन’ म्हणून साजरा करण्याचा निर्णय आम्ही घेतला. ‘सहकार दिन’ दादांच्या सहकार क्षेत्रातील कार्याचे स्मरण आपल्याला सदैव देत राहील.

### आर. आर. पाटील (आबा)

महाराष्ट्राच्या राजकारणात आपली वेगळी छाप निर्माण करणारे माजी उपमुख्यमंत्री व विद्यमान गृहमंत्री आर. आर. पाटील (आबा) हे सांगली जिल्ह्याचे. त्यांच्या राजकारणाची सुरुवात जिल्हा परिषद सदस्य पदापासून झाली. ते सदस्य झाले दादांच्या त्या वेळच्या विरोधी समाजवादी काँग्रेस पक्षातून; पण विजयी झाल्यानंतर पोहोचले दादांचे आशीर्वाद घ्यायला! त्यावेळी दादांनी त्यांचे भरभरून कौतुक केले होते. आर. आर. आबांशी प्रस्तुत लेखकाने संवाद साधला तेव्हा ते दादांविषयी मनमोकळेपणाने बोलले. ते म्हणाले, ‘दादा हे माझे राजकीय दैवत! बालपणी गरिबी आणि संकटांशी माझा सामना सुरू असताना सांगली जिल्ह्यात दादांनी विकासाची चळवळ जोमदारपणेचालविली होती. राजकारणाच्या पलीकडे जाऊन शेतकरी आणि सर्वसामान्य माणूस डोळ्यांसमोर ठेवून आपल्या भागाचा विकास कसा करायचा असतो, हे दादा उभ्या महाराष्ट्राला दाखवत होते. त्या काळात दादांच्या माणुसकीचे आणि दिलदारपणाचे अनेक किस्से ऐकत मी लहानाचा मोठा झालो. त्यामुळे एकप्रकारे लहानपणीच माझ्यावर दादांच्या समाजिक, राजकीय कार्यांनी संस्कार घडविला. त्याचा उपयोग मला आयुष्यभर होतो आहे. त्यांच्या सहवासातील अनेक घटना, घडामोडींनी मला जीवनाचे तत्त्वज्ञान शिकविले. मी जिल्हा परिषदेत दादांच्या

अनुक्रमणिका

विरोधी गटाचा सदस्य होतो; पण दादांकडे विरोधक आणि आपला अशी कधी वर्गवारी नव्हती. त्यामुळे त्यांच्याकडे मुक्त प्रवेश असायचा.

जिल्हा परिषद सदस्य झाल्यानंतर तासगावला आमचा सत्कार आयोजित करण्यात आला होता. त्या सत्काराला प्रमुख पाहुणे म्हणून दादा येणार होते. समारंभाला गर्दी झाली होती. दादांचे कार्यक्रमस्थळी आगमन झाले. मी व्यासपीठावर माईकवरून 'वसंतदादा पाटलांचा विजय असो!' अशा घोषणा देत होतो. उपस्थित जनसमुदायही दादांच्या नावाने घोषणा देत होता. दादा आपल्या गाडीतून उतरले. व्यासपीठाकडे आले. माईकवरून माझे घोषणा देणे सुरूच होते. दादा व्यासपीठावर आले आणि माझ्याजवळील माईकचा ताबा त्यांनी घेतला आणि त्यांनीच घोषणा द्यायला सुरुवात केली. 'आर. आर. पाटलांचा विजय असो! आर. आर. पाटलांचा विजय असो!!' दादांच्या या घोषणांनी मी भांबावून गेलो. अक्षरशः अंगावर शहारे आले. दादा माझ्या नावाने घोषणा देताहेत, यापेक्षा मोठेपणा तो काय?

आपल्या माणसांना मोठं करताना त्यांचं भरभरून कौतुक करायचं हा दादांचा स्वभाव. असे अनेक प्रसंग दादांच्या राजकारणात काम करणाऱ्या माणसाला प्रेरणा देण्याचा दृष्टिकोन सांगून जायचे. मला सांगायला नेहमी आनंद वाटतो की, माझे सर्वेसर्वा शरद पवारसाहेबांचा आणि माझा पहिला परिचय दादांनीच करून दिला होता. त्यावेळी दादा साहेबांना म्हणाले होते, 'शरदराव, हा आर. आर. पाटील शेतकऱ्याचा पोरगा आहे. गरिबीतून आला आहे. ग्रामीण भागात खूप चांगलं काम करतोय, तुम्हाला सांगतो, एक दिवस महाराष्ट्रात हा खूप मोठा माणूस होणार आहे.' दादांनी त्यावेळी पवारसाहेबांना करून दिलेला माझा परिचय माझ्या हृदयात कोरलेला आहे.

दादा राजस्थानचे राज्यपाल असताना मी आमच्या भागातील एका मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी दादांना घेऊन येतो, असे लोकांना सांगितले होते. तो दिवसही ठरला; पण आचारसंहितेसारख्या कुठल्यातरी अडचणीमुळे दादांनी अशा कार्यक्रमाला त्या काळात जाऊ नये; अशा प्रकारचा संकेत होता. दादा त्या वेळेस सांगलीत होते. मी दादांकडे जाऊन बसलो. त्यांचे स्वीय सहायक यशवंत हाप्पेंच्या माध्यमातून दादांना कार्यक्रमाला येण्याची गळ घालू लागलो. दादा गर्दीत होते. 'कार्यक्रमाला येऊ शकणार नाही;पण तू थांब, असे सांगितले. मी निराश झालो होतो. दादा कार्यक्रमाला येणार नाहीत हे गृहीत धरून तेथेच थांबलो होतो. काही वेळ गेला. मग अचानक दादांनी मला सोबत येण्याचा इशारा केला. आम्ही गाडीत बसलो आणि आमच्या भागाकडे निघालो. येणार नाही म्हणणाऱ्या दादांनी घेतलेल्या या भूमिकेमुळे मी तर खूश झालोच; पण त्या मंदिराच्या ठिकाणी जमलेल्या शेकडो लोकांच्याही आनंदाला पारावर उरला नाही. कार्यकर्ता आणि जनता यांना अवास्तव नियम आणि संकेतांच्या चौकटीत बांधून ठेवणे दादांना कधी रुचलेच नाही. त्यांचा गावागावांचा अभ्यास भल्याभल्यांना बुचकळ्यात टाकणारा होता.

एकदा एका कार्यक्रमासाठी मी दादांसोबत तासगावहून विट्याला मोटारगाडीतून निघालो होतो. प्रवासात गप्पांबरोबरच दादांचे शेतीवर लक्ष असायचे. कोणत्या शेतात कोणते पीक आहे, त्याची वाढ आणि इतर संदर्भात आजची परिस्थिती काय आहे; याविषयीचे त्यांचे निरीक्षण चालू असायचे. त्या प्रवासात बोलत बोलत दादांनी एका शेताकडे बोट दाखवले आणि म्हणाले, 'नारळाची झाडे दिसणारे ते शेत कोणाचे?' मी अंदाजाने नाव ठोकून दिले आणि ते चुकीचे होते. दादांनी मात्र ज्यांचे ते शेत होते, त्यांचे नाव तर सांगितलेच सांगितले; शिवाय क्षेत्रही सांगितले. मला आश्चर्यही वाटले आणि मी चुकीचे नाव सांगितले त्याबद्दल दुःखही वाटत होते. त्यावेळी दादा म्हणाले होते, 'संपर्क कमी पडतोय, भरपूर फिरा. त्याशिवाय

अनुक्रमणिका

माणसे आणि आपल्या भागाच्या अडचणी समजणार नाहीत.' दादांचा हा अभ्यास माझ्यासारख्या कार्यकर्त्याला बरेच काही शिकवून गेला. त्याचा उपयोग आज मला होतो आहे.

## जयंत पाटील

लोकनेते राजारामबापू पाटील यांचे चिरंजीव व विद्यमान ग्रामविकास मंत्री जयंत पाटील यांनाही दादांचा सहवास लाभला. राजारामबापू आणि दादांमधील राजकीयतात्त्विक मतभेद महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात नोंदले गेले. त्याच बापूंचा राजकीय आणि समाजिक वारसा लाभलेले जयंत पाटील दादांबद्दल आपल्या भावना व्यक्त करताना म्हणाले, 'लोकांवर प्रेम करून विश्वासाचे नाते प्रस्थापित करणारे अद्भुत संघटन कौशल्य दादांकडे होते. बापू स्वर्गवासी झाल्यानंतर त्यांनी मला खूप प्रेम दिले. मानाने वागवले. मी ज्या-ज्या वेळी त्यांना भेटायला गेलो, त्या-त्या वेळी कितीही ज्येष्ठ आणि मातब्बर मंडळीसोबतच्या दादा कामात व्यस्त असले तरी ते मला नेहमीच थेट भेट द्यायचे. माझे म्हणणे ऐकून घ्यायचे. मला मोलाचा सल्ला द्यायचे. माझी त्यांची पहिली भेट माझ्या वाढदिवसादिवशी झाली. दादा आणि बापू त्यांच्यातील तात्त्विक भेद मिटविण्यासाठी ते स्वतःहून माझ्या घरी एकत्र आले होते. त्या दिवशी त्यांनी ते मतभेद संपविले. नेमका त्याचदिवशी माझा वाढदिवस होता. दादा आणि बापूंच्या उपस्थितीत मी वाढदिवसाचा केक कापला आणि दादांनी मोठ्या प्रेमाने मला केक भरवला! बेरजेचे आणि विकासाचे राजकारण कसे करायचे याचे धडे मला त्यांच्या सहवासात मिळाले. दादांनी ज्या काळात विकासाची चळवळ हाती घेतली आणि यशस्वी केली, तो काळ आजच्या तुलनेत सर्वच आघाड्यांवर अविकसित होता. त्या काळात लोकांचे प्रबोधन करीत विकासाची कामे त्यांनी उभी केली. बापूंच्या निधनानंतर दादा तीन-चार वेळा माझ्या घरी मी काँग्रेसमध्ये यावे यासाठी येऊन गेले. युवक काँग्रेसच्या चळवळीत मी सक्रिय सहभागी व्हावे, यासाठी ते आग्रही राहिले. राजारामबापू सहकारी साखर कारखान्याच्या अनेक कार्यक्रमांतही ते आनंदाने सहभागी व्हायचे. त्यांनी उभ्या केलेल्या संस्थांवर त्यांचे निस्सीम प्रेम होते. त्या संस्थांवर बारीक लक्ष ठेवताना एखाद्या लहान लेकराची काळजी घ्यावी तशी भावना त्यांच्या प्रत्येक कृतीतून दिसायची. काहीवेळा संघर्षाचे प्रसंगही आले; पण त्यातून दादांचा दिलदारपणा आणि मनाचा मोठेपणाच सिद्ध झाला. एका निवडणुकीच्या निमित्ताने दादांचे माझ्याबद्दल गैरसमज झाले होते. काही दिवसांनंतर ते आपोआपच दूर झाले. त्यांनी लगेचच मला मुंबईला मंत्रालयासमोरील बंगल्यात बोलावून घेतले. खोलीचे दारस्वतः बंद केले आणि मला सांगितले की, 'तुमच्याबद्दलचा गैरसमज दूर झालेला आहे, निवडणुकीत कारवाया करणारे कोण होते हे मला समजले आहे!' या घटनेतून त्यांच्या मनाच्या मोठेपणाचा अनुभव मला आला. सांगली जिल्ह्यातील सहकारी साखर कारखानदारीवरून देखील माझा संघर्ष झाला होता; पण तोही त्यांनी माझ्या स्पष्टवक्तेपणाचे कौतुक करत स्वीकारला!

## बा. द. खराडे

सांगलीयेथील दै. 'ललकार' चे संपादक बा. द. खराडे म्हणतात, 'वसंतदादांची आणि माझी पहिली भेट १९५० मध्ये झाली. दादा तेव्हा होमगार्ड कमांडंट होते. आमराईत सुरू असलेल्या कॅम्पवेळी दादांनी मला बोलावून घेतले. मी 'प्रजासत्ता' साप्ताहिकात होतो. शिक्षण अर्धवट सोडून मी पत्रकारिता करत असल्याचे समजताच दादांनी मला शिक्षण पूर्ण करण्याचा सल्ला दिला. एवढेच नव्हे, तर साताऱ्याला कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याकडे जाण्यास सांगितले. तशी शिफारस करण्याची ग्वाही दिली; पण मलाच जमले नाही. त्या काळी सांगलीत पत्रकार कमीच होते. मिरजेत १९४८ मध्ये 'ज्योती' नावाचे पहिले

अनुक्रमणिका

दैनिक सुरू केले. त्याच दरम्यान सांगलीत विश्रामबागमध्ये बाळासाहेब चिवटे यांनी ‘नेता’ आणि नंतर ‘लोकनेता’ दैनिक सुरू केले. त्यात माजी मुख्यमंत्री बाबासाहेब भोसले उपसंपादक म्हणून कार्यरत होते! तेव्हा ते विलिंग्डन महाविद्यालयात शिकत होते.

दादांचा आणि पत्रकारांचा संपर्क सांगलीचा साखर कारखाना सुरू झाल्यानंतर वाढला. दादांचा मुक्काम तेव्हा कारखान्याच्या गेस्ट हाऊसवरच असे. काही साप्ताहिके आणि ‘नवसंदेश’, ‘अग्रदूत’, ‘राष्ट्रशक्ती’ ही दैनिक त्यावेळी जोमात होती, कोल्हापूरहून निघणाऱ्या ‘सत्यवादी’ चाही मोठा नावलौकिक होता. ‘प्रभात दर्शन’, ‘सांगली समाचार’, ‘मतवादी’ ही दैनिकेही होती.

‘नवसंदेश’ चे कमलाकर भोसले, ‘राष्ट्रशक्ती’ चे दीनानाथ भोसले, ‘अग्रदूत’ चे बापूसाहेब कुंभोजकर, ‘सत्यवादी’ चे विद्याधर पाटील, ‘टाइम्स’ चे भगवंत अंबाजी दफ्तरदार आणि गणपतराव दफ्तरदार, साप्ताहिक लोकसखा आणि दैनिक ‘लोकसत्ता’ चे गजानन हुद्दार, ‘तरुण भारत’ चे बापूसाहेब पुजारी या पिढीनंतर यशवंतकुंभार, हिरालाल पडियार, दशरथ पारेकर, मदन पाटील, संपत बर्गे, मोहनराव माणगावकर, मीलन मुतालिक, रविंद्र दफ्तरदार, सर्जेराव मालेकर, नेमिनाथ सरडे, अरुण नाईक यांनी पत्रकारिता गाजविली. आमचा ‘ललकार’ ही त्याच काळातील, आमच्या नंतरच्या पिढीतील अरुण रामतीर्थकर, शिवाजी कांबळे, सुभाष खराडे, विलास चव्हाण, बळवंत देशिंगकर, दिलीप पाटील, राजाभाऊ कुलकर्णी, अण्णा कोरे, अशोक मेहता यांनाही दादांचा सहवास लाभला.

दादांनी स्मरणशक्ती अफाट होती. एखाद्याची ओळख झाली की, ते त्याचे नाव विसरत नसत. दादा मंत्री झाल्यानंतर तर पत्रकार मंडळींशी त्यांचा स्नेह अधिकच वाढला. ते जिल्ह्यात येत, तेव्हा त्या दौऱ्यात तर आम्ही जायचो; पण दादांमुळे राज्यात आणि राज्याबाहेर शासकीय अभ्यासदौरेही आम्हाला करता आले.

दादा दैनिकांतील महत्त्वाच्या बातम्या बारकाईने अभ्यासत. जिल्ह्यातील साप्ताहिकांवरही त्यांचे लक्ष असे. विशेष म्हणजे विरोधी लिहिणाऱ्याचेही ते कौतुक करत. ‘निंदकाचे घर असावे शेजारी’ असे ते नेहमीच म्हणत. सगळ्याच पत्रकारांना दादा नेहमी आदराची, जिव्हाळ्याची वागणूक देत. आम्ही काही समाजवादी मंडळी सातत्याने प्रस्थापित राजकारण्यांविरुद्ध लिहायचो. कॉंग्रेसच्या न पटणाऱ्या विचारधारेला विरोध करायचो; पण दादांनी कधीच आकस बाळगला नाही. उलट दादा आमच्याही मदतीला धावून येत. १९७४ मध्ये माझ्यावर काही समाजकंटकांनीॲसिड हल्ला केला. मी गंभीर जखमी झालो. त्यावेळी दादा आणि राजारामबापू पाटील धावून आले. दादांनी त्यात मुंबईच्या जे. जे. रुग्णालयात दाखल केले. तेथील खर्चाची जबाबदारी उचलली. मात्र, पुढील उपचार होण्यापूर्वीच घरगुती अडचणींमुळे मला सांगलीत परतावे लागले.

मुख्यमंत्री झाल्यावरही दादा सांगलीतील पत्रकारांशी नेहमीसारख्याच दिलखुलास गप्पा मारत. दादा साऱ्या महाराष्ट्राचे होते. मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांचे सांगलीत येण्याचे प्रमाण कमी झाले. कारखान्याच्या गेस्ट हाऊसवर किंवा कॉंग्रेस कमिटीत पत्रकार बैठका व्हायच्या. दादा पत्रकारांना कधीकधी पद्माळेतील शेतातही घेऊन जात आणि गप्पांचा फड रंगवत. आम्ही त्यांच्या माहीमच्या घरीही हक्काने जायचो. ‘माणसांत मिसळणारा आणि विरघळणारा नेता’ अशीच दादांची प्रतिमा होती. सांगलीआणि मिरज नगरपालिकांची एकत्रित महानगरपालिका करण्याचा विचार दादांच्या काळात पुढे आला होता.

अनुक्रमणिका

मात्र, सांगली आणि मिरजेतील नेतेमंडळी एकत्रित येत नव्हती. त्यावेळी दादा म्हणायचे, ‘आधी तुम्ही या. मनं जुळली की, मग सांगली-मिरज आपोआप एकत्र येईल…’

१९८१ मध्ये आम्ही ‘ललकार’ चे रिलाँचिंग केले. त्या कार्यक्रमाला दादा स्वतः आले होते. तेव्हा ते भरभरून बोलले. त्या कार्यक्रमात त्यांनी मला काँग्रेसच्या विचारांचे दैनिक सुरू करण्याची गळ घातली; पण मी विचार बदलला नाही. अर्थात आमच्या संबंधांत त्यांमुळे कधीच अडसर आला नाही.’

## खासदार विजय दर्डा

‘लोकमत’ समूहाचे अध्यक्ष व राज्यसभेचे विद्यमान खासदार विजय दर्डा यांनादेखील त्यांचे वडील स्वर्गीय जवाहरलाल दर्डा व स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्यामुळे वसंतदादांचा सहवास लाभला. खासदार दर्डा दादांबद्दल म्हणाले, ‘महाराष्ट्राचे राजकारण, समाजकारण व ग्रामीण अर्थकारण यांची व्यवस्थित घडी घालणारे जे मुख्यमंत्री या राज्याला आरंभी लाभले त्यांत यशवंतराव चव्हाण, दादासाहेब कन्नमवार आणि वसंतदादा नाईक यांच्याएवढेच मोठेपण वसंतदादा पाटील यांच्याही वाट्याला आले. वसंतदादा म्हणजे विधायक लोकशक्ती, राज्याच्या सर्वांगीण विकासाच्या ध्यासाने झपाटलेले नेतृत्व, सामान्य माणसांच्या हिताचे काळजी वाहणारे आणि ग्रामीण महाराष्ट्राचा चेहरा-मोहरा बदलून टाकणारे विलक्षण ताकदीचे व्यक्तिमत्त्व.

यशवंतरावांनी महाराष्ट्रातील सहकार चळवळीला चालना दिली, मात्र ती चळवळ खेडोपाडी रुजविण्याचे व तिला आलेली अर्थकारणाची सोनेरी फळे राज्याच्या पदरात टाकण्याचे काम वसंतदादांनीच केले. सहकारी साखर कारखाने, सूतगिरण्या, पतसंस्था, पाणीपुरवठा संस्था असे सहकाराचे प्रचंड जाळे दादांनी महाराष्ट्रात उभारले आणि ज्या गावखेड्यांना दारिद्र्याने गांजले होते, त्यात त्यांनी वैभवाचे दिवस आणले. तासगाव परिसरातील घराघरांत दादांची छायाचित्रे श्रद्धेने लावलेली आपण त्यांच्या हयातीतच कशी पाहिली याची अतिशय हृद्य आठवण समाजवादी नेत्या मृणालताईगोरे यांनी दादांच्या जयंतीदिनी ‘लोकमत’ मध्ये लिहिलेल्या एका लेखात नोंदविली आहे. मृणालताई विरोधी बाकावर बसणाऱ्या व वसंतदादांच्या सरकारवर कडावून हल्ले चढविणाऱ्या नेत्या होत्या. ही बाब लक्षात घेतली की, त्यांच्या या नोंदीचे महत्त्वही ध्यानात येते. कोणताही शेतकरी व ग्रामीण माणूस दादांशी संवाद साधू शकत असे आणि त्याची व्यथाही दादांच्या तत्काळ लक्षात येत असे.

दादांना मी मंत्रालयात, विधिमंडळात, सभास्थानी, दौऱ्यात आणि त्यांच्या व माझ्या घरीही पाहिले आहे. माझे वडील व स्वातंत्र्यसेनानी स्वर्गीय जवाहरलालजी दर्डा (बाबूजी) हे महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात दीर्घकाळ राहिलेले ज्येष्ठ मंत्री होते. त्यांनी व दादांनी सहकाराच्या क्षेत्रात एकत्र कामही केले होते. विशेषतः त्या काळात गृहनिर्माण सहकारी संस्थांचे काम सांगली व यवतमाळ या दोनच जिल्ह्यांत वाखाणण्याजोगे होते व त्याचे नेतृत्व अनुक्रमे वसंतदादा व बाबूजी यांच्याकडे होते. त्यामुळे त्यांचे आमच्याकडे येणे-जाणे नित्याचे होते. त्यांच्या वागणुकीतील अकृत्रिम जिव्हाळा व ग्रामीण माणसात दिसणारे आरपारपण त्या काळात मला पाहता व अनुभवता आले. ‘एखादे काम रुजवायचे कसे ते दादांपासून शिका’ ही शिकवण बाबूजींनीही आमच्या मनावर कायमची ठसवली आहे.

अनुक्रमणिका

वसंतदादांच्या वागण्या-बोलण्यात नेहमीच एक सहजसाधेपण असे. मुख्यमंत्री असतानाही ते आपल्या बंगल्यातील कार्यालयात खूपदा अंगात साधी बंडी घालून व नेहमीचे पायघोळ धोतर नेसूनच वावरत. कुठल्याशा देशाचे पंतप्रधान एकदा त्यांच्या भेटीला आले, तेव्हा त्या देशाची लोकसंख्या आणि जगाच्या नकाशातील त्याचे स्थान पाहून ते आपल्या सचिवाला म्हणाले 'अरे, यांचा देश तर आपल्या सांगली जिह्याहूनही लहान आहे'... आणि मग अंगातील बंडीवर साधाच बंगाली सदरा घालून ते त्या पंतप्रधानांना सामोरे गेले... पोलिसांच्या गराड्यात कधी न राहणारे व नागरिकांना नेहमी उपलब्ध असणारे मुख्यमंत्री हा त्यांचा लौकिक होता. येणारी माणसे त्यांना आपल्या खासगी अडचणीही सांगू शकत आणि तेही तेवढ्याच आत्मियतेने ऐकूनही घेत... मोठाल्या फायली घेऊन येणाऱ्या सचिवांना ते आधीच म्हणत, 'यातल्या कामाच्या फायली ठेवा, बाकीच्या परत न्या...'

वसंतदादांचा 'लोकमत' व लोकमत परिवारावर विशेष लोभ होता. माझ्या प्रत्येकभेटीत त्यांनी 'लोकमत' ची चौकशी केली आणि स्वतःकडून जमेल तेवढे सगळे साहाय्यही या वृतसमूहाला केले. शेतकऱ्यात दिसणारे सहजसाधेपण, मिष्किल शहाणपण दादांमध्ये होते. त्यांच्या भामंरागड भेटीतील एक गोष्ट पत्रकार म्हणून माझ्या चांगली स्मरणात आहे. भामरागड परिसरातील एका रस्त्याचे रुंदीकरण केंद्रीय वनधोरणातील झाडे न तोडण्याच्या निर्देशामुळे अडले होते. गावकऱ्यांची त्या रस्त्याची मागणी मात्र मोठी होती. वनखात्याचे अधिकारी दादांना त्यांच्या धोरणात्मक अडचणी सांगू लागले तेव्हा दादा मिष्किलपणे हसून म्हणाले, 'झाडे तोडावी लागतील म्हणता ना;पणझाडे आहेत कुठे? मला तर ती कुठेच दिसत नाहीत.' ... अधिकारी समजायचे ते समजले आणि गावकऱ्यांची रस्त्याची मागणीही पूर्ण झाली.

दादा स्वतः फारसे शिकले नव्हते; पण शिकलेल्यांना शहाणपण शिकविण्याएवढे ज्ञान त्यांनी आत्मसात केले होते. ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार व्हावा, त्यासाठी गावखेड्यात महाविद्यालये उघडली जावीत, त्यात चांगल्या व प्रशिक्षित शिक्षकांचा सहभाग असावा असा त्यांचा आग्रह होता. मात्र, केवळ पुस्तकी व कारकुनी शिक्षण देणाऱ्या शिक्षण संस्था त्यांना मान्य नव्हत्या. ज्या शिक्षणाचा वापर विकासासाठी होतो त्या तंत्रविज्ञानाच्या शिक्षण संस्था उभारण्यावर त्यांचा भर होता. महाराष्ट्रात खासगी अभियांत्रिकी महाविद्यालये उघडण्याचा निर्णय दादांचाच. आज मोठ्या संख्येने महाराष्ट्रात ही महाविद्यालये उघडली गेली व त्यातून मोठ्या संख्येने इंजिनिअर बाहेर पडताना पाहता आले, त्याचे श्रेयही फारसे न शिकलेल्या या शहाण्या माणसालाच जाते.

ग्रामीण विकासाचा ध्यास घेतलेल्या दादांना शहरातील गरिबांच्या व्यथाही चांगल्या ठाऊक होत्या. मुंबईच्या विकासाचा पायाही त्यांनी मजबूत केला. राज्यातील महानगरे व जिल्ह्याची ठिकाणे यात शासकीय इमारती, रस्ते व विकासकामे यांवरही त्यांचे काटेकोर लक्ष राहिले. विकासाच्या कामात जनतेचा सहभाग व पुढाकार महत्त्वाचा असतो, असे ते म्हणत. 'सरकार विकास करीत नाही, तो करून घ्यावा लागतो' असे त्यांचे सांगणे असे. शेतकऱ्यांना कमी व्याजाने पैसा मिळावा, अशी त्यांची मागणी होती. शेती हा उद्योग मानला जावा यासाठी दबाव आणावा म्हणून त्यांनी १९८८ मध्ये शेतकरी संघटना स्थापण्याची घोषण केली. बिर्ला मातोश्री भवनात झालेल्यातेव्हाच्या सत्कार समारंभात आपल्या हातातील काठी फेकून त्यांनी शेतकऱ्यांच्या बाजूने दंड थोपटले होते. संघटितांचे वर्ग सरकारचे जेवढे फायदे घेतात तेवढे शेतकऱ्यांना घेता येत नाहीत. मजुरी, वीज, खते, वाहतूक, पाणीपट्टी या साऱ्यांचे दर वाढले म्हणून शेतकऱ्यांना शेती परवडत नाही, त्यामुळे उद्योगपतींचा न्याय शेतकऱ्यांनाही दिला जावा, असे ते म्हणत.

अनुक्रमणिका

दादांनी उभे केलेले सहकाराचे विराट वैभव नंतरच्या काळात आलेल्या नेतृत्वाला नीट राखता आले नाही. सहकारी संस्था चालविणारे अनेकजण खऱ्याअर्थाने ‘सहकारमहर्षी’ न राहता ‘सहकारसम्राट’ बनले. त्यांच्यातील अनेकजण ‘साखरसम्राट’ म्हणून राज्यात आणि देशात बदनामही झाले. दादांच्या त्यागाचा व क्रांतिविषयीच्या आग्रहाचा मार्ग सोडल्याचा हा दुष्परीणाम होता. आज दादांची स्मृती जपायची व तिचा आदर करायचा तर सहकारात शिरलेला ‘स्वाहाकार’ थांबविणे व त्यासाठी आवश्यक ती सारी कठोर पावले उचलणे गरजेचे आहे. ग्रामीण भागाच्या विकासाखेरीज राज्याचा विकास होणे नाही आणि वसंतदादांच्या मार्गाने गेल्याखेरीज ग्रामीण भागाचा विकासही होणे नाही, ही बाब त्यांचे स्मरण करताना साऱ्या महाराष्ट्राने ध्यानात घेतली पाहिजे, दादांच्या प्रत्येक भेटीत त्यांच्या काम करण्याच्या पद्धतीचा आणि माणसांशी असलेले नाते दृढ करणारा नवा दृष्टिकोन मला मिळायचा.’

## दिनकर रायकर

महाराष्ट्रातील अनेक पत्रकारांना दादांचा सहवास लाभला; त्यांपैकीच एक ‘लोकमत’ समूहाचे संपादक दिनकर रायकर हे एक ज्येष्ठ पत्रकार. दादांविषयी बोलताना रायकर म्हणाले, ‘दादांचा आणि माझा स्नेह १९७० पासून होता. त्यावेळी ते प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष होते, तर शरद पवार सरचिटणीस होते. कुठलाही अभिनिवेश न दाखवता एखादा मोठ्या पदावरचा माणूस किती साधा आणि सरळ असूशकतो, याचे उदाहरण म्हणून दादांचे नाव सदैव घेतले जाईल. येणाऱ्या माणसाचे फक्त काम करून न थांबता तो माणूस कोठून आला, कसा आला, परतीला जायला त्याच्याजवळ पैसे आहेत का, त्याचे जेवण-खाणे झाले काय, याची आवर्जून विचारपूस करून प्रसंगी आपल्या बंडीच्या खिशात हात घालून अनेक गरजूंना पैसेकाढून देताना मी दादांना अनेकवार पाहिले आहे. त्याच कारणाने राज्यभरातून येणाऱ्या असंख्य माणसांच्या गराड्यात ते असायचे, मुंबईतील माहिमच्या त्यांच्या ‘ज्योती सदन’ या निवासस्थानी माझी व त्यांची अनेकदा भेट झाली. मंत्रालय असो वा घर, दादा माणसांच्या गर्दीतच असायचे. ती गर्दीच जणू काही त्यांच्या कार्यक्षमतेचे टॉनिक होती! मुख्यमंत्रिपदावरील माणूस एवढ्या सहज आणि साधेपणाने सर्वसामान्यांना भेटू शकतो, हेच दादांच्या कार्यपद्धतीतून दिसायचे. ते महाराष्ट्राच्या वाटचालीतील वेगळे युग होते. दादांच्या प्रत्येक कृतीला लोकसंग्रहाचा, तळमळीचा आणि विश्वासपूर्ण आपलेपणाचा आधार असे. १९८४ मध्ये मी एनएसयुआयच्या शिबिराच्या निमित्ताने नागपूरला गेलो होतो. तेव्हा दादाही नागपुरातच होते. मी त्यांना भेटायला गेलो होतो. त्या काळात चंद्रपूर भागात आदिवासीची काही घरे जळाली होती. त्या आपद्ग्रस्तांना मदतीचा धनादेश देण्यासाठी आदिवासींना त्या ठिकाणी बोलाविण्यात आले होते. जिल्हाधिकारी धनादेश घेऊन तेथे उपस्थित होते. दादा आपल्या नेहमीच्या वेशात बंडी परिधान करून बसलेले होते. दादांच्या हस्ते आदिवासींना मदतीचा धनादेश दिला गेला. धनादेश दिल्यानंतर दादा मात्र तेवढ्यावर थांबले नाहीत. त्यांनी लगेचच जाण्याची काय व्यवस्था आहे का, पैसे आहेत का, असे त्या आदिवासींना विचारले व थेट बंडीच्या खिशात हात घालून आदिवासींना पैसे देण्यास सुरुवात केली. त्या ठिकाणी हजर असलेल्या जिल्हाधिकाऱ्यांनी दादांना समजावण्याचा प्रयत्न केला; पण एकतील ते दादा कसले? दादा म्हणाले, ‘तुम्ही त्यांना चेक दिला; पण रात्री ते परत जाणार कसे?, त्यांच्या जेवणाचे कसे? याचा विचार आणि सोय शासनाने केली आहे का? असे अनेक प्रसंग मला आणि मुंबईतील अनेक पत्रकारांना अनुभवायला मिळाले. स्पष्टवक्तेपणा आणि निखळ स्वभाव हे दादांचे खास वैशिष्ट्य होते. कोणताही निर्णय घेताना दादा कचरायचे नाहीत. त्यावर ठाम राहायचे. मला आठवते, मुंबई ते पुणे अशी एशियाड बससेवा त्या काळात सुरू होणार होती; परंतु ती सेवा सुरू झाल्यास टॅक्सीवाल्यांच्या व्यवसायावर परिणाम होईल म्हणून दादा निर्णय घ्यायला थोडा विलंब लावत होते. अखेर आम्ही पत्रकारांचे शिष्टमंडळ

घेऊन दादांकडे गेलो. मुंबई-पुणे एशियाड बससेवा सुरू झाल्यास जनतेची कशी सोय होईल हे दादांना पटवून दिले. दादांनी लगेचच निर्णय घेतला आणि तेव्हा मुंबई-पुणे एशियाड बससेवासुरू झाली. पुढे महाराष्ट्रात अनेक ठिकाणी एशियाड बससेवा सुरू झाल्या. पत्रकारांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. निवडणुकीच्या कालावधीत मी सांगलीच्या दौऱ्यावर गेलो होतो. दौऱ्यावर निघण्यापूर्वी मी दादांना त्यांच्या जिल्ह्यात जात असल्याची सहज कल्पना दिली. त्या काळात आज उपलब्ध असलेले तंत्र आणि सोयीसुविधा उपलब्ध नव्हत्या. बातम्या पाठविण्यासाठी विशेष परिश्रम घ्यावे लागायचे. मी सांगलीला पोहोचेपर्यंत दादांनी आपल्य कार्यकर्त्यांकरवी माझी सगळी व्यवस्था करून ठेवली होती. टाईपरायटरपासून बातमी पाठविण्याच्या सुविधेपर्यंतची सर्व व्यवस्था त्यांनी केलेली होती. हे सर्व करत असताना त्यांनी 'हे किंवा अमूक छापा' असे मात्र तेव्हाही आणि कधीच सांगितले नाही. काहीतरी छापून यावे किंवा आणावे यासाठी पत्रकारांशी जिव्हाळ्याने वागावे असा दादांचा कधीच उद्देश नसे. अखिल भारतीय काँग्रेसचे सरचिटणीसपद असो, मुख्यमंत्रिपद असो वा राज्यपालपद असो, आपल्या स्वाभिमान आणि अस्मितेसाठी पदाचे राजीनामे देणारे काँग्रेस पक्षातील माझ्या पाहण्यात आणि ऐकिवात दादा हे एकमेव नेते होते. राजकारणातील दादांचा हा बाणा महाराष्ट्र कधीही विसरू शकणार नाही.

## अखेरचे दिवस

राजस्थानच्या राज्यपालपदावरून मुक्त झाल्यानंतर देशपातळीवर शेतकरी संघटना स्थापन करण्यासाठी दादांचे शेवटपर्यंत प्रयत्न चालू होते. मात्र त्यांना प्रकृती साथ देत नव्हती. १०-१२ वर्षांपासून गुडघ्याच्या आणि कमरेच्या दुखण्याने दादांना हातात काठी घेतल्याशिवाय वावरणे अशक्य झाले होते. हृदयविकार आणि रक्तदाब हे त्यांचे विकार बळावलेले होते. औषधोपचार करून अल्पकाळ त्यांच्या प्रकृतीत सुधारणा व्हायची आणि पुन्हा काही दिवस गेले की त्रास सुरूच राहायचा. त्या काळात स्वीय सहायक यशवंत हाप्पे यांनी दादांची खूप सेवा केली. सावलीप्रमाणे ते त्यांच्यासोबत राहिले. त्यांच्या या सेवेमुळे हाप्पे यांना पुढे 'दादांचे मानसपुत्र' असेच म्हटले गेले. प्रकृती साथ देत नसली तरी दादांचा काम करण्याचा अट्टहास मात्र कायम असायचा. त्याच अट्टहासामुळे ते त्यांच्याकडे येणाऱ्या प्रत्येक माणसाला भेटायचे. त्यांची कामे मार्गी लावण्याचा प्रयत्न करायचे. अनेकदा दौरेही करायचे. त्यांची इच्छाशक्ती दांडगी होती; पण त्यांना शरीर मात्र साथ देत नसे. त्या काळात हाप्पे या त्यांच्या मानसपुत्राने घेतलेली काळजी सदैव दादाप्रेमींच्या चर्चेचा आणि आदराचा विषय ठरली. प्रकृतीचा त्रास बळावत असला तरी राज्यात वेगवेगळ्या कार्यक्रमांसाठी दौरे करण्याचा अट्टहास मात्र दादांनी सोडला नाही.

तत्कालीन अर्थमंत्री सुशीलकुमार शिंदे आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांनी सोलापूर जिल्ह्यात आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे निमंत्रण त्यांनी स्वीकारले. २६ फेब्रुवारी १९८९ रोजी सोलापूरच्या श्राविका प्रशालेच्या प्रांगणात राज्यातील व्यापाऱ्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी राज्यव्यापी परिषद आयोजित करण्यात आली होती. त्या परिषदेला हजर राहण्यासाठी दादा सकाळी १०·३० वाजता परिषदस्थळी पोहोचले. त्यावेळीही त्यांना चालताना त्रास होत होता. सकाळचे पहिले सत्र सुरू झाले. दादांना तेथेही त्रास जाणवत असूनही त्यांनी पहिल्या सत्रातील भाषणे ऐकली. त्यांचे भाषण दुसऱ्या सत्रात दुपारी ३·३० वाजता होणार होते; परंतु त्यांना अस्वस्थ वाटत असल्याने त्यांचे भाषण आधीच घेण्यात आले. त्यांनी भाषणास प्रारंभ केला. जेमतेम दोन-तीन मिनिटेही बोलले असतील नसतील तोच त्यांना त्रास सुरू झाला. ते अस्वस्थ झाले. त्यांनी भाषण थांबविले. त्यांची अस्वस्थता पाहून व्यासपीठावरील कार्यकर्ते त्यांच्याकडे धावले. पायांना मुंग्या आल्याने व पाय जड आल्याने कार्यकर्त्यांनी

अनुक्रमणिका

त्यांच्या पायांना तातडीने तेथेच मालिश केले आणि त्यांना विश्रामगृहाकडे नेण्याची तयारी सुरू झाली. जाताना ते घामाघूम झाले आणि त्यांचा तोलही जाऊ लागला. त्याच अवस्थेत त्यांना परिषदेचे संयोजक रंगलाल तोष्णीवाल यांनी शासकीय निवासस्थानात नेले. तेथेही त्यांना गॅसेसचा त्रास सुरू झाला आणि ते बेशुद्ध पडले. ऐव्हाना तोपर्यंत सुशीलकुमार शिंदे, ब्रह्मदेव माने, विष्णुपंत कोठे, निर्मलाताई ठोकळ ही मंडळी विश्रामगृहात पोहोचली. विजयसिंह मोहिते-पाटील हेही अकलूजहून दादांकडे यायला निघाले. डॉ. पी. बी. झंवर, डॉ. आर. आर. चव्हाण या डॉक्टरना विश्रामगृहात पाचारण करून दादांवर तातडीचे उपचार करण्यात आले. त्या उपचारांनंतर त्यांना शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. अतिदक्षता विभागाच्या हृदयरोग तज्ज्ञांनी कृत्रिम श्वासोच्छ्वासाची व्यवस्था करून उपचार सुरू केले. सायंकाळी साडेचारच्या सुमारास ते शुद्धीवर आले. शुद्धीवर आल्यानंतर जणू काही घडलेच नाही, अशा थाटात दादा सर्वांशी बोलू लागले. त्यांना भेटायला येणाऱ्यांशी ते हसतमुखाने बोलू लागले. सुशीलकुमार शिंदे यांनी सोलापुरातील पत्रकारांच्या विनंतीवरून दादांची भेट अतिदक्षता विभागात घडवून आणली. त्या वेळीही दादा हसतच म्हणाले, ‘आता बरा आहे, काळ आला होता; पण वेळ आली नव्हती!’

सायंकाळनंतर दादांची प्रकृती झपाट्याने सुधारली. नंतर त्यांनीच मुंबईच्या बॉम्बे हॉस्पिटलमध्ये पुढील उपचारांसाठी जाण्याची इच्छा व्यक्त केली. हॉस्पिटल आणि तेथील डॉक्टर गेल्या अनेक वर्षांपासून त्यांच्यावर उपचार करीत असल्याने दादांना सोलापूरऐवजी तेथे उपचार घेणे सोईचे वाटले. त्यानुसार त्यांना मुंबईला हलविण्याचा निर्णय झाला. त्याच दिवशी रात्री १० वा. २० मि.च्या मद्रास-मुंबई उद्यान एक्स्प्रेसने प्रकाशबापू, तीन तज्ज्ञ डॉक्टर आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांसह दादा मुंबईला रवाना झाले. मुंबईत आल्यानंतर त्यांच्यावर नियमित उपचार करणाऱ्या डॉक्टरनी तपासण्या केल्या. औषधोपचार केले. त्यांच्या प्रकृतीत सुधारणा झाली आहे, असेच सर्वांना वाटले. त्यामुळे प्रकाशबापूदेखील दिल्लीत सुरू असलेल्या लोकसभा अधिवेशनासाठी रवाना झाले. २८ फेब्रुवारीला केंद्रीय अर्थसंकल्प सादर झाला. त्या अर्थसंकल्पाचे आकाशवाणीवरील वार्तापत्रदेखील दादांनी काळजीपूर्वक ऐकले. त्यावर डॉक्टरांनी मेंदूवर ताण पडेल असे काही ऐकूही नका, असा निर्वाणीचा सल्लाही दिला.

त्यांची प्रकृती सुधारत आहे असेच वातावरण त्यांच्या कुटुंबीयांत आणि राज्यभरातील कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झाले होते आणि १ मार्च १९८९ हा काळ दिन उजाडला! डॉक्टरांनी दिलेल्या सूचनांनुसार दादांच्या औषधोपचाराची, खाण्या पिण्याची काळजी घेतली जात होती. दादांचे स्वीय सहायक यशवंत हाप्पे यांनी सकाळी ११ वाजेपर्यंत दादांची सेवा-शुश्रूषा केली आणि ते काही कामानिमित्त बाहेर पडले. नेमक्या त्याच काळात सकाळी ११·३० च्या सुमारास हॉस्पिटलमध्येच दादांवर काळाने झडप घातली. तेथे उपस्थित असलेल्या त्यांच्या स्नुषा शैलजा व दादांचे खासगी सचिव संतकुमार चौधरी यांना दादांना वेदना होत असल्याचे लक्षात आले. त्यांनी तिथल्या डॉक्टरना तातडीने उपचार करायला सांगितले; पण तोपर्यंत दादांची प्राणज्योत मालवलेली होती. दादांनी डोळे मिटलेले होते. ते पाहताच ‘दादा... दादा... दादा...’ अशी हाक सर्वांनी दिली; परंतु प्रतिसाद मिळत नव्हता... दादांनी जगाचा कायमचा निरोप घेतलेला होता. लढवय्या स्वातंत्र्यसेनानी, हळव्या मनाचा दिलदार मित्र, शेतकऱ्यांचा कैवारी आणि माणसांच्या मोहोळात स्वतःला विसरून जाणारा सच्चा लोकनेता सर्वार्थाने शांत झाला होता. सर्वजण ओक्साबोक्सी रडू लागले. आप्तेष्ट आणि अन्य मंडळी जमा झाली. दादांच्या निधनाचे वृत वाऱ्यासारखे राज्यभर पसरले. राज्यावर दुःखाचे सावट पसरले. सांगली जिल्ह्याला तर अश्रूंच्या धारा आवरणे कठीण झाले. दादांचे सुपुत्र प्रकाशबापू दिल्लीत लोकसभेच्या कामकाजात व्यस्त होते. दादांच्या निधनाची वार्ता काही मिनिटांतच पंतप्रधान राजीव गांधी यांना मिळाली. त्यांनीच प्रकाशबापूंना संसद

सभागृहातून बाहेर बोलावून दादांच्या निधनाचा निरोप दिला. बापू तातडीने मुंबईकडे निघाले. दादांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी विधानभवनात ठेवण्यात आले. दुसऱ्या दिवशी २ मार्च रोजी ते हवाई दलाच्या हेलिकॉप्टरने सांगलीत आणण्यात आले. त्यावेळी पार्थिवासमवेत प्रकाशबापू, त्यांच्या पत्नी शैलजा, मुख्यमंत्री शरद पवार, विष्णुअण्णा पाटील आणि स्वीय सहायक यशवंत हाप्पे होते.

सांगलीकरांना आपल्या सुपुत्राचे अखेरचे दर्शन घेण्यासाठी पार्थिव 'विजय बंगला' येथे आणि नंतर सकाळी १०·३० ते २ पर्यंत नगरपालिकेच्या स्टेडियममध्ये ठेवण्यात आले. त्यानंतर दुपारी दोनच्या सुमारास दादांची अंत्ययात्रा निघाली. भूमिगत असताना वेशांतर करून आणि स्वातंत्र्यानंतर खुलेआम ज्या शहराच्या कानाकोपऱ्याची पायपीट करून दादांनी विकासाचा नवा मंत्र राज्याला दिला, त्याच शहरातील रस्त्यांवरून त्यांचा अंतिम प्रवास सुरू झाला. दादांवर अलोट प्रेम करणारा शोकाकुल जनसागर रस्त्यांवर लोटला होता. चौका-चौकांत पुष्पहार अर्पण करून त्यांना आदरांजली वाहण्यात येत होती. आमराई, पटेल चौक, राजवाडा चौक, कापड पेठ, गणपती मंदिर, पांजरपोळ, जुने वॉटर वर्क्स या मार्गांनी लाखो लोकांचा अखेरचा निरोप घेत अंत्ययात्रा कृष्णाकाठी माईघाटावर पोहोचली. तेथे शालिनीताई पाटील आणि परिवारातील सर्व सदस्यांनी त्यांचे अखेरचे दर्शन घेतले. कृष्णाकाठी वाढलेल्या आणि स्वातंत्र्यासाठी लढलेल्या लोकनेत्याला लाखोंच्या साक्षीने अखेरचा निरोप देण्यात आला.

पंतप्रधान राजीव गांधी, शिवराज पाटील-चाकूरकर वसंत साठे, नजमा हेपतुल्ला, एन. के. पी. साळवे, गुलाम नबी आझाद, विठ्ठलराव गाडगीळ, शीला दीक्षित, मधू दंडवते आणि देशभरातील सर्व क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत दुपारी ४ वाजून ५ मिनिटांनी प्रकाशबापू यांनी मंत्राग्नी दिला. एकीकडे पेटलेली दादांची चिता होती, तर दुसरीकडे अश्रूंनी चिंब-चिंब होऊन दादांच्या अखेरच्या दर्शनाने व्याकुळ झालेली लाखो मने होती. दादा पंचत्वात विलीन झाले.... नंतर राज्यातील सर्व जिल्ह्यांत त्यांचा अस्थिकलश नेण्यात आला. औदुंबर, नृसिंहवाडी आणि पंढरपूर येथे अस्थिविसर्जन करण्यात आले. आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत माणूस आणि माणुसकी जतन करणारा एक धाडसी, दिलदार आणि जिगरबाज लोकनेता काळाच्या पडद्याआड गेला...

अनुक्रमणिका

## जीवनपट

| | |
|---|---|
| • १३ नोव्हेंबर १९१७ | कोल्हापुरातील मंगळवार पेठेत दिवाळीपाडव्यादिवशीच्या पहाटे जन्म |
| • ऑक्टोबर १९१८ | वडील बंडूजी पाटील व आई रुक्मिणीबाई यांचे तापसरीच्या साथीत दोन तासांच्या अंतराने निधन |
| • १९३७ ते १९३९ | तासगाव तालुका काँग्रेस समितीचे चिटणीस |
| • १९४० | कागलचे मामा दत्तात्रय जगदाळे-पाटील यांची कन्या मालतीताई यांच्याशी विवाह |
| • २४ मार्च १९४१ | तासगाव तालुक्यातील बिसूर येथे स्वातंत्र्यसंग्रामात वैयक्तिक सत्याग्रह व ६ महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा |
| • ९ ऑगस्ट १९४२ | 'चले जाव' चळवळीत सहभाग, भूमिगत राहून क्रांतिलढा |
| • २२ जून १९४३ | सांगली संस्थानचा तुरुंग फोडून पसार |
| • १४ मे १९४६ | सातारा जिल्हा काँग्रेस समितीच्या चिटणीसपदी निवड |
| • १९४८ ते १९५० | सातारा जिल्हा होमगार्ड कमांडंट म्हणून कार्य |
| • १९५० | सांगली जिल्हा (दक्षिण सातारा) काँग्रेस समितीच्या सरचिटणीस पदी निवड |
| • १९५१ | सांगलीच्या बाजार समितीचे अध्यक्ष |
| • १९५२ | सांगली विधानसभा मतदारसंघातून २७ हजार मतांनीविजयी |
| • १९५७ | सांगली विधानसभा मतदारसंघातून दुसऱ्यांदा विजयी |
| • १९५८ | सांगली शेतकरी सहकारी साखर कारखाना उभारणीत मुख्य प्रवर्तक |
| • १९६२ | सांगली विधानसभा मतदारसंघातून तिसऱ्यांदा विजयी |
| • १९६२ ते १९६४ | महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह फर्टिलायझर्स व केमिकल्स संस्थेचे अध्यक्ष |
| • १९६५ | राज्य सहकारी साखर कारखाना संघाचे अध्यक्ष |
| • १९६६ | महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीचे प्रारंभी उपाध्यक्ष व नंतर अध्यक्ष |
| • १९६७ | 'पद्मभूषण' पुरस्काराने गौरव |
| • १९७० | साखर निर्यात मंडळाचे अध्यक्ष |
| • १६ मार्च १९७२ | शंकरराव चव्हाण यांच्या मंत्रिमंडळात पाटबंधारे मंत्री |
| • १३ मार्च १९७३ | राजकारण संन्यासाची घोषणा |
| • मार्च १९७७ | काँग्रेस अडचणीत आल्याने राजकारणात पुन्हा सक्रिय |
| • १७ एप्रिल १९७७ | मुख्यमंत्रिपदी निवड |
| • फेब्रुवारी १९७८ | मुख्यमंत्रिपदी निवड |
| • फेब्रुवारी १९८० | सांगली लोकसभा मतदारसंघातून खासदार म्हणून निवड |
| • २ फेब्रुवारी १९८३ | मुख्यमंत्रिपदी निवड |
| • जून १९८३ | सांगली विधानसभा मतदारसंघातून आमदार शालिनीताई पाटील |

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| | यांच्या राजीनाम्याने रिक्त झालेल्याजागेवर पोटनिवडणुकीत विजयी |
| • १९८४ | राहुरी कृषी विद्यापीठाकडून ‘डॉक्टर ऑफ सायन्स’ ही पदवी देऊन गौरव |
| • मार्च १९८५ | मुख्यमंत्रिपदी निवड |
| • जून १९८५ | मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा |
| • १४ नोव्हेंबर १९८५ | राजस्थानच्या राज्यपालपदी नियुक्ती |
| • जुलै १९८७ | राज्यपालपदाचा राजीनामा |
| • १६ ऑक्टोबर १९८७ | पुणे विद्यापीठाकडून डी.लिट पदवी प्रदान |
| • १२ नोव्हेंबर १९८७ | कोल्हापूर महापालिकेच्यावतीने मानपत्र |
| • १३ नोव्हेंबर १९८७ | देशपातळीवरील शेतकरी संघटना स्थापण्याची सांगलीत घोषणा |
| • १ मार्च १९८९ | सकाळी ११·३० वाजता बॉम्बे हॉस्पिटलमध्ये मुंबईत निधन. |

अनुक्रमणिका

# संदर्भ सूची


- वसंतदादा पाटील; व्यक्ती आणि कार्य
  लेखक : विजयसिंह इनामदार
  प्रकाशक: सविता प्रकाशन, कळंबी, ता. मिरज, जि. सांगली.
  १९७०
- मंतरलेले दिवस
  लेखक: ग. दि. माडगूळकर
  प्रकाशक: साधना प्रकाशन, पुणे. १९८१
- महाराष्ट्राचा महापुरुष: वसंतदादा
  लेखक: भा. वि. धर्माधिकारी
  प्रकाशक: विश्वकर्मा प्रकाशन, सातारा. १९८५
- वसंत गौरव-गौरव ग्रंथ
  प्रकाशक: प्रा. रामकृष्ण मोरे, अध्यक्ष, गौरव ग्रंथ समिती, पुणे.
  १९८६
- राजयोग (वसंतदादा पाटील यांचे आत्मचरित्र)
  शब्दांकन: प्रा. मोहन पाटील
  प्रकाशक: अक्षर प्रकाशन, सांगली. १९९०
- मा. पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील अमृतमहोत्सवीजयंती समारोह सहकार
  विशेषांक-स्मरणिका
  प्रकाशक: स्मरणिका समिती, सांगली. १९९२
- मुख्यमंत्रिपदाच्या संदर्भात वसंतदादा पाटील यांच्या राजकीयनेतृत्वाचा अभ्यास
  लेखक: प्रा. डॉ. दिनकर विष्णू पाटील (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना सादर केलेला शोधप्रबंध) २००३
- पुरोगामी जीवनसफर (आत्मचरित्र)
  लेखक: भाई गणपतराव कोळी
  प्रकाशक: मधुकर रावकर२००८
- संघर्ष (आत्मचरित्र डायरी)
  लेखिका: डॉ. शालिनीताई वसंतराव पाटील
  प्रकाशक: विश्वमित्र प्रकाशन,बोरी, ता. इंदापूर, जि. पुणे. २०१०
- गर्जा महाराष्ट्र आपुला...
  लेखक: प्रा. डॉ. जे. के. पवार
  प्रकाशक: राज प्रकाशन, कोल्हापूर२०११
- राज्यातील विविध नियतकालिकांत व दैनिकांत प्रकाशित झालेल्या वसंतदादा पाटील यांच्यासंदर्भातील बातम्या व विशेष लेख.


अनुक्रमणिका



राजा माने (राजेंद्र ज्ञानोबा माने)

□ **जन्मगाव** – बार्शी, जि. सोलापूर.

□ **शिक्षण**– बी. ए. (तत्त्वज्ञान), एम. बी. ए. (मार्केटिंग अँड पर्सोनेल)

□ **पत्रकारिता कारकीर्द** – पत्रमहर्षी म. य. तथा बाबा दळवी व राजेंद्र दर्डा यांच्या नेतृत्वाखालील 'लोकमत पत्रकार प्रशिक्षण' योजनेतून १९८५ मध्ये औरंगाबाद येथून पत्रकारितेस प्रारंभ.
'लोकमत' समूहात जिल्हा प्रतिनिधी (परभणी),
शाखा व्यवस्थापक व वृत्तसमन्वयक (अहमदनगर),
वृत्तसंपादक (सांगली), आदी पदांवर काम.
कार्यकारी संपादक: पुढारी (पुणे, नगर)
कार्यकारी संपादक: पुण्यनगरी (कोल्हापूर, सोलापूर)
संपादक: दै. 'एकमत' (लातूर)
संपादक: सुराज्य (सोलापूर), आदी दैनिकांत काम.
सध्या 'लोकमत' च्या कोल्हापूर विभाग व कोकण आवृत्तीचे संपादक.

□ ग्रामीण अर्थकारण, राजकारण, लातूर-उस्मानाबाद जिल्ह्यांतील भूकंपग्रस्तांच्या प्रश्नांवर लेखन.

□ दक्षिण महाराष्ट्रातील महापूरग्रस्त व प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांवर लेखन.

□ **उल्लेखनीय**–महाराष्ट्र शासनाचे विविध विकासवार्ता पुरस्कार

- बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार •पत्रपंडीत पां. वा. गाडगीळ पुरस्कार
- बाबा दळवी शोध पत्रकारिता पुरस्कार •काकासाहेब खाडिलकर पुरस्कार
- प्रबोधनकार ठाकरे पुरस्कार • पद्मश्री विठ्ठलराव विखे-पाटील पुरस्कार
- नानासाहेब परुळेकर पुरस्कार •मणीभाई देसाई पुरस्कार • दा. प. आपटे पुरस्कार
- बार्शी नगरपालिकेच्यावतीने 'बार्शी भूषण' पुरस्कार देऊन नागरी सत्कार तसेच राज्यातील विविध संस्थांचे १७ पुरस्कार. • उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ.

□ विविध विषयांवरील पाच पुस्तके प्रकाशित. मुलीलाच **'वंशाचा दिवा'** मानणाऱ्या कुटुंबांची मनोगतेमांडणाऱ्या **'लेक माझी लाडकी'** या पुस्तकाचे लेखन-संपादन.

□ राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्यासमवेत ब्रिटन व सायप्रस या देशांच्या दौऱ्यात सहभागी.

अनुक्रमणिका